09-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SGB/ 10:00

09-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.1

SGB/ SBT/ MAP/ 10:00

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

उपसभापती : आता लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येतील. लक्षवेधी सूचना पुकारल्यानंतर संबंधित सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसतील तर ती लक्षवेधी सूचना पुन्हा चर्चेला घेतली जाणार नाही.

पृ. शी. : पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने संपादित करुनही पुनर्वसन करताना आवश्यक सुविधा अद्याप न पुरविणे

मु. शी. : पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने संपादित करुनही पुनर्वसन करताना आवश्यक सुविधा अद्याप न पुरविणे यासंबंधी सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील, संजय दत्त, मोहन जोशी, प्रतापसिंह मोहिते-पाटील, चरणसिंग सप्रा, जैनुद्दीन जव्हेरी, सय्यद जामा, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ.वसंत पवार, श्री.रमेश शेंडगे, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.संजय पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नगरविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) टेंभुर्डे, वळवली आदी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने अत्यल्प भावात संपादित करणे, सदर जमिनी सिडकोने ग्रामस्थांना विश्वासात न घेता परस्पर रिलायन्स कंपनीला एस्.ई.झेड्.साठी देणे, रिलायन्स कंपनीने या ठिकाणी भिंती उभारण्याचे काम सुरु करणे, या बांधकामामुळे येथील ग्रामस्थांचे नित्याचे व्यवहार ठप्प होणे, त्यामुळे ग्रामस्थांनी दिनांक ४ एप्रिल, २००९ व ५ एप्रिल, २००९रोजी भिंती उभारण्याचे काम बंद पाडण्यासाठी आंदोलन उभारणे, त्यामुळे या ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, यास्तव यासंबंधी शासनाने करावयाची उपाययोजना वा कार्यवाही."

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

09-06-2009 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.2

SGB/ SBT/ MAP/ 10:00

लक्षवेधी सूचना क्र.1....

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सिडकोने रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यातील टेंभुर्डे, वळवली आदी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. परंतु पुनर्वसन करताना गावठाणे सुरक्षित कशी राहतील यादृष्टीने आवश्यक सुविधांकडे दुर्लक्ष केले. पनवेल तालुक्यातील वळवली आदी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने अल्प किंमतीमध्ये संपादित केल्या. तेथे विकासाची कामे करताना भरावाचे काम रिलायन्स कंपनीकडून केले जात आहे. त्याठिकाणी गावठाणे खाली आणि भराव 2 ते 3 मीटर ऊंचीवर असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्याने त्यांना जीवन जगणे कठीण बनले आहे. या संदर्भात सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.विवेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले त्यावेळी दिलेल्या आश्वासनांची अद्याप सिडको प्रशासनाने पूर्तता केलेली नाही. त्या आश्वासनांची पूर्तता केव्हा करणार आहात?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये द्रोणागिरी, उलवे आणि कळंबोली या नोडस्मधील एकूण 2140 हेक्टर क्षेत्रामध्ये सिडको खाजगी गुंतवणूकदाराच्या सहभागाने नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्प राबवित आहे. सन्माननीय सदस्यांनी टेंभुर्डे आणि वळवली या दोन गावांचा उल्लेख केला आहे. या परिसरात ज्यावेळी सिडकोने आपल्या हद्दीमध्ये भिंत घालण्यास सुरुवात केली त्यावेळी अशी तक्रार करण्यात आली की, गावठाणे खाली राहून भरावाचा भाग वर जात आहे. तेथे पाण्याचा निचरा करण्यासाठी ड्रेनेजची कशी व्यवस्था केली जाणार आहे आणि दोन्ही गावाच्या गावठाणाबाबत तक्रारी होत्या त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील आणि ग्रामस्थांपुढे प्रेझेंटेशन झाले. सिडकोमार्फत कशी विकास कामे केली जाणार आहेत, त्यापासून गावकऱ्यांना कसा त्रास होणार नाही याची माहिती देण्यात आली. लवकरात लवकर त्यांचे समाधान करण्यासाठी सिडको प्रयत्न करेल.

श्री.जयंत प्र.पाटील : या परिसरात सिडकोकडून 25 वर्षापासून विकासाची कामे सुरु आहेत. सुरुवातीला उरण तालुक्यामध्ये विकासाची कामे सुरु झाली. विकासाची कामे करीत असताना अंतर्गत भराव व संरक्षण/कुंपण भिंत बांधण्याची कामे केली जात आहेत. यामुळे गावठाणे खाली आणि भराव ऊंचीवर असल्याचे शासनाच्या अनेक वर्षापूर्वी निदर्शनास आले असताना नवीन डेव्हलपमेंट करताना त्याठिकाणी गावठाणे व्यवस्थित राहतील.....

बी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

आणि पुन्हा जनतेला त्रास होणार नाही याची खबरदारी शासन घेणार काय ? यापूर्वी ज्या गावठाणातून तक्रारी आल्या आहेत त्यांची पूर्तता शासन करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, ज्यांच्या तक्रारी यापुढे येतील त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला जाईल.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: बोरामणी (दक्षिण सोलापूर) भागातील 46 गावांना उजनी धरणाचे पाणी मिळणे

मु.शी.: बोरामणी (दक्षिण सोलापूर) भागातील 46 गावांना उजनी धरणाचे पाणी मिळणे याबाबत सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

उपसभापती : लक्षवेधी सूचना देणाऱ्या दोन्ही सन्माननीय सदस्यांपैकी एकही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना पुन्हा चर्चेसाठी घेणार नाही.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पारोळा (जि.जळगांव) भागात कापसाचे बियाणे न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष

मु.शी.: पारोळा (जि.जळगांव) भागात कापसाचे बियाणे न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, सय्यद पाशा पटेल, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, भगवान साळुंखे, विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, हेमंत टकले, प्रा. फौजीया खान, सर्वश्री अरुण गुजराथी, जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, मोहन जोशी,सय्यद जमा, चरणसिंग सप्रा, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अनिल परब, सुरेश जेथलिया, गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर, किरण पावसकर, सतीश चव्हाण, श्रीमती मधु जैन, श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते व याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पारोळा (जि.जळगाव) तालुक्यातील प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे पारोळा, शहरातील कृषि केंद्रामधून राशी - 1 व राशी - 2 ची बी.टी.बियाणे न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या संतापाचा उद्रेक होऊन दिनांक 18 मे 2009 रोजी वा त्या सुमारास झालेल्या तुफान दगडफेकीत एका उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांसह 32 पोलीस कर्मचारी, आठ शेतकरी, तीन मुले जखमी होणे, तालुक्यातील शेतकऱ्यांना बियाण्याचे वितरण जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार करण्यात येणे, परंतु सुमारे चार लाख शेतकऱ्यांकडून या बियाण्यांची मागणी होत असताना केवळ 16 हजार 532 थैल्यांचे वाटप करण्यात येणे, यामुळे या शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध न होणे, तसेच काही दुकानदारांनी दुकाने वेळेवर न उघडल्याचेही निदर्शनास येणे, यामुळे शेतकऱ्यांना बी-बीयाणे पुरवठा करण्यात शासनाला आलेले अपयश बी-बियाणे पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान, शासन या गंभीर घटनेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याने शेतकऱ्यांच्या मनात शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, शासनाने या गंभीर प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना बी-बियाणे उपलब्ध करण्याची आवश्यकता व शासनाची यावर प्रतिक्रिया."

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पारोळा (जि.जळगांव) भागात बियाण्याच्या संदर्भात जो प्रसंग घडलेला आहे तशीच परिस्थिती राज्यात अनेक भागात आहे. गेल्या वर्षी अनेक ठिकाणी म्हणजे नांदेड, लातूर भागात बियाणे व खतांच्या संदर्भात तसेच विविध प्रश्नांवरुन मोठ्या प्रमाणावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. माननीय मंत्री महोदयांनी निवेदनात उपाययोजना सांगितलेल्या आहेत व ती म्हणजे बियाणे व खतांची साठेबाजी थांबविण्याची पावले उचलली आहेत. गेल्या वर्षी देखील अशाच प्रकारची साठेबाजी करणाऱ्या लोकांवर कोणती कारवाई केली याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. कारण दरवर्षी तोच प्रश्न आणि तेच उत्तर अशा साठेबाजांवर कारवाई झाली नाही तर एक प्रकारचे साटे-लोटे आणि दुष्टचक्र उभे राहिल्याचे दिसत आहे. म्हणून गेल्या वर्षी आढळून आलेल्या साठेबाजांवर काय कारवाई केली ? तसेच शेतकऱ्यांच्या मनात त्यामुळे एक प्रकारची भीती निर्माण झालेली आहे की, वेळेवर त्यांना बियाणे व खते मिळणार नाहीत. त्यासंदर्भात शासनाची कोणती उपाययोजना आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, एकाच प्रकारच्या बियाण्याची मोठ्या प्रमाणावर मागणी असे हे स्वरुप आहे. तसेच मागील वर्षीसंबंधीचा जो उल्लेख सन्माननीय सदस्या यांनी केला त्याबाबतीत विधानसभेत सविस्तर चर्चा झाली असून साठेबाजांवर कारवाई देखील आपण केलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मात्र राशी-1 व राशी-2 ही बी.टी. या कॉटनच्या बियाण्याची जास्त प्रमाणात मागणी होत असून या बियाण्याची उपलब्धता कमी आहे. यामध्ये शिस्त लावण्याचा प्रयत्न जिल्हाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यानंतर बियाण्यांची दुकाने उघडण्यात आली व बियाण्याचे वाटपही व्यवस्थित झाले, त्यात अडचण आली नाही. काही दुकानदारांनी मात्र न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहिली अशाच ठिकाणी ही परिस्थिती निर्माण झाली होती.

...5

अशुधारित प्रत / परिपृच्छासाठी नाही

पृ.शी.: कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांना पॅकेजअंतर्गत अनुदान न मिळणे व त्यांच्या विविध अडचर्णीबाबत

मु.शी.: कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांना पॅकेजअंतर्गत अनुदान न मिळणे व त्यांच्या विविध अडचर्णी या विषयावर सर्वश्री परशुराम उपरकर, संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, अरविंद सावंत वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

कोकण किनारपट्टीवरील मच्छिमारांची मत्स्यव्यवसायाच्या मंदीमुळे निर्माण झालेली हलाखीची परिस्थिती, समुद्रात मच्छिमारी होत नसल्यामुळे मत्स्यदुष्काळ जाहीर करण्याबाबत मच्छिमारांची होत असलेली मागणी, मच्छिमारांसाठी विशेष पॅकेज अंतर्गत छोटया मच्छिमारांना देण्यात येणारे रुपये 2000 अनुदान सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 9016 मच्छिमारांना तातडीने न मिळणे, त्याचबरोबर मासे खारवणे छोटया होडीद्वारे मासे पकडणे, मुळे काढणे, कुर्ल्या पकडणे, सिनारी, लागे व होडीवर काम करणारे खलाशी यांना तसेच उक्त जिल्ह्यातील सुमारे 800 मच्छिमार नौकांना पास, छोटया होडीधारकांना सबसिडीचे रॉकेल, फायबर बोटींना कर्ज, सहा टक्के दराने कर्ज पुरवठा व्हावा, सन 1998 पासून मत्स्य तुटवड्यामुळे एन. सी. डी. सी. गटाचे कर्जावरील व्याजमाफ होणेसाठी तसेच ज्यांनी पतसंस्था शेडयुल्ड बँक यांच्याकडून घेतलेल्या कर्जाची वसुली थांबावी व शेतकऱ्यांप्रमाणे कर्जमाफी मिळावी व अन्य असलेल्या कर्ज माफी मिळणेसाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया.

श्री. हसन मुश्रीफ (मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ MAP/

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सभागृहात वारंवार मच्छिमारांचा प्रश्न उपस्थित केला जातो पण शासन या मच्छिमारांच्या बाबतीत काहीच करीत नाही. माननीय मंत्री महोदयांनी वेगवेगळया उपाययोजना सांगितल्या पण त्या केवळ कागदावरच दिल्या जातात. कुठल्याही उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात नाही. मच्छिमारांची जी टक्केवारी काढताना ब्रिटीश काळातील पध्दती बदलण्याबाबत सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली त्यावेळी एक समिती नेमण्याचीही मागणी करण्यात आली. अशी समिती शासन नेमणार आहे काय ? तसेच जे छोटे 9016 मच्छिमार या पॅकेजमधून वगळले आहेत ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहेत. त्यांना मागील वर्षीचे आणि यावर्षीचे अनुदान एकत्रितपणे देण्याची तरतूद शासन करणार काय ? त्याचप्रमाणे जिल्ह्यात मत्स्य अधिकाऱ्यांची नेमणूक शासन तातडीने करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : शासन मत्स्यव्यवसायासंबंधी काहीही करीत नाही, हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य नाही. कारण महाराष्ट्र राज्य हे देशात पहिले राज्य आहे की, ज्या राज्याने यांत्रिकी नौका घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करुन दिले. तसेच मच्छिमारांना डिझेल स्वस्त दरात देऊन व्हॅटच्या परताव्यासह फायदा देण्याचा निर्णय घेतला आहे. अशा प्रकारे सन 2007-08 मध्ये 31 कोटीचे पॅकेज देखील मच्छिमारांसाठी शासनाने दिलेले आहे. ज्या 9016 मच्छिमारांना अद्याप अनुदान मिळालेले नाही त्यांचे प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाले असून त्याला मान्यता दिली जाईल. तसेच अधिकाऱ्यांच्या भरतीची प्रक्रिया देखील पूर्ण केली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सर्व मच्छीमारांचे कर्ज माफ करण्यात येईल असे याच सभागृहात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते परंतु नंतर मच्छीमारांना कर्ज माफी देण्याच्या संदर्भातील धोरण शासनाने बदलवले त्यामुळे मच्छीमारांच्या कर्जमाफीचे धोरण शासनाने का बदलवले याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. राज्यशासनाने विविध महामंडळांची कर्जे माफ केलेली आहे त्यामुळे शासन या मच्छीमारांची कर्जे माफ करण्याच्या दृष्टीने गंभीरपणे विचार करेल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, बजेट ज्यावेळी सादर झाले त्यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेल्या सर्व महामंडळांची कर्जे माफ करण्यात आली होती. मत्स्य कर्ज, मौलाना आझाद वित्तीय महामंडळ, खादीग्राम उद्योग महामंडळ अशांचा समावेश त्यामध्ये नव्हता. त्यामुळे आता याही लोकांची कर्जे माफ करण्याचा विचार शासन स्तरावर सुरु आहे. मत्स्य उद्योगाच्या संदर्भात महसूल मंत्री नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली कोकणच्या मत्स्य व्यवसायाठी काय पॅकेज द्यावे लागेल यासाठी समिती नियुक्त करण्यात आली असून या समितीचा अहवाल आल्यानंतर त्यांना यातून मुक्तता देण्याच्या संदर्भात शासन निश्चितपणे प्रयत्न करेल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, ब्रिटिश काळापासून कॅच पध्दत अंगीकारली जात आहे ती पध्दत बदलून नवीन पध्दत निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे काय? ब्रिटिश काळापासून चालत आलेली कॅच पध्दत बदलण्यासाठी शासन समिती नेमणकार आहे काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मत्स्य उत्पादनाच्या संदर्भात जी काही आकडेवारी आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी जी तक्रार केलेली आहे त्याबाबत समिती नेमून शास्त्रशुद्ध पध्दत करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मत्स्यव्यवसाय करणा-यांना मदत देण्याचे शासनाने नाकारलेले आहे. मत्स्यसदृष्य दुष्काळ परिस्थिती नसल्याने मत्स्य व्यवसाय करणा-यांना मदत देता येणार नाही, 50 टक्क्यापेक्षा कमी उत्पादन झालेले नाही त्यामुळे त्यांना मदत करता येणार नाही,एवढे एकच कारण शासनाने दिलेले आहे. परंतु शासनाने पुढे असे म्हटले आहे की, मासळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

दुष्काळाच्या संदर्भात 30 वर्षापूर्वी मार्गदर्शक तत्वे निश्चित झालेले आहे व त्यानुसार 50 टक्क्यापेक्षा मासळीचे उत्पादन कमी झालेले नसल्यामुळे त्यांना मदत करता येत नाही असा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. सन 1981 मध्ये मार्गदर्शक तत्वे तयार झाली होती त्यामुळे यातील निष्कर्ष काय आहेत याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. 30 वर्षापूर्वी यासंदर्भात जे निकष तयार झाले होते ते बदलण्याची आवश्यकता आहे त्यामुळे बदललेल्या परिस्थितीत त्या निकषामध्ये बदल करण्याचा शासनाकडून प्रयत्न केला जाणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मच्छिमारांचे प्रमाण कमी झालेले नसून मासेमारी करणा-यांची संख्या वाढलेली आहे, मासेमारी करणा-या बोटींची संख्या मोठया प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे 50 टक्क्यापेक्षा मासळीचे उत्पादन कमी झाले असे दिसत नाही. मघाशीच मी सन्माननीय सदस्य श्री. उपरकर साहेबांच्या प्रश्नाला उत्तर देतांना सांगितले आहे की, ही जी 1981 ची मार्गदर्शक तत्वे आहेत ती बदलण्यासाठी पुन्हा एकदा समिती नियुक्त केली जाईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, गेले चार पाच वर्ष सातत्याने सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर तसेच माजी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे प्रश्न विचारीत आहे की, डिझेल परतावा किती महिन्यांचा शिल्लक आहे व केंद्रीय डिझेल परताव्याचे 4 कोटी रुपयांची देयके बाकी आहेत ते कधी देण्यात येईल ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, डिझेलच्या परताव्याची रक्कम किती आहे याची मला माहिती नाही परंतु ही सर्व माहिती मी पटलावर ठेवतो. परंतु माझ्या मते कुठलीही बाकी शिल्लक राहिलेली नाही.

श्री. राजन तेली : सन 2020 पर्यंत भारतीय समुद्रातील मासे नष्ट होतील असा इशारा सेंट्रल इंडस्ट्रीज ऑफ फिशरीज एज्युकेशनने दिलेला आहे काय ? जर अशा प्रकारचा धोक्याचा इशारा दिला असेल तर त्यासंदर्भात आपण काय कारवाई केली ? तसेच असिस्टंट कमिशनरांची पोस्ट 3 वर्षापासून सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये नाही त्यामुळे हे पद सिंधुदुर्ग जिल्हयात केव्हा भरण्यात येईल ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सेंट्रल इंडस्ट्रीज ऑफ फिशरीज एज्युकेशनने जो इशारा दिलेला आहे त्याची माहिती माझ्याकडे नाही परंतु या इशा-याच्या संदर्भात निश्चितपणे मी माहिती घेतो. तसेच सिंधुदुर्ग जिल्हयात जी पदे रिक्त आहे ते पद तत्वरीत भरले जातील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्याबाबत.

उपसभापती : आता लक्षवेधी सूचना 5 घेण्यात येईल. या लक्षेवधी सूचनेला गृहखात्याने उत्तर द्यावयाचे होते परंतु संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित नाही. आता एक जी लक्षवेधी सूचना राहिलेली ती संपण्याच्या अगोदर गृहविभागाचे मंत्री महोदय आले तर निश्चितपणे ही लक्षवेधी घेतली जाईल, असेही झाले नाही तर दुपारच्या सत्रात या लक्षवेधी सूचनेचा अंतर्भाव केला जाईल. त्यामुळे गृहमंत्र्यांना तातडीने बोलावून घेण्यात यावे.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय उपसभापतींना सभागृहाच्या बैठकीच्या वेळेत बदल झाल्याची माहिती कळविण्यात न आल्याबाबत

उपसभापती : सभागृहाची बैठक 10.00 वाजता आहे याची माहिती मला एक तासापूर्वी मिळाली. मी फक्त दाढी करुन येथे आलेलो आहे.मला सन्माननीय सभापती महोदयांनी फोन करुन सभागृहाची बैठक आज 10.00 वाजता आहे असे सांगितले. प्रशासनाच्या कामाच्या संदर्भातील उल्लेख मी या ठिकाणी करणार नव्हतो परंतु या ठिकाणी उपस्थित असलेल्या विधानमंडळाच्या अधिका-यांनी सभागृहाची बैठक आज किती वाजता आहे यासंदर्भात काल जो काही निर्णय झालेला आहे त्याची माहिती मला कळविण्याचे साधे सौजन्य देखील दाखवले नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : आम्हाला एस.एम.एस. पाठविण्यात आला होता.

उपसभापती : ठीक आहे. चौकशी केल्यानंतर मला असे समजले की, माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेते माननीय सभापतींकडे गेले होते आणि त्यांनी माननीय सभापतींना अशी विनंती केली होती की, उद्या सकाळी 10.00 वाजता बैठक घेण्यात यावी . वास्तविक आज सकाळी 10.00 वाजता मी सभागृहाची बैठक घेणारच होतो परंतु 11.00 वाजता बैठक घ्यावी असे मला सर्वांनी सागितले होते. त्यामुळे मी किती दहशतीखाली काम करतो हे आपण पहावे. मी विरोधी पक्ष नेत्यांना आणि गट नेत्यांना वारंवार विनंती केली होती की सकाळी 10.00 वाजता बैठक घेण्यात यावी तरी सुध्दा त्यांनी मला सांगितले की , 11.00 वाजता बैठक घेण्यात यावी. त्यांच्या विनंतीचा मी मान राखला होता. त्यानंतर दोघेही माननीय सभापतींकडे गेले होते आणि लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सकाळी 10.00 वाजता बैठक घेण्याची त्यांनी विनंती केली होती .त्यांनी ही विनंती मान्य केली होती. सचिव महोदय, या बाबतीत मला कळविणे हे आपल्या कार्यालयाचे कर्तव्य होते . माननीय सभापती महोदय मला याबाबतीत कळवितात आणि आपले कार्यालय मात्र निष्क्रीय राहते .

सचिव : आम्ही एस.एम.एस. केलेले आहेत.

The Deputy Chairman: Mr. Secretary, you should have informed me and the hon. Members of the House by phone. प्रत्येकजण एस.एम.एस वाचतोच असे नाही. केवळ एस.एम.एस. पाठविले आहेत असे सांगून चालणार नाही.अशा प्रकारे जर सभागृहाच्या कामकाजाच्या वेळेत बदल झाला असेल तर प्रत्येक सदस्यांना फोन करुन आपण कळवावे.

सह सचिव : याबाबतीत दखल घेण्यात येईल.

उपसभापती : याबाबतीत आपण सभागृहाला सांगावे. या बाबतीत दखल घेण्यात येईल असे आता आपण सांगत आहात म्हणजे मी दखल घेतल्यानंतर आपण दखल घेण्यात येईल असे सांगत आहात. This is absolutely wrong. वास्तविक माननीय सभापतींनी मला फोन करुन सांगितले हा त्यांचा चांगुलपणा आहे. अन्यथा मला सुध्दा सकाळी 10.00 वाजता सभागृह आहे हे समजले नसते. पाचवी लक्षवेधी सूचना माननीय गृह मंत्र्यांशी संबंधित आहे ते आता सभागृहात उपस्थित नाहीत तेव्हा त्यांना उपस्थित राहण्या सबंधीचा निरोप पाठविण्यात यावा. सकाळी दहा वाजता सभागृह आहे हे त्यांनासुध्दा माहीत नसेल त्यामुळे यामध्ये त्यांचासुध्दा काही दोष असेल असे नाही.यानंतर सहावी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : केन्द्र शासनाच्या अंत्योदय योजनेतंर्गत राज्य शासनातर्फे वाटप करावयाच्या धान्याचे वाटप अद्यापि न होणे

मु.शी : केन्द्र शासनाच्या अंत्योदय योजनेतर्गत राज्य शासनातर्फे वाटप करावयाच्या धान्याचे वाटप अद्यापि न होणे यासंबंधी ॲड.अनिल परब ,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

डॉ.नीलम गो-हे : ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी.

उपसभापती : या ठिकाणी जेवढया लक्षवेधी सूचना मांडण्यात आल्या होत्या त्या सर्व मी येथे वाचल्या आहेत. लक्षवेधी सूचना देणारे जे सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत त्यांची लक्षवेधी सूचना मी पुन्हा घेणार नाही हे मी प्रथमच स्पष्ट केलेले आहे.सहावी लक्षवेधी सूचना देणारे सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत मात्र त्याला उत्तर देणारे मंत्री महोदय उपस्थित आहेत. ते उत्तर देण्यास तयार आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पाचव्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देणारे माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

उपसभापती : ती लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलतो.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय येत आहेत.

उपसभापती : त्यांची किती वेळ वाट पहावयाची. सबंधित लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलतो. . सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 18 मिनिटांनी, सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 च्या प्रस्तावावर माननीय सभापतींनी दिलेला निर्णय

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी काल नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यासंबंधी प्रस्ताव दिला होता. त्यासंबंधी मी काल निर्णय दिला नव्हता. तो निर्णय देण्यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी या सभागृहामध्ये अर्थसंकल्पाचे भाषण करीत असतांना राज्यातील सिंचनाच्या अनुशेषासंबंधी उल्लेख केला होता. त्यांनी असे सांगितले होते की, अनुशेषग्रस्त विभागामध्ये आता सिंचनाचा अनुशेष शिल्लक राहणार नाही. अशाप्रकारचे त्यांचे अर्थसंकल्पाच्या भाषणामधील वाक्य हे विदर्भ, मराठवाडा व कोकण या विभागांची फसवणूक करणारे आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी या सभागृहाची नव्हे तर विदर्भ, मराठवाडा, खानदेश व कोकण या विभागांची देखील फसवणूक केली आहे. या विभागामधील सिंचनाचा अनुशेष अजूनही कायम आहे. म्हणून विदर्भ, मराठवाडयाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये "सिंचनाच्या क्षेत्रामध्ये राज्यात सन 2000 साली असलेला 5 हजार 501 कोटी रुपयांचा मूळ अनुशेष वेळोवेळी आवश्यक ती तरतूद केल्याने घट होऊन मार्च, 2009 अखेर आता केवळ 947 कोटी रुपये इतकाच राहिला आहे. या वर्षी सन 2009-10 मध्ये हा संपूर्ण अनुशेष दूर करण्याकरिता मी नियतव्यय उपलब्ध केला आहे. त्यामुळे आता राज्यात सिंचनाच्या क्षेत्रात आर्थिक अनुशेष शिल्लक राहिलेला नाही" असे म्हटले आहे. त्यामुळे ही विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या विभागातील लोकांची अत्यंत फसवणूक आहे. आणि म्हणून ही वस्तुस्थिती जनतेसमोर यावी यासाठी या अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा झाली पाहिजे अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आम्ही या महत्वाच्या विषयासंदर्भात नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. मूळामध्ये माननीय वित्त मंत्र्यांचे अंदाजपत्रकाच्या संदर्भातील जे भाषण आहे, त्यामध्ये "आता अनुशेष संपुष्टात आलेला आहे" अशा प्रकारचा अधिकृत उल्लेख येणे हे अत्यंत चुकीचे आहे. या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्रामध्ये सर्वात महत्तम असा अनुशेष जर कशाचा वाढला असेल तर तो जल सिंचनाच्या बाबतीत वाढलेला आहे. मी आपला वेळ दोन मिनिटांपेक्षा जास्त घेत नाही. आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मान्य करणे का आवश्यक आहे ? तर जून 1982 एकंदर 14 जिल्हयांमध्ये अनुशेष होता, जून 1994 मध्ये 19 जिल्हयांमध्ये अनुशेष होता आणि काल-परवा सदनामध्ये जून 2007 मधील अहवाल सादर केलेला आहे, त्यानुसार आता 23 जिल्ह्यांमध्ये अनुशेष आहे. राज्याचा अनुशेष 1982 मध्ये 924 हजार हेक्टरचा होता, 1994 मध्ये तो 1653 हजार हेक्टरपर्यंत वाढला आणि 2007 मध्ये तो 1870 हजार हेक्टर इतका झाला. विदर्भाचा अनुशेष 1982 मध्ये . . .

सभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी दोन मिनिटांच्या वर जास्त वेळ घेत नाही. मी माझे बोलणे 11 वाजून 05 मिनिटांनी सुरु केले असून ते 11 वाजून 07 मिनिटांनी संपविणार आहे. हा महत्वाचा विषय आहे आणि त्यावर नियम 289 अन्वये चर्चा होणे का आवश्यक आहे ? तेवढेच मला सांगावयाचे आहे. कोणत्या भागातील अनुशेष दूर झाला ? तर एकही भाग नाही. मी आपल्याला तीन-चार भागांविषयी सांगतो. 1982 विदर्भाचा अनुशेष 527 हजार हेक्टर इतका होता, 1994 मध्ये तो 853 हजार हेक्टर इतका झाला आणि 2000 मध्ये तो 1065 हजार हेक्टर इतका झाला. मराठवाडयातील अनुशेष 1982 मध्ये 2060 हजार हेक्टर इतका होता, 1994 मध्ये तो 4100 हजार इतका झाला आणि आता 2007 मध्ये तो 2493 हजार हेक्टर इतका झाला आहे. आता केवळ एक मिनिट राहिलेले आहे. अमरावती महसूल विभागाचा 1982 मध्ये 417 हजार हेक्टरचा अनुशेष होता, 1994 मध्ये तो 726 हजार हेक्टर इतका झाला आणि 2007 मध्ये 888 हजार हेक्टर इतका झाला. कोकणातील परिस्थिती सुध्दा तशीच आहे. 1982 मध्ये 5000 हेक्टर इतका अनुशेष होता, 2007 मध्ये 9000 हजार इतका झाला. माझे एवढेच आहे की, ...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे लवकर मांडावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी माझे बोलणे बरोबर दोन मिनिटामध्ये संपविणार

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.अजून दुसरे मिनिट पूर्ण व्हावयाचे आहे.आपण मला संधी द्यावी.सभापती महोदय, हा राज्यातील अनुशेषासंबंधीचा प्रश्न आहे.राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्रातील कोणत्याही सत्शील माणसाला लाजेने मान खाली घालण्याची वेळ यावी अशी स्थिती आलेली आहे. मराठवाडा, कोकण इ.भागामध्ये फिजिकल बॅकलॉग वाढलेला आहे आणि शासन रुपयाची गोष्ट करीत आहेत. आज रुपयाची किंमत पाहिली तर तो दस पटीने वाढलेला आहे. मी दोन मिनिटापेक्षा जास्त वेळ घेणार नाही. मी सांगितल्याप्रमाणे दोन मिनिटांमध्ये माझे बोलणे संपविणार आहे.म्हणून माझे एवढेच म्हणणे आहे की, आपण सर्वजण महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये शिरताना सिंचनाच्या अनुशेषाच्या प्रचंड डोंगरावर बसलेलो आहोत. याची चर्चा झाली पाहिजे. शासनाने हे सगळे कुठून काढले आहे ? अंदाजपत्रकाच्या संबंधाने याची चर्चा झाली पाहिजे. याठिकाणी सायटेशन दिलेले आहे, म्हणून आम्ही प्रश्नोत्तराचा तास तहकूब करावा असे म्हटलेले आहे. परंतु आमची मनापासून अशी इच्छा आहे की, प्रश्नोत्तराचा तास व्हावा, पण आज किंवा उद्या या प्रश्नाच्या संदर्भातील चर्चा मंजूर करण्यात यावी अशी आमची विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंगजी फुंडकर, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी, तसेच सर्वश्री.नितीन गडकरी, केशवराव मानकर, कपिल पाटील, गोपीकिसन बाजोरिया यांनी नियम 289 अन्वये काल प्रस्ताव दिला होता. मी काल याबाबतीत निर्णय घेतला नव्हता. आज मी याबाबतचा निर्णय देत आहे. आज 2009-2010 च्या अर्थसंकल्पावर चर्चा होणार आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्यांना यासंबंधात जे मुद्दे विस्ताराने मांडावयाचे असतील, त्यामध्ये या विषयाचाही परामर्श घेणे शक्य आहे. आजच्या दिवसाची कामकाज पत्रिका पाहिली तर याठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे, त्यासंबंधात कामकाज पत्रिकेवर काही विषय दिसत नाही, म्हणून मी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, तो मी स्विकारणार नाही. याठिकाणी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची ही भावना आहे की, विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्र येथील महत्वाच्या प्रश्नासंबंधात अजून विस्ताराने चर्चा व्हावी असे एकंदरीत सन्माननीय सदस्यांचे मनोगत आहे असे वाटते. मी या अधिवेशनामध्ये यासंदर्भात दीड तासाची चर्चा उपस्थित करण्यासाठी जरुर अनुमती देईन, पण मी आज देणार नाही. मी दीड तासाच्या चर्चेची वेळ माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य यांच्याशी जरुर चर्चा करुन ठरवेन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

मौजे माजिवडे (जि.ठाणे) येथील मे.नॅशनल स्टोन क्वॉरी कंपनीने भारत सरकारच्या मालकीची जागा अनधिकृतपणे वापरल्या प्रकरणाची चौकशी

(१) * ५०३१६ श्री. पांडुरंग फुंडकर, श्री.सय्यद पाशा पटेल, श्री. जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ. वसंत पवार, श्री. संजय पाटील, श्री. राजेंद्र जैन : ताराकिंत प्रश्न क्रमांक ४६३४६ ला दिनांक २२ डिसेंबर,२००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.नॅशनल स्टोन क्वॉरी, मौजे माजिवडे (जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.१९४/१ ही भारत सरकारच्या मालकीची जागा भाडेपट्टीची कोणतीही नोंद नसताना अनधिकृतपणे वापरल्याबद्दल त्यांची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जागेवर होत असलेल्या बांधकामास स्थगिती देणे तसेच जागेची कोणत्याही प्रकारची खरेदी-विक्री न करणे याबाबत निर्णय घेण्यासाठी सर्व संबंधितांची एकत्रित बैठक घेण्याचेही मा.महसूल राज्यमंत्री महोदयांनी दिनांक २२ डिसेंबर, २००८ रोजी मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

डॉ.पंतगराव कदम : (१), (२) (३) होय, हे खरे असून सदर प्रकरणी तत्कालीन मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी दिनांक २२.१२.२००८ रोजी मा.सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार शासनाच्या दिनांक २२.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रश्नाधीन जमिनीमध्ये कोणतीही बांधकामे करण्यास तसेच त्यामधील गाळे/सदनिका यांची विक्री करण्यास स्थगिती देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक २३.१२.२००८ सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक २४.१२.२००८ तसेच सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग -१ ठाणे शहर यांनी त्यांच्या दिनांक २३.१२.२००८ रोजीच्या पत्रान्वये सदरचे आदेश सर्व संबंधितांना कळविले आहेत.

दरम्यान प्रश्नाधीन जमीन ही भारत सरकार व मध्य प्रदेश शासनाच्या मालकीची असल्याने याबाबत सर्व संबंधितांची बैठक शासनस्तरावर होऊन त्याबाबत निर्णय घेण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी विभागीय आयुक्त, कोकण तसेच शासनाकडे सादर केला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या तीन अधिवेशनामध्ये सतत हा प्रश्न विचारला जात आहे आणि त्याचे उत्तरही तेच-तेच दिले जात आहे. हा प्रश्न मे.नॅशनल स्टोन क्वॉरी, मौजे माजिवडे (जि.ठाणे) येथील सर्व्हे क्र.194/1 येथील असून, सदरहू एरिया जवळपास 52 हजार चौ.मी.क्षेत्रफळाचा आहे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

ता.प्र.क्र.50316....

श्री. पांडुरंग फुंडकर...

ही जमीन भारत सरकारच्या मालकिची आहे व भारत सरकारने प्रॉव्हिडंन्ट फंड कंपनीकडे देखरेखीसाठी दिलेली होती. प्रॉव्हिडंन्ट फंड कंपनीचे मॅनेजर श्री. प्रधान हे होते. या मॅनेजरनी ती जमीन मे. नॅशनल स्टोन क्वारी कंपनीला भाडेपट्टयावर दिली होती. वर्षाला तिचा भाडेपट्टा फक्त 3600 रुपये आहे. ही जमीन 99 वर्षाच्या लिजवर दिली होती. दगड व माती काढण्यासाठी दिलेल्या जमिनीवर बिल्डिंग उभ्या राहिल्या आहेत. माझा मूळ प्रश्न असा आहे की, जमीन पहिल्यांदा भाडेपट्टयाने देतांना भारत सरकारची परवानगी घेतली होती काय? दगड व माती काढण्यासाठी जमीन दिली असेल तर त्या ठिकाणी बिल्डिंग उभ्या राहिल्या आहेत किंवा उभ्या राहात आहेत त्यांना एन.ओ.सी. कोणी दिली, त्याचा एन.ए. कोणी केला? अनधिकृतपणे एन.ए. देऊन बांधकामास परवानगी दिली असेल आणि परवानगी न घेता जमीन ट्रान्स्फर केली असेल तर या संपूर्ण प्रकरणाची चोकशी करण्याची मी मागणी केली होती. मागील अधिवेशनात माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले होते की, "माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेले म्हणणे बरोबर आहे. मी त्यामध्ये एवढाच एक मुद्दा समाविष्ट करतो तो म्हणजे सदर जमीन, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम 1976 च्या कलम 34 खाली होती आणि या कायद्याखाली चौकशी झालेली आहे. आपणास माहीत आहे की, यु.एल.सी. ॲक्ट रिपिल झाला आहे. मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सदर प्रकरणी एका आठवडयाच्या आत चौकशी करुन अहवाल दिला जाईल."

सभापती महोदय, दिनांक 22-12-2008 ला हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सन्माननीय तत्कालीन राज्य मंत्र्यांनी एका आठवडयाच्या आत चौकशी करुन अहवाल देण्यात येईल असे सांगितले होते. तेव्हा या संसबंधिची चौकशी केली आहे काय? याचे एन.ए. कोणी केले आणि बांधकामास परवानगी कोणी दिली? बांधकामास परवानगी दिली असेल तर संबंधित अधिकाऱ्यावर काय कारवई केली?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, ही जमीन ओरिजनली ग्वाल्हेर महाराजांची होती. या देशाला 1947 साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते संस्थान खालसा झाले आणि ती जमीन भारत सरकारच्या मालकिची झाली. ग्वाल्हेर सरकारची प्रॉव्हिडंन्ट फंड नावाची कंपनी होती. त्या कंपनीचे श्री. प्रधान हे मॅनेजर होते. भारत सरकारने या श्री. प्रधान यांना त्या जमिनीची देखभाल

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यास सांगितले होते. पण श्री. प्रधान यांनी परस्पर हा व्यवहार केला. या जमिनीशी राज्य सरकारचा काही संबंध नाही. भारत सरकारची जमीन, त्या जमिनी बाबत झालेला व्यवहार,हा खरे म्हणजे पार्लमेंटचा प्रश्न आहे. त्यानंतर ती जमीन दुसऱ्या कंपनीला देण्यात आली. त्यांनंतर त्यांचे कोर्टात कॉम्प्रोमाईस झाले. कोर्टाने कलेक्टरला आदेश दिले म्हणून कलेक्टरने एन.ओ.सी. दिली.सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारल्यानंतर त्या ठिकाणी जी बिल्डिंड बांधली आहे, त्यातील फ्लॅट विकायला बंदी घातलेली आहे. तसेच राहिलेल्या जमिनीवर बांधकाम करण्यास बंदी घातलेली आहे. ही कारवाई केली असली तरी सुध्दा मूळ प्रश्न असा आहे की, त्या जमिनीची मालकी ही भारत सरकारची आहे. भारत सरकार हे एजंट आहे. त्यामुळे यासंबंधात त्यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे असे भारत सरकारला वरचेवर लिहिले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : हे प्रकरण हायकोर्टात गेले आणि हायकोर्टाने परवानगी दिली असे म्हणणे खरे नाही. मूळ व्यवहार चुकीचा झालेला आहे. व्यवहार चुकीचा झाला असेल तर शासनाच्या अधिकाऱ्यांना एन.ओ.सी. देण्याचा आणि एन.ए. करण्याचा काय अधिकार आहे? ती जमीन भारत सरकारच्या मालकिची आहे. भारत सरकारने ती प्रॉव्हिडंन्ट कंपनीकडे देखरेखीसाठी दिली होती. त्यांनी तिसऱ्या कंपनीला लिजवर दिली होती. त्या ठिकाणी दगड व माती काढण्याचा व्यवहारासाठी ती जमीन लिजवर दिली गेली. त्या ठिकाणी बांधकामास परवानगी देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कोटयावधी रुपयाची ती जमीन आहे. त्या जमिनीचा व्यवहार झालेला आहे. संबंधित अधिकाकऱ्यांनी याबाबतीत सर्व प्रकारचा व्यवहार केला असेल तर त्यासंबंधात त्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरणार काय? यासंबंधीची सर्व जबाबदारी भारत सरकारवर लोटून चालणार नाही. ही भारत सरकारची जमीन असेल तर महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी परवानगी कशी दिली. म्हणून याबाबतीत जो व्यवहार झालेला आहे त्या व्यवहाराची सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करणार काय?

डॉ. पतंगराव कदम :सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, भारत सरकार आणि ही कंपनी एकत्र आले आणि त्यांनी कोर्टात कॉम्प्रोमाईस केले. त्यामुळे कलेक्टरनी एन.ओ.सी. दिली.

यानंतर श्री. बरवड....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50316 ..... डॉ. पतंगराव कदम...

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले त्याप्रमाणे हा सगळा जो प्रकार आहे त्याची फेरचौकशी करु. त्यामध्ये कोण दोषी आहेत, कोर्टाचा निर्णय काय आहे हे बघून त्यामध्ये आपल्या राज्याचे अधिकारी दोषी असतील तर चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल्.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचारी बनावट पावती पुस्तक वापरुन लाखो रुपयांचा केलेला भ्रष्टाचार

(२) * ५१०१४ श्री.सय्यद जमा , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सय्यद पाशा पटेल : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचारी बनावट पावती पुस्तक वापरुन लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करीत असल्याचे माहे जुलै,२००८ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कार्यालयातील भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सुरु असलेला भ्रष्टाचार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतीश पाटील, श्री.सुरुपसिंग नाईक यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती येथे एफ.आय.आर. दाखल करण्यात आला असून दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या ठिकाणी असा प्रश्न विचारलेला आहे की, सदरहू कार्यालयातील भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सुरु असलेला भ्रष्टाचार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ? या प्रश्नाला असे उत्तर दिले आहे की, पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. अमरावती सोडून पूर्ण महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी आर.टी.ओ.ची कार्यालये आहेत त्या ठिकाणी अनेक भ्रष्टाचार होत आहेत. यामध्ये फक्त एफ.आय.आर. दाखल करुन कारवाई होईल काय ? आर.टी.ओ. बद्दल आमदार, खासदारांच्या ज्या तक्रारी येतात त्याबाबत आतापर्यंत कोणती कारवाई केलेली आहे.

श्री. सतीश पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यापेक्षा वेगळा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. या प्रकरणामध्ये जे जे दोषी आढळून आले त्यांच्या विरोधात एफ.आय.आर. दाखल केलेला आहे. त्या अनुषंगाने विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. इतर ठिकाणी ज्या तक्रारी येतात त्यासंदर्भात नोंद घेऊन आपण कारवाई करतो.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या एफ.आय.आर. मध्ये कोणकोणती कलमे लावलेली आहेत ? ज्यांच्यावर कारवाई केली त्यांची नावे काय ? या प्रकरणाची सद्य:स्थती काय आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 51014 .....

श्री. सतीश पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाची व्याप्ती अतिशय मोठी आहे. या ठिकाणी बनावट पावत्यांच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. त्या ठिकाणी बनावट पावत्या नव्हत्या. मूळ पावती पुस्तके गहाळ झालेली होती त्यात खाडाखोड करुन गैरव्यवहार केलेला आहे. यामध्ये जवळपास 21 लोक दोषी आढळून आले आहेत. त्यांच्यावर 409, 420, 468, 471 आणि 34 अशा प्रकारची कलमे लावलेली आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यामध्ये किती कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे ? द्रुतगती न्यायालयामध्ये जाऊन लवकरात लवकर या लोकांना शिक्षा होईल यासाठी शासन काय पावले उचलणार आहे ?

श्री. सतीश पाटील : सभापती महोदय, एकूण 253 प्रकरणे आहेत. यामध्ये 22 लाख 26 हजार 199 रुपये एवढ्या रकमेचा गैरव्यवहार झालेला आहे. या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी असल्यामुळे आपल्या स्तरावर देखील एक चौकशी समिती नेमलेली होती. त्या चौकशीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये जे जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम सुरु केलेले आहे. या कामाला द्रुतगती देण्याच्या संदर्भात सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत या समितीच्या अहवालाप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

गेवराई तालुक्यात (जि.बीड) गोदावरी नदीच्या पात्रातून वाळूचा अनधिकृतरित्या होत असलेला उपसा

(३) * ५०६८३ श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यात (जि.बीड) येथे गोदावरी नदीच्या पात्रातून माहे जानेवारी, २००९ पासून मोठ्या प्रमाणावर वाळूचा अनधिकृतरित्या उपसा होत असतांना त्यांच्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.पंतगराव कदम : (१), (२) व (३) गेवराई तालुक्यात (जि.बीड) माहे जानेवारी, २००९ पासून आजतागायत गोदावरी नदीपात्रातून अनधिकृत वाळू उत्खनन व वाहतुक केल्याबाबतची एकूण ५ प्रकरणे निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने संबधिताविरुध्द दंडात्मक कारवाई करून रू.४०,३००/- इतकी दंडाची रक्कम वसुल केली आहे. तसेच अवैध वाहतुक करणाऱ्यांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाई करुन रु. 40,300 इतकी दंडाची रक्कम वसूल केली आहे अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. या संबंधितांची नावे काय आहेत ? त्यांच्या विरोधामध्ये कोणत्या कलमाखाली गुन्हा दाखल केलेला आहे ? बीड जिल्ह्यामध्ये ज्या प्रमाणामध्ये वाळू उपसा करण्यास परवानगी आहे त्यापेक्षा जास्त वाळू उपसा केला जातो. मोठ्या नदीप्रमाणेच छोट्या नद्यांमधूनही वाळू उपसा केला जातो. याची चौकशी केली जाईल काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, यामध्ये श्री. सदाशिव आनंद घोरपडे यांना 3100 रुपये दंड झालेला आहे. श्री. बबन जाधव शहागड यांना 3100 रुपये दंड झालेला आहे. श्री. बाबाराव साळवे यांना 3400 रुपये दंड झालेला आहे. श्री. विनोद राधाकिसन झंवर यांना 15,400 रुपये दंड झालेला आहे आणि श्री. पाराजी बाबासाहेब माने यांना 15,300 रुपये अशा प्रकारे एकूण 40,300 रुपये दंड वसूल केलेला आहे. प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून सीआरपीसीच्या कलम 144(3) खाली अधिसूचना काढलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

तारांकित प्रश्न क्रमांक 53011

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

१ जानेवारी, २००९ पासून ६ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याची मागणी

(५) *५०४४६ श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १ जानेवारी, २००९ पासून केन्द्र शासनाने त्यांचे कडील कर्मचाऱ्यांना व निवृत्ती वेतनधारकांना ६ टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचे मान्य केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केन्द्र शासनाप्रमाणे महागाई भत्ता जसाचा तसा देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केन्द्राप्रमाणे वाढीव महागाई भत्ता तातडीने लागू करावा यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?
डॉ.सुनील देशमुख, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (१) होय.
(२) ते (४) केंद्र शासनाप्रमाणे ६ टक्के महागाई भत्त्याचा हप्ता राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व निवृत्ती वेतन धारकांना लागू करण्याबाबतचे आदेश अनुक्रमे दिनांक २ मे, २००९ व ५ मे, २००९ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, 25 शिक्षक कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारा हा प्रश्न आहे. सहावा वेतन आयोग जसाच्या तसा लागू करण्यासाठी 12.6.2009 रोजी राज्य स्तरावर आंदोलन होणार आहे. यापूर्वीही आंदोलने झाली, परंतु शासनाने केंद्राप्रमाणे वेतन आयोग लागू केला नाही. यापूर्वी सन्माननीय वित्त मंत्र्यांनी असे उत्तर दिले आहे की, वित्त विभागाचा जी.आर.निघाल्यानंतर इतर विभागासाठी जी.आर.काढण्याची आवश्यकता नाही. तरीही प्रत्येक विभागाला यांच्या विभागाच्या जी.आर.नंतर जी.आर.काढावा लागतो. या जी.आर.ची वेतनश्रेणीसहित 22 टक्के डी.ए.शासकीय कर्मचा-यांना जून, पेड इन जुलैमध्ये दिला जाणार आहे. त्यानंतर शालेय शिक्षक कर्मचारी व इतर कर्मचा-यांना जुलै पेड इन ऑगस्ट महिन्यात काटेकोरपणे लागू करण्यात येईल काय ?

डॉ.सुनील देशमुख : हा प्रश्न 6 टक्के डी.ए.संबंधी विचारलेला आहे. त्यामुळे वेतन आयोगाचा प्रश्न येत नाही. हा 6 टक्के 1.1.2009 पासून डी.ए.लागू केलेला आहे.

श्री.डी.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आले नाही.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांच्या प्रश्नाचे उत्तर आले नाही. मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरच रिपीट केले आहे. या कर्मचा-यांना जून पेड इन जुलै महिन्यात डी.ए.लागू केला जाईल काय आणि केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचे मान्य केलेले असताना शिक्षकांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मात्र केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी देण्याचे नाकारले आहे हे खरे आहे काय आणि ती त्यांना देणार की नाही ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न 6 टक्के डी.ए.संबंधी विचारलेला आहे, सहाव्या वेतन आयोगासंबंधीचा हा प्रश्न नाही. या कर्मचा-यांना 6 टक्के डी.ए.लागू केलेला आहे.

श्री.डी.यू.डायगव्हाणे : वित्त विभागाने म्हटले आहे की,शासकीय कर्मचा-यांना जून, पेड इन जुलै महिन्यात 6 डी.ए.लागू होणार आहे. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाला याच जी.आर.च्या धर्तीवर जुलै, पेड इन ऑगस्ट महिन्यात सुधारित वेतनश्रेणी मिळणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : वित्त विभागाने काढलेल्या जी.आर.ची अंमलबजावणी होईल.

प्रा.बी.टी.देशमुख : वित्त विभागाने लेखी उत्तरात म्हटल्याप्रमाणे 2 मे, 2009 रोजी जी.आर.काढलेला आहे. सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा शासनाने निर्णय घेऊन त्याबाबतचा वित्त विभागाने दि.27.2.2009 रोजी जी.आर.सुध्दा काढलेला आहे. शिक्षकांच्याबाबत अनेक त्रुटी आहेत, त्याबाबत मी विचारणार नाही, त्यासाठी स्वतंत्र चर्चा करता येईल. पण मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही. वित्त विभागाने एक जी.आर.शासकीय कर्मचा-यांसाठी काढला. परंतु माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी जी.आर.काढला नाही. त्यामुळे त्यांना 6 टक्के डी.ए.मिळणार नाही. या जी.आर.मध्ये असे म्हटले आहे की, "शासन असे आदेश देत आहे की, दिनांक 1 जानेवारी, 2009 पासून सुधारित वेतन संरचनेतील वेतन बॅण्ड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या वर 16 टक्के वरुन 22 टक्के करण्यात यावा. म्हणजे नवीन वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे त्यांना पेबॅण्ड व ग्रेडपेच्या आधारावर 16 टक्क्यावरुन 22 टक्के डी.ए.करावा. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांसंबंधी मंत्रिमंडळाने निर्णय घेऊनही जी.आर. का इश्यू केला नाही ? जोपर्यंत तो निर्णय लागू होत नाही. तोपर्यंत 6 टक्के डी.ए.चा निर्णय लागू होणार नाही. म्हणजे त्यांना वाढीव डी.ए.चा लाभ द्यावयाचा असेल प्रथम नवीन वेतनश्रेणीचा निर्णय लागू केला पाहिजे. म्हणजे अधिका-यांच्या कृपेवर शिक्षण खाते चालणार काय ? हे बरोबर नाही. मंत्रिमंडळाने 1 एप्रिल पासून हा निर्णय लागू केला आहे. त्यांना एप्रिलपासून लागू केला नाही, मे पासून लागू केला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

माझे दोन प्रश्न आहेत. मंत्री मंडळाने घेतलेल्या निर्णयामध्ये अनेक दोष आहेत. त्याबद्दल मी विचारीत नाही. त्याची चर्चा आम्ही वेगळी करु. तो शासन निर्णय केव्हा निघणार आणि तो निघाला की हा आपोआप लागू होतो ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात येईल. (अडथळा) ..मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय लागू झालेला नाही. मी असे उत्तर दिले की, मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय लागू होईल.

प्रा. बी.टी. देशमुख : यामध्ये गोंधळ होत आहे. एक गोष्ट मी स्पष्ट करु इच्छितो की, शिक्षकांच्या बाबतीत त्यांचे पेबॅण्ड कापून टाकणारे, श्रेणीवेतन कापून टाकणारे अनेक निर्णय घेतलेले आहेत त्याबद्दल मी बोलत नाही. शासकीय कर्मचा-यांचा निर्णय आपण काढला त्याची अंमलबजावणीसुध्दा मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेल्या तारखेपासून झालेली नाही. ती अंमलबजावणी पुढे सरकली. हे दुर्दैवी आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हे ज्येष्ठ सदस्य आहेत. ते या ठिकाणी मोठ्या आत्मीयतेने प्रश्न मांडत आहे. सन्माननीय सदस्यांना असे वाटत आहे की, ते कुठे तरी कमी बोलत आहेत म्हणून मला बोलले पाहिजे.... मला कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी नंतर बोलावे...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : जोपर्यन्त समाधानकारक उत्तर येत नाही तोपर्यन्त प्रश्नाचा पाठपुरावा करावा लागतो.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारलेला आहे. एक जी.आर. काढला. शिक्षकांच्याबाबतीत निर्णय घेण्यामध्ये विलंब लावला जात आहे. त्यासंदर्भात उत्तर मिळत नसेल तर प्रश्न पुन्हा पुन्हा विचारावा लागतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण एकाच वेळी तीन सन्माननीय सदस्यांना बोलू देता का ?

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : जेव्हा शिक्षकांचा प्रश्न येतो त्यावेळी जाणूनबुजून काही सन्माननीय सदस्य विरोध करतात हे योग्य नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सर्व सन्माननीय सभासदांच्या अनुषंगाने मी असे म्हणेन की, एखाद्या सन्माननीय सभासदाला मी प्रश्न विचारण्याची संधी दिल्यानंतर अन्य सभासदांनी उठण्याची तसदी शक्यतो घेता कामा नये. संबंधित मंत्र्यांकडून अचूक उत्तर घेण्याचा प्रयत्न सन्माननीय सभासदांनी करावाच. परंतु एक सन्माननीय सभासद प्रश्न विचारत असताना त्यांचा प्रश्न पूर्ण झाल्यानंतरच दुस-या सन्माननीय सभासदाने प्रश्न विचारण्यासाठी उभे रहावे.

प्रा. बी.टी.देशमुख : परवा हे दोन प्रश्न होते. परंतु त्या दिवशी ते सभागृहात उपस्थित झाले नाहीत. ते प्रश्न राखून ठेवण्यासंबंधी आम्ही आपल्या दालनात येऊन आपणास विनंती केली. त्या दिवशी पहिलाच प्रश्न होता. अनेक सन्माननीय सदस्यांनी तो प्रश्न विचारलेला होता. मुद्दा अतिशय सरळ आहे. पेबॅण्ड आणि ग्रेडपेवर आधारित ही 6 टक्के वाढ आहे. फिल्ड ऑफिसर असे म्हणतात की, अजून तुमचा बॅण्ड निघालेला नाही, त्यामुळे ते काहीच वाजवणार नाहीत ? हे सुधारितला लागू आहे असे जी.आर.मध्येच म्हटलेले आहे. मंत्रिमंडळाने निर्णय घेतले म्हणून हे लिहिलेले आहे. मंत्रिमंडळाने काय निर्णय घेतला ? सर्व कर्मचारी आणि शिक्षक यांना एप्रिल पेड इन मे असे देण्याचा निर्णय घेतला. त्यात अनेक डिफेक्टस् असून त्याची चर्चा मी येथे करीत नाही. त्याची चर्चा आम्ही नंतर करु. माझे म्हणणे असे आहे की, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत शासन निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर देखील काढलेला नाही. लोकांना भोवती फिरविण्याचे काम तेथे चालू आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयामध्ये अनेक दोष आहेत. त्याबाबत आम्ही नंतर बोलू. हा शासन निर्णय केव्हा निघणार याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. 6 टक्के महागाई भत्ता कसा मिळत नाही हे जी.आर.मध्ये लिहिलेले आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, मंत्री महोदयांनी याबाबतीत उद्या 46 अन्वये निवेदन करुन सांगावे किंवा हा प्रश्न राखून ठेवावा. शिक्षकांना काही तरी न्याय मिळाला पाहिजे.

डॉ. सुनील देशमुख : मी स्पेसिफिकली सांगितले सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी असे विचारले की, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे हे होईल काय ? मी "होय" असेच म्हटलेले आहे. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला असेल तर तो लागू होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50446.....

प्रा. बी.टी.देशमुख : मंत्रिमंडळाने निर्णय घेतला असेल तर, असे नाही. माझ्या जवळ मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची प्रत आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50446....

प्रा.बी.टी.देशमुख....

मंत्रिमंडळाने सरळ निर्णय घेतलेला आहे की, शासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांना तक्ता 3.9.3 मधील पेबॅण्ड आणि ग्रेड पे लागू होतील असा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने जी.आर. काढला आहे. त्या जी.आर.मध्ये असे म्हटले आहे की, दिनांक 1 एप्रिल, 2009 पासून लागू होतील. असे या शासन निर्णयात म्हटले आहे की नाही याबाबतचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी तेच म्हणतो आहे की, शासन निर्णय तसा असेल व मंत्रिमंडळाचा तसा निर्णय असेल तर तो निर्णय त्यांना लागू होईल.

प्रा.बी.टी.देशमख :सभापती महोदय, शासकीय कर्मचा-यांचा जी.आर.निघाला आहे. परंतु शिक्षकांच्या बाबतीत जी.आर.काढण्यात आलेला नाही. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला नाही असे माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी सभागृहाला सांगावे..

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना सांगू इच्छितो की,...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदय, या सरकारला काही विश्वासार्हता आहे की नाही ? या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे शासन निर्णय वाचून दाखवित आहे. मंत्री महोदय, जर, तर करीत असतील तर या राज्यात सरकार आहे की नाही असा प्रश्न निर्माण होतो आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नास माननीय मंत्र्यांनी पॉईंटेड उत्तर द्यावे. माननीय मंत्री महोदयांनी जर, तर अशा प्रकारची उत्तरे देणे बरोबर नाही.

डॉ.सुनील देशमुख : मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झाला असेल तर तो लागू होईल असे मी म्हटले आहे.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : मुद्दा असा आहे की, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये राज्यमंत्र्यांना बोलाविले जात नाही. त्या बैठकीत फक्त मंत्रीच उपस्थित असतात. या प्रश्नाच्या अनुषंगाने शिक्षण मंत्र्यांना देखील उत्तरासाठी बोलवावे अशी माझी मागणी आहे.

(गोंधळ)

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.... ता.प्र.क्र. 50446....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता ठेवावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचे पावित्र्य राहील या अनुषंगाने आपण काळजी घ्यावी. सरकारला कोणाशी काही देणे-घेणे नाही.

सभापती : आपण सर्व सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत आहात, त्यामुळे या प्रश्नावर चर्चा होऊ शकणार नाही. त्यामुळे कृपया सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवावी. सन्माननीय डॉ. सुनील देशमुख यांना सांगू इच्छितो की, शासनाने या अनुषंगाने विविध विभागांचा जी.आर.काढला आहे. परंतु शिक्षण विभागाशी संबंधित कर्मचा-यांच्या बाबतीत जी.आर.काढलेला नाही. तो जी.आर.काढणे गरजेचे आहे. शिक्षण विभागाशी संबंधित कर्मचा-यांच्या बाबतीतील जी.आर.शासनाने काढला नसेल तर तो कधी काढण्यात येईल असा सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, श्री. डायगव्हाणे, श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे व अन्य सन्माननीय सदस्यांना प्रश्न प्रश्न आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय झाला असेल तर त्या अनुषंगाने जी.आर.काढणे गरजेचे आहे अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने हकीम समिती नेमण्यात आली होती. हकीम समितीने शासकीय कर्मचारी, निम शासकीय कर्मचारी, शिक्षक या सर्व संवर्गाचा आढावा घेतलेला आहे. त्या समितीने आपल्या शिफारशी मंत्रिमंडळाच्या बैठकी समोर ठेवल्या. त्या शिफारशी मंत्रिमंडळाने मान्य केल्या. त्याच्यामध्ये कोणाला अडचण असेल तर त्या अनषंगाने त्रुटी समिती गठीत करण्यात आली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : त्रुटींच्या संदर्भात त्रुटी समिती गठीत केलेली आहे. आमचा मूळ प्रश्न वेगळा आहे...

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, दिनांक 1 जानेवारी, 2009 पासून केंद्र शासनाने त्यांचेकडील कर्मचा-यांना व निवृत्ती वेतनधारकांना 6 टक्के महागाई भत्ता वाढ देण्याचे मान्य केले आहे हे खरे आहे काय असा मूळ प्रश्न विचारला आहे, त्यास शासनाने "होय" असे उत्तर देण्यात आले आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने सहावे वेतन आयोग कोणाला मिळाला, कोणाला मिळाले नाही असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असेल तर त्यासाठी त्यांना वेगळा प्रश्न विचारावा लागेल.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50446....

डॉ.सुनील देशमुख....

6 टक्के महागाई भत्ता लागू केला आहे किंवा नाही हा खरा मूळ प्रश्न आहे. हा महागाई भत्ता राज्य शासनाने कधीपासून केला आहे, त्याची तारीख देखील लेखी उत्तरात नमूद केली आहे. परंतु या प्रश्नाच्या अनुषंगाने सहावे वेतन आयोग कोणाला मिळाले, कोणाला मिळाले नाही, कोणाला कमी मिळाले हा वेगळा प्रश्न होतो असे माझे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्यांनी यासाठी वेगळा प्रश्न विचारावा असे माझे स्पष्ट मत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : ही गोष्ट खरी आहे की, त्यातील त्रुटी वगैरे ज्या काही गोष्टी आहेत. त्या गोष्टींचा या प्रश्नांशी काही संबंध येत नाही हे मला मान्य आहे. मी ही गोष्ट सभागृहाला पहिल्यापासून सांगतो आहे. त्रुटींच्या बाबतीत आम्ही स्वतंत्रपणे विषय सभागृहात उपस्थित करु. हा प्रश्न 6 टक्के महागाई भत्ता लागू करण्यासंबंधीचा आहे. 6 टक्याच्या अनुषंगाने शासनाने जो जी.आर.काढला आहे, त्यात असे लिहिले आहे की, शासनाने जे निर्णय घेतले आहेत त्याप्रमाणे सुधारित वेतन संवर्गातील वेतन बॅण्ड अधिक ग्रेड वेतन याच्यावर 16 ते 22 टक्के करण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर शासनाने जी.आर. सुध्दा काढला. त्या जी.आर.मध्ये लिहिले आहे की, शिक्षकांबाबत निर्णय झाला आणि एप्रिल पेड इन मे दिला जाईल. आमचे म्हणणे असे आहे की, अधिका-यांच्या कृपेवर मंत्रिमंडळाचे निर्णय राबविले जाणार आहेत का? का जी.आर.काढला नाही? जी.आर.काढला नाही म्हणून 6 टक्के महागाई भत्ता मिळत नाही. मंत्रिमंडळाने निर्णय घेऊनही त्या शिक्षकांना पे बॅण्ड नाही, ग्रेड पे नाही आणि 6 टक्के महागाई भत्ताही नाही. शिक्षण विभागाच्या गलथानपणातून निर्माण झालेली ही बाब आहे. आवश्यक असल्यास हा प्रश्न राखून ठेवावा किंवा मंत्रीमहोदयांनी यथोचित उत्तर द्यावे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी यापूर्वीच स्पष्टपणे सांगितले आहे. 6 टक्के महागाई भत्त्याच्या अनुषंगाने उत्तर दिले, तो लागू झाला आहे. त्यामध्ये कोणाला सहावा वेतन आयोग कमी लागू झाला, जास्त लागू झाला हा प्रश्न निर्माण होत नाही. महागाई भत्त्याचा आदेश सुधारित वेतन समितीच्या संकल्पनेनुसार कर्मचाऱ्यांना फेरफार करुन लागू झाला आहे. त्यामुळे शिक्षकांना सुधारित वेतन बॅण्ड लागू केल्यानंतर थकबाकी देण्यात येणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लातूर जिल्ह्यात अकाली पावसामुळे शेतमाल व फळबागा यांचे आणि पशुधनाच्या झालेल्या नुकसानाची भरपाई शेतकऱ्यांना मिळण्याची मागणी

(६) * ५३०५७ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील अहमदपूर, देवणी, उदगीर, शिरुर, अनंतपाळ, लातूर, निलंगा वा आसपासच्या भागात दिनांक ७ एप्रिल, २००९ रोजी व त्यासुमारास अकाली पावसामुळे शेतकऱ्यांच्या आंबा, द्राक्ष, करडी, रब्बीची ज्वारी, हरभरा या पिकांचे शेतमालाचे, फळबागांचे आणि पशुधनाचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले असून नुकसान भरपाई देण्याची मागणी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. दिलीपराव देशमुख : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभ्झापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर हे खरे नाही असे दिले आहे. पाऊस अकाली पडला हे खरे नाही की नुकसान झाले हे खरे नाही की, प्रचंड नुकसान झाले हे खरे नाही की, मागणी केली नाही हे खरे नाही? नक्की काय खरे नाही?

श्री.दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, हे सर्वच खरे नाही. दिनांक ७ एप्रिल रोजी लातूर जिल्हयातील जे तालुके प्रश्नामध्ये नमूद केले आहेत तेथे कुठेही नोंद घेण्याइतपत पाऊस झ ालेला नाही. मी स्वत: त्या दिवशी अहमदपूर तालुक्याच्या दौऱ्यावर होतो. केवळ ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट अशा प्रकारचे वादळ झाले होते. प्रश्नामध्ये ज्या पिकांचा उल्लेख केला आहे तसे कोणतेही नुकसान त्याठिकाणी झालेले नाही. लातूरचा शेतकरी बऱ्यापैकी जागरुक आहे. ताबडतोबीने अर्ज करणे, दाद मागणे यासंदर्भात त्वरित कृती केली जाते. तसे कोणतेही अज जिल्हाधिकाऱ्यांकडे आलेले नाहीत. मी स्वत: त्या दिवशी जिल्हयामध्ये होतो. तसे कोणतेही नुकसान त्याठिकाणी झालेले नाही म्हणून उत्तरामध्ये हे खरे नाही असे म्हटले आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याच प्रश्नावर मागील आठवड्यात लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. एप्रिल महिन्यातील अकाली पावसानंतर मे महिन्यातील १८, १९ व २० तारखेला अकाली पाऊस पडला हाता. त्यावेळी मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले होते की, जिथे जिथे नुकसान झाले असेल त्याबद्दल पाहणी केली जाईल. तशा पध्दतीने पाहणी करुन मे महिन्यातील अकाली पावसामुळे नुकसान झाले असेल तर त्याबाबत काय कारवाई करणार आहात?

..३.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.५३०५७.....

श्री.दिलीपराव देशमुख : सभागृहाने नियम २६० अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावर जी चर्चा झाली होती त्या दिवशी मी सांगितले होते की, मे महिन्यात आपल्या म्हणण्याप्रमाणे नुकसान झाले असेल तर तपासून पाहू आणि पात्र असल्यास मदत करु ही शासनाची भूमिका आहे.

श्री.दिवाकर रावते : लातूरचा शेतकरी जागरुक आहे असे मंत्रीमहोदयांनी म्हटले. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे विदर्भातील शेतकरी आळशी आहे, विड्या फुकतो हे खरे आहे काय?

श्री.दिलीपराव देशमुख : ब-यापैकी जागरुक आहे असे मी म्हटले. म्हणजे महाराष्ट्रातील इतर शेतकरी जागरुक नाही असे नाही. बाकीचे बरेच जागरुक आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना हे खरे नाही असे म्हटले व दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना प्रश्न उद्भवत नाही असे म्हटले आहे. सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी हा प्रश्न उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे सदैव शेतकऱ्यांमध्ये काम करतात. त्यांनी अहमदपूर, देवणी, उदगीर, शिरुर, अनंतपाळ, लातूर, निलंगा आदी भागांचा प्रश्नामध्ये उल्लेख केला आहे. मंत्रीमहोदय 7 एप्रिल या दिवशी अहमदपूर या एकाच तालुक्यात होते. कदाचित त्या दिवशी इतर तालुक्यांमध्ये पाऊस पडला असेल, वादळ झाल्यामुळे नुकसान झाले असेल तर फेरचौकशी केली जाईल का?

श्री.दिलीपराव देशमुख : ही बाब तपासून घेऊ. त्यामध्ये कोणतीही अडचण नाही.

एम.1....

अशुद्धीत प्रत / शुद्धीपत्र नाही

राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा प्रस्ताव

(7) * 50802 **श्री सुभाष चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री. चरणसिंग सप्रा,श्रीमती मधु जैन, डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया, श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (वि.जा.भ.ज.) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्याच्या प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, केलेल्या छाननीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने सदर प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नाना पंचबुध्दे, श्री. सुरुपसिंग नाईक यांच्याकरिता : (1) होय

(2) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, सदरचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. याप्रकरणी विलंबाची कारण काय आहेत ? तसेच हा निर्णय कधी होणार आहे ? व त्यासंबंधीची कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, इतर मागासवर्गियांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ व मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना हा केंद्रशासनाचा विषय असून महाराष्ट्र शासनाने 29 मे, 2003 पासून ही योजना लागू केली आहे. यासंबधीचा प्रस्ताव हे अधिवेशन संपण्यापूर्वी केंद्रशासनाकडे पाठविण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, या प्रस्तावाचे स्वरुप काय आहे ? तसेच हा प्रस्ताव छाननीसाठी कोणत्या विभागाकडे पाठविण्यात आला आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50802....

श्री. सुरुपसिंग नाईक : सभापती महोदय, या प्रस्तावाचे स्वरुप असे आहे की, एस.सी. व एस.टी. विद्यार्थ्यांना "अ" ग्रेडसाठी 740 रुपये व अनिवासी विद्यार्थ्यांसाठी 330 रुपये "ब" ग्रेडसाठी 290 रुपये आणि अनिवासी विद्यार्थ्यांसाठी 190 रुपये तसेच एस.सी. व एस.टी. च्या "बी" ग्रेडच्या विद्यार्थ्यांसाठी 510 रुपये आणि अनिवासी विद्यार्थ्यांसाठी 230 रुपये याच धर्तीवर ओबीसीच्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळावी म्हणून हा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठविणार आहोत. मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो कारण सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यासंबंधीचा उल्लेख त्यांनी केला आहे. अशा प्रकारची शिष्यवृत्ती मिळावी म्हणून जो प्रस्ताव आहे त्यानुसार ही रक्कम जवळपास 80 ते 100 कोटी रुपये होते म्हणूनच मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव चर्चेसाठी जाणे आवश्यक आहे. हा प्रस्ताव लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर नेऊन त्याला मान्यता घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : महोदय, ओबीसीच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कारण केंद्रशासनाने 100 टक्के शिष्यवृत्ती दिलेलीच आहे. जर केंद्रशासन 100 टक्के शिष्यवृत्ती देत असेल तर महाराष्ट्र शासन 50 टक्के रक्कम का देत आहे ? म्हणून केंद्रशासनाच्या जी.आर. प्रमाणे राज्यात देखील या विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती देणार काय?

श्री. सुरुपसिंग नाईक : महोदय, महोदय, मी खुलासेवार माहिती दिलेली आहे की, एस.सी. व एस.टी. च्या विद्यार्थ्यांना जी शिष्यवृत्ती दिली जाते त्याच धर्तीवर ओबीसीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यासंबंधीचा प्रस्ताव केंद्रशासन मंजूर करते. त्यानंतर ही वाढ होईल.

....3

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रिका नाही

PFK/ KGS/ ST/

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील कासारसाई धरणासाठी घेतलेल्या शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी परत करणेबाबत

(8) * 53085 श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील कासारसाई धरणासाठी तेथील नेरे, जांबे, मालंजी, माण, दारुंबरे इत्यादी गावातील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने सन 1981 साली संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, नेरे, दत्तवाडी व जाधव वस्तीतील जमिनी शासनाने आरक्षित करुन त्यांची विक्री दलालांमार्फत सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या 7/12 च्या उताऱ्यात मूळ शेतकऱ्यांच्या नातेवाईकांची फोड न करता त्यांची नावे वगळण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर अतिरिक्त जमिनीची आता शासनाला गरज नसल्याने मूळ शेतकऱ्यांना सदर जमीन परत करुन सदर जमिनीच्या उताऱ्यावर जिल्हाधिकारी नावाने मारलेला शिक्का रद्द करुन त्यात मूळ मालकांची नावे समाविष्ट करण्याची तेथील शेकडो ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, या मागणीबाबत शासनाने सकरात्मक निर्णय घेतला आहे काय, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे ?

श्री.दिलीपराव देशमुख : (1) होय.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) नाही.

मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली, यांनी केरळ शासन विरुध्द एम् भास्करन पिल्लई या प्रकरणात दि.5/5/97 रोजी दिलेल्या आदेशानुसार शासनाने दि.14/3/2004 अन्वये निर्णय घेतला आहे. त्यानुसार भूसंपादन अधिनियम, 1894 च्या तरतूदीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरुन शिल्लक असलेल्या जमिनीचा वापर अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी करावा. अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी त्या जमिनीची आवश्यकता नसल्यास अशा अतिरिक्त झालेल्या जमिनीचा जाहीर

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लिलाव करण्यात यावा. परंतु मूळ मालकास परत करु नये, तथापि या लिलावात मूळ भूधारक भाग घेऊ शकतील. त्यामुळे अतिरिक्त जमीन मूळ शेतकऱ्यांना परत करता येणार नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन 1981 पासून या जमिनी शासनाने संपादित केल्या आहेत. उत्तरात म्हटले आहे की, सुप्रिम कोर्टाने सन 2004 मध्ये हा निर्णय दिलेला आहे. अनेक वेळा ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन देखील त्या विहित कारणासाठी वापरात नाही व अशा जमिनी वषानुवर्षे सरकारकडे पडून असतात. यापूर्वी माननीयश्री. गोविंदराव आदिक हे उद्योग मंत्री असताना प्रश्न विचारण्यात आला होता की, अशा प्रकारे वापरात नसणाऱ्या जमिनी शेतकऱ्यांना परत देता येतील काय याबाबत त्यांनी "विचार करु" असे सांगितले होते. परंतु सुप्रिम कोर्टाचा निर्णय सन 1997 चा असून तो सन 2004 मध्ये आपण कार्यान्वित केला आहे. अनेक वेळा सेझच्या बाबतीत देखील शेतकऱ्यांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालय नवनवीन निर्णय देत असते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रारंभीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

आणि म्हणून कासारसाईच्या धरणग्रस्तांना जमीन देण्याच्या संदर्भात "लिलावात मुळभाग धारक भाग घेऊ शकतील" असे म्हटलेले आहे. मुळशी येथे जमिनीचे दर लाखोच्यावर गेलेले आहेत त्यामुळे किती लोक या लिलावात भाग घेऊ शकतील ? सुप्रीम कोर्टाचा निर्णय अन्याय कारक आहे असे म्हटले जाते त्यामुळे यासंदर्भात पुन्हा अभ्यास करावा त्याच्यानंतरचा एखादा निर्णय नक्की आपल्याला सापडेल. त्यामुळे सुप्रीम कोर्टात जावयाचे की, नाही हा पुढचा प्रश्न आहे. त्यामुळे शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीने या निर्णयाची कायदेशीर तपासणी करुन परत मूळ जमीन धारकांना म्हणजे या भागातील किंवा इतर भागातील जमिनी मिळतील यादृष्टीने शासन काय पाऊल उचलणार आहे ?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी शासनाने अभ्यास करावा व या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी काय मार्ग काढता येईल अशी विचारणा केलेली आहे त्यामुळे जरुर यासंदर्भात अभ्यास करुन कायदेशीर सल्ला घेण्यात येईल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, जब सरकार ने धरण बनाने के लिए यह जमीन संपादित की थी तो फिर उसी कार्य के लिए इस जमीन का इस्तेमाल होना चाहिए था. कोर्ट के जजमेंट में कहा गया है : "सार्वजनिक प्रयोजनासाठी वापरुन शिल्लक असलेल्या जमिनीचा वापर अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी करावा", इसलिए मेरा प्रश्न यह है कि क्या सरकार ने पब्लिक बेनिफिट के लिए ऐसी कोई स्कीम बनाई है, जिसके लिए यह जमीन इस्तेमाल की जा सके ?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, हा प्रश्न धरणासाठी जमीन घेतल्याच्या संदर्भातील नसून धरणासाठी, बॅकवॉटरसाठी किंवा बांधकामासाठी जी जमीन घेतलेली आहे ती पूर्ण वापरण्यात आलेली आहे. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी जी जमीन लागते त्यासंदर्भातील हा प्रश्न आहे. हा प्रश्न कशा रितीने हाताळावयाचा यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे आदेश दिलेले आहेत. सार्वजनिक उपक्रमामध्ये हा सुध्दा विषय येऊ शकतो की, धरणग्रस्त शेतक-यांवर इतर ठीकाणी जर अन्याय झाला असला आणि त्याने दुस-या ठिकाणची जमीन दाखवून ही जमीन मला द्या असे सांगितले तर ही जमीन त्या कामासाठी वापरता येते. मात्र मूळ मालकाला ती जमीन परत करु नये अशा प्रकारचे सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत. सन 2004 मध्ये अशा प्रकारचा आदेश काढण्यात आलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, पुनर्वसनाच्या संदर्भात गंभीर प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. जेव्हा एखादी जागा शासनाकडून ॲक्वायर करण्यात येते तेव्हा त्यासंदर्भात मूळ मालकाला एक तर मोबदला देण्यात येतो किंवा त्यांना दुसरीकडे जागा देण्यात येते. दुसरीकडे जागा देतांना ती जागा "अ" वर्ग नसून "ब" वर्ग म्हणून देण्यात येते. आपण सांगता की, 1997 मध्ये श्री. एम.भास्करन पिल्लई यांचा निर्णय आलेला आहे व त्यासंदर्भात शासनाने 2004 मध्ये जी.आर.काढला असून त्यामध्ये म्हटले आहे की, "No land could be restored to the original owner but it could be utilised for other purpose or it could be auctioned." परंतु नुकताच 2009 मध्ये सुप्रिम कोर्टाचा असा निवाडा आलेला आहे की, सुप्रीम कोर्टाने जे काही सायटेशन दिलेले आहे ते सायटेशन जर त्या फुटींगवर असेल तर तो नियम पूर्ण देशात आणि पूर्ण राज्यात लागू राहील. परंतु जर त्याची फुटींग वेगळी असेल तर ते सायटेशन सुप्रिम कोर्टाच्या किंवा हायकोर्टाचे सायटेशनशी आपण गृहीत धरु नका. एखाद्या केसमध्ये जर सुप्रिम कोर्टाने सायटेशन दिले असेल, पण दुस-या केसमध्ये फुटींग वेगळी असेल आणि शासन सांगत असेल, अधिकारी सांगत असतील की, नाही आम्ही सुप्रिम कोर्टाचे सायटेशन करु शकत नाही. त्यामुळे त्या केसची फुटींग आणि शेतक-यांची फुटींग वेगळी असेल तर यासंदर्भात आपण कोणता न्याय देणार आहात ?

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, पहिल्या उत्तरात मी सांगितले आहे की, यासंदर्भातील कायदेशीर बाजू तपासून घेऊ व त्या संदर्भात सल्ला घेऊ व त्याप्रमाणे आपल्याला पुढील कार्यवाही करता येईल.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क परत करण्याची उपाययोजना

(९) * ५०७३० श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. मधुकर चव्हाण : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विना अनुदानित व कायमविना अनुदानित संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेऊ नयेत असे आदेश शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) अशा प्रकारच्या संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून संबंधित संस्थेस परत करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(३) माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचे दर काय आहेत,

(४) गेल्या ४-५ वर्षांपासून अनेक संस्थांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर, श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्याकरिता: (१) होय.

(२) होय.

(३) व (४) शालेय शिक्षण विभागाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काचे दराप्रमाणे प्रतिपूर्ती करण्यात येते.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क शासनाने परत करण्याच्या संदर्भातील हा विषय आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेऊ नये असे शासनाचे आदेश असून त्या प्रमाणे मागासर्गीय विद्यार्थ्यांकडून संस्थांनी अशा प्रकारची कोणतीही फी घेऊन नये असे सर्व संस्थांना आदेश पाठविलेले आहेत. दुस-या प्रश्नाच्या संदर्भात या फीची प्रतीपुर्ती शासनाने परत करावयाची आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, ज्या विना अनुदानित शाळा आहेत, कायम विना अनुदानित शाळा आहेत या शाळामध्ये शिकणारे आमचे जे मागासवर्गीय विद्यार्थी आहेत त्यांची फी ठरविण्याचे अधिकार पीटीआयला आहेत. यासंदर्भात पीटीआयने फी मंजूर केलेली आहे, ती फी शिक्षण विभागाकडे पाठविलेली आहे त्यामुळे त्या मंजूर फीच्या दराने आजही मागासवर्गीयांना शिक्षण शुल्क परत मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50730.. श्री.रामनाथ मोते...

म्हणून माझा माननीय मत्री महोदयांना पहिला असा प्रश्न आहे की, पी.टी.ए. यांना जो अधिकार दिलेला आहे त्या अधिकारामध्ये त्यांनी ठरविलेली फी आणि त्यानुसार सादर केलेल्या देयकानुसार शासन फीची प्रतिपूर्ती करणार आहे काय ? त्यानंतर मला माननीय मंत्री महोदयांना दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, अनेक शाळांची गेल्या तीन चार वर्षाची लाखो रुपयांची बिले शासनाकडे प्रलंबित आहेत त्या सदर्भात अनेकदा बैठका होऊन चर्चा झाल्या होत्या परंतु तरीही या फीच्या रकमेची प्रतिपूर्ती मिळालेली नाही तेव्हा ही प्रतिपूर्ती तातडीने देण्याची व्यवस्था शासन करणार आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने ठरविलेली जी फी असेल ती मागासवर्गीयांची फी शासनाकडून देण्यात येते परंतु विना अनुदानित शिक्षण संस्थेमध्ये जी फी ठरविण्यात येते ती शालेय शिक्षण विभागापेक्षा जास्त ठरविली जाते. ती फी शासन त्यांना देऊ शकत नाही याबाबतीत शासनाने जे धोरण ठरविलेले आहे त्याप्रमाणे त्यांना आतापर्यत फी दिली जाते विना अनुदानित शिक्षण संस्थांनी जास्तीची फी आकारली असल्यामुळे ती फी शासन देऊ शकत नाही मात्र शिक्षण विभागाने जी फी आकारली आहे ती त्यांना परत केली जाते.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, तिस-या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. या उत्तरात असे म्हटलेले आहे की, "शालेय शिक्षण विभागाने प्रमाणित केलेल्या शिक्षण शुल्काचे दराप्रमाणे प्रतिपूर्ती करण्यात येते " माझा असा स्पेसिफिक प्रश्न आहे की, हे दर नेमके कोणते आहेत याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणार आहे काय ? त्याचबरोबर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, समाज कल्याण विभागाकडून दर वर्षी या विद्यार्थ्याच्या फीची प्रतिपूर्ती वर्ष संपल्यानंतरसुध्दा दिली जात नाही. अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही त्यामुळे पैसे आलेले नाहीत असे त्यांना सांगण्यात येते. शैक्षणिक वर्ष संपण्याच्या अगोदर या विद्यार्थाना फीची प्रतिपूर्ती करण्यासाठी शासन अनुदान देणार आहे काय, सहामाही परीक्षा होण्याच्या अगोदर प्रतिपूर्तीची रक्कम विद्यार्थ्याना देण्याच्या दृष्टीने शासन ठोस निर्णय घेणार आहे काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50730.....

सभापती : फीच्या आकारणीसंबंधीची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असल्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी तसे उत्तर दिलेले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, फीच्या दराबद्दलची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी असे मी सांगितले होते मात्र मी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्यानुसार प्रतिपूर्ती केव्हा करणार आहात त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी असे मी सांगितलेले नव्हते. त्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : शालेय शिक्षण विभागाच्या दराप्रमाणे फीची प्रतिपूर्ती करीत असल्यामुळे त्या संदर्भात पुन्हा वेगळे सांगण्याची काही गरज नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अतिशय स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. विना अनुदानित संस्थांनी ठरविलेल्या फीला शासनाची मान्यता आहे. माझ्या माहितीप्रमाणे 2003- 2004 सालापर्यंत त्याप्रमाणे समाज कल्याण विभाग फीची प्रतिपूर्ती करीत होते त्यानंतर मात्र ते बंद केले गले ही गोष्ट खरी आहे काय आणि बंद केले असेल तर त्याची कारणे काय आहेत आणि प्रतिपूर्ती देण्याचे पुन्हा केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, विद्यार्थ्याच्या शालेय फीच्या संदर्भात शालेय शिक्षण विभाग वेळोवेळी निर्णय घेत असते. 1996 साली विभागाने निर्णय घेतला होता तसेच शासनाने असे धोरण ठरविले होते की पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्याना मोफत शिक्षण देण्यात येईल . ते धोरण अंमलात आणले गेले त्याचबरोबर खाजगी विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित ज्या शाळा आहेत..

अशुद्धीत प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 50730...

श्री. चंद्रकांत हंडोरे...

अशा ज्या शाळा आहेत त्यांची फी पीटीएने मंजूर केलेल्या दराप्रमाणे देण्यात यावी अशी शाळांची गेल्या काही वर्षापासून मागणी आहे...

श्री. दिवाकर रावते : कधीपासून ते सांगा?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन 2003 पासून आहे. याबाबतीत शालेय शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे सामाजिक न्याय विभागाने आतापर्यंत फीची प्रतिपूर्ती केली आहे. याबाबतीत खाजगी संस्थांचे असे म्हणणे आहे की, आम्हाला पीटीएने मंजूर केलेल्या दराप्रमाणे फीच्या प्रतिपूर्तीची रक्कम वाढवून देण्यात यावी. त्याबाबत सामाजिक न्याय विभागाने अजून धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. आणि म्हणून त्याबाबतीत निश्चितपणे प्रयत्न सुरु आहेत. ही गोष्ट खरी आहे की, विद्यार्थ्यांच्या फीमध्ये वाढ करुन दिली पाहिजे. याबाबतीत निश्चितपणे शासन विचार करील आणि हा प्रश्न निकाली काढण्यासाठी प्रयत्न करील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदय दिशाभूल करीत आहेत. त्यांनी आता याठिकाणी असे उत्तर दिले की, आम्ही शासकीय दराप्रमाणे फी देत आहोत. सन 2003 नंतर एकाही विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळेला शासकीय दराप्रमाणे फीचे पैसे दिले नाहीत. शासकीय दर कोणते? याचे उत्तर असे देण्यात आले की, शासनाने व शिक्षण विभागाने प्रमाणित केलेले दर. याचा अर्थ असा की, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळांना पीटीएने ठरवून दिलेले फीचे दर शिक्षण उपसंचालकांकडे जातात. आणि त्यांची मान्यता मिळाल्यानंतर समाज कल्याण विभागाकडे जातात. त्यामुळे प्रमाणित असलेल्या दराप्रमाणे देण्यास शासन बांधील आहे. एका बाजूला दहावीपर्यंत शैक्षणिक फी माफ करण्याची जबाबदारी शासनाने घेतली आहे. त्यामुळे पीटीएने मंजूर केलेल्या व सामाजिक न्याय विभागाने मान्य केलेल्या शिक्षण शुल्काच्या दरांना शिक्षण विभागाची मान्यता घ्यावी लागते. ती मान्यता घेण्याची आपली बांधिलकी आहे. त्यामुळे शिक्षण उपसंचालकांनी मान्य केलेल्या प्रमाणित दरानुसार आपण पैसे दिले नाहीत, ते देणार काय?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे सामाजिक न्याय विभागाकडून या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती केलेली आहे. तरीसुध्दा मी ही बाब तपासून पहातो. मूळ मुद्दा एवढाच आहे की, पीटीएने मंजूर केल्याप्रमाणे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

ता.प्र.क्र. 50730...

(गोंधळ)

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. विना अनुदानित तत्वावरील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून शिक्षण विभागामार्फत वेगवेगळया पध्दतीने फीची आकारणी केली जाते. त्या फीची देयके शिक्षण विभागाकडून आपल्या विभागाकडे पाठविण्यात येतात. अशाप्रकारची देयके अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत अशी सन्माननीय सदस्यांची माहिती आहे. याबाबतीत मला असे वाटते की, आपण या बाबतीतील आपले उत्तर पूर्ण करावे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांकडून याबाबतीत एखादी चर्चा उपस्थित करुन आपण त्यांच्याकडून वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे आणि ती सन्माननीय सदस्यांनी सुध्दा समजून दिली पाहिजे. मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांची ही समस्या असल्यामुळे प्रलंबित असलेल्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती विनाविलंब करण्याची आपण व्यवस्था केली पाहिजे.

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, आपण सूचना केल्याप्रमाणे याबाबत माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि इतर सन्माननीय सदस्य तसेच शालेय शिक्षण विभागाचे व माझ्या विभागाचे अधिकारी यांची एक संयुक्त बैठक घेऊन या विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही यादृष्टीने कोणता धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे हे ठरविण्याकरिता लवकरात लवकर निश्चितपणे बैठक घेण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शुद्धीकरणासाठी नाही

सभापती : मी माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरेसाहेबांना सांगू इच्छितो की, या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, यासंदर्भात जी बैठक घेण्यात येणार आहे, ती माझ्या दालनामध्ये घेऊ.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मला मान्य आहे.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, माझा छोटासा प्रश्न आहे. गेल्या 4-5 वर्षापासून शासनाकडून माझ्या संस्थेचेच साडेतीन कोटी रुपये येणे आहे. त्यामुळे आम्हाला तेथील कर्मचाऱ्यांचे तीन-चार महिन्यांचे पगार देखील देता आलेले नाहीत. त्यामुळे ज्या वर्षाची फी देय आहे, ती त्याच वर्षामध्ये देण्याच्या बाबतीत सरकार आश्वासन देणार आहे काय ? ही रक्कम सतत ॲक्युम्युलेट होत जाते आणि त्यासंबंधात बजेटमध्ये काहीतरी दाखविले जाते. पण प्रत्यक्षात आम्हाला ती रक्कम मिळत नाही. तेव्हा दरवषी जी फी दिली जाते, त्याची प्रतिपूर्ती दरवर्षाला करणार आहात काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, विधान परिषद सभागृहाचा फोरम हा स्वत:च्या फायद्यासाठी वापरणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, माझ्या संस्थेचे साडेतीन कोटी रुपये येणे शिल्लक आहेत. तर ही गोष्ट बरोबर नाही. लोकसभेमध्ये सुध्दा अशा प्रकारचे प्रश्न अलाऊड नाहीत.मग उद्या साडेतीन कोटी रुपये मिळावेत यासाठी सुध्दा उद्या एखादी बैठक बोलविली जाईल. माझे असे म्हणणे आहे की,सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार साहेबांनी त्यांचा प्रश्न मागे घ्यावा. कारण हे बरोबर नाही, उचित नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे सभागृह हे राष्ट्रवादी पक्ष आणि काँग्रेस पक्ष यांच्यातील भांडण ऐकण्यासाठी नाही, तुम्ही बाहेर भांडणे करावीत. सन्माननीय सदस्यांनी उदाहरण दिले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी खाली बसावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा हा प्रश्न नाही, तर त्यांनी एक उदाहरण दिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, याठिकाणी बसल्यानंतर एखाद्या इश्युच्या बाबतीत, एखाद्या पक्षाच्या अनुषंगाने भाष्य करणे हे सुध्दा सभ्यतेच्या मर्यादेमध्ये बसणे शक्य नाही. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांच्या प्रश्नासंबंधात माननीय राज्यमंत्री श्री.सुनील देशमुखसाहेबांनी सांगितले की, या व्यासपीठाचा वापर हा आपल्या एखाद्या व्यक्तीगत प्रश्नासाठी न करता, या प्रश्नाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी संबंधित माननीय मंत्री महोदयांना सांगावे किंवा तो प्रश्न माझ्याकडे द्यावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, लोकसभेमध्ये सुध्दा स्वत:च्या फायद्यासाठी प्रश्न उपस्थित करता येत नाही, असा नियम आहे.

सभापती : बरोबर आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी खाली बसावे. आता 12 वाजून 03 मिनिटे झालेली आहेत. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असल्याने, मी जास्त वेळ दिला.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, It may be slip of tongue मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार बोलत असताना, ते"माझ्या" असे म्हणाले, ते स्लीप ऑफ टंक असे होऊ शकते. पण आज त्यांनी मराठा संस्थेचा उल्लेख करावयास पाहिजे. ही संस्था नाशिक येथे असून ती तीन जिल्हयांमध्ये कार्यरत आहे. त्याठिकाणी हजारो कर्मचारी काम करीत आहेत, हजारो मुले शिकत आहेत. त्या संस्थेच्या संदर्भात त्यांना रेफर करावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे अमरावती येथील कॉलेजच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करीत होते, तेव्हा देखील सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार असे म्हणाले की, माझ्या दोन कॉलेजच्या बाबतीत काय ? तेव्हा स्वत:बद्दल विचारण्याची त्यांना सवय आहे.

सभापती : मला असे वाटते की, आपण मूळ प्रश्नापासून पूर्णतया बाजूला गेलो आहोत. मी सातत्याने आपल्या मनातील अनेक भावनांना न्याय मिळावा म्हणून पुष्कळ वेळ देत आहे. मी आता या विषयाच्या संबंधातील चर्चा थांबवित आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही आपल्या निर्णयाचा आदर करतो. परंतु मूळ प्रश्नाला बगल देऊन येथे स्वत:चा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न झाला आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी मिळत नाही हा येथे मूळ प्रश्न होता. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी न देता महामंडळाचे कर्ज माफ करण्यासाठी यांच्याकडे पैसे आहेत आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पैसे देण्यासाठी पैसे नाहीत ही गोष्ट सदनाच्या पटलावर आलेली आहे. याबद्दल आम्ही सरकारचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.)

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 1996-1997 चा 26 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008 चा 37 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सुरेश शेट्टी (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 2008 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात सभागृहात दिनांक 15 डिसेंबर, 2008 ते दि.30 डिसेंबर, 2008 या कालावधीत तसेच सन 2009 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 16 मार्च, 2009 ते दि.19 मार्च,2009 या कालावधीत मा. मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या अनुक्रमे एकूण 472 व 21 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सुरेश शेट्टी (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन 1985 च्या पहिल्या अधिवेशनापासून ते सन 2009 च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या एकूण 776 आश्वासनांवर शासनाने केलेल्या कारवाईबाबतचे विवरण मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

सभापती महोदय, या सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना मी माहिती देऊ इच्छितो आणि सर्वप्रथम माननीय सभापती महोदयांचे मन:पूर्वक अभिनंदन करु इच्छितो. माननीय सभापती महोदयांनी या प्रश्नाच्या बाबतीत स्वत: लक्ष घालून दर महिन्याला आढावा घेऊन, मुख्य सचिवांच्या बैठका घेऊन जे काम कलेले आहे, त्यामुळे 80 टक्के आश्वासनांची पूर्तता झालेली आहे. आता फक्त 20 टक्के आश्वासने बाकी राहिली आहेत, ती सुध्दा लवकर संपविण्यात येतील.

सभापती :विवरण सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबतचे जोडलेले विवरण छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी मर्यादितचा सन 2007-2008 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. सुरेश जेथलिया (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा एकोणिसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : रोजगार हमी योजना समितीचा एकोणिसावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

अतिरिक्त अर्थसंकल्पावरील चर्चेबाबत

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम आम्ही वाचला आहे. त्यामध्ये अनुक्रमांक 6 वर सन 2009-2010 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसधारण चर्चा (शेवटचा दिवस) असे लिहिले आहे. सभापती महोदय, या अतिरिक्त अर्थसंकल्पावर अद्याप चर्चा सुरु झालेली नाही आणि "आजचा शेवटचा दिवस" असे लिहिले आहे म्हणजे आम्हाला या अतिरिक्त अर्थसंकल्पावर फक्त एकच दिवस चर्चा करता येईल काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आपण दोन दिवस चर्चा ठरविलेली होती. पण काल अचानकपणे काही विषय सभागृहासमोर आल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्याने अर्थसंकल्पावरील चर्चा होऊ शकली नाही. आज या ठिकाणी अर्थसंकल्पावरील चर्चेचा शेवटचा दिवस असा उल्लेख केलेला आह. त्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावर आपले मत मांडता येणार नाही. म्हणून आपण यासंदर्भात आम्हाला थोडीशी सवलत देऊन ही चर्चा दोन दिवसांची करावी अशी मी विनंती करतो.

सभापती : कामकाज सल्लागार समितीचा जो कार्यक्रम आपण निश्चित केला त्यामध्ये आज दिनांक 9 जून, 2009 रोजी अर्थसंकल्पावरील चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस असा कार्यक्रम निश्चित केला होता. काल अर्थसंकल्पावरील चर्चेचा पहिला दिवस होता. त्या अनुषंगाने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर जो कार्यक्रम दाखविलेला आहे त्यामध्ये आज अर्थसंकल्पावरील चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस आहे, ही वस्तुस्थिती आहे. काल आपण माझ्या दालनात चर्चा केल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात जी चर्चा घेतली त्यामुळे काल अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु होऊ शकली नाही. अशा परिस्थिती काय करावयाचे ? आज आपण अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु करु आणि अशा परिस्थितीमध्ये आपण काय करावयाचे याचा निर्णय मी यथावकाश जरुर घेईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्पीय चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी नावे देण्याचा प्रश्न येतो. आपण आपल्या पातळीवर निर्णय घ्यावा. हे शेवटचे अधिवेशन आहे, शेवटची चर्चा आहे.

सभापती : मी एवढेच सांगितले की, आजची अर्थसंकल्पावरील चर्चा आपण सुरु करु. दरम्यानच्या काळामध्ये माझ्या दालनामध्ये दोन्ही बाजूच्या नेत्यांबरोबर चर्चा करुन काय निर्णय घ्यावयाचा ते ठरवू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर मी दिलेली लक्षवेधी सूचना आहे. ही लक्षवेधी सूचना घेण्यात यावी.

सभापती : ती लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल मुंबईमध्ये शिवसेनेच्या वतीने रिलायन्स एनर्जी कंपनीच्या कार्यालयावर वीज दरवाढीच्या विरोधात मोर्चा गेलेला होता. अशा प्रकारचा मोर्चा येणार आहे याबाबत पोलीस अधिकाऱ्यांना कळविले होते. मोर्चाचे शिष्टमंडळ व्यवस्थापनाशी चर्चा करण्यासाठी वर गेले. व्यवस्थापनाशी चर्चा करण्यामध्ये त्यांना वर तास दीड तास वेळ लागला. त्यावेळी खाली मोर्चा सेटल झाला होता आणि महिला बसलेल्या होत्या. असे असताना पोलिसांनी त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की, तुम्ही आता येथून निघून जा. महिलांनी विनंती केली की, शिष्टमंडळ वर चर्चा करीत आहे त्यांना खाली येऊ द्या. सर्वसाधारण पध्दत अशी असते की, ज्यावेळी मोर्चा येतो त्यावेळी शिष्टमंडळ जाऊन बोलणी करतात आणि नंतर त्याबाबत ते मोर्चाला कळवतात. त्या महिलांनी सांगितले की, आमचे प्रतिनिधी वरुन येतील आणि काय झाले त्याबाबत आम्हाला कळवतील. परंतु या गडबडीमध्ये त्या मोर्चाला हुसकावून लावण्यासाठी पोलिसांनी जोरदार प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी महिलांवर जो अमानुष लाठीहल्ला केला त्या लाठीहल्ल्यामध्ये श्रीमती सुभद्रा कदम या महिलेचा पूर्ण डोळा निकामी झालेला आहे. किमान 20 महिलांना अतिशय जबरदस्त दुखापत झालेली आहे. 15 पुरुष जखमी झालेले आहेत. शांतपणे निदर्शने करणाऱ्या महिलांवर पोलिसांनी इतक्या अमानुषपणे हल्ला केलेला आहे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्या महिलांवर हल्ला केला, ज्यांनी पोलिसांना हल्ला करण्याचे, लाठीचार्ज करण्याचे आदेश दिले त्या संबंधित लोकांवर ताबडतोब कारवाई करण्यात यावी अशी मागणी मी सभागृहासमोर करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्या ठिकाणी निदर्शने चालू असताना या ठिकाणी आम्ही हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी सभापतीस्थानी माननीय उपसभापती होते. त्यांनी यासंदर्भात जे आदेश दिले त्यानुसार आज यासंदर्भात निवेदन करावयाचे आहे. त्यासंदर्भातील निवेदन तयार आहे काय ? निवेदन तयार असेल तर शासनाने या ठिकाणी निवेदन करावे अशी विनंती करतो. यासंदर्भात शासनाच्या काय भावना आहेत हे कळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे. त्या महिलांवर एस.आर.पी. आणि पोलिसांनी जो लाठीहल्ला केला त्याचे व्हिडिओ क्लिपिंग उपलब्ध आहे. दोन तीन महिला एका बाजूला बसलेल्या असताना त्यांना ओढून आणून त्यांच्यावर लाठीहल्ला केला. एका महिलेचा डोळा कायम स्वरुपी निकामी झालेला आहे. ती महिला जे.जे. हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, त्या महिलेचे डोळयाचे नुकसान झालेले असल्यामुळे तिला नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. त्या महिलेने आंदोलनात दगड मारला नव्हता की काही केले नव्हते असा सदृश्य पुरावा माझ्या जवळ आहे. त्या महिलेचा डोळा निकामी झाल्यामुळे तिला नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे.

सभापती : आता सन्माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. काल सन्माननीय उपसभापतींनी या विषयासंबंधी शासनाला निवेदन करण्याचे आदेश दिले होते. मंत्रिमहोदयांनी आज दिवसभरामध्ये यासंबंधीचे सभागृहात निवेदन करावे आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एका महिलेच्या डोळयाला इजा झाल्याची माहिती सभागृहाला दिली आहे. सध्या त्या महिलेवर जे.जे.रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्या महिलेला औषधोपचारासाठी व अन्य मदत करण्यासाठी शासनाने लक्ष द्यावे, किंबहुना, त्या महिलेचा डोळा निकामी झाला असल्यामुळे त्यांना त्याची नुकसान भरपाई देता येईल काय यादृष्टीने कार्यवाही करावी अशाप्रकारचे मी आदेश देत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, काल नाशिक शहरामध्ये उद्‌भवलेल्या परिस्थितीबाबतचा विषय मी सभागृहात उपस्थित केला होता. परंतु शासनाकडून त्याबाबत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. नाशिकमध्ये सिडकोच्या परिसरात 60 मोटर सायकल्स त्यातील पेट्रोल काढून जाळण्यात आल्या. याप्रकरणातील समाजकंटकांना पोलिसांना हद्दपारीच्या नोटिसा काढल्या आहेत. परंतु त्यांनी पोलिसांनाच आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे. या हद्दीपारीच्या केसेसचा तपास तातडीने करणे आवश्यक आहे. जे समाजकंटक असतील त्यांच्याविरुध्द तातडीने कारवाई केली पाहिजे. त्यांनी 60 मोटर सायकल्स जाळल्या असल्यामुळे समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. यामध्ये ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मी देखील काल हा विषय उपस्थित केला होता. ज्या विभागामध्ये ही घटना घडली आहे तो संपूर्ण विभाग कामगार वर्गाचा आहे. समाज विघातक प्रवृत्तीच्या लोकांनी त्या भागात 60 मोटर सायकल्स जाळल्या आहेत. 10 दिवसापूर्वी सुध्दा अशा गुंडांनी नाशिक शहरामध्ये हल्ला केलेला आहे. नाशिक शहरामध्ये घडलेले गुन्हे गंभीर स्वरुपाचे आहेत. त्यामुळे शासन त्यांच्यावर कठोर कारवाई करणार आहे काय, जे पोलीस कारवाई करण्यास हलगर्जीपणा करतील त्यांच्याविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

सभापती : नाशिक शहरामध्ये घडलेला प्रकार गंभीर व चिंताजनक आहे. किंबहुना, कायदा व सुव्यवस्थेला आव्हान आहे. त्यामुळे शासनाने आणि विशेषत: गृह विभागाने यासंबंधी कठोर कारवाई करावी आणि अशा प्रवृत्तींना ठेचून काढावे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेनुसार कारवाई केली जाईल.

3....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : काल माझ्याकडे नियम 93 अन्वये सूचना आल्या होत्या आणि आजही काही सूचना आलेल्या आहेत. परंतु कालच्या सूचनांचे वाचन करण्यात आले नव्हते. प्रथम मी कालच्या नियम 93 अन्वये सूचनांचे वाचन करतो, त्यानंतर आजच्या सूचनांचे वाचन करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी "वाशिम जिल्हयाचा विकास आराखडा जवळपास 25 वर्षापूर्वी तयार झाला असून अद्यापही पुनर्प्रसिध्द करण्यात आला नसून हया विकास आराखडयात शहराला लागून जमीन ग्रीन झोनमध्ये आरक्षित करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी " कुर्ला, मुंबई येथील जमीन एका ट्रस्टच्या नावाने असून सदर ट्रस्टने धर्मादाय आयुक्तांची कोणतीही परवानगी न घेता निविदा काढणे, सदर जमिनीवर खाजगी व्यक्तींनी हक्क सांगणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, अशोक मानकर, किशोरराव मानकर यांनी "शासनाच्या आरोग्य विभागात बी.ए.एम.एस. व एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकारी असून त्यांच्या वेतनात तफावत असणे तसेच एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिका-यांना शासकीय सेवेत कायम करण्यात आले असून सुमारे 1200 एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकारी अस्थायी सेवेत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "नुकताच 12 वी चा निकाल लागला असून निकालामध्ये वाणिज्य शाखेतील 96 हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रवेश क्षमता केवळ 70 हजार असल्याने उर्वरित 26 हजार विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य तुकडया वाढविण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर मधुकर चव्हाण यांनी "शिक्षण सेवकांचा कमाल कालावधी तीन वर्षाचा असूनही राज्यातील शेकडो प्रशिक्षित मागासवर्गीय शिक्षण सेवक 5-6 वर्षापासून 1500 रुपये मानधनावर काम करीत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, नितीन गडकरी, विनोद तावडे व प्रकाश शेंडगे यांनी "पिंपरी-चिंचवड येथील सुमारे 394 कारखाने औद्योगिक मंदी, अवाजवी जकात कर, इत्यादी बाबींमुळे बंद पडले असून महापालिकेने औद्योगिक भूखंड निवासी भूखंडामध्ये रुपांतरित करण्यास परवानगी दिल्यामुळे विविध कारणे पुढे करुन कारखाने बंद करुन त्या जागी निवासी गाळे बांधणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "वर्धा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या हिताच्या मागण्यांसंदर्भात तसेच अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना गणवेश देणे, उपस्थिती भत्ता व गणवेशाच्या रंगाबाबत शासनाचे आदेश होऊनही सदर आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याने शिक्षण समितीचे सभापती व सदस्य दि. 8 जून, 2009 पासून उपोषणास बसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व जगदीश गुप्ता यांनी "शिवा या अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेतर्फे त्यांच्या अनेक प्रलंबित मागण्यांसंदर्भात शासनाकडे वेळोवेळी निवेदन करुनही मागण्या मान्य न होणे, लिंगायत वाणी व लिंगायत या जातीसह उपजातीचा ओबीसी प्रवर्गात समावेश करण्याचे माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय होऊनही त्यावर अंमलबजावणी न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर व अरविंद सावंत यांनी "शिरंगे, ता. देडामार्ग येथल संरक्षित वनात विनापरवाना वृक्ष तोड करुन बीजूमेधू या कपंनीने मोठ्या प्रमाणावर वन संपत्तीचे केलेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

दिनांक 08/06/2009रोजी आलेल्या अन्य सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

आता मी आज दिनांक 9 जून 2009 रोजीच्या 93च्या सूचना वाचतो.

सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी "औरंगाबाद शहरातील कचरा उचलण्यासाठी रॅमकी या कंपनीला 11 कोटी रुपयांचे कंत्राट दिले असून तेच काम करण्यासाठी कर्मचा-यांवर 7 कोटी रुपये खर्च येत असल्याने सदर कंपनीस 4 कोटी रुपये शिल्लक देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी दिनांक 17 जुलै 2008 रोजी भिवंडी येथे छापा टाकून अनेक कंपन्यांच्या गुटख्यांची पॅकेट्स मोठ्या प्रमाणावर जप्त करणे, याबाबतचा प्रयोग शाळेचा अहवाल शासनास सादर करुनही त्यावर कोणतीही कारवाई न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील यांनी "कर्जत, जि. रायगड येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त असून सदर रुग्णालयात श्वान दंश, सर्प दंश, विंचू दंश इत्यादी औषधांचा पुरवठा न होणे व इतर सोईसुविधांचा अभाव असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...)

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी "गोंदिया येथे गेल्या अनेक वर्षापासून अवैध दारु व्यवसाय जोरात सुरु असून त्यामुळे तेथे व्यसनाधिनतेचे प्रमाण वाढले असून महिलांनी सदर दुकान बंद करण्याबाबत पोलिसांना वेळोवेळी विनंती करुनही त्यावर कारवाई न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते व डॉ. नीलम गो-हे यांनी "राज्याचे अतिरिक्त सहकार निबंधक श्री. मनोहर भागाजी त्रिभुवन यांना पतसंस्थेचे लेखा परीक्षणाचे काम देण्याच्या बदल्यात लेखा परीक्षकाकडून दीड लाख रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांनी "मुंबई शहराला गेल्या काही वर्षापासून पाणी टंचाई भेडसावत असून यावर श्वेतपत्रिका काढण्याचे आदेश स्थायी समितीने देणे व त्यात मुंबईच्या अमर्याद व नियोजनशून्य विकासामुळे मुंबईला पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असून पाणी पुरवठ्याचा स्त्रोत वाढविण्यात महापालिकेला आलेले अपयश " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत मत/शीघ्रलेखी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर,अरविंद सावंत, किरण पावसकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयातील नेमळे या सहकारी सोसायटीमध्ये त्या सोसायटीचे चेअरमन म्हणून श्री. गरुप्रसाद अर्जून नाईक यांची निवड झाल्यावर त्यांनी सदर संस्था लिक्वीडेशनकडे केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया,किशनचंद तनवाणी,सुरेश जेथलिया यांनी " अकोला जिल्हा परिषदेच्या लघुसिंचन विभागामार्फत शेतक-यांना सिंचन व जलसंधारणाची सोय व्हावी यासाठी कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे योजना राबविली जाऊन त्यासाठी शासनाचा मोठया प्रमाणावर निधी दिला जाऊन सदर कामात गैरव्यवहार होणेबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे, श्री. परशुराम उपरकर यांनी "मुंबईतील रिलायन्स एनर्जी या उपनगरात वीज पुरवठा करणा-या कंपनीच्या वीज दरवाढीच्या विरोधात शिवसेनेने दिनांक 8.6.2009 रोजी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या लाठी हल्ल्यात सुमारे 40 ते 50 जण जखमी होणेबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. रिलायन्स एनर्जीच्या संदर्भात शासन आज निवेदन करणार आहे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

माझ्याकडे नियम 93 ची एकूण 9 निवेदने प्राप्त झालेली आहे. आता निवेदन क्रमांक 1 वर चर्चा सुरु होईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : हत्ती कॅच मोहिम हाती घेऊनही त्याचा फायदा न होणे

मु. शी. : हत्ती कॅच मोहिम हाती घेऊनही त्याचा फायदा न होणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बबनराव पाचपंते (वन मंत्री) : सभापती महोदय, श्री.परशुराम उपरकर यांनी " हत्ती कॅच मोहिम हाती घेऊनही त्याचा फायदा न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, वन विभागाने श्री. विजयानंद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हत्ती कॅच मोहिम हाती घेतली होती. या मोहिमेमध्ये हत्तींना बेहोशीच्या गोळीचा ओव्हर डोस झाल्यामुळे दोन हत्तींचा मृत्यू झाला अशा प्रकारची भावना निर्माण होऊन त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे. सदर हत्तींचा मृत्यू कोणत्या कारणामुळे झाला यासंबंधी वन विभागाने कोणती खातरजमा केली आहे ? त्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, मृत झालेल्या दोन्ही हत्तीचे पोस्टमार्टेम करण्यात आले आहे. पोस्टमार्टेम रिपोर्टप्रमाणे यातील एक हत्ती अतिसाराने मृत झालेला आहे. दुसरा हत्ती आजारी असल्यामुळे मृत झाला आहे. दोन्ही हत्तींचे पोस्टमार्टेम रिपोर्ट आलेले आहेत. ज्यावेळी ही मोहिम राबवावयाची होती, त्यापूर्वी या अनुषंगाने चर्चा झाली होती. ज्या ज्या ठिकाणी मोहिम राबविली, त्या त्या ठिकाणी हवामानाचा परिणाम मोठया प्रमाणात होतो. ज्यावेळी ही मोहिम राबविली त्यावेळी अशा प्रकारची घटना घडू शकतात अशा प्रकारची माहिती श्री. चौधरी यांनी आधीच वन विभागास माहिती दिली होती. हत्ती कॅच मोहिम थांबलेली नाही हे मी नम्रपणे सभागृहास सांगू इच्छितो.

श्री. परशुराम उपरकर : हत्तींच्या उपद्रवामुळे शेतक-यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. याबाबतीत शासनाने काय उपाययोजना हाती घेतल्या आहेत ?

श्री. बबनराव पाचपुते : यानंतर 11 हत्ती आले होते परंतु ते आपल्या हद्दीत येऊ शकले नाही. कोल्हापूर पासून ते थेट खालपर्यंत हत्तींना येण्यास अडथळे निर्माण केले आहेत. त्यामुळे ते हत्ती आपल्या हद्दीत येऊ शकले नाहीत. ते हत्ती परत गेलेले आहेत. आपण हत्ती येऊ नयेत म्हणून अडथळे निर्माण करुन ठेवले असल्यामुळे यापुढे ते हत्ती आपल्या हद्दीत येऊ शकणार नाही. जर हत्ती आले तर त्यांना पकडण्याची वन विभागाने पूर्णपणे तयारी केलेली आहे.

श्री. राजन तेली : माझा पहिला प्रश्न असा आहे की, सिंधुदूर्ग जिल्हयात एकूण हत्तींची संख्या किती आहे ? हत्ती आपल्या विभागात येऊ नयेत म्हणून दोन हद्दीच्या मध्ये सौर ऊर्जेवर कंपाऊंड घालण्यात येणार होते त्याची सद्य:स्थिती काय आहे ? ज्या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली नाही असे किती शेतकरी आहेत ? त्या शेतक-यांना कधीपर्यंत नुकसान भरपाई देण्यात येणार आहे ?

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, जे काम करावयाचे होते ते पूर्ण झालेले आहे. आता आपल्याकडे हत्ती नाहीत. गोव्यात दोन हत्ती गेलेले आहेत. ते हत्ती मधून मधून आपल्या परिसरात येतात ही वस्तुस्थिती आहे. हत्तीच्या उपद्रवामुळे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसान भरपाईपोटी शासनाने एकूण 6 कोटी 98 लाख रुपये दिलेले आहेत. 14 लाख रुपयांची नुकसान भरपाई शेतक-यांना द्यावयाची राहिली आहे. कागदपत्राच्या पूर्तते अभावी ती नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. ते पैसे देखील या वर्षी वाटले जातील.

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : हत्तींना साखळदंडाने बांधून ठेवू शकत नाही. या परिसरात मोठ्या प्रमाणात हत्ती येऊ लागल्याने तेथील जनतेने हत्तींना पकडण्याची मागणी केली होती. हत्ती पकडण्यासाठी श्री. चौधरी या अधिका-यांना बाहेरच्या राज्यातून त्या परिसरात आणले. श्री. चौधरी हे हत्ती पकडण्यामध्ये तज्ज्ञ आहेत अस वारंवार आपणाकडून सांगितले जात होते. हत्तींना पकडल्या नंतर त्यांना अत्यंत सुरक्षित स्थळी त्यांचे स्थलांतर केले जाईल असेही सांगण्यात येत होते. ज्यावेळी श्री. चौधरी यांची या कामासाठी नेमणूक केली त्यावेळी त्यांना त्या परिसरातील हवामानाचा अंदाज नव्हता. परंतु शासनाला त्यासंबंधीचा अंदाज होता. ज्यावेळी श्री.चौधरी यांनी दोन हत्तींना पकडले आणि त्यांना साखळदंडाने बांधून ठेवले होते. हत्तींना साखळदंडाने बांधून ठेवल्यामुळे दोन हत्ती मृत्युमुखी पडलेले आहेत ही गोष्ट आपण नाकारणार आहात काय ? अशा घटना घडू शकतील याची शासनाला माहिती होती तर वन विभागाच्या अधिका-यांनी अशा प्रकारचा प्रयोग का केला ?

श्री. बबनराव पाचपुते : आपल्या हद्दीत हत्ती आले तर ते का आले ? हत्तींना परत पाठविले तर का पाठविले ? हत्तीना पकडावयाचे ठरविले तर का पकडतात ? असे सर्व बाजुने बोलले जाते. हत्ती कॅच मोहिम हाती घेण्यापूर्वी त्या परिसरातील सर्व प्रकारचा अभ्यास करण्यात आला आणि त्यानंतर जागतिक लेव्हलचे जे हत्ती तज्ज्ञ श्री. विजयनंद चौधरी यांना आपण निमंत्रीत केले. सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन केंद्र शासनाने वाईल्ड बोर्ड आहे त्यांनी परवानगी दिलेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ती परवानगी देत असताना काय काय प्रिकॉशन्स घ्यायच्या हे सांगितले. काय होऊ शकते हे सांगितले. पोस्ट मार्टेम अहवाल आला त्यामध्ये अतिसारामुळे मृत्यू झाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे वेगळी चौकशी करण्याची आवश्यकता नाही. आता महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये हत्ती नाहीत.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला शहरामध्ये मागील 15 दिवसांपासून एक माकड सर्व घरामध्ये धुमाकूळ घालत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना हा प्रश्न उपस्थित करता येणार नाही. या संदर्भात त्यांनी मंत्रीमहोदयांना चेंबरमध्ये भेटून मार्ग काढावा.

नियम 93 अन्वये जी निवेदने चर्चेला घेण्यात येत आहेत त्यातील अनुक्रमांक-2 वरील सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांचे निवेदन हे तहकूब करीत आहे. तसे लेखी पत्र सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांनी दिले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रिया अधिक सुलभ करणे

मु. शी. : राज्यातील प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रिया अधिक सुलभ करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे हे निवेदन प्रलंबित ठेवावे.

सभापती : ठीक आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, यापूर्वीचे देखील माझे एक निवेदन पेंडिंग राहिले आहे, आजच्या यादीत ते समाविष्ट झालेले दिसत नाही. त्यामुळे तेही निवेदन उद्या चर्चेला घेण्यात यावे.

सभापती : ठीक आहे. पुढील निवेदन चर्चेला घेण्यात येत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सीआरझेड कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होणे

मु. शी. : सीआरझेड कायद्याची काटेकोर अंमलबजावणी होणे याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे हे निवेदन उद्या चर्चेला न घेता गुरुवारी चर्चेला घेण्यात यावे.

सभापती : ठीक आहे. पुढील निवेदन चर्चेला घेण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील विविध ठिकाणच्या बी.डी.डी.चाळींची वेळेवर साफसफाई होणे

मु. शी. : मुंबईतील विविध ठिकाणच्या बी.डी.डी.चाळींची वेळेवर साफसफाई होणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. निवेदने चर्चेला येत नाहीत. चर्चेला आली तर मंत्रीमहोदय किंवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ती निवेदने चर्चेला घेता येत नाहीत.

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी याची नोंद घ्यावी आणि सन्माननीय मंत्रीमहोदयांना हे सांगणे जरुरीचे आहे. नियम 93 ची निवेदने सभागृहात चर्चेला घेतली जातात त्यावेळी संबंधित मंत्रीमहोदयांना कळविले जाते. असे असताना सुध्दा दुर्दैवाने एखादा अपवाद मी समजू शकतो, परंतु सलग 4 निवेदनांच्या अनुषंगाने मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत हे बरोबर नाही. हे चूक आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : अपवाद हा देखील आपल्या परवानगीने मान्य होऊ शकतो.

श्री.बबनराव पाचपुते : नोंद घेऊन संबंधित मंत्रीमहोदयांना लगेच कळविले जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण निर्णय दिला त्याबद्दल धन्यवाद. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचा मुद्दा योग्य आहे. आपल्याला कळविले पाहिजे, तरच तो अपवाद मान्य होऊ शकतो. परंतु आपलाही आदर राखला जात नाही.

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी संबंधित मंत्री तसेच संसदीय कार्यमंत्री यांनाही आजची परिस्थिती कळवावी.

श्री.बबनराव पाचपुते : ठीक आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे निवेदन उद्या चर्चेला घेण्यात यावे.

सभापती : होय.

पृ. शी. : पेण, जि.रायगड येथील सौ.कविता जोशी या महिलेचा झालेला खून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु. शी. : पेण, जि.रायगड येथील सौ.कविता जोशी या महिलेचा झालेला खून याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी "पेण, जि.रायगड येथील सौ.कविता जोशी या महिलेचा झालेला खून" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

निवेदन क्रमांक-6.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मयत महिलेचे वडील श्री.अर्जून म्हात्रे यांचा जबाब घेण्यात आला का? त्यांचे समाधान झाले आहे का?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सगळ्यांच्या साक्षी घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि निवेदनामध्ये म्हटले आहे की.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण सभागृहाची बैठक ताबडतोब स्थगित करावी. शासनाकडून हा छळवाद चालू आहे. सरकार, मंत्री यांना काही देणे घेणे नाही. संपले आता. दोन महिन्यांनी निवडणुका होणार आहेत. ढोल वाजवायचा आहे. आलो तर आलो. नाही तर नाही. सदनाचा वारंवार अवमान होत आहे. आपल्याला हा अवमान सहन होतो का? रोजच्या रोज होणारा अवमान आपल्याला सहन होतो का?

श्री.भास्कर जाधव : (जागेवर बसून) माननीय सभापतींनी तंबी दिली आहे.

एक्स.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : परंतु माननीय मंत्री महोदयांना अनेक वेळा तंबी देऊन सुध्दा फायदा होत नाही, यावरुन किती निलाजरेपणा आलेला आहे हेच दिसून येते.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण सभागृहात येण्यापूर्वी माननीय मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते यांना मी निदेश दिलेले आहेत की, अशा प्रकारे नियम 93 ची निवेदने सभागृहात चर्चेला असताना देखील संबंधित विषयाचे मंत्री महोदय उपस्थित राहत नाहीत, ही अत्यंत गंभीर बाब आहे. यासंदर्भात मी माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना मी एक पत्र लिहिणार आहे की हे कितपत बरोबर आहे ? सदनातील कामकाज सर्वात महत्वाचे मानले जाते व त्याची गांभीर्याने नोंद घेण्याची व्यवस्था करावी.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, निवेदन क्र. 6 वर चर्चा सुरु आहे. त्या अनुषंगाने मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, सदर प्रकरण अत्यंत गंभीर आहे. एका उच्चशिक्षीत पदवीधर मुलीला आत्महत्त्येला प्रवृत्त करण्यासंबंधीची तक्रार करण्यात आली होती. त्याची सविस्तर चौकशी करण्यात आली असून याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. त्यात 306 हे कलम सुध्दा अंतर्भूत केले आहे. 306 कलम म्हणजे "इक्विव्हॅलंट टू मर्डर" खुनाच्या गुन्ह्याला लावतो तितकेच गंभीर हे कलम आहे. यामध्ये 16 साक्षीदारांची नोंद घेण्यात आली असून या मुलीचा व्हिसेरा दि. 25.5.2009 रोजी प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविलेला आहे. त्याचा अहवाल आल्यानंतर जो निष्कर्ष येईल त्यानुसार नोंद केली जाईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा केंद्रीय वेतन आयोग जसाच्या तसा लागू करण्याबाबत करण्यात आलेले लेखणीबंद आंदोलन

मु.शी.: राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सहावा केंद्रीय वेतन आयोग जसाच्या तसा लागू करण्याबाबत करण्यात आलेले लेखणीबंद आंदोलन याबाबत श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : महोदय, निवेदन क्र. 7 च्या विषयाचे दोन्ही माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल देखील सभागृहात महत्वाची चर्चा सुरु होणार असताना एकही मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते, हे योग्य नाही. म्हणून सभागृहाची बैठक स्थगित करुन संबंधित माननीय मंत्री महोदयांना सभागृहात बोलाविण्याची व्यवस्था करावी.

श्री. नितीन राऊत : नियम 93 अन्वये मला जी सूचना देण्यात आली होती ती 7 व्या क्रमांकावर होती परंतु ती 6 व्या क्रमांकावर पुकारण्यात आली.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मंत्री महोदय उपस्थित नसतात अशा परिस्थिती सभागृहाची बैठक स्थगित करावी लागली तरी चालेल पण हा विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : निवेदन क्र. 7 हे उद्या घेण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : उद्या कशाला, आजच हे निवेदन घेऊ.

सभापती : सभागृहात ज्या ज्या मंत्री महोदयांची निवेदने आहेत त्यांनी सभागृहात उपस्थित व्हावे म्हणून मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, निवेदन क्र. 8 घेण्यास हरकत नाही.

श्री. दिवाकर रावते : माननीय सभापती महोदयांनी सभागृहाची बैठक स्थगित करण्यासंबंधीचा निर्णय दिलेला आहे.

(12.38 ते 12.48 बैठक स्थगित झाली)

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(विरोधीपक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहात निवेदन 93 अन्वये दिलेल्या सूचनेवर निवेदन सुरु असतांना संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय उपस्थित नसल्यामुळे माननीय सभापती महोदयांनी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित केले होते. आता सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरु झाले असतांनाही सभागृहात संबंधित विभागाचे एकही मंत्री उपस्थित नाहीत. आपण जे काही निर्देश देता त्यासंदर्भात मंत्रीमहोदय सिरिअस घेत नाही. हा जो प्रकार चालला आहे त्याला शासन म्हणतात काय? सभागृहात हा जो प्रकार चालला आहे तो काय चालला आहे? मंत्रीमहोदयांची सभागृहाच्या संदर्भातील वागणूक बेजबाबदारीची आहे. त्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे अशी विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे सरकार भुक्कड आहे, खुशाल चेंडू आहे. सभागृहाच्या कामकाजाबद्दल हे सरकार गंभीर नाही. त्यामुळे संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी शांत रहावे .

श्री.मधुकर चव्हाण : पाच निवेदनाना उत्तरे देण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे आवश्यक असतांना एकही मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.नितीन गडकरी : माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय मंत्र्यांना अनेकदा सांगूनसुध्दा माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत ही गोष्ट बरोबर नाही.

उपसभापती : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने सुरु असतांना जर माननीय मंत्री महोदय सभागृहात हजर नसतील तर सदस्यांना चीड येणे स्वाभाविक आहे. माननीय मंत्री महोदय सभागृहात नसल्यामुळे कित्येक वेळा दिवसातून दोन चार वेळा सभागृहाची बैठक तहकूब करावी लागते. सत्ताधारी पक्षाची ही जबाबदारी आहे..

श्री.नितीन गडकरी : पीठासीन अधिका-यांची भूमिका सहिष्णूतेची आहे, पीठासीन अधिका-यांचे धोरण बोटचेपेपणाचे आहे. त्यांनी याबाबतीत कडक धोरण स्वीकारले पाहिजे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांना मी सांगू इच्छितो की, आपण येथे असल्यामुळे मला वारंवार येथे यावे लागत आहे. एवढे माझे तुमच्यावर प्रेम आहे. मी लोकसभेत चाललो होतो परंतु तुमच्यावरील प्रेमापोटी मी येथे परत आलो आहे . आपला दो हंसो का जोडा है यह बिछड नही सकता. असो.

माननीय सदस्यांनी जी व्यथा मांडलेली आहे त्या बाबतीत आताच मी माननीय सभापतीशी बोललो होतो. प्रत्येक वेळी निवेदन पुढे ढकलण्यात यावे असे आपण सांगत असतो, असे करता करता एक दिवस अधिवेशनच आपल्याला पुढे ढकलावे लागेल. असे मी त्यांच्याशी बोललो होतो. मंत्री उपस्थित न राहिल्यामुळे निवेदन पुढे ढकलण्याची वेळ सत्ताधारी पक्षाने पीठासीन अधिका-यांवर आणता कामा नये . माननीय सभापतींनासुध्दा कित्येक वेळा पेचात पडावे लागते. माझ्या सारख्या व्यक्तिचीसुध्दा तीच स्थिती आहे. सत्ताधारी पक्षाने ही बाब अत्यंत गांभीर्याने घ्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, वारंवार सांगूनसुध्दा मंत्री ऐकत नाहीत.सहा निवेदनाला उत्तर देण्यासाठी या ठिकाणी कोण मंत्री उपस्थित आहे हे आपण पहा. अजूनही माननीय मंत्री महोदय सभागृहात आलेले नाहीत. वारंवार सांगूनही मंत्री ऐकत नाहीत तेव्हा त्यांना बेंचवर उभे केले पाहिजे. याबाबतीत एक बैठक आपल्या दालनात बोलविण्यात यावी.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभागृहातील कामकाज चालू राहण्यासाठी एका कॅबिनट मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे त्याप्रमाणे मी येथे उपस्थित आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

उपसभापती : सभागृहाची बैठक 1.15 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(12.52 ते 1.15 बैठक स्थगित झाली)

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभागृहात अनेक मंत्री उपस्थित नसणे

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या सदनाच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच सहापैकी पाच नियम 93 अन्वयेच्या निवेदनाला उत्तर देण्यासाठी सत्तास्थानावर असलेल्या पक्षाचे संबंधित मंत्री अनुपस्थित असल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागले. त्यानंतर पुन्हा सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर तीच स्थिती होती. सभापती महोदय, या लोकशाहीमध्ये एक गोष्ट आपल्या लक्षात आली आहे की, सत्ताधारी पक्षाकडून या सभागृहाचे पीठासीन अधिकारी म्हणून आपला सन्मान ठेवला जात नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेक मंत्र्यांना मेमो दिले तरी त्यांचा सन्मान ठेवला जात नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांचे सुध्दा हे मंत्री ऐकत नाहीत. आता हे प्रकार आऊट ऑफ कंट्रोल झाले आहेत. आपण वारंवार सूचना देऊन सुध्दा हे मंत्री आपले ऐकत नाहीत. या सभागृहात पीठासीन अधिकारी म्हणून आपला सन्मान आहे की नाही असा संशय आमच्या मनात निर्माण झाला आहे. एकदा झाली तर ती चूक असते, परंतु वारंवार चुका केल्या जात आहेत, रोज हे प्रकार सुरु आहेत. एका आठवडयात किती वेळा हे प्रकार घडले? सभापती महोदय, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी कामकाजाचा आढावा वाचून दाखवितांना मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे सभागृहाचा किती वेळ वाया गेला हे सुध्दा आपण सांगितले पाहिजे. माझी आपणास विनंती आहे की, हे प्रकार खूप झाले असल्यामुळे आपण त्यांना तंबी देऊन चालणार नाही. खरे म्हणजे या सर्व मंत्र्यांच्या बेजबाबदार वर्तनाबद्दल एक दिवस या सभागृहामधून त्यांना निलंबित केले पाहिजे. त्यांना या सभागृहामध्ये येण्यापासून वंचित केले पाहिजे. तेव्हा आपण काहीतरी केले पाहिजे. हे मंत्री आपणास आणि या सभागृहास खूप लाईटली घेत आहेत, या सभागृहाला गंभीरपणे घेत नाहीत. आपली व या सभागृहाची अप्रतिष्ठा व अवमान करीत आहेत. यामुळे विधान परिषदेमध्ये उपस्थित राहिले नाही तरी काहीही कारवाई होत नाही अशाप्रकारचा चुकीचा मेसेज बाहेर जाणे योग्य नाही. अशाप्रकारे या सभागृहाची क:पदार्थ प्रसिध्दी होत आहे. या सभागृहाची प्रतिष्ठा राखण्यासाठी आपण निर्णय घेणार आहोत की नाही? माझी आपणास विनंती आहे की, दरवेळी आपण उदार दृष्टीकोन ठेवता, दरवेळी त्यांना सहानुभूती दाखवून माफ करता, असे करु नका म्हणून सांगता. आणि खाली बसून ते आपली मान डोलवितात. परंतु त्याप्रमाणे ते कधीही वागत नाहीत हे 100 वेळा सिध्द झाले आहे. माझी आपणास विनंती आहे की, या बाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. नितीन गडकरी....

आपणाकडून कठोर मेसेज जाईल अशाप्रकारचा निर्णय घेतला पाहिजे. आम्हाला म्हातारी मेल्याचे दु:ख नाही. परंतु याबाबतीत आपण कठोर निर्णय घेतला पाहिजे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाच्या कामकाजाचा आढावा वाचून दाखविला जातो, त्यामध्ये मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे सभागृहाचा वाया गेलेला वेळ सुध्दा वाचून दाखविण्यात यावा अशी मी आपणास विनंती केली होती. त्याप्रमाणे आपण तो वाया गेलेला वेळ वाचून दाखवीत आहात. परंतु हे वाचन म्हणजे मंत्रिमहोदयांना गौरवोद्गार वाटावयास लागले आहेत. मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे सभागृहाचा वाया गेलेला वेळ वाचणे म्हणजे त्यांना गौरवोद्गार वाटत आहेत. त्याची दखल घ्यावयाची नाही असे या मंत्र्यांनी ठरविले आहे. त्यामुळे या मंत्र्यांना एक दिवस आपण निलंबित केले पाहिजे. नाहीतर हे सभागृह तरी एक दिवस निलंबित केले पाहिजे...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण आम्हाला शिक्षा द्या, आपण द्याल ती शिक्षा भोगण्यास आम्ही तयार आहोत.

श्री. दिवाकर रावते : मागील दहा अधिवेशनापासून त्यांना तंबी देण्याबाबत मी ऐकत आहे. परंतु त्यांना तंबी म्हणजे काय हे कळत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, अधिवेशन काळात आपणास व माननीय उपसभापती यांना मदत करण्यासाठी तालिका सभापती नियुक्त केले जातात. त्याप्रमाणे मंत्र्यांना मदत करण्यासाठी तालिका मंत्री नेमण्यात यावेत अशी माझी विनंती आहे. त्यामुळे या सभागृहाचे कामकाज सुरळीत चालेल, सभागृहाचा वेळ वाया जाणार नाही. माझ्या या सूचनेचा गंभीरपणे विचार करावा अशी विनंती आहे.

श्री. नितीन गडकरी : त्यामुळे जे मंत्री झाले नाहीत त्यांनाही समाधान मिळेल.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हे सभागृह चालविण्यासाठी कॅबिनेट मंत्र्यांची आवश्यकता असते. या सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित होते. नियम 93 च्या निवेदनावरील चर्चा सुरु झाली त्यावेळी आपण पहिले निवेदन स्थगित ठेवले. त्यानंतर दोन निवेदनांच्या बाबतीत आपण निर्णय दिला. एकूण 6 निवेदनांपैकी 3 निवेदनावरील चर्चा पूर्ण झाली.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे झालेले नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, येथे नियम 93 च्या सहा निवेदनांवर उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय उपस्थित नव्हते.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, दोन निवेदनांच्या बाबतीत उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय उपस्थित नव्हते असे सांगितले. पहिले निवेदन तर माझ्या विभागाशीच संबंधित होते . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.बबनराव पाचपुते : आतापर्यंत सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकलेले आहे. मग आता माझे म्हणणे देखील ऐकून घ्यावे. येथेच अडचण होते. कारण तुम्ही कोणी ऐकून घेत नाही. तुम्हाला दुसऱ्याचे ऐकावयाचे लक्षात येत नाही. माझे थोडेसे ऐकून घ्यावे. माझे ऐकून घ्यावे. याठिकाणी नियम 93 अन्वये वरील निवदनांवर चर्चा होत असताना, दोन सूचना वाचल्यानंतर संबंधित मंत्री महोदय उपस्थित नसल्याने आपण असे सांगितले की, या सूचना पुढे ढकलण्यात याव्यात आणि त्या नंतर घ्याव्यात. येथे निवेदनावरील चर्चा सुरु होत असताना, आपण ज्या प्रकारच्या सूचना दिल्या . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एकंदर सहा निवेदने होती.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना बोलू द्यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मधाशी आम्ही काहीतरी चुकीचे बोललो आहे असे रेकॉर्डवर जाणार आहे आणि त्यामुळे आमची बदनामी होणार आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, तीन निवेदनांवर चर्चा झाली. परंतु सहा निवेदनांपैकी पाच निवेदनांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय उपस्थित नव्हते ही वस्तुस्थिती आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, असे नाही. परत एकदा तपासून पहावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तपासून बघावे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तेव्हा उपस्थित नव्हते, त्यामुळे तुम्ही एकदा तपासून पहावे. तुम्ही तिघेही उपस्थित नव्हता.

. . . .2 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला सगळयांनी सांगितले आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माझ्या विभागाशी संबंधित पहिल्या निवेदनावर चर्चा झाली.दुसऱ्या निवेदनाच्या वेळी माननीय मंत्री महोदय येथे उपस्थित होते.तिसऱ्या निवेदनाच्या वेळी माननीय गृहमंत्री उपस्थित होते. त्यानंतर चौथे आणि पाचवे या दोनच निवेदनांवरील चर्चा पुढे ढकललेली आहे. सहाव्या व सातव्या निवेदनांवर चर्चा करण्यासाठी माननीय मंत्री महोदय येथे उपस्थित होते. येथे सन्माननीय तीनही ज्येष्ठ सभासद हजर नव्हते. अशा वेळी असा आरोप करणे हे . . . .

सभापती : मी सांगू इच्छितो की, याठिकाणी श्री.परशुराम उपरकर यांची पहिली नियम 93 अन्वये सूचना होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदय उपस्थित होते. दुसरी नियम 93 अन्वये सूचना सन्माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया यांची होती. परंतु त्यांनी माझ्याकडे चिठ्ठी दिली होती की, मी काही कारणासाठी अर्जन्टली बाहेर जात आहे . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : पण माननीय मंत्री उपस्थित नव्हते.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय उपस्थित होते. चार-पाच मंत्री महोदय उपस्थित होते.

(अनेक सन्माननीय सदस्य खाली बसून एकदम बोलतात.)

सभापती : त्यावेळी माननीय राज्यमंत्री श्री.विजय वडेट्टीवार उपस्थित होते. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची नियम 93 अन्वये सूचना होती आणि सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, परंतु मंत्री महोदय उपस्थित नव्हते.

सभापती : त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, कपिल पाटील यांची नियम 93 अन्वये सूचना होती.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, त्यावेळी माननीय मंत्री महोदय उपस्थित नव्हते.

सभापती : त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते व संजय केळकर यांची नियम 93 अन्वये सूचना होती. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ उपस्थित नव्हते.

. . . .2 बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय वन मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांना त्यांचे शब्द मागे घ्यावयास सांगावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

सभापती : यानंतर सर्वश्री.जयंत पाटील, कपिल पाटील यांची नियम 93 अन्वये सूचना होती. त्यावेळी गृह राज्यमंत्री श्री.नितीन राऊत उपस्थित होते. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. परंतु त्यावेळी माननीय वित्त मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील उपस्थित नव्हते.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यावरुन असे दिसून येते की, सात सूचनांपैकी जवळजवळ पाच सूचनांशी संबंधित असलेले विविध विभागांचे माननीय मंत्री महोदय उपस्थित नव्हते.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, यावर खुलासा करण्यापेक्षा, याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी किमान दिलगिरी तरी व्यक्त करावयास पाहिजे आणि यावर पडदा टाकावा.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, काही माननीय राज्यमंत्री येथे आले, परंतु सभागृहाचे कामकाज थांबविण्यात आले होते. आपण पहिल्या वेळेस सांगितल्यानंतर, जेव्हा दुसऱ्या वेळेस कामकाज स्थगित केले, तेव्हा मी येथे उपस्थित होतो. परंतु असे सांगण्यात आले की, सदनामध्ये एकही मंत्री उपस्थित नाहीत. सभागृहाच्या दरवाजामध्ये माननीय मंत्री महोदय असताना असे सांगण्यात आले की, सदनामध्ये एकही मंत्री उपस्थित नाहीत. सभागृहातील बेल बंद झाली, तेव्हा मी येथे आलो ही वस्तुस्थिती आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तुमच्या उपस्थितीचा . . . .

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय,मी त्यानंतरचे सांगत आहे. पहिल्या वेळेस सभागृह स्थगित झाल्यानंतर, पुन्हा बेल सुरु झाली. मग बेल संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु झाले, तेव्हा आपण असे सांगितले की, सदनामध्ये एकही मंत्री महोदय उपस्थित नाहीत, मी येथे उपस्थित होतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, संबंधित विभागाचे कॅबिनेट मंत्री उपस्थित नव्हते.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित असल्यानंतर

. . . .2 बी-4

श्री.बबनराव पाचपुते . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामकाज सुरु करण्यामध्ये काही अडचण नाही. पण आता आपण सांगितले, त्याप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सदनामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत म्हणून सभागृह स्थगित करण्यात आले होते काय? तर याठिकाणी नियम 93 अन्वये ज्या विषयाच्या बाबतीत सूचना देण्यात आलेली आहे,त्या विषयाशी संबंधित माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत म्हणून सभागृह स्थगित करावे लागले आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यठिकाणी माननीय संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत. याबाबतीत आपण जी सूचना केलेली आहे, त्याबाबतीत आम्ही अंमलबजावणी करु.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मग यांनीच येथे उपस्थित रहावे आणि तुम्हीच सगळी उत्तरे द्यावीत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या सदनामध्ये कॅबिनेट मंत्री महोदय हजर होते, पण या मुद्याची आणि संबंधित विषयाच्या संबंधातील माननीय मंत्री महोदय हजर नाहीत या मुद्याची आपण गल्लत करु नये. नियम 93 अन्वये ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्याच्याशी संबंधित असलेल्या विभागाच्या मंत्री महोदयांच्या उपस्थितीचा येथे पाढा वाचून दाखविल्यानंतर पुन्हा तुम्ही त्याबद्दल सांगत आहात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी संबंधित विषयांच्या संबंधातील कॅबिनेट मंत्री महोदय उपस्थित असले पाहिजेत असा विषय आहे. जेव्हा सभागृह स्थगित झाल्यानंतर, पुन्हा सुरु होण्यापूर्वी पाच मिनिटे अगोदर बेल वाजते. अशा वेळी ती संपण्यासाठी एक-दोन मिनिटांचा अवधी राहिल्यानंतर तरी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये उपस्थित झाले पाहिजे की नाही ? पण बेल संपल्यानंतर सभागृह सुरु होते, पण कॅबिनेट मंत्री हजर नसतात, मग ओरड सुरु होते की, कॅबिनेट मंत्री कुठे आहेत ? मग ते धावत-पळत येतात. हा सुध्दा या सदनाचा अवमान नाही काय ? माननीय मंत्री महोदयांनी अगोदर सदनामध्ये उपस्थित राहिले पाहिजे. ते त्यांचे काम आहे, कर्तव्य आहे, त्यांचे सरकार आहे. असे कसे चालेल?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नाही

सभापती :सभागृहात संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत मला त्यांच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, मी 10 मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज तहकूब या करिता केले की, ज्यावेळी नियम 93 ची निवेदने चर्चेसाठी असतील किंवा अन्य कोणतेही कामकाज असेल त्यावेळी त्या त्या विभागाच्या सन्माननीय मंत्र्यांनी किंवा राज्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे ही आवश्यक बाब आहे. सदनाची प्रतिष्ठा राखणे आणि त्या त्या विभागाचे जे मंत्री असतील त्यांनी अचूक वेळेवर या सदनामध्ये येणे हे त्यांचे काम आहे. या अनुषंगाने त्यावेळी माझ्या असे निदर्शनास आले की, 7 निवेदनापैकी किमान 4 निवेदनावरील चर्चा मंत्री नाहीत म्हणून थांबली असेल तर ही परिस्थिती चागली नाही, म्हणून मी दहा मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज तहकूब केले होते. सन्माननीय संसदीय मत्र्यांना त्यादृष्टीने माझी सक्त सूचना आहे की, सरकारच्या अनुषंगाने सदनामध्ये संबंधित मंत्र्यांची उपस्थिती सातत्याने रहाणे हे अत्यंत महत्वाचे काम गाहे. या पुढच्या काळात यादृष्टीने आपण काळजी घ्यावी. सदनाचा वेळ एक मिनिटसुध्दा वाया जाणे हे तुमच्या आणि आमच्या दृष्टीने कोणालाच भूषणावह नाही. असे प्रकार या पुढच्या काळात, होऊ नयेत अशी माझी विनंती आहे. या अनुषंगाने सभागृहाचा जो वेळ वाया गेला आहे, त्याची आपण नोंद घ्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, निश्चितपणे सभागृहाच्या कामकाजामध्ये सरकारच्या वतीने मंत्री, राज्यमंत्री उपस्थित राहणे आवश्यकच आहे. तथापि या संदर्भामध्ये सभागृहाचा वेळ गेला आणि आपण सक्त शब्दामध्ये सूचना केली, त्याची निश्चितपणे अंमलबजावणी करण्यात येईल आणि असे प्रसंग पुन्हा घडणार नाहीत याच्या संदर्भातील खबरदारी घेण्यात येईल. या सदनामध्ये अशा पध्दतीने सभागृहाचा वेळ वाया गेला याबद्दल संसदीय कार्य मंत्री या नात्याने मी दिलगिरी व्यक्त करतो.

<u>नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत</u>

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, आता सभागृहात मंत्रिमहोदय आहेत तेव्हा नियम 93 वरील निवेदने चर्चेला घेण्यात यावीत.

सभापती : नियम 93 अन्वयेची जी निवेदने घ्यावयाची राहिली आहेत ती सगळी निवेदने उद्या घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : मनोरा आमदार निवासा शेजारी झोपडपट्टीचे बेट तयार होणे.

मु. शी. : मनोरा आमदार निवासा शेजारी झोपडपट्टीचे बेट तयार होणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"मुंबई शहरात नरिमन पॉइंट येथे मनोरा आमदार निवासा शेजारी समुद्रकाठी झोपडपट्टीचे मोठे बेट तयार होणे, दररोज नवीन झोपडयांमध्ये होणारी वाढ, झोपडवासीय नागरिक समुद्रकाठी नैसर्गिक विधी व केर कचरा टाकून प्रदूषण निर्माण करणे, सगळया झोपडपट्टीतला ओला सुका कचरा समुद्र किणारी टाकणे, तसेच रोज कचरा अथवा तत्सम वस्तुंना आग लावून जाळण्यात येणे त्यामुळे तेथील धुराचा व प्रदूषणाचा अजुबाजूच्या रहिवाशी व सरकारी इमारतींरना व मनोरा आमदार निवासातील रहिवाश्यांना होणारा त्रास व रोज वाढत जाणऱ्या झोपडयांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या महापालिका व संबंधित अधिकाऱ्यांचे होणारे दुर्लक्ष व त्यामुळे समान्य जनमानसात निर्माण झालेली चिड व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, मनोरा आमदार निवासात मी वरच्या मजल्यावर रहाते. खाली कचरा जाळला जातो त्या धूराने रात्री झोप येत नाही, इतकेच नाही परवा रात्री माझा घसा दुखायला लागला. या ठिकाणी रोज झोपडया आणि घोडयांचे तबेले वाढत चाललेले आहेत. यासंबंधात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन ताबडतोब कारवाई करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत यत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात वीज रोधक यंत्रे तातडीने बसविण्याची आवश्यकता

मु. शी. : मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात वीज रोधक यंत्रे तातडीने बसविण्याची आवश्यकता याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती: मा□□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

" मराठवाड्यात नेहमीच धुमाकूळ घालणाऱ्या विजेने गेल्या पाच वर्षात 486 जणांचा बळी घेतला जाणे, तसेच या विभागात वीज कोसळण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात वीजरोधक यंत्र बसविण्याचा शासनाने निर्णय घेऊन यासाठी आठही जिल्ह्यांसाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचा निधी पुरविण्यात येणे, तथापि, औरंगाबाद जिल्हा वगळता अन्य जिल्ह्यात वीजरोधक यंत्रे न बसविणे, त्यामुळे सदर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वीज कोसळून मृत्युच्या घटना वारंवार होणे, याबाबत सदर प्रकरणाला आळा बसावा म्हणून वीजरोधक यंत्र तातडीने बसविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना."

सभापती महोदय, मराठवाड्यात नेहमीच विजेने धुमाकूळ घातलेला आहे. गेल्या पाच वर्षात पावसाळ्यामध्ये पडलेल्या विजेने 486 जणांचा बळी गेलेला आहे. या विभागात वीज कोसळण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात वीज रोधक यंत्र बसविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याला 1 लाख रुपयांचा निधी पुरविण्याचा निर्णय सुध्दा झालेला आहे. परंतु औरंगाबाद जिल्हा वगळता इतर कोणत्याही जिल्ह्यामध्ये अशी वीजरोधक यंत्रे शासनाने बसविलेली नाहीत. आता नुकताच पावसाळा सुरु होत आहे. वीज रोधक यंत्रे बसविण्याचा जो निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे त्या अनुषंगाने मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये येत्या एक महिन्याच्या आत वीजरोधक यंत्रे कार्यान्वित करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पाचाड येथील जिजामाता वाडा आणि समाधीच्या दुरवस्थेकडे पुरातत्व खात्याचे झालेले दुर्लक्ष

मु. शी. : पाचाड येथील जिजामाता वाडा आणि समाधीच्या दुरवस्थेकडे पुरातत्व खात्याचे झालेले दुर्लक्ष याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□य सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची राजधानी म्हणून महाड (जि.रायगड) तालुक्यातील रायगड किल्ला निवडला होता. पर्यटक रायगड किल्ला पाहून परत जातात. छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणाऱ्या राजमाता जिजामातेचा वाडा आणि समाधी रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेल्या पाचाड गावी आहे. राजमाता जिजामातेचा हा वाडा आणि समाधी केंद्रीय पुरातत्व विभागाच्या ताब्यात आहे. परंतु योग्य देखभाल दुरुस्ती अभावी या वाड्यातील पुरातन वास्तूची दुरवस्था झाली आहे. आज या वाड्यात जाण्यासाठी चांगला रस्ता नाही. वाड्याच्या तटबंदीच्या भिंती ढासळत आहेत. जुनी जोती, दगडी भिंतीवर जंगली झाडे उगवली आहेत. या झाडांच्या मुळांमुळे पडझड वाढत आहे. पुरातत्व खात्याने योग्य वेळी याची दखल घेतली नाही तर जिजामातेचा हा वाडा जमीनदोस्त होण्यास फार काळ लागणार नाही. तरी या महत्वपूर्ण वास्तूची देखभाल करण्यासाठी शासनाने खास प्रयोजन करावे यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : भाज्या हिरव्यागार आणि टवटवीत ठेवण्यासाठी घातक रसायनांचा वापर केल्यामुळे जनतेला गंभीर आजारांना सामोरे जावे लागणे

मु. शी. : भाज्या हिरव्यागार आणि टवटवीत ठेवण्यासाठी घातक रसायनांचा वापर केल्यामुळे जनतेला गंभीर आजारांना सामोरे जावे लागणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

" घातक रसायनांचा वापर करुन भाज्या हिरव्यागार आणि ताज्या टवटवीत ठेऊन बाजारात विक्रीसाठी येत असल्याचे भयानक सत्य उघडकीस येणे, परिणामी जनतेला अंधत्व, लिव्हर आणि किडनीचे विकार, गर्भपात, स्तनाचा कर्करोग, हृदयविकार यासारख्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागणे, फळभाज्यांची वाढ होण्यासाठी काही कालावधी जावा लागतो, परंतु एका इंजेक्शनच्या सहाय्याने एका रात्रीत हिरव्यागार भाज्या तयार होतात, तसेच माणसाच्या पोटात गेल्यानंतर एखादा अवयव निकामी होण्याची शक्यता असणे, क्युप्रिक सल्फेट, कार्बाईड तसेच ऑक्सिटोसीन या घातक रसायनांचा वापर केला जाणे, सदर प्रकरणी तातडीने लक्ष घालून सदर रसायनांच्या वापरावर तात्काळ बंदी घालण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा व अतिगंभीर असून त्यावर चर्चा करण्यासाठी मी सदर विषय सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : 'ब' वर्ग जमीन हस्तांतरणाची हजारो प्रकरणे प्रलंबित असणे

मु. शी. : 'ब' वर्ग जमीन हस्तांतरणाची हजारो प्रकरणे प्रलंबित असणे याबाबत श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"नुकतेच शासनाने 'ब' वर्ग जमीन हस्तांतरणावर बंदी आणली असताना व नागरिकांना त्यांच्या जमिनी कायम पट्टयावर दिल्यानंतरही ती हस्तांतरण करताना त्यांना 50 टक्के किंमत बाजारभावाने शासनास द्यावी लागत असून अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा व इतर जिल्ह्यातील शासकीय जमिनी 99 वर्षाच्या कालावधीसाठी नागरिकांना लिजवर देण्यात आलेल्या असून जमिनीच्या हस्तांतरणाची रक्कम शासनास भरल्यानंतरही तसेच शासनाने कायम पट्टयावर देऊनही हस्तांतरण करण्यास शासनाकडून परवानगी मिळण्यास होत असलेला विलंब, शासकीय जमिनीवरील हस्तांतरणाची अनेक प्रकरणे शासनाकडे अनेक वर्षापासून प्रलंबित असून शासनानेच हस्तांतरणावर बंदी आणली असताना अशा प्रकारे हस्तांरणास परवानगी देण्यास विलंब होतो. 'ब' वर्ग हस्तांरणास विलंब होत असून अशी हजारो प्रकरणे शासनाकडे प्रलंबित असून याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन तसे निवेदन करावे, ही विनंती."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चेंबूर येथील चिल्ड्रेन एड सोसायटीचे बडतर्फ अधीक्षक श्री. के. बी. पुरी यांनी महिलांशी केलेल्या गैरवर्तनाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना ते शासकीय निवासस्थानी राहात असणे

मु. शी. : चेंबूर येथील चिल्ड्रेन एड सोसायटीचे बडतर्फ अधीक्षक श्री. के. बी. पुरी यांनी महिलांशी केलेल्या गैरवर्तनाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असताना ते शासकीय निवासस्थानी राहात असणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"चेंबूर मुंबई चिल्ड्रेन एड सोसायटीचे बडतर्फ अधीक्षक श्री. के. बी. पुरी यांनी महिलांशी केलेल्या गैरवर्तनावरुन व त्याबाबत नेमलेल्या चौकशी अधिकाऱ्यांच्या अहवालाच्या आधारे श्री. के. बी. पुरी यांच्या विरुध्द भा.द.वि.संहितेच्या कलम 354, 509 अन्वये ट्रॉम्बे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यानंतर श्री. पुरी यांना बडतर्फही करण्यात आले. श्री. पुरी हे बडतर्फ होऊनही ते शासकीय निवासस्थानी राहात असून ते वसतिगृहातील मुलांना हाताशी धरुन पुरावे नष्ट करीत आहेत. श्री. पुरी यांच्या विरोधात दिलेला चौकशी अहवाल ज्या चौकशी अधिकाऱ्यांनी दिला त्यांनाच शासनाने सेवेतून निलंबित केले. आजही श्री. के. बी. पुरी संस्थेच्या परिसरातील शासकीय निवासस्थानी राहात असून त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या न्यायप्रविष्ट प्रकरणातील साक्षीपुरावे नष्ट करण्याचे प्रयत्न करीत असून बडतर्फ अधीक्षक श्री. पुरी यांना तात्काळ शासकीय निवासस्थान खाली करुन घेण्याबाबत शासनाला काही अडचण आहे काय किंवा कसे याबाबत तातडीने निवेदन करावे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

सभापती महोदय, मुंबईमधील चेंबूर भागामध्ये चिल्डेन एड सोसायटीबाबतचा प्रश्न या ठिकाणी अनेक वर्षे विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये गाजत होता. या चिल्ड्रेन एड सोसायटीमध्ये श्री. पुरी नावाचे गृहस्थ काम करीत असताना त्यांना बडतर्फ करण्यात आले. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांनी अनेक महिलांचा वेगवेगळ्या पध्दतीने शारीरिक व मानसिक छळ केला म्हणून श्री. पुरी यांच्या बडतर्फीचा निर्णय झाला. परंतु श्री. पुरी हे आजही त्या चिल्ड्रेन एड सोसायटीच्या आवारात राहतात. त्या चिल्ड्रेन एड सोसायटीच्या अध्यक्षा आमदार श्रीमती ॲनी शेखर आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

विशेषत: महिला व बालकल्याण विभागाकडून सहकार्य मिळत नसल्यामुळे श्री.पुरी हे बडतर्फ होऊनही ते शासकीय निवासस्थानामध्ये रहात आहेत. वसतिगृहामाधील लहान मुलांना हाताशी धरुन पुरावे नष्ट करीत आहेत. श्री.पुरी यांच्याविरुध्द 354 व 509 अन्वये ट्रॉम्बे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविलेला आहे. त्यामध्ये सुध्दा ते हस्तक्षेप करीत आहे. त्यांच्या केसचा निकाल लागण्यापूर्वी ते पुरावे नष्ट करीत असल्यामुळे श्री.पुरी हे बडतर्फ झालेले असल्यामुळे त्यांचे शासकीय निवासस्थान ताबडतोब खाली करुन घेण्यामध्ये सरकारला काय अडचण आहे जे जाणून घेण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मी विनंती करीत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बल्लारपूर कोल माईन्स WCL सास्ती ओमन कास्टमध्ये सेफ्टी नियम WCL द्वारे माईन्सचे काम न करणे व त्यामुळे जनता व कामगारांच्या जीविताला निर्माण झालेला धोका

मु. शी. : बल्लारपूर कोल माईन्स WCL सास्ती ओमन कास्टमध्ये सेफ्टी नियम WCL द्वारे माईन्सचे काम न करणे व त्यामुळे जनतेच्या व कामगारांच्या जीविताला निर्माण झालेला धोका याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"बल्लापूर कोल माईन्स WCL सास्ती ओमन कास्ट मध्ये सेफ्टी नियम WCL द्वारे माईन्स चे काम न करणे व त्यामुळे जनतेच्या व तेथील कामगारांच्या जिवाला धोका निर्माण होणे, 5 दिवस अगोदर सास्ती माईन्स ओपन कास्टमध्ये मातीच्या ढिगाऱ्याखाली दबून 2 कामगार मृत्यूमुखी पडणे व त्यांचे मृतदेह ढिगाऱ्याखाली दबून राहणे व दि.8.6.09 ला 1 मृतदेह मिळणे, 1 मृतदेह अजून न मिळणे, चंद्रपूर जिल्हयात अशा अनेक माईन्समध्ये सेफ्टी नियम न पाळणे, शासनाची कोणतीही कारवाई न होणे, माईन्स अधिकारी यांच्याशी संगनमत करुन कामगार व जनतेची फसवणूक होत असल्याबद्दल मी विशेष उल्लेखाद्वारे ही बाब आपल्या निदर्शनास आणत आहे, शासनाने याबाबत त्वरित कारवाई करावी व त्याबाबत सभागृहात माहिती द्यावी ही विनंती.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2009-2010 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (चर्चा पुढे सुरु...)

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये दोन दिवस चर्चा करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार ही चर्चा दोन दिवस व्हावयास पाहिजे होती. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेवर अर्थसंकल्पावरील चर्चा (शेवटचा दिवस) असे नमूद केलेले आहे. सभापती महोदय, कालचा एक दिवस एका वेगळया विषयावर खर्ची पडला. त्यामुळे काल अर्थसंकल्पावर चर्चा होऊ शकली नाही. अर्थसंकल्पावर दोन दिवस चर्चा करण्याचे ठरलेले असल्यामुळे दोन दिवस चर्चा झाली पाहिजे. या चर्चेसाठी केवळ एक दिवस दिल्यामुळे कोणत्याही सन्माननीय सभासदावर अन्याय होऊ नये एवढेच मला म्हणावयाचे आहे.

उपसभापती : काल अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झाली होती. एवढेच मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोणत्याही सन्माननीय सभासदावर अन्याय होऊ नये अशी मी पुनश्च विनंती करतो.

सभापती महोदय, सन 2008-09 चा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाला सादर झालेला आहे. हा अहवाल वाचला तर त्यामध्ये राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबतचे अवलोकन करण्यात आल्याचे दिसून येईल. त्यामध्ये शासनाच्या प्रत्येक विभागावर प्रकाश टाकलेला आहे. हा अहवाल वाचला तर अर्थसंकल्पावर बोलण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. या आर्थिक पाहणी अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, राज्याच्या कृषी उत्पादनात, औद्योगिक उत्पादनात फार मोठया प्रमाणात घट झाली आहे. कृषी उत्पादनात 24 टक्के घट झाली आहे. तेल बियांच्या उत्पादनात 49 टक्के घट झाली आहे.

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

यानंतर श्री.शिगम....

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु....)

मत्स्य आणि दूध व्यवसायासंबंधी देखील आकडेवारी दिलेली आहे. सन 2007-08मध्ये 20 लाख रोजगार कमी झाले. रोजगार वाढले नाहीत. एका बाजूला राज्यातील बरोजगारी दूर करण्याचे आश्वासन सरकार बेरोजगारांना देत आहे आणि दुस-या बाजूला 2007-2008च्या राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये या राज्यातील 20 लाख रोजगार कमी झाल्याचे नमूद केलेले आहे. राज्यामध्ये कारखाने बंद झाले. विजेच्या भारनियमनामुळे कारखाने बंद होत आहेत. जगात मंदीची लाट आल्यामुळे काही कारखाने बंद पडले आणि त्या कारखान्यातील कामयस्वरुपी काम करणा-या कामगारांवर उपासमारीची पाळी आली आहे. त्यांच्यावर बेरोजगार होण्याची पाळी आली आहे. रज्यातील जवळपास साडेतीन लाख कामगार बेकार झाले आहेत. राज्यातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. खरे म्हणजे दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या कमी व्हायला पाहिजे होती. दारिद्रय रेषखालील लोकसंख्येमध्ये पहिला क्रमांक उत्तरप्रदेशचा, दुसरा क्रमांक बिहारचा आणि तिसरा क्रमांक महाराष्ट्राचा लागतो. ही सरकारने राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये दिलेली आकडेवारी आहे. त्यामुळे राज्यात काय चालले आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. 2009-2010च्या अर्थसंकल्पाबाबत विविध क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटल्या. वृत्तपत्रातून अग्रलेख छापून आले, उद्योग क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटल्या, साहित्यिक क्षेत्रातून प्रतिक्रिया उमटल्या, राजकीय क्षेत्रातून प्रतिक्रिया आल्या. या सर्व प्रतिक्रिया मी वाचाल्या.त्यातील एक प्रतिक्रिया मला आवडली. आपल्या राज्याचे उपमुख्यमंत्री आणि या सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ साहेब यांनी दिलेली प्रतिक्रिया मला आवडली. त्यांनी "जो जे वांछिल तो ते लाहो" अशी अंदाजपत्रकाबद्दलची प्रतिक्रिया दिली. त्यांनी या आपल्या प्रतिक्रियेपुढे आणखी एक शब्द पुढे जोडून "जो जे वांछिल तो ते लाहो, श्रीमंतास" अशी प्रतिक्रिया दिली असती तर ती अधिक सरस ठरली असती. सभापती महोदय, राज्यातील गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे.राज्यातील गरीब हे अधिक गरीब आणि श्रीमंत हे अधिक श्रीमंत होत आहेत. जगातील पहिल्या पाच दहा श्रीमंतांच्या यादीमध्ये अंबानी सारखे उद्योगपती जाऊन बसत आहेत. ही गरीब श्रीमंतामधील दरी वाढविण्याला हे राज्य सरकार जबाबदार आहे. हे राज्य कोणासाठी चालविले जात आहे ? राज्यातील 10 कोटी जनतेचे भवितव्य कोणाच्या हातामध्ये आहे? या राज्याचे दरवाजे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

श्रीमंतासाठी सताड उघडे आहेत, राज्याच्या मंत्र्यांच्या केबिन्स श्रीमंतासाठी सताड उघडया आहेत. गरिबांच्या नशिबी मात्र सतत रांगा लागलेल्या आहेत. त्यांना मंत्र्यांच्या केबिनपर्यन्त जाता येत नाही. प्रत्येक ठिकाणी गरिबांना रांगा लावाव्या लागतात अशी स्थिती राज्यामध्ये निर्माण झालेली आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. हेमंत टकले)

....नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, श्रीमंत लोकांसाठी या राज्य शासनाकडून लवकर निर्णय घेतले जातात. श्रीमंताचा कुठलाही प्रस्ताव असला तर त्यास मान्यता दिली जाते. मॉल उभे करावयाचे असतील तर त्यासाठी मुंबईतील गिरण्यांच्या जमिनी दिल्या जातात. जमीन मिळविण्यासाठी जास्त कागदपत्रे फिरविण्याची गरज भासत नाही. त्यासाठी शासनाकडे जास्त खेटे घालण्याची गरज नाही. ज्यांनी ज्यांनी मॉल बांधण्यासाठी जमिनी मागितल्या, त्यांना गिरण्यांच्या जमिनी ताबडतोबीने उपलब्ध करुन दिल्या जातात. सेझ उभे करावयाचे आहेत त्यासाठी शेतक-यांच्या पिकावू जमिनी घेतल्या जातात. बेलापूर पट्टा असेल, कोकण विभाग असेल वा अन्य ठिकाणच्या जमिनी असतील अशा ठिकाणच्या जमिनी सेझसाठी देण्यास मंत्रिमंडळ फारच तत्परता दाखविते. ज्यांना मोठया शिक्षण संस्था काढावयाच्या आहेत. त्यांना एम.आय.डी.सी.चे भूखंड उपलब्ध करुन दिले जातात. आय.टी.पार्कच्या नावाखाली भूखंड घेऊन त्या ठिकाणी मोठी हॉटेल्स उभारली जात आहेत. जमीन आय.टी.पार्कसाठी घेतली जाते. त्या अनुषंगाने प्रपोजल तयार केले जाते व त्या प्रपोजलला मान्यता देण्यासाठी भूखंडाचे आरक्षण बदलले जाते. आय.टी. पार्कच्या भूखंडावर मोठ मोठया हॉटेल्स आणि इमारती उभ्या केल्या जातात. सभापती महोदय, शेतक-याला खताची खूपच आवश्यकता असते. खत हे शेतक-यांच्या दृष्टीने फारच महत्वाची वस्तू आहे. परवा या सभागृहात खताच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झाला होता. खताचा साधा परवाना हवा असेल तर त्यासाठी मोठया प्रमाणात पैशांची मागणी करण्यात येते. खताचा परवाना देण्यासाठी आयुक्तांनी पाच कोटी रुपयांची मागणी केली होती ही बाब नुकतीच सभागृहात चर्चेला आली होती. सभापती महोदय, "जो जे वाच्छिल ते तो लाहो आणि श्रीमंत खाओ". ज्याला जे पाहिजे ते मिळेल. परंतु त्यासाठी पैसे मोजावे लागतील अशा पध्दतीची कार्यपध्दती राज्य शासनामध्ये सुरु आहे. आम्ही राज्याकडे गेल्या पाच वर्षापासून पाहतो आहोत. या सरकारचे हे अधिवेशन शेवटचे आहे. या शासनाने मागील पाच वर्षात जनतेला काय दिले व पुढे काय देणार आहे याची जनतेला चांगलीच जाणीव झाली आहे. सभापती महोदय, सन 1999 पासून ते आज तागायत या राज्यावर कर्जाचा किती बोजा आहे याची माहिती मी सभागृहाला देणार आहे. आमचे युतीचे राज्य होते, त्यावेळी आपण दिंडोरा पीटत होतात की, युती सरकारने राज्य कर्जाच्या खायीत लोटले. युती सरकारने दिवाळे काढले. या राज्याला कर्जाच्या बोजाखाली दाबले. परंतु युती सरकारने सत्ता सोडली त्यावेळी राज्यावर 36

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. 1999-2000 या वर्षी कर्जाचा आकडा 42 हजार 606 कोटी रुपयांपर्यंत गेला. 2000-2001 या वर्षी हा आकडा 61 हजार 81 कोटीवर गेला. 2002-02 या वर्षी हा कर्जाचा आकडा 72 हजार 122 कोटीपर्यंत गेला. 2002-03 या वर्षी हा आकडा 80 हजार कोटीपर्यंत गेला. 2003-04 या वर्षी हा आकडा 97 हजार 674 कोटीपर्यंत गेला. 2004-05 या वर्षी हा आकडा 1 लाख 9 हजार 666 कोटीपर्यंत गेला. 2006-07 या वर्षी हा आकडा 1 लाख 33 हजार 723 कोटीपर्यंत गेला. 2007-08 मध्ये हा आकडा 1लाख 44 हजार 800 कोटी रुपयांपर्यंत गेला. 2008-09 मध्ये 1 लाख 85 हजार कोटीपर्यंत हा कर्जाचा आकडा गेलेला आहे. या सरकारने हे राज्य पूर्णपणे कर्जात बुडविले आहे. गेल्या पाच वर्षात या सरकारचे फलीत काय आहे ? या सरकारने राज्यावर कर्जाचा मोठा डोंगर उभा करुन ठेवला आहे. या देशामध्ये एक नवीन रेकॉर्ड या सरकारने प्रस्तापित केले आहे. आज या राज्यावर 1 लाख 85 हजार कोटीचे कर्ज आहे. सभापती महोदय, 1999-2000 मध्ये जे कर्ज होते त्यापेक्षा साडेतीन पटीने कर्ज वाढवून ठेवले आहे. मात्र विकासाच्या नावाने मात्र महाराष्ट्र कोरडाच आहे....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे अर्थसंकल्पीय भाषण सुरु आहे. त्यांच्या सूचना तसेच महत्वाच्या मुद्दे कोणीही मंत्री लिहून घेताना दिसून येत नाही. या सभागृहात माननीय वित्त मंत्री उपस्थित नाहीत. वित्त राज्यमंत्री उपस्थित नाहीत. एवढेच नव्हेतर अधिका-यांच्या गॅलरीमध्ये देखील एकही अधिकारी उपस्थित नाहीत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. अनीस अहमद : सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता के भाषण से संबंधित नोट्स मैं ले रहा हूँ.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे अर्थसंकल्पीय भाषण सुरु असताना माननीय वित्त मंत्री, वित्त राज्य मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. अधिकारी गॅलरीत अधिकारी देखील उपस्थित नाहीत. हा आमच्या विरोधी पक्ष नेत्याचा अवमान आहे. हे सरकार अतिशय निर्लज्जपणे, नालायकपणे तसेच बेजाबदारपणे वागत आहे. या सरकारला कसलीही लाज वाटत नाही. हे सरकार अतिशय बेशिस्तपणे वागत आहे. आमच्या नेत्याचा ते अवमान करीत आहेत.

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येतात आणि एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

यानंतर श्री. भोगले...

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नोंद

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

डॉ.दीपक सावंत : मंत्रीमहोदय काय लिहून घेत आहात?

श्री.मधुकर चव्हाण : आमच्या नेत्यांचा आपण अपमान करीत आहात.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मान आहे की नाही?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

तालिका सभापती (श्री.हेमंत टकले) : सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.50 ते 2.05 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. हेमंत टकले)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा सुरु असताना कुठल्याही प्रकारचे गांभीर्य मात्र सभागृहात दिसून येत नाही. अशी महत्वाची चर्चा सुरु असताना माननीय मंत्री महोदयांनी हजर रहावे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. पण माननीय विरोधी पक्षनेते अर्थसंकल्पावर बोलत असताना सभागृहात मंत्री हजर नाहीत तसेच अधिकारी सुध्दा जागेवर नाहीत, ही परिस्थिती अत्यंत खेदजनक आहे. त्याचबरोबर मी असेही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अर्थसंकल्पावरील चर्चा माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुरु केली असून चर्चेच्या सुरुवातीला तरी माननीय सभापती अथवा माननीय उपसभापतींनी हजर राहणे आवश्यक आहे. एकदा कामकाज सुरु झाले तेव्हा तालिका सभापती तालिकेवर आले तरी हरकत नाही परंतु सुरुवातीचेच भाषण माननीय विरोधी पक्षनेत्यांचे असताना थोडा वेळ तरी सभापती किंवा उपसभापती यांनी उपस्थित रहावे अशी अपेक्षा असते. अशीच मागणी विरोधी पक्षाकडून आहे, त्याला मी पाठिंबा देतो.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, या सभागृहात किंवा विधानसभेत जितका मान, सन्मान आणि प्रतिष्ठा माननीय मुख्यमंत्र्यांची आहे तितकाच मान, सन्मान आणि प्रतिष्ठा ही माननीय विरोधी पक्षनेत्यांची सुध्दा असते. हिंदीत ज्याला "गरिमा" म्हणतात असे माननीय विरोधी पक्षनेत्यांचे पद हे एक गरिमामय पद आहे. अर्थसंकल्पावर सभागृहात चर्चा सुरु असताना संबंधित खात्याचे मंत्री किंवा राज्यमंत्री देखील नाहीत. अधिकारी सुध्दा नाहीत. अधिकाऱ्यांच्या बाबतीत कदाचित आपण "इनव्हिजीबल" असे म्हणू शकतो, ती गोष्ट वेगळी आहे, परंतु तरी देखील ते दिसत नाहीत. या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी देखील हाच मुद्दा उपस्थित केला. म्हणून माननीय सभापतींना जर तालिकेवर येणे शक्य नसेल तर निदान माननीय उपसभापतींनी येऊन माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणाचे महत्व वाढविले पाहिजे. कारण माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण हे केवळ टीकेचाच भाग नसतो तर ते शासनाला कोणती दिशा देतात हे देखील महत्वाचे असते. अशा प्रकारे या सभागृहाचा गरिमा कायम ठेवण्यासाठी तालिकेवर खरे तर माननीय सभापतींनीच रहावे असा आग्रह असतो परंतु निदान माननीय उपसभापतींनी तरी हजर रहावे व त्यानंतरच चर्चेला सुरुवात करावी असे आमच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. हेमंत टकले) : सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना मी माननीय सभापती महोदयांपर्यंत पोहचवतो व त्यासाठी सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 2.10 ते 2.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

kk-1 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये अर्थसंकल्पीय भाषणावरील चर्चा ही सन्मानाची तसेच मानाची असते. या विधिमंडळात जे आमदार निवडून येतात ते आपल्या भागातील सर्वसामान्य जनतेच्या व्यथा आणि वेदना तसेच त्यांचे भवितव्य काय असावे याबाबतीत काही संकल्पना घेऊन येथे आलेले असतात. या ठिकाणी अर्थसंकल्पाच्या निमित्ताने आम्हाला 150 ते 200 रुपये किंमतीची धारावीतून विकत आणलेली एक बॅग दिली आहे.त्या बॅगेमध्ये अर्थसंकल्पाची पुस्तके देण्यात आली असून प्रत्येक सन्माननीय सदस्य आपल्या कुवतीप्रमाणे, आपल्या बुध्दिमत्तेप्रमाणे त्या पुस्तकात जे लिहिलेले असते त्यामध्ये आपल्या संकल्पना सापडतात काय हे शोधण्याचा प्रयत्न करीत असतो व त्यामध्ये काही उणिवा असतील तर माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरात त्या बाबतची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून आलेल्या आमदारांना समाजातील शेवटच्या घटकातील झोपडीत राहणा-या माणसांसाठी काय असते याबाबतीत जास्त महत्व वाटते. सभापती महोदय, मी मुंबई शहरामध्ये जन्माला आलो असून येथेच लहानाचा मोठा झालेलो आहे तसेच महापौर पदापर्यंत पोहोचलेलो असून मुंबई शहरातील श्रीमंती आणि ऐट मी पाहिलेली आहे त्याचबरोबर ग्रामीण भागात गेल्या 22 वर्षापासून काम करीत असतांना मी हे सुध्दा पाहिलेले आहे की, ग्रामीण भागातील झोपडपट्टीमध्ये राहणारा माणूस खापरीच्या ताटात आणि वाटीत भाकरी खात असतो. तेव्हा त्याला खापरी ऐवजी ॲल्युमिनियमची ताट आणि वाटी का मिळत नाही याची चिंता ज्यावेळी आपण व्यक्त करु त्यावेळी ख-या अर्थाने आमदारकी सार्थकी लागेल. अशा प्रकारची संकल्पना मी मांडत असतो. सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने त्या संदर्भातील भावना व्यक्त करणे हे महत्वाचे काम आहे. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांसाठी केवळ एकच माणूस बोलत असतो असे नाही तर प्रत्येक सन्माननीय सदस्य या ठिकाणी आपापल्या भावना मांडत असतो.

सभापती महोदय, आपल्या सभागृहाच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत .अधिका-यांच्या गॅलरीत बसलेले अधिकारी इनव्हिजीबल असले तरी त्या ठिकाणी अर्थ विभागाचे अधिकारी बसलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

असतात ते अधिकारी सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची नोंद करीत असतात. या चर्चेच्या वेळी सर्व खात्याच्या अधिका-यांनी उपस्थित असले पाहिजे त्या ठिकाणी सर्व विभागातील अधिकारी असले पाहिजेत. मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी, कौल आणि शकधर या पुस्तकाचा संदर्भ दिला होता. अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या वेळी सदनातील किती सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत यापेक्षासुध्दा प्रशासनातील अधिका-यांनी गॅलरीत उपस्थित राहणे आवश्यक असते आणि त्या निमित्ताने सपूर्ण प्रशासन जागे झालेले असते ती प्रशासनातील एक प्रकारची जागरुकता असते. एखाद्या खात्यातील ज्या काही उणिवा आहेत त्या सन्माननीय सदस्यांनी येथे मांडल्यानंतर त्याची नोंद या अधिका-याकडून घेतली जाते आणि माननीय मंत्री महोदयापर्यंत त्या नोंदी पोहोचविल्या जातात. त्यानंतर त्या पैकी कोणत्या मुद्याच्या बाबतीत उत्तर द्यावयाचे आणि कोणत्या मुद्याचे उत्तर द्यावयाचे नाही हे माननीय मंत्री महोदय ठरवत असतात. हे राजकारणातील डावपेच असतात . सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना जेवढे महत्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व अर्थसंकल्पावरील भाषणाच्या वेळी माननीय विरोधी पक्ष नेत्याला असते. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी त्याबाबतीत मघाशी सांगितले होते. सभापती महोदय,अर्थसंकल्प मांडतांना महाराष्ट्रातील जनतेच्या समृध्दीची कथा सांगण्यात आली आहे. सत्ताधारी पक्षाच्या दृष्टीने अर्थसंकल्पातील चांगल्या गोष्टी मांडल्या आहेत. हया सर्व बेरजेच्या बाबी आहेत परंतु त्यामध्ये उणे काय आहे हे विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून सांगण्याचा प्रयत्न होत असतो त्याच वेळी अर्थसंकल्पामध्ये कोण कोणत्या त्रृटी आहेत हे समजू शकते. संपूर्ण राज्यातील सर्व सामान्य जनतेच्या दृष्टीने संपूर्ण् सदन संवेदनशील आहे हे त्यातून समजून येते.सभापती महोदय, अधिवेशनाच्या सुरुवातीपासून काल परवापर्यन्त आम्ही या सभागृहात हेच पाहिलेले आहे की , या सभागृहात कामकाजाचे गांभीर्य नाही, माननीय मंत्री महोदय सभागृहात उत्तर देतांना गंभीर नाहीत. अत्यंत मरगळलेले सरकार पहावयास मिळत आहे असे मी परावा म्हणालो होतो. सभागृहाच्या कामकाजाशी कोणाला काहीही देणे घेणे नाही. परंतु अशा परिस्थितीत मात्र आम्ही विरोधी पक्ष म्हणून आमचे कर्तव्य अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे ही गोष्ट कोणाला आक्रस्ताळेपणा वाटेल, कोणाला अवाजवीपणा वाटेल, कोणाला चीडण्यासारखी गोष्ट वाटेल वा अन्य कोणाला काहीही वाटेल परंतु काही वेळा आमचासुध्दा नाईलाज होत असतो.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीसह प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

श्री. दिवाकर रावते..

आणि म्हणून माझ्या सारख्या एका कार्यकर्त्याला काही वेळा या सर्व प्रवृत्त्या सहन होत नाहीत. त्याला अपप्रवृत्तीमध्ये कन्व्हर्ट करण्याचा आपण प्रयत्न करतो. परंतु ते दुर्दैव आहे. संयमालाही काही मर्यादा असतात. तुमची समाजाशी बांधिलकी असेल तर ती बांधिलकी आम्हाला अस्वस्थ करीत राहते, स्वस्थ बसू देत नाही. आज माननीय विरोधी पक्षनेते भाषण करण्यासाठी उभे राहिले त्यावेळी मी खूप व्यथित झालो. त्यावेळी अधिकाऱ्यांची गॅलरी रिकामी होती, त्याठिकाणी एकच व्यक्ती बसलेली होती. मी म्हणालो एक तर एक ठीक आहे, परंतु तेही उठून गेले. गॅलरी देखील रिकामी झाली. सभागृहामध्ये मंत्रीही उपस्थित नाहीत. या सभागृहाची पध्दत आहे म्हणून कॅबिनेट मंत्री उपस्थित होते. परंतु ते सुध्दा इतर माननीय सदस्यांबरोबर कोंडाळे करुन गप्पा मारीत बसले होते. हा विषय टीका करण्याचा नाही. हा या सभागृहाच्या पावित्र्याचा प्रश्न आहे. आमच्याकडून असे काही वेडेवाकडे या सभागृहात झाले असेल तर आपण आम्हाला सांगा. आपसात बोलत असतांना चुकून कधी तरी आमचा आवाज चढतो, तो सभागृहात ऐकायला जातो. ज्याप्रमाणे नाक्यावर गप्पा मारण्यासाठी बसतो त्याप्रमाणे चार सदस्य तिकडे बसले आहेत, दोन सदस्य ईकडे बसले आहेत. अशाप्रकारे या सभागृहाचे पावित्र्य राखले जावे कां? तुम्हाला काय करायचे आहे ते करा, काय बोलायचे आहे ते बोला. हे शेवटचे अधिवेशन आहे, देणे नाही आणि घेणे नाही. त्यानंतर सरकार बदलेल. त्यावेळी या मधील काही अर्धे लोक असतील, नसतील माहीत नाही. अशा एका विचारांनी गर्भगळीत झालेली ही परिस्थिती आता सहन होण्यापलिकडे आहे. सभापती महोदय, मघाशी निघालेला विषय मला अजिबात सहन झाला नाही. मी इतका वेळ या सरकारच्या अकर्तृत्वाबद्दल बोललो. माननीय सदस्य सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, अरुण गुजराथी यांनी आमच्या या विषयाला कौल देत असतांना माननीय सभापतींना जबाबदार धरण्याचा प्रयत्न केला तो आम्हाला बरोबर वाटला नाही. माननीय सभापती त्यावेळी या सभागृहामध्ये उपस्थित असावयास पाहिजेत. किंबहुना, माननीय उपसभापती सुध्दा पाहिजेत. परंतु चक्क पीठासीन अधिकाऱ्यांच्या आसनावर माननीय तालिका सभापती बसले. तुम्हाला काय बोलायचे ते बोला आणि जा. आणि म्हणून मला असे वाटते की, या चर्चेमुळे तुमचा आणि आमचाही वेळ निरर्थक जावयास नको. निरर्थक चर्चा आम्ही निर्माण करावयास नको आणि तुम्ही देखील ऐकावयास नको. महाराष्ट्रातील जनतेला हे सरकार निरर्थक आहे, कर्तृत्वशून्य आहे, यांना सांगून काही होत नाही, यांचे कान बधीर झाले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

श्री. दिवाकर रावते..

आहेत, यांना ऐकण्याची इच्छा नाही हे सांगण्याची आमची आता प्रामाणिकपणे इच्छा झाली आहे. म्हणून मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती करतो की, कशासाठी या चर्चेमध्ये आपण भाग घ्यावयाचा? कशासाठी बोलायचे? यामधून आपल्याला काय मिळणार आहे? म्हणून मला असे वाटते की, आपण विरोधी पक्ष म्हणून या चर्चेमध्ये सहभागी होऊच नये. तुम्हाला ऐकायची इच्छा नसेल तर आमची बोलायची इच्छा आता राहिलेली नाही. आणि म्हणून मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना माझ्या वतीने विनंती करतो की, एवढे अपमानित होण्यापेक्षा आमदार म्हणून किंमत नसलेल्या या सदनामध्ये आपण आपल्यापुरते सन्मानित राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करु, तो आपला अधिकार आहे तो आपण वापरु या. अशी मी आपल्या माध्यमातून माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती करतो. धन्यवाद.

उपसभापती : अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरुवात झाल्यानंतर मी या आसनावर स्वत: बसलो होतो. दुपारी 2.00 वाजता या सभागृहामध्ये उपस्थित झालेल्या सार्वजनिक हिताच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय वन मंत्री व इतर संबंधितांशी पूर्वनियोजित बैठक बोलाविण्यात आली होती. त्या बैठकीसाठी अगोदरच अधिकारी येऊन बसले होते, आणि मी मंत्रिमहोदयांना बैठकीसाठी पाचारण केले होते. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण सुरु होऊन पाच-दहा मिनिटानंतर मी तालिका सभापतींना आसनावर येण्यासाठी विनंती केली. ती बैठक संपल्यानंतर 15 मिनिटांनी मी येणारच होतो. ही वस्तुस्थिती असल्यामुळे मी याबाबतीत आपणाशी विसंगत बोलत आहे अशातला भाग नाही. शेवटी तालिका सभापती हे सुध्दा तितकेच महत्वाचे पीठासीन अधिकारी आहेत. तालिका सभापतींची नावे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये प्रत्येक पक्षाच्या गट नेत्यांकडून देण्यात आलेली असतात. सभागृहामध्ये आपण कित्येक वेळा पाहिले आहे की, मी याठिकाणी कोणती ॲक्शन घेतल्याचे आपणही पाहिलेले नाही. या सभागृहामध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय मंत्री इतकेच नव्हेतर सभागृहातील आमदार सुध्दा तितकेच महत्वाचे आहेत असे मानणाऱ्यांपैकी मी आहे. त्यामुळे या बाबतीत माननीय सभापती माझ्याकडे ही जबाबदारी सोपवून गेले होते. जनतेच्या, सार्वजनिक हिताच्या संदर्भात एक तातडीची बैठक बोलाविण्यात आली होती. त्या बैठकीसाठी मी तालिका सभापतींना सांगून गेलो होतो. दहा ते पंधरा मिनिटांकरिता मी तालिका सभापतींना या ठिकाणी बसवून गेलो. त्यामुळे माझ्याकडून माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/

उपसभापती...

विरोधी पक्षनेत्यांचा अवमान करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांचा सन्मान फार मोठा आहे. मला वाटते निश्चितपणे तो अद्यापपर्यंत आम्ही बाळगला आहे. याठिकाणी बाकीच्या घडणाऱ्या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. सभागृहामध्ये काही महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असते त्यावेळी सन्माननीय सदस्य असतील मग ते विरोधी बाकावरील असतील किंवा सत्ताधारी बाकावरील असतील.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती . . . .

अशा वेळी सर्वांकडून तितक्याच सन्मानपूर्वक या चर्चा घडल्या पाहिजेत. बहुतेक वेळेला मध्येच कधीतरी बऱ्याच लोकांचे वागणे आक्षेपार्ह असते. परंतु आमच्याकडे ते पचविण्याची इतकी ताकद निर्माण झालेली आहे, तसेच निदान आपण आपल्या जागेवरुन बोलू शकता. परंतु आम्हाला कधी-कधी या आसनावर बसून तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागतो. शेवटी आम्हाला तुम्हा सर्वांनाच सांभाळून घेऊन पुढे जावयाचे असते.अशा वेळी जर अशी काही एखादी बाब घडली तर मला असे वाटते की, त्याबाबतीत फार मोठी चर्चा करुन, आपण आपसामध्ये जे प्रेम, स्नेहभाव आहे आणि एकमेकांबद्दल जी आदराची भावना निर्माण झालेली आहे, त्याला कुठेही तडा जाऊ देऊ नये अशी माझी विनंती आहे. याठिकाणी जो काही प्रकार घडला त्याची पुनरावृत्ती होणार नाही याचीही मी आपल्याला सर्वांना खात्री देतो. आता मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना बोलण्यासाठी संधी देतो. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब आपल्यालाही बोलावयाचे आहे. त्यामुळे तुम्हाला आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनाही बोलण्याची संधी देतो. आपण आता सभागृहाचे कामकाज यापुढे सुरळीतपणे पार पाडू या. एवढेच मी येथे सांगू इच्छितो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ...

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : एकजण बोलल्यावर दहाजण बोलणार. हे आत कंटाळवाणे . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला येथे बोलण्यासाठी संधी दिलेली आहे. माझ्या बोलण्यावर आपली हरकत आहे काय ?

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मग थांबा. तुमची काही हरकत असेल तर मी खाली बसतो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ...

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, माझे बोलणे पूर्ण होऊ द्यावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सभागृहामध्ये एखादा विषय उपस्थित झाल्यानंतर त्याच विषयावर चार-चार वक्ते 15-15,20-20 मिनिटे बोलतात. ही वृत्ती आमच्यामध्ये देखील ...

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

वाढली आहे. पण हा विषय वेगळा आहे. परंतु सभापती महोदय,आपण सन्मानाबद्दल, डेकोरमबद्दल, प्रथेबद्दल, परंपरेबद्दल जो विषय मांडला आहे, तो मला मान्य आहे. पण सभागृहामध्ये पलिकडच्या बाजूने छोट्या-छोट्या विषयावर चार-चार वक्ते वारंवार बोलत असतात, त्यामुळे सभागृहामध्ये बसताना आमच्यामध्ये देखील अस्वस्थता निर्माण झालेली आहे. कोणत्या विषयावर किती वेळ चर्चा व्हावी, कोणत्या विषयावर किती वेळ कीस काढावा, कोणत्या विषयावर आपल्या मनासारखे किती वेळ बोलावे, सभागृहाचे कामकाज ठरलेल्या वेळेपेक्षा किती वेळा पुढे-पुढे जावे, याचा सुध्दा सभागृहाने कधीतरी विचार करण्याची वेळ आलेली आहे. कामकाज पत्रिकेवरील कामकाज किती वेळा बदलावयाचे ? त्यासाठी किती वेळा वेळ बदलून घ्यावयाची ? जर सदनामध्ये ठरलेल्या वेळेमध्ये ठरवलेला कार्यक्रम झाला तर अशा प्रकारची अस्वस्थता कोणाच्याही मनामध्ये निर्माण होणार नाही असे माझे मत आहे. म्हणून एक बाजूने चर्चा होत असताना, दुसऱ्या बाजूने देखील चर्चा व्हावयास पाहिजे की, जर कार्यक्रम पत्रिकेमध्ये देण्यात आलेल्या विषयाप्रमाणेच जर कामकाज ठरविलेल्या वेळेमध्ये झाले तर ही अस्वस्थता फार कमी होईल आणि माननीय मंत्री महोदयांना सुध्दा सभागृहामध्ये उपस्थित रहाणे सहज शक्य होईल. माननीय मंत्री महोदय सदनामध्ये उपस्थित रहात नाहीत याचे मी समर्थन करीत नाही. पण अनेक वेळा अशा पध्दतीने आपला विषय पुढे जातो, मागे जातो, विषय बदलतो, नवीन-नवीन विषय उपस्थित होतात. एखाद्या छोट्या विषयावर चार-चार वक्ते एकाच बाजूने 15-15 मिनिटे, 10-10 मिनिटे, 20-20 मिनिटे बोलतात आणि दुसऱ्या बाजुकडील सन्माननीय सदस्य फक्त ऐकण्याचेच काम करतात. तेव्हा आता माझ्यासारख्या सभासदाला सुध्दा या सभागृहामध्ये अस्वस्थता वाटू लागलेली आहे. ठरलेल्या वेळेमध्ये, ठराविक विषय जर ठराविक सन्माननीय सदस्यांनी मांडला तर ते योग्य होईल. समोरच्या बाजूने एका पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी विषय मांडला की दुसऱ्या पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी दिलीच पाहिजे.मग तिसऱ्या सन्माननीय सदस्यांनाही सपोर्टसाठी बोलावयास दिलेच पाहिजे, चौथ्या सन्माननीय सदस्यांनाही सपोर्टसाठी बोलावयास दिलेच पाहिजे. सभापती महोदय, सभागृहामध्ये कामकाज करण्याची ही कोणती प्रथा आहे ? आपण यासाठी किती वेळ देत आहोत ? अशी माझी विनंती आहे. माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांच्या बोलण्याला माझा आक्षेप नाही. त्यांचा विषय वेगळा आहे आणि मी वेगळा विषय मांडलेला आहे.

. . . .2 एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे आता सभागृहामध्ये या सभागृहाचे नियंत्रण कोणी करावयाचे, असा प्रश्न निर्माण झालेला आहे. जर सन्माननीय सदस्यांनी नियंत्रणाचे काम आपल्या हातामध्ये घेतले तर मग आपली खूर्ची वर ठेवण्याची गरजच नाही, आपल्याला येथे येऊन बसावे लागेल.

उपसभापती : मी येथून खाली येऊ काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तसे नाही. आम्ही बोलावयाचे की नाही याबाबतीत आपला निर्णय आहे. आम्ही प्रत्येक वेळेस आपल्या परवानगीनेच बोलतो. सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव, असे आहे की, आज तुम्ही सत्तारुढ पक्षामध्ये आहात. कदाचित तुमच्या नशिबाने तुम्हाला पुढच्या वेळी इकडे बसण्याची संधी नक्की मिळेल. तेव्हा तुम्ही देखील आमच्या सारखेच बोलणार आहात.

(सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव खाली बसून बोलतात.)

सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना सांगू इच्छितो की, या खुर्चीचा गुणच असा आहे. माननीय श्री.छगन भूजबळ यांनी विरोधी पक्षनेता म्हणून केलेले कामकाज मी माझ्या काळामध्ये पाहिलेले आहे. मी या सभागृहामध्ये सन्माननीय श्री.शरद पवारसाहेबांना विरोधी पक्षनेता म्हणून कामकाज करताना पाहिलेले आहे.या सभागृहामध्ये शेतकरी कामगार पक्षाचे श्री.विठ्ठलराव हांडे साहेब यांना देखील विरोधी पक्षनेता म्हणून काम करताना पाहिलेले आहे.ते कसे आक्रमक होते हे आम्ही पाहिलेले आहे.सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसाहेब यांनाही माहिती आहे.तसेच कै.प्रमोद नवलकर यांनाही विरोधी पक्षनेता म्हणून कामकाज करताना पाहिलेले आहे. या सभागृहाचा 20-22 वर्षाचा इतिहास आहे. ही गोष्ट खरी आहे की, या सभागृहामध्ये अनेक वेळा अनेक चर्चा होत असतात. त्यावेळी तुमच्या मनातील भावनेप्रमाणे कदाचित त्या जास्त प्रमाणात देखील होत असतील. पण शेवटी ती चर्चा नियंत्रित करावयाची, थांबवावयाची किंवा बेल वाजवून थांबवावयाची, हा पीठासीन अधिकाऱ्यांचा अधिकार आहे. हा तुमचा-माझा अधिकार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव जे बोलले, ते त्यांनी माननीय सभापतींना भेटून सांगावे. ते काय निर्णय घ्यावयाचा असेल तो घेतील. मला तुमच्यावर काही आक्षेप घ्यावयाचा नाही.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये जी चर्चा झाली, ती होत असताना अनायसे माननीय वित्त मंत्री देखील सदनामध्ये उपस्थित आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. नितीन गडकरी...

हे कोणी तरी मुद्दाम करीत आहे असे म्हटले तर ते योग्य होणार नाही. पण विशेषत: एका गोष्टी बद्दल मला वाईट वाटते. ज्यावेळी या सभागृहात मी नव्याने सदस्य म्हणून निवडून आलो होतो. त्यावेळी अर्थसंकल्पावर चर्चा होत असताना मुख्य सचिव, राज्याचे वित्त सचिव, बांधकाम विभागाचे सचिव, इरिगेशन विभागाचे सचिव उपस्थित असायचे आणि सन्माननीय सदस्य ज्यावेळी याठिकाणी बोलायचे त्यावेळी त्यांचे मुद्दे ते टिपायचे. सभापती महोदय, वित्त मंत्री संवेदनशील लोकप्रतिनिधी आहेत म्हणून ते आमची वेदना समजून घेतील. श्री. तांबे नावाचे पी.डब्ल्यू.डी.चे एक सचिव होते. अतिशय विद्वान होते. त्यांनी वाशीचा पूल बांधलेला आहे. त्या तांबेना मी सांगितले की, व्हिलेज कनेक्टिव्हिटी ही सगळयात प्रॉयॉरिटीने घ्यावयास पाहिजे. ते म्हणाले,साहेब मी या पी.डब्ल्यू.डी. विभागात इतके वर्षे काम केले.पण दुर्दैवाने ही गोष्ट माझ्या कधी लक्षात आली नाही. या राज्यात मोठे पूल बांधण्यापेक्षा एक खेडे जोडण्याला प्राथमिकता आहे आणि त्यातून काय विकास होतो याकडे इतक्या वर्षाच्या सेवेमध्ये माझे दुर्लक्ष झाले, याची मला व्यथा होते. सभापती महोदय, आमच्यापैकी काही सदस्य एक्सपर्ट आहेत. काही नाहीत. काही शिक्षित आहेत तर काही अशिक्षित आहेत. पण आम्ही जनतेमध्ये काम करतो. खरे म्हणजे आय.ए.एस. अधिकाऱ्यांना जनतेमध्ये जाऊन काम करण्याची संधी मिळत नाही. सभापती महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा होत असताना आम्ही या ठिकाणी सर्व विभागाच्या संदर्भातील आमच्या व्यथा मांडतो, विषय मांडतो. या व्यथा पिण्याच्या पाण्याच्या योजनेच्या संदर्भातील असतात. रस्त्यांच्या संदर्भातील असतात. त्यावेळी असा काही नियम नव्हता. पण त्यावेळी याबाबतीत काळजी घेण्यात येत होती. अर्थसंल्पावर चर्चा होत असताना त्या त्या विभागाचे अधिकारी गॅलरीत बसत होते. ते व्हिजिबल नाहीत. याबाबतीत माझे जे म्हणणे आहे त्याला नियमाचा आधार नाही. कारण या सभागृहात बोलताना आमच्यासमोर अंधार आहे. आम्ही या ठिकाणी बोलत असताना अधिकारी गॅलरीत बसलेले आम्हाला कोणी दिसत नाहीत. ते व्हिजिबल नाहीत. हा सभागृहाचा नियम आहे, तोच मी या ठिकाणी सांगत आहे. अधिकाऱ्यांकडे बघून आपण बोलत नाही. शासन म्हणजे मुख्यमंत्री. शासन म्हणजे मंत्री. सचिव म्हणजे शासन नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, मी एक गोष्ट पाहिली की, सन्माननीय विरोधी पक्ष उभे असताना अधिकारी गॅलरीत कोणी तरी एक जण बसले होते पण ते कोणा तरी मंत्र्यांचे स्वीय सहायक होते. त्याबाबतची माहिती घेतल्यानंतर बहुतेक ते वित्त विभागातील नव्हते, असे मला कळले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते बजेटवर बोलत होते. बजेटवर बसेलत असताना काही वेळा आम्ही राजकीय टिका करतो. आम्हालाही निवडणुका लढवावयाच्या आहेत. आणि तुम्हालाही निवडणुका लढावयच्या आहेत. जे व्हायचे ते होईल. आम्ही येथे राजकारण करायला आलो नाही. अशी ढोंगबाजी करणे बरोबर नाही. पण कुठे जागा मिळते् आणि कुठे सरकता येते ते आम्ही पहात असतो. हे स्वाभाविक आहे. तुम्ही हे कराल तर आम्ही हे करतो. हा या खुर्च्यांचा गुणधर्म आहे हा तुमचा आणि आमचा दोष नाही. तुम्ही विरोधी पक्षात बसलात तर तुम्हीही असेच बोलणार. मी मंत्री असताना एकदा खालच्या सभागृहात गेलो होतो. माननीय मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशींनी मला चर्चेची सुरुवात करायला सांगितले होते. "त्यावेळी हे दुसऱ्या सभागृहातले असल्यामुळे त्यांना येथे बोलता येणार नाही" असे सांगून श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी मला खालच्या सभागृहात बोलू दिले नव्हते. त्यांचे म्हणणे बरोबर होते. त्यात काही चूक नव्हती. लोकशाहीत हे चालणारच आहे आणि ते चाललेही पाहिजे. पण विरोधी पक्ष नेते बोलत असताना त्याची गंभीरता ब्युरॉक्रसी घेत नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आणि श्री. अरुण गुजराथी यांनी एक दुसरी वेदना या ठिकाणी व्यक्त केली. मी त्यांच्या भावनेबद्दल आक्षेप घेत नाही. पण त्यांनी ती जाहीरपणे व्यक्त केली नसती तर चांगले झाले असते, असे मला सहज वाटते. कारण ही गोष्ट त्यांच्या सारख्या ज्येष्ठ सदस्यांनी आपल्या लक्षात आणून द्यावयास पाहिजे होती. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे बरोबर आहे. मुख्यमंत्री आणि ते या सभागृहातील नेते आहेत, त्यांचा बहुमान केला पाहिजे. त्यांच्या भाषणाच्यावेळी सभापतींच्या आसनावर तालिका सभापती बसले, म्हणजे तालिका सभापती हे पद नाही. तालिकेवर जे कोणी बसलेले आहेत ते सभापतीच आहेत. ते त्या ठिकाणी बसल्यानंतर सभापतींना जे अधिकार आहेत ते त्यांनासुध्दा आहेत. पण साधारणत: त्यांनी जी भावना व्यक्त केली ती हळूहळू सगळयांची व्यक्त केली आहे. आम्हाला ब्युरॉक्रसी गंभीरपणे घेत नाही. मंत्री सभागृहाला गंभीरपणे घेत नाहीत. त्यानंतर नियम 93 च्या निवेदनाचे उत्तर देण्यास संबंधित

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मंत्रिमहोदय उपस्थित रहात नाहीत. मंत्र्यांना ब्युरॉक्रसी गंभीरपणे घेत आहे की नाही हे मला माहीत नाही. पण मला या गोष्टीचे दु:ख होते की, अनेक वेळा सरकारमध्ये देखील ब्युरॉक्रसी मंत्र्यांचा अवमान करते. काही मंत्री तर असे सांगतात की, आम्ही सचिवांना बोलावले तर ते येत नाहीत. ही परिस्थिती चांगली नाही. परंतु विरोधी पक्ष नेत्यांच्या अर्थसंकल्पावरील भाषणातले शासनाला योग्य वाटतील ते मुद्दे टिपून घ्यावेत आणि शासनाला योग्य वाटले तरच ते स्वीकारावेत अथवा स्वीकारु नयेत, तो अधिकार शासनाचा आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मी आपल्याला एक गोष्ट सांगतो. या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे जर आपण नीट एकली तर त्यातून मिळणारे जे प्रशिक्षण आहे ते इतके मोठे आहे की एवढे मोठे प्रशिक्षण दुसरीकडे मिळू शकत नाही. अनेक वेळा सत्ताधारी पक्षाच्या एखाद्या नेत्याचे भाषण अतिशय सुंदर होते. त्या भाषणातून आपल्याला अनेक मुद्दे मिळतात. आपल्याला त्या भागातील माहिती मिळते. त्यामुळे या सभागृहातील सगळेच काम म्हणजे कोणाचा वेळ जात नाही म्हणून, 200 रुपये 500 रुपये भत्ता मिळतो म्हणून किंवा दिवस घालविण्यासाठी, टंगळमंगळ करण्यासाठी या ठिकाणी सन्माननीय सदस्य आलेले आहेत अशी स्थिती नाही. सभापती महोदय, माझी विनंती आहे. यावेळी हे जे वातावरण निर्माण झाले त्याचे कारण असे आहे की, कोणीच कोणाला गांभीर्याने घेत नाही. या सभागृहाला मंत्रिमहोदय गांभीर्याने घेत नाहीत त्यामुळे तेही येत नाहीत. ब्युरॉक्रसी येथील कामाला गांभीर्याने घेत नाहीत. त्याचाही राग आला. त्यानंतर सन्माननीय सदस्यांना वाटले की, माननीय सभापती निघून गेले, माननीय उपसभापती सुध्दा निघून गेले. कोणी ऐकत नाही मग कशाला बोलावयाचे ? प्रेसवाले व्हिजिबल नाहीत पण त्यांना बसावे लागते. कारण त्यांची मॅनेजमेंट त्यांच्याकडे विचारणा करते. त्यामुळे त्यांचा इलाज नाही. त्यांना बोलताही येत नाही. त्यामुळे तोंड दाबून बुक्क्याचा मार अशी त्यांची परिस्थिती असते.. आम्ही चांगले बोललो किंवा वाईट बोललो तरी त्यांना दिवसभर ऐकावे लागते. संध्याकाळी कोठे तरी एकट्याने भेटले की, मळमळ व्यक्त करतात. आपण किती बोलता असे ते म्हणतात. पण त्यांना उपाय नाही. कारण त्यांचे संपादक त्यांना विचारतात. ते व्हिजिबल नाहीत पण त्यांना सगळे सहन करावे लागते. सभापती महोदय, या सगळ्यातील गंभीरता कमी होत चालली आहे. ही लोकशाही चार स्तंभांवर उभी आहे. लेजिस्लेटिव्ह विंग, एक्झिक्युटिव्ह विंग आणि प्रेस हे तीन स्तंभ आहेत तसेच ज्युडिशिअरीचे दुसरे फिल्ड आहे. या लोकशाहीला मानणारे आम्ही सर्व आहोत. अशा ठिकाणी ही सगळी संवेदनशीलता गमावणे, नॉनसिरीयस ॲप्रोच असणे, कोणी कोणाचे ऐकत नाही, तुम्ही कितीही बोला काहीही करा, या सगळ्याचा कंटाळा आला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी भावना व्यक्त केलेली आहे त्याबाबतीत मला असे वाटते की, कोणावर राग नाही. आपल्यावर तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आमचा मुळीच राग नाही. आपण तो विषय घेऊ नका. मी क्षमा मागून सांगतो. आपणच आदेश काढलेले आहेत की, अधिवेशन सुरु असतानाच्या काळात बैठका बोलवू नयेत. त्यामुळे ही बैठक आपण बोलविली असेल तर मला काही म्हणावयाचे नाही पण जर ही बैठक मंत्रिमहोदयांनी बोलविली असेल तर ते बरोबर नाही. कारण माननीय सभापतींचे आदेश आहेत की, अधिवेशन काळामध्ये बैठक बोलवू नये. पण सभापती महोदय, आपला तो अधिकार आहे. या सगळ्या बाबतीत हा जो नॉनसिरीयसनेस आलेला आहे त्याबद्दल आज सगळ्यांच्या मनामध्ये उद्वेग निर्माण झालेला आहे. म्हणून मघाशी मी एकदा म्हणालो की, आज दिवसभरासाठी कामकाज स्थगित करावे. कोठे तरी हे लोकांमध्ये जाऊ द्या. त्यावेळी आपण तो विषय सोडून दिला. पण आता या चर्चेच्या बाबतीत आज सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विनंती केलेली आहे. मलाही तसे वाटते. आज आम्ही घोषणा देत नाही. सरकारचा धिक्कार करीत नाही. पण सभापती महोदय, ही यंत्रणा, सरकार, त्यामधील ब्युरॉक्रसी आणि एकंदर ही जी संवेदनशीलता गमावलेली आहे आणि हे आम्हाला ऐकायलाही तयार नाहीत एवढे सुध्दा गांभीय नसेल तर या कामकाजात आज विरोधी पक्ष नेत्यांचा कळत नकळत एकप्रकारचा अपमान झालेला आहे. म्हणून सभापती महोदय, आम्ही आपल्याला हात जोडतो, नमस्कार करतो. आपल्याबद्दल आमचा काही आक्षेप नाही. आजचा दिवस आम्हाला शांतपणे जाऊ द्या. उद्या आम्ही सहभागी होऊ. पण याची कोठे तरी नोंद घेतली पाहिजे. दरवेळी आपण सांगता की, हे केले पाहिजे पण आपले कोणी ऐकत नाही, कोणी येत नाही. चार वेळा हे सर्व झाले आहे. आता याचा कंटाळा आलेला आहे. आता याबाबत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काय निर्णय घ्यावयाचा तो घ्यावा. परंतु त्यांचा अपमान हा आपणा सगळ्यांचा अपमान आहे. आमच्या ज्या संवेदनशील भावना आहेत त्या फक्त दु:ख व्यक्त करणाऱ्या आहेत. म्हणून यासंदर्भात विरोधी पक्षाने योग्य तो निर्णय घ्यावा. मी फक्त या बाबतीत माझ्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी या दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या प्रतिपादनाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. समोर अधिकारी दिसत नाहीत याचे आश्चर्य वाटत नाही. याचे कारण असे की, जेव्हा सरकार निष्क्रिय बनते, डिफंग बनते, अर्थहीन बनते त्यावेळी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी अधिकारी जर तिथून गायब झाले तर त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण सरकार गंभीर नसेल तर कोणी गांभीर्याने घेत नाही. परंतु या ठिकाणी या सभागृहाच्या प्रतिष्ठेचा आणि अस्तित्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, सेकंड चेंबर असावे की, नसावे याबाबत विधानसभेमध्ये मोठी चर्चा झालेली आहे. अनेकांनी सेकंड चेंबरला विरोध केलेला होता. परंतु या राज्याचे निर्माते श्री. पंजाबराव देशमुख साहेब यांनी ठामपणे सेकंड चेंबर का असले पाहिजे याबाबतीत मोठे प्रतिपादन केले आहे. संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सेकंड चेंबर का असले पाहिजे याबाबतीत सविस्तर उत्तर त्यावेळच्या विरोधकांना दिलेले होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

त्यांनी असे म्हटले होते की, विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे आणि कायदेमंडळामध्ये जी चर्चा होते त्यासाठी सेकण्ड थॉट दिला गेला पाहिजे. घाईगर्दीत कोणताही कायदा तयार होऊ नये. हा सेकण्ड थॉट देण्यासाठी वरचे सभागृह निर्माण करण्यात आले. म्हणून राज्यसभा व विधानपरिषदेची निर्मिती झाली. महाराष्ट्राच्या विधानपरिषदेला तर महाराष्ट्राच्या निर्मितीपासूनचा इतिहास आहे. येथील परंपरा अशी आहे की, संविधानकर्त्यांनी जी अपेक्षा व्यक्त केली होती, त्या अपेक्षेला अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्य पुरेपूर उतरलेले आहेत. किंबहुना, अनेक कायद्याचा फेर विचार करण्याचे काम या सभागृहाने केलेले आहे. असे असताना आज दिवसभर, किंबहुना, मागील 2-3 अधिवेशन मी पहात आहे की, सरकारमध्ये असलेले कोणतेही मंत्री, कोणत्याही प्रश्नाला गांभीर्याने घेत नाहीत. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसतात, राज्यमंत्री उपस्थित असले तर ते गांभीर्याने उत्तरे देत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. आता सुध्दा एक सन्माननीय मंत्री महोदय, मला खुणवून असे म्हणाले की, आपण कशाला बोलता ? मला त्यांना विचारावयाचे आहे की, हे सभागृह कशासाठी निर्माण केले आहे ? म्हणजे खाली बसून सुध्दा ते अशाप्रकारच्या कॉमेण्टस् करीत आहेत. यावरुन हे सभागृह कशाला पाहिजे आहे अशाप्रकारची या सरकारची मानसिकता आहे ते कळले आहे. माझ्यासारख्या नवीन सदस्यांना कधीकधी चीड येते. आपण ज्या अपेक्षेने ज्या सभागृहात आलो त्या अपेक्षांबाबत मंत्र्यांची ही भूमिका असेल तर या सभागृहातील चर्चा निष्फळ ठरते. विरप्पा मोईली समितीने शिक्षक व पदवीधर मतदार संघाबद्दल कॉमेण्टस् केल्या होत्या. तेव्हापासून हे सेकण्ड चेंबर कशासाठी पाहिजे असे बोलले जात आहे. विधानपरिषदेबाबत अनेक राज्यांनी निर्णय घेतलेला आहे. विधानसभेच्या मर्जीवर हे सेकण्ड चेंबर अस्तित्वात राहू शकते हे मला मान्य आहे. पण सरकारला हे सभागृह नको असेल तर अगदी स्पष्टपणे सांगून टाकावे. या राज्याचे निर्माते स्व.यशवंतराव चव्हाण यांनी आणि स्व.पंजाबराव देशमुख हे दोघेही या सभागृहाच्या निर्मितीसाठी आग्रही होते. त्यावेळी त्यांनी जे काही म्हटले होते त्याची सर्वांनी आठवण करावी. आम्ही त्या दोन्ही मान्यवरांना मानत नाही, आम्ही त्यांचे वारस नाही, आता आम्ही निंबाळकरांच्या मारेक-यांचे वारसदार आहोत, साथीदार आहोत, हे एकदा सांगून टाकावे. ते सांगण्यासाठी काही हरकत नाही. परंतु हे जर सांगणार नसाल तर या सभागृहाला शासनाने गंभीरपणे घेतले पाहिजे. माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या अगोदर बोलण्यासाठी उभा राहिलो होतो. त्यावेळी मी माझी व्यथा मांडली होती. एखाद्या विषयाचा किती कीस काढावयाचा, त्याचे किती चर्वितचर्वण करावयाचे असा माझा मुद्दा होता. आता त्याचे जीवंत उदाहरण पुन्हा याठिकाणी दिसून आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विधानपरिषदेचे सभागृह कसे निर्माण झाले त्याची चांगली माहिती दिली आहे. ती माहिती आम्ही शांतपणे ऐकत होतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर असतील, स्व.पंजाबराव देशमुख असतील, या महाराष्ट्राच्या निर्मितीचे शिल्पकार कै.यशवंतराव चव्हाण असतील यांचा उल्लेख करीत असताना तुम्ही या महान नेत्यांचे वारसदार नाहीत तर निंबाळकरांच्या मारेक-यांचे वारसदार आहात असे म्हणून त्यांनी त्यांचाही अपमान केला आहे. म्हणून त्यांचे हे वक्तव्य कामकाजातून काढून टाकून त्यांना समज देण्यात यावी. सन्माननीय सदस्यांना बोलण्यापासून रोखावे. त्यांना बोलण्याची संधी दिली आहे म्हणून त्यांनी काहीही बोलू नये. त्यांनी सभागृहात वाटेल तसे बोलावयाचे काय, सरकारविरुध्द वाटेल तसे आरोप करावयाचे काय ? प्रत्येक गोष्ट सरकारच्या पक्षाला जोडली जाणे हे कोणत्या न्याय तत्वामध्ये बसते ?

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जे काही उद्गार काढले आहेत ते कामकाजातून काढून टाकण्यात येतील. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहात चाललेल्या विषयावर बोलण्याचा आपल्याला अधिकार आहे. परंतु अशाप्रकारे आपण संदर्भहीन वक्तव्य करु नये, जेणे करुन कारण नसताना कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या भावना दुखावतील. हे बरोबर नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या वक्तव्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त करतो. पण प्रश्न एवढाच आहे की, स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.पंजाबराव देशमुख आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आपण आठवण करावी. (अडथळा) मी सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव हे अनेक बाबतीत माझे आदर्श आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

(श्री. कपिल पाटील....)

ते नेहमी सभागृहाचा डेकोरम पाळतात. मी त्यांना नेहमी सांगत असतो की मी तुमच्याकडून शिकत असतो. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे बोलत असताना त्यांनी सांगितले की शिस्त पाळली नाही....तुम्ही शिस्त पाळायला सांगितली. तुम्ही ती पाळली तर आम्हीही ती पाळणार आहोत. आमची माननीय सभापतीबद्दल कोणतीही तक्रार नाही. परंतु शासनाने यासंबंधी गंभीरपणे दखल घेण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बोलावे.

उपसभापती : आम्ही सभापतींची पूर्व परवानगी घेऊन बोललो असे प्रत्येक सन्माननीय सदस्य बोलतात आणि त्याचे उत्तरदायित्व आमच्याकडे येते. माननीय विरोधी पक्षनेते हे या आसनाची प्रतिष्ठा राखणारे आहेत. तेव्हा मी आपणास विनंती करतो की जे काही घडले त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची दखल मी घेतो.

श्री. दिवाकर रावते : आमचा लढा सरकारच्या विरोधात आहे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आज अर्थसंकल्पाच्या संदर्भामध्ये या सभागृहात चर्चा उपस्थित होत असताना सुरुवातीलाच माननीय राज्यमंत्री किंवा मी या सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अशा भावना व्यक्त केल्या की, अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित नव्हते आणि त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते यांचा अनादर झला. अशा प्रकारची भावना सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये जर निर्माण झाली असेल तर ती वावगी म्हणता येणार नाही. आपण गेली 10 वर्षे मला या सभागृहामध्ये मंत्री म्हणून पहात आहात. गेल्या 10 वर्षामध्ये या सभागृहामध्ये कोणतेही महत्वाचे कामकाज असताना त्या त्या वेळी या सभागृहाचा आणि या सभागृहाच्या परंपरांचा आदर करणे आणि त्या माध्यमातून प्रश्न सोडवून घेणे, प्रश्नाला न्याय देणे हीच माझी भूमिका उच्च व तंत्र शिक्षण मंत्री म्हणून, वैद्यकीय शिक्षण मंत्री म्हणून, ऊर्जा मंत्री म्हणून या ठिकाणी राहिलेली आहे. आज सकाळी दोन्ही सभागृहाचे कामकाज सकाळी 9.00 आणि 10.00 वाजता सुरु झाले. रोज सकाळी राज्यमंत्री आणि मी कामाचे वाटप करुन घेत असतो, कारण कार्यक्रमपत्रिका रात्री उशिरा प्राप्त होते. एक सभागृह राज्यमंत्र्यांनी सांभाळायचे आणि एक सभागृह मी सांभाळायचे अशा प्रकारे आम्ही कामाचे वाटप करुन घेतो. मला वित्त आणि अन्य विभागाच्या जबाबदा-या सांभाळायच्या असल्या तरी माननीय राज्यमंत्र्यांकडे देखील बांधकाम आणि ऊर्जा खात्याच्या जबाबदा-या आहेत. म्हणून सभागृहामध्ये चर्चेला सुरुवात होत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

असताना माननीय राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित असतील अशी माझी अपेक्षा होती आणि मी देखील अन्य ब्रिफिंगमध्ये व्यस्त होतो. कारण विधानसभेमध्ये कालपासून अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झालेली आहे. आता थोड्याच वेळेत ती चर्चा सुरु होणार आहे. मी चौकशी केली त्यावेळी चर्चा झाल्यानंतर दोन्ही सभागृहामध्ये अर्थमंत्र्यांनी चर्चेला उत्तर देण्याचा प्रघात असल्याचे समजले. त्यामुळे जाणूनबुजून किंवा दूरान्वयानेसुध्दा माननीय विरोधी पक्षनेत्यांचा किंवा या सभागृहाचा किंवा या सभागृहातील कोणत्याही सन्माननीय सदस्यांचा अवमान करण्याचा किंवा त्यांना कमी लेखण्याची माझी भूमिका नाही. कारण डॉ. पंजाबराव देशमुख आणि महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण यांनी ज्या लोकशाही परंपरांचे जतन केलेले आहे, जी लोकशाहीची मूल्ये त्यांनी रुजविलेली आहेत त्या परंपरेमध्ये वाढलेला मी कार्यकर्ता आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील....

आणि त्यामुळे गेली 20 वर्षे विधानसभेत काम करीत असताना लोकशाही परंपरेचा आदर करण्याची भूमिका आमच्यात सातत्याने राहिली आहे. म्हणून विधानमंडळाने माझ्या सारख्या सदस्याचा गौरव सुध्दा केलेला आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना, सर्व गट नेत्यांना आग्रहाची विनंती आहे की, एखादी गोष्ट चुकून घडली असेल त्याबद्दल मी अनकंडीशनल दिलगिरी व्यक्त करतो. परंतु आपण या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये आपापली मते मांडली पाहिजेत. आज विधानसभा सभागृहातील अर्थसंकल्पावरील माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो व विनंती करतो की, या सभागृहातील अर्थसंकल्पावरील चर्चा संपल्यानंतर किंवा उद्या सकाळी माझे उत्तराचे भाषण ठेवले तर मला ते सोयीचे होईल. माननीय वित्त राज्य मंत्री आणि वित्त विभागाचे काही अधिकारी या सभागृहात उपस्थित राहून प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील नोटस् निश्चितपणे घेतील. मी पुन्हा सर्वांना विनंती करतो की, सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे. आमच्या विषयी कोणीही दुषित भावना ठेवू नये पुन:श्च विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज सभागृहात जी घटना घडलेली आहे. अशी घटना घडणे हे काही नवीन नाही. अधिवेशन सुरु झालेल्या दिवसापासून कुठल्या ना कुठल्या कारणांमुळे, माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे अनेक प्रश्न पुढे ढकलण्यात आले आहेत. या सभागृहाच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत. सभापती महोदय, लोकशाहीमध्ये राज्य घटनेने सांगितल्यानुसार केंद्रात्मक लोकसभा असो, राज्यसभा असो. राज्यातील विधानसभा असो, विधानपरिषद असो. यासाठी काही प्रथा आणि परंपरा आहेत. त्याचे काही संकेत आहेत. या प्रथा आणि परंपरेनुसार ही सभागृहे चालविली जातात. सभापती महोदय, मी लोकसभेतही काम केलेले आहे. विधानसभेमध्ये सुध्दा काम केलेले आहे आणि गेली आठ वर्षे विधान परिषदेमध्ये काम करीत आहे. गेल्या आठ वर्षापासून पाहतो आहे की, सभागृहातील कामकाजासंबंधी सरकारमध्ये नैराश्याचे वातावरण असते तसेच या कामकाजा विषयी सरकारकडून दुर्लक्षपणा करण्यात येतो. त्यामुळे या सभागृहाचा डेकोरम, पर्यायाने सभागृहाची प्रतिष्ठा दिवसेंदिवस खालावत चालली आहे. या सदनातील सर्वात ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आहेत. गेली अनेक वर्षे ते या सभागृहात काम करीत आहेत. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य देखील सांगतील की, या सभागृहाचा दर्जा दिवसेंदविस खालावत चालला आहे. त्याचे कारण असे आहे की, लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्ष

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

महत्वाचा असतो. तसा विरोधी पक्ष देखील महत्वाचा असतो. लोकशाहीच्या रथाची ही दोन चाके आहेत. ही दोन्ही चाके बरोबर चालली तर या सभागृहाचा सुध्दा डेकोरम ठेवला जाईल आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यास देखील चांगल्या प्रकारे मदत होईल. परंतु गेल्या काही वर्षापासून पाहतो आहोत की, सरकारकडून विरोधी पक्षाच्या सदस्यांच्या म्हणण्याकडे सिरियसली पाहिले जात नाही. जनतेच्या विकासाच्या कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक करीत नाहीत. कामापूरते म्हणून या सभागृहात यावयाचे. प्रश्नोत्तराच्या तासाला असमाधानकारक उत्तरे द्यावयाची, सभागृहातील कामकाज रेटून न्यावयाचे अशी पध्दत दिवसेंदिवस रुढ होत चालली आहे. सभापती महोदय, हा काही माझा व्यक्तीगत प्रश्न नाही. परंतु लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे. माझ यामुळे सगळे काही घडते आहे, परंतु हा प्रश्न माझा स्वत:चा आहे असे मी समजत नाही. परंतु विरोधी पक्ष नेत्याचे जे पद आहे, जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच महत्व या सभागृहात बसणा-या प्रत्येक सन्माननीय सदस्यांना आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाबाबत हे सरकार किती उदासीन आहे हे आजच आपल्या सगळयांच्या निदर्शनास आले असेल. आज सभागृहाच्या कामकाजात नियम 93 ची 7 निवेदने होती. त्या 7 निवेदनापैकी 5 निवेदनाशी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. खरे म्हणजे हे अधिवेशन सर्वांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे...

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. या अधिवेशनातून राज्य सरकारला पुढच्या पूर्ण वर्षभराची दिशा निश्चित करावी लागते. त्यातून दिशा मिळत असते. महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेचे प्रश्न याठिकाणी मांडले जातात. ते प्रश्न सुटावेत म्हणून विरोधी पक्षाच्या वतीने प्रयत्न केले जातात. परंतु सरकार ज्या बेफिकीरपणे वागत आहे, विरोधी पक्षाला कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता कामकाज रेटून नेण्याचा प्रयत्न सरकारकडून चालला आहे. हे आम्हाला रोजच सहन करावे लागत आहे. खरे म्हणजे किती सहन करावे हा एक प्रश्न आहे. आज तर सरकारने कळस गाठला. अधिकाऱ्यांनीही कळस गाठला आहे. म्हणून मी याठिकाणी माझ्या सर्व सहकाऱ्यांशी चर्चा केली आणि सर्वांचे मत घेऊन मी याठिकाणी असे जाहीर करतो की, विरोधी पक्षाच्या वतीने पूर्ण अर्थसंकल्पीय चर्चेवर आम्ही बहिष्कार घालीत आहोत एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

(विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण सभापतीस्थानी आल्यावर विरोधी पक्षाला अवमानित करावयाचे नव्हते, त्यांचा मानसन्मान राखून काम करावयाचे असते, विरोधी पक्षाला दुखवण्याचा कोणताही हेतू नव्हता अशी आपणही विनंती केली. याठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी शासनाच्या वतीने अनकंडिशनल, कोणतेही आढेवेढे न घेता कळत नकळत अवमान झाला असेल तर माफी मागतो, दिलगीरी व्यक्त करतो असे मोकळ्या मनाने सरकारच्या वतीने जाहीर केले. वास्तविक अशा प्रकारच्या चर्चा होत असतात, विषय उपस्थित होत असतात, त्यातून ताणतणाव वाढत असतात परंतु चर्चेतून वातावरण निवळल्यानंतर पुन्हा सगळे कामकाजात सहभागी होत असतात अशी या सभागृहाची आतापर्यंतची प्रथा आणि परंपरा आहे. अशा वेळी सर्वांच्या चेहेऱ्यावर समाधान दिसत असताना सुध्दा विरोधी पक्ष अशा पध्दतीने अर्थसंकल्पीय चर्चेच्या आणि राज्याच्या हिताच्या दृष्टीने असलेल्या चर्चेमध्ये भाग न घेता सभात्याग करतो, या त्यांच्या भावनेमध्ये आम्ही सगळे सहमत असताना, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी, ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी त्यांची बाजू मांडली असताना सुध्दा विरोधी पक्ष सभात्याग करतो त्यावेळी शंका येते. याचे निमित्त करुन सभात्याग करण्याचा निर्णय त्यांनी पूर्वीच घेतला होता की काय अशी शंका यायला पूर्ण वाव आहे. म्हणून विरोधी पक्षाची भूमिका ही महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेच्या दृष्टीने योग्य नाही. विरोधी पक्षाच्या भूमिकेचे आम्ही समर्थन करु शकत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मघाशी सभागृह तहकूब झाल्यानंतर मी याठिकाणी आलो. सगळी परिस्थिती समजून घेतल्यानंतर मला जे काही सांगावयाचे होते ते सांगितले. एका गोष्टीचा उल्लेख मी टाळला होता. काल सभागृहाची बैठक संपत असताना मी याठिकाणी असे घोषित केले होते की, सभागृहाची बैठक उद्या सकाळी 11.00 वाजता नियमित सुरु होईल. कामकाज उरकण्याच्या दृष्टीने सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक सुरु करु अशी मी सगळयांना विनंती केली होती. परंतु उपनगरातील अनेक सन्माननीय सदस्यांना रहदारीमुळे सकाळी 10.00 वाजता सभागृहात उपस्थित राहणे जमत नाही असे सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी भाष्य केले होते. त्यामुळे सभागृहाच्या संमतीने सभागृहाची बैठक उद्या सकाळी 11.00 वाजता भरेल असे मी याठिकाणी जाहीर केले होते. या संदर्भात संपूर्ण सभागृहाची संमती होती. असे असताना आज सकाळी मला आदरणीय सभापती महोदयांचा फोन आला. लक्षवेधी सूचनांसाठी आज सकाळी 10.00 ते 10.55 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक आयोजित केली आहे, तेव्हा आपण उपस्थित रहावे. त्यामुळे सकाळी 9.00 वाजता मी सभागृहाकडे येण्यास तयार झालो.

2टी.1....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

आणि सकाळी 10 वाजण्यापूर्वी मी पोहचलो. यासंबंधीचा उल्लेख मी आज सकाळी देखील केला. वास्तविक पाहता ही माहिती मला अधिकाऱ्यांनी द्यायला हवी होती, ते त्यांचे काम होते परंतु जो आज सभागृहाचे कामकाज सुरु होण्याबाबत जो फेरबदल झाला त्याची तातडीने माहिती मला अधिकाऱ्यांकडून न मिळता माननीय सभापतींनी फोन करुन सांगितले व ताबडतोब मी हजर झालो. मी या निमित्ताने मुद्दाम एक गोष्ट पॉइंट आऊट करु इच्छितो की, काल सायंकाळी ठरल्याप्रमाणे आज सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक सुरु होणार होती ती अचानक 10.00 वाजता ठरविली. त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेते आणि गटनेते यांनी विनंती केल्यानुसार विशेष बैठकीत लक्षवेधी सूचना घ्याव्यात म्हणून आजची ही विशेष बैठक ठरविण्यात आली अशी माहिती मला मिळाली आहे. तसेच यासंबंधीची अधिकृत माहिती जोपर्यंत मला मिळत नाही तोपर्यंत काय झाले हे कसे समजणार. परंतु ज्यावेळेस माननीय सभापतींनी कळविले त्यावेळेस मला कल्पना आली की, अचानक कार्यक्रमामध्ये बदल करण्यात आला. अशा प्रकारे विशेष आदर राखून, त्यांची प्रतिष्ठा व सन्मान राखून कामकाजात असा बदल होत असेल तर ही बाब देखील कोणीतरी लक्षात घेणे आवश्यक आहे.

परंतु सभागृहात अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु असताना माननीय सभापती अथवा उपसभापती नसतील किंवा मंत्री नसतील त्यावरुन मुद्दा उपस्थित होणे स्वाभाविक आहे. परंतु त्याचबरोबर असेही लक्षात घेतले पाहिजे की, अनेक वेळा तालिकेवर चार-चार, सहा-सहा तास बसलेलो असतो. परंतु आता माननीय मंत्री महोदय श्री. बबनराव पाचपुते यांच्यासोबत एका सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी माझ्या दालनात आम्ही चर्चा करणार होतो म्हणूनही सभागृहात मला उपस्थित राहणे शक्य झाले नाही. कारण काही विषय असे संवेदनशील असतात की, कोणत्याही क्षणी काहीही होऊ शकते म्हणून ही बैठक आयोजित केली होती. हे टाळावयाचे असेल तर जी कारणे घडली असतील त्यातील हे एक कारण होते, असे मी येथे नमूद करु इच्छितो. वास्तविक मला वाटते की, आजचे हे पहिले उदाहरण असेल की, आजची बैठक 11.00 वाजता घ्यावी असे काल ठरल्यानुसार देखील पुन्हा सन्माननीय सदस्यांच्या सन्मानार्थ, त्यांच्या भावनांचा आदर राखून कार्यक्रमात बदल करु शकतो

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

त्यावेळेस सभागृहात कोणाचाही अवमान करण्याची भावना सुध्दा पीठासीन अधिकाऱ्यांची असू शकत नाही. तसेच माननीय अर्थमंत्र्यांनी देखील या ठिकाणी सांगितले व विनंती केली की, विरोधी पक्षाने चर्चेत भाग घ्यावा. तरी देखील सन्माननीय सदस्य अशा प्रकारे बहिष्कार टाकत असतील तर सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी ही चर्चा सुरु करावी.

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, आज सकाळपासून मी या सभागृहात उपस्थित आहे. कारण सभागृहाचा डेकोरम राखण्याची जबाबदारी विशेषत: आमची असते. त्यात एक कॅबिनेट दर्जाचे मंत्री असले तरी हरकत नाही. परंतु असे असताना सुध्दा विरोधी पक्षाकडून सतत हरकत घेण्यात येते की, सभागृहात संबंधित विषयाचे मंत्री महोदय नाहीत. वास्तविक एक कॅबिनेट मंत्री असले तरी सामूहिक जबाबदारी म्हणून ठीक आहे. सकाळी नियम 93 ची तीन-चार निवेदने असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव बोलले ते देखील खरे आहे की, काहीही कारण नसताना मूळ विषयाला बगल देण्यासाठी, मूळ विषयापासून बाजूला जाण्यासाठी सभागृहात मंत्री हजर नाहीत अशा गोष्टींचा उहापोह केला जातो आणि पुन्हा सभागृहाचे कामकाज बंद पाडले जाते. दुसऱ्यांदा ज्यावेळेस सभागृहाचे कामकाज बंद पडले त्यावेळेस तर मी दरवाजातच उभा असताना देखील मंत्री उपस्थित नाहीत म्हणून कामकाज स्थगित करावे अशी मागणी करण्यात आली. याचा अर्थ सभागृहाचे कामकाज बंद पाडण्याचाच विरोधकांचा मानस होता की काय अशी शंका येते. गेल्या आठवड्यात माननीय सभापतींनी सांगितले होते की, एका तलावात दोन मगर असल्याची तक्रार आली व त्यासंसबंधीची बैठक आज दुपारी 2.00 वाजता ठेवली. या बैठकीसाठी आम्ही बाहेर गेलो त्यावेळेस सभागृहात अवमान झाल्याचे म्हटले ते योग्य नाही. सभागृहात डेकोरम ठेवला पाहिजे, सन्मान राखला पाहिजे हे ठीक आहे. परंतु काहीही नसतांना अंडरस्टँडिंग करावे लागते. परंतु झोपलेल्याला जागे करता येते, झोपेचे सोंग घेणाऱ्याला कसे जागे करणार अशी विरोधकांची परिस्थिती आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी देखील अनकंडिशनल माफी मागितली त्यावेळेस विरोधी पक्षाने असा हट्ट सोडून देणे आवश्यक होते. लोकशाहीमध्ये विरोधी पखाचे प्रमुख महत्वाचे असतात. परंतु विरोधी पक्षाने चर्चा न करता अशा प्रकारे बाहेर निघून जाणे, ही विरोधकांची भूमिका योग्य आहे असे मला वाटत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. हेमंत टकले)

पृ.शी.: अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2009-10 च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु .....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-10 चा अर्थसंकल्प खालच्या सभागृहात सन्माननीय वित्त मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी मांडला व या सभागृहात सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी अर्थसंकल्प मांडलेला आहे. या ठिकाणी सन 2009-10 चा जो अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे. ज्यावेळी अर्थसंकल्प मांडण्यात आला होता त्याच्या दुस-या दिवशीच्या वर्तमानपत्रातील प्रतिक्रिया मी वाचलेल्या आहेत. तसेच मिडीयावर ज्या प्रतिक्रिया देण्यात आलेल्या आहेत त्या प्रतिक्रिया सुध्दा मी पाहिलेल्या आहेत. भारतीय जनतापक्षाचे नेते श्री. नितीन गडकरी यांनी आपल्या प्रतिक्रियेमध्ये सांगितले होते की, या शासनाने या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जी काही आश्वासने दिलेली आहेत ती आश्वासने हे शासन पाळील असे काही नाही. अर्थसंकल्पाच्या संदर्भात निरनिराळया प्रतिक्रिया आल्या होत्या व त्या सर्व मी पाहिलेल्या आहेत व वाचलेल्या देखील आहेत. अर्थसंकल्पाच्या संदर्भात प्रतिक्रिया देत असतांना आम्ही असे सांगितले होते की, ख-या अर्थाने न्याय, सामाजिक न्याय देण्याची प्रक्रिया या सन 2009-10 च्या अर्थसंकल्पात शासनाने दिलेली आहे. "जो जे वांछिल तो ते लाहो" असे मी काही म्हणणार नाही. परंतु जी काही वस्तुस्थिती आहे ती काही नाकारता येत नाही. मी सन 1999 पासून या सभागृहाचा सदस्य आहे. या सभागृहात दरवर्षीचा अर्थसंकल्प मांडीत असतांना त्या त्या वर्षीची परिस्थिती वेगळी होती. 1999 मध्ये युतीचे शासन सत्तेवर होते त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. युतीचे शासन या राज्यात जवळपास साडेचार वर्ष होते. युतीची सत्ता गेल्यानंतर सतत 9 वर्षे या राज्यात आघाडी शासनाने अर्थसंकल्प मांडलेला आहे. गेली 5-6 वर्षे सातत्याने श्री. जयंत पाटील यांनी अर्थसंकल्प मांडलेला आहे. अर्थसंकल्प

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी.....

मांडण्याचा त्यांनी विक्रमच केलेले आहे. सर्वात जास्त अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम श्री. जयंत पाटील यांच्या नावावर आहे. यावर्षीचा अर्थसंकल्प सन्माननीय वित्त मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी खालच्या सभागृहात मांडलेला आहे व वरच्या सभागृहात सन्माननीय सदस्य डॉ. सुनील देशमुख यांनी मांडलेला आहे. त्यावेळच्या परिस्थितीमध्ये आणि आताच्या परिस्थितीमध्ये भयंकर फरक आहे. आता आर्थिक परिस्थितीमध्ये फार मोठा सुधार झालेला आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न फार मोठया प्रमाणात वाढलेले आहे. देशाचे दरडोई उत्पन्न 33 हजार कोटी रुपये असले तरी काही वर्षामध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न मोठया प्रमाणात वाढले आहे. देशाच्या दरडोई उत्पन्नामध्ये तुलना केली तर जवळ जवळ 47 हजार कोटी दरडोई उत्पन्न झालेले आहे. यावर्षीच्या अर्थसंकल्पाकडे बघितले तर आपल्याला दिसून येईल की, पहिल्या दोन तीन वर्षाचा अर्थसंकल्प शिलकी सादर करण्यात आला होता. परंतु सन 2009-10 या वर्षीचा अर्थसंकल्प तुटीचा मांडण्यात आलेला आहे. जवळ जवळ 7 हजार कोटीच्या तुटीचा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

वास्तविक पाहता ही पडझड का झाली, कशामुळे झाली यासबंधीचा खुलासा माननीय वित्त मंत्र्यांच्या लेखी भाषणात केला असल्याचे आपणाला दिसून येईल. या वर्षी तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे . या वर्षीचा अर्थसंकल्प सादर करीत असतांना आणि राज्याची आर्थिक स्थिती पहात असतांना या वर्षीचा तुटीचा अर्थसंकल्प पुढच्या वर्षी शिलकीचा अर्थसंकल्प होऊ शकतो असे मला सांगावयाचे आहे. या वर्षी तुटीचा अर्थसंकल्प सादर करीत असतांनासुध्दा मोठया प्रमाणावर करवाढ करण्यात आलेली नाही ही वस्तुस्थिती आपणाला नाकारता येणार नाही. सभापती महोदय, या वर्षी फक्त 950 कोटी रुपयांची करवाढ सुचविण्यात आलेली आहे. यावर्षी अर्थसंकल्पामध्ये जेवढी तूट आहे ती पाहता फक्त 950 कोटी रुपयांची करवाढ सुचविण्यात आलेली आहे. याचाच अर्थ असा आहे की,पुढच्या वर्षी ज्यावेळी राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाईल त्यावेळी तो तुटीचा न राहता आपल्याला अधिक उत्पन्न मिळू शकेल आणि पुढच्या वर्षीचा अर्थसकल्प शिलकीचा राहील.

सभापती महोदय, सध्या जागतिक मंदी आहे. संपूर्ण जगाच्या तुलनेने, युरोपियन देशाच्या तुलनेने आपण या जागतिक मंदीवर चांगल्या प्रकारे मात करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपली अर्थव्यवस्था कणखर असल्यामुळे तसेच माननीय पंतप्रधान हे अर्थतज्ज्ञ असल्यामुळे इतर देशांच्या तुलनेने देशाची आणि राज्याची अर्थव्यवस्था आपण मजबूत ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. 2009-2010 सालच्या वार्षिक योजनेला नियोजन आयोगाने मान्यता दिलेली आहे जवळजवळ 26 हजार कोटी रुपयांच्या योजनेला नियोजन आयोगाने मान्यता दिली आहे. याचा अर्थ असा की, विकास कामासाठी 26 हजार कोटी रकमेच्या खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त नॉन प्लॅन एक्सपिंडीचर जवळजवळ 11 हजार 815 कोटी रुपयांचा आहे. याचाच अर्थ असा आहे की,जवळजवळ 37 हजार 915 कोटी रुपयांचा 2009-2010 सालासाठी आराखडा तयार करण्यात आला असून त्यातून राज्यामध्ये विकासाची कामे कशी होणार आहेत हे दिसून येईल. त्याचबरोबर पगारावरील खर्चासाठीसुध्दा अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ राज्य

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी.....

सरकारी कर्मचा-यासाठी सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सहा ते सात हजार कोटी रुपयांचा बोजा येणार असून त्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे अर्थसंकल्पाची मांडणी करीत असतांना हे राज्य आर्थिक संकटात नेलेले आहे अशा प्रकारचा सूर लावण्याचा विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून प्रयत्न केला जात आहे तो बरोबर नाही असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या संदर्भात माझ्या सारख्या माणसाला एक गोष्टीची चिंता जरुर वाटते. 1999 साली लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन झाले होते .तेव्हा पासून अर्थसंकल्पातील पैसा कोठून येतो आणि कोणत्या कामासाठी जातो हे आम्ही सांगत आहोत. पंरतु गेल्या सात आठ वर्षापासून आम्ही ओव्हर ड्राफट काढलेला नाही. सुरुवातीच्या वर्षात ओव्हर ड्राफट काढून सरकारी नोकराचे पगार दिले जात होते पण पाच सात वर्षात एक रुपयाचासुध्दा ओव्हर ड्राफट काढण्यात आलेला नाही असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. परंतु माझ्या सारख्या माणसाला एक चिंता वाटते की, आज या राज्यावर कर्जाचा बोजा किती झालेला आहे. याबाबतीत माझ्या सारख्या माणसाला थोडी चिंता वाटते. आज 1 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज राज्यावर आहे अशा प्रकारे जर कर्ज वाढत राहिले ते बरोबर राहणार नाही. कर्जाची फेड करण्यास राज्य सरकार सक्षम आहे परंतु कोणत्या कामासाठी कर्ज काढणत येत आहे आणि कोण कोणत्या योजनावर खर्च करीत आहेत याचे विवरण जरी सादर करण्यात आलेले असले तरी कर्जवाढीचा धोका किती आहे हे पहावयास पाहिजे आणि राज्यावरील कर्ज वाढणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे हे मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो .

नतर श्रीमती रणदिवे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

सभापती महोदय, विक्री कराच्या उत्पन्नाबाबत सांगावयाचे तर वॅट आल्यानंतर आपल्याला असे वाटत होते की, आता उत्पन्न वाढणार आहे की नाही ? परंतु वॅट लागू केल्यानंतर या राज्यातील उत्पन्न वाढले असे आपल्याला सर्वांनीच सांगितलेले आहे.अगोदर काही लोकांचा त्यावर विश्वास नव्हता.परंतु यासंबंधातील वस्तुस्थिती नाकारता येत नाही की,वॅट आल्यामुळे विक्री कराच्या उत्पन्नात बदल झालेला आहे आणि शासनाला मोठया प्रमाणात निधी उपलब्ध होत आहे.

सभापती महोदय, मला याठिकाणी काही गोष्टींचा प्रामुख्याने उल्लेख करावयाचा आहे. शासनाने अर्थसंकल्पामध्ये निरनिराळया क्षेत्रांसाठी तरतूद केलेली आहे. राज्यामध्ये अनुशेषाचा प्रश्न आहे, सिंचनाच्या अनुशेषाचा प्रश्न आहे. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र इ.ठिकाणी 2004 पासून सिंचनाचा अनुशेष होता. परंतु त्याठिकाणी सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी 20 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. मला याचा आनंद आहे की, यावर्षी दि.01-04-2009 रोजीचा या राज्यातील सिंचनाचा अनुशेष संपूर्णपणे भरुन काढण्यासाठी पूर्ण तरतूद करण्यात आलेली आहे.आता सिंचनाच्या बाबतीत कोणताही अनुशेष शिल्लक नाही. जो मराठवाडयामध्ये अनुशेष शिल्लक राहिलेला आहे,तो अन्य क्षेत्रातील आहे, म्हणजेच आरोग्याच्या संदर्भात 807 कोटी 51 लक्ष रुपये, तंत्रशिक्षणाच्या संदर्भात 40 कोटी 49 लक्ष रुपये व पशु संवर्धनसंदर्भात 36 लाख रुपये अशा प्रकारे या तीन क्षेत्रांसाठी आहे. या तीन क्षेत्रासाठी माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशांनुसार आवश्यक ती तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र सिंचनाच्या संदर्भातील अनुशेष भरुन काढण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, मी कोकण विभागातील आहे. आमची अशी परिस्थिती आहे की, उर्वरित महाराष्ट्राला कोणी विचारीत नाही. मराठवाडा, विदर्भ यांच्यासाठी घटनेच्या कलम 371 (2) मध्ये तरतूद केलेली आहे की, त्यांच्यासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळाची स्थापना केली जाईल. त्या भागामध्ये सिंचनाचा प्रश्न असेल, अनुशेषाचा प्रश्न असेल तर तो पूर्ण करण्यासाठी घटनात्मक तरतूद करण्यात आलेली आहे. पण कोकणामध्ये चार जिल्हे येतात. कोणत्याही प्रकारच्या अनुशेषा मध्ये मुंबईचा समावेश करण्यात येत नाही. कोकणामध्ये ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग असे चार जिल्हे येतात. याठिकाणी अनुशेष किती आहे ? हा अनुशेश किती रुपयांचा आहे ? ते समजत नाही. आम्ही उर्वरित महाराष्ट्रामध्ये येत असल्यामुळे इतर भागांच्या तुलनेमध्ये आम्हाला अनुशेषाची

. . . .2 डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

रक्कम इतर भागांच्या तुलनेने कमी मिळते. त्यामुळे कोकणातील सिंचनाचे प्रकल्प अडकून पडलेले आहेत. विदर्भ, मराठवाडयातील सिंचनाचे प्रकल्प पूर्ण होत आहेत. परंतु दुर्दैवाने कोकणातील सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध होत नाही अशा प्रकारे अर्थसंकल्पाच्या माध्यमातून या संबंधातील विदारक चित्र कोकणातील जनतेसमोर येत आहे हे मला आवर्जून याठिकाणी सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये म्हटलेले आहे की,"केंद्रीय मार्ग निधी योजनेअंतर्गत देशामध्ये रस्ते विकासात राज्याचा प्रथम क्रमांक असून, आतापर्यंत 1,769 कोटी रुपये किंमतीची कामे मंजूर करण्यात आली असून त्यामधून सुमारे 4,523 किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात आली आहे. तसेच 421 पुलांची कामेही पूर्ण करण्यात आली आहेत. या आर्थिक वर्षात या योजनेअंतर्गत 250 कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित असून, त्यातून 325 किलोमीटर लांबीच्या रस्ते विकासाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे." सभापती महोदय, हा केंद्र शासनाचा पैसा आहे. याठिकाणी राज्याने अर्थसंकल्पामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागासाठी जवळजवळ 2000 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या व्यतिरिक्त केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत आहे. याठिकाणी माझे कोकणातील सहकारी, सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत. कोकणातील जी परिस्थिती आहे, ती लक्षात घेता आमचे विकासाच्या बाबतीत कोणते प्रश्न आहेत ते सुध्दा शासनाने समजून घेतले पाहिजेत.

सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई)

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी..

कोकणाच्या बाबतीत चर्चा व्हावी अशी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मागणी केली होती. त्याप्रमाणे यासभागृहात कोकणाच्या प्रश्नावर जवळ जवळ सात तास चर्चा झाली. या चर्चेच्या वेळी या चर्चेला संबंधित मंत्र्यांनी उत्तर न देता माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे, अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती. त्यावेळी श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते. त्यांनी या चर्चेला सव्वा तास उत्तर दिले आणि आश्वासन दिले. कोकणात 1980 साली सागरी महामार्गाला सुरुवात झाली. हा महामार्ग रेवसपासून सुरु होऊन रेड्डीपर्यंत जाणार होता. या गोष्टीला जवळ जवळ 29 वर्षे झालेली आहेत. पण अद्याप तो सागरी महामर्गा पूर्ण होऊ शकलेला नाही. हा सागरी महामार्ग टप्प्या-टप्प्याने बी.ओ.टी. तत्वावर देऊ शकतो काय, याचा विचार करण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी चर्चेला उत्तर देतांना सांगितले होते. नंतर कालांतराने समजले की, बी.ओ.टी. तत्वावर या सागरी महामर्गाचे काम होऊ शकत नाही. म्हणून या सागरी महामार्गाच्या कामाला जी चालना मिळायला पाहिजे होती, ती मिळाली नाही. त्यासाठी जो निधी मिळाला पाहिजे होता तो निधी मिळू शकला नाही.

सभापती महोदय, राज्य महामार्ग क्रमांक 17 मुंबई ते गोव्याला जातो. हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. मृत्यूला समोरे जावयाचे असेल तर या राज्य महामार्ग क्रमांक 17 वरुन जावे. हा रस्ता अत्यंत अरुंद आहे. एक काळ असा होता की, या रस्त्यावरुन जास्त वाहतूक होत नव्हती. आता या रस्त्यावरील वाहतूक हजार ते दीड हजार पटीने वाढली आहे. मोठे ट्रेलर आणि टँकर या रस्त्यावरुन जातात. हा रस्ता अरुंद आहे. या अरुंद रस्त्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही म्हणून या रस्त्याची जैसे थी परिस्थिती आहे. ती परिस्थती सुधारण्यासाठी राज्य महामार्ग क्रमांक-17 साठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात पर्यटनासाठी 165 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. सभागृहात माननीय अर्थ राज्यमंत्री बसलेले आहेत. मला त्यांना विचारावयाचे आहे की, ज्यावेळी युतीचे शासन होते, त्यावेळी मुख्यमंत्री श्री. नारायण राणे हे सिंधुदुर्गचे असल्यामुळे त्यांनी त्या ठिकाणी सिंधुदुर्ग पर्यटन महामंडळ सुरु केले. ते रजिस्टर केले. त्यानंतर 1999 साली आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आले. आम्हाला असे वाटले की, राजकीय हेतुने प्रेरित होऊन हे महामडळ सुरु करण्यात आलेले आहे. कारण ते महामंडळ होऊ शकले नव्हते. ते महामंडळ बदं

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी..

झाले. त्यानंतर आमच्या पक्षाच्या सरकारने सभागृहात आश्वासन दिले की, हे महामंडळ केवळ सिंधुदुर्ग जिल्हयापुरते मर्यादित रहाणार नाही तर संपूर्ण कोकणासाठी महामंडळ करण्यात येईल,आणि तशा प्रकारची घोषणा करण्यात आली. त्याचाही काही परिणाम झाला नाही. त्यानंतर पर्यटन महामंडळ करु आणि येथील पर्यटन वाढवू असे सांगण्यात आले. आज सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर करताना ज्या ज्या सुविधा त्या ठिकाणी यावयास पाहिजे होत्या त्या त्याठिकाणी न देता पर्यटनाचे पैसे अन्य ठिकाणी वापरण्यात येतात. आज पर्यटनासाठी 165 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमध्ये कोकणासाठी आणि सिंधुदुर्ग जिल्हयासाठी काय तरतूद केलेली आहे? आज तो पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे.आज एवढी वाईट परिस्थिती आहे की, या पर्यटन महामंडळला अध्यक्ष नाही. माननीय मंत्रिमहोदयांकडे हे पर्यटन महामंडळ दिलेले आहे. त्यामुळे पर्यटन महामंडळाचे मॅनेजिंग डायरेक्टर कोण आहेत हे माहीत नाही. सेक्रेटरी कोण आहेत हे माहीत नाही. अशा परिस्थितीत या संपूर्ण कोकणातील पर्यटन विकास महामंडळाच्या अर्थ व्यवस्थेला सुरुंग लावण्याचे काम शासन करणार असेल तर कोकणामध्ये सुधारणा कशी होणार आणि ती सुधारणा कोण करणार आहे? पर्यटन महामंडळ हे राज्याचे पर्यटन महामंडळ आहे. हे पर्यटन महामंडळ मंत्र्यांकडे असू शकते पण पर्यटन महामंडळाचा चार्ज माझ्याकडेच असला पाहिजे अशा प्रकारची भूमिका घेऊन सरकारमध्ये काम होणार असेल तर ते पूर्णत: चुकीचे होईल. कोकणामध्ये सुधारणा होण्यासाठी पर्यटन विकास महामंडळने स्वतंत्रपणे काम करावयास पाहिजे अशी आमची मागणी आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

सभापती महोदय, मला राग नाही. या ठिकाणी माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. चंद्रकांत हंडोरे उपस्थित आहेत. आपण गरिबांनी वेगवेगळ्या महामंडळाकडून घेतलेली 1100 कोटी रुपयांची कर्जे माफ केली. आपण शेतकऱ्यांचे कर्ज माफ करतो त्यावेळी या गरिबांचे सुध्दा कर्ज माफ केले पाहिजे अशी जी चांगली भूमिका शासनाने घेतली त्याचे मी समर्थन करतो. तशाच प्रकारे चार पाच वर्षांपूर्वी मी चिपळूण येथे एक मेळावा घेतला होता. माननीय श्री. शरद पवार साहेब त्या ठिकाणी आले होते. त्या ठिकाणी कुणबी आर्थिक महामंडळ स्थापन करण्याचे जाहीर केले होते. त्यासाठी टोकन प्रोव्हीजन केली होती. तरी सुध्दा आपण कुणबी आर्थिक महामंडळ का स्थापन करु शकत नाही ? आज इतर जी सर्व महामंडळे लोकांना फायदा करुन देतात त्यांची कर्जे आपण माफ करतो त्याचप्रमाणे कुणबी सुध्दा श्रीमंत नाहीत. कोकणातील कुणबी समाजातील लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत दुबळी आहे. जे शारीरिक कष्ट करतात असा कुणबी समाज ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. आज आपण ते महामंडळ का स्थापन करु शकत नाही ? माझी अशी मागणी आहे की, कुणबी आर्थिक महामंडळाबाबत शासनाने याच अधिवेशनामध्ये घोषणा करावयास पाहिजे. या वर्षापासून कुणबी आर्थिक विकास महामंडळ सुरु करीत आहोत अशी घोषणा करावी. त्याचा फायदा बहुजन समाजातील कुणबी समाजाला होऊ शकेल. आपण राज्याच्या निरनिराळ्या समाजघटकांच्या आर्थिक उन्नतीसाठी अनेक योजना या ठिकाणी आणलेल्या आहेत आणि त्यांना मदत केलेली आहे. त्याबद्दल मी माननीय मत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. आमच्याकडे चिपी येथील एअरपोर्टचा प्रश्न आहे. आपण राज्यातील विमानतळांचा विकास करण्यासाठी 238 कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केलेला आहे. चिपी येथील विमानतळ होणार असे आठ दहा वर्षे सांगितले जात आहे पण अजून ते विमानतळ होत नाही. परवा माननीय पालकमंत्र्यांनी बैठक घेतली. त्यांनी सांगितले की, आता भूसंपादनाचे काम पूर्ण होत आलेले आहे आणि एक दोन वर्षात ते विमानतळ होईल. परंतु आपण त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली नाही. आता फक्त 80-90 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. एमआयडीसी मार्फत जमीन संपादनाचा प्रस्ताव ठेवलेला आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

ते काम आपण करणार की नाही ? पर्यटन महामंडळाची आपण अशा पध्दतीने विल्हेवाट लावली. आम्हाला आपण कोणत्या प्रकारची आर्थिक मदत करीत नाही. पर्यटन महामंडळाचा जो निधी येतो तो कोठे खर्च करतो हे माहीत नाही. मग या ठिकाणी सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून आपण कशासाठी जाहीर करता ? फक्त नावासाठी रेकॉर्डवर जाहीर करता. राज्यामध्ये आणि देशामध्ये सांगणार की आम्ही सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा जाहीर केलेला आहे. परंतु शासन आम्हाला काय देते ? गोव्यासारख्या ठिकाणी 18 लाख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटक येतात. गोव्याच्या बॉर्डरवर असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये त्यांच्याही पेक्षा अप्रतिम समुद्रकिनारे आणि सृष्टीसौंदर्य आहे पण त्याचा लाभ पर्यटक घेऊ शकत नाहीत. दहा पंधरा वर्षापूर्वी तेथे तीन चार पंचतारांकित हॉटेल्स आणण्यासाठी जागा संपादित केली परंतु त्या जागेचा उपयोग करु शकत नाही. त्या ठिकाणी एकही हॉटेल आलेले नाही. या सर्व गोष्टींच्या बाबतीत जेव्हा विचार करतो तेव्हा कोकणावर अन्याय होतो असे मला वाटते. राज्यावर जे 1 लाख 85 हजार कोटीचे कर्ज आहे त्यामध्ये कोकणचा हिस्सा किती आहे ? आपण इतर भागाला वाटेल तेवढी मदत करतो. विदर्भाला वाटेल तेवढे पैसे देतो. मराठवाड्याला वाटेल तेवढे पैसे देतो. यामध्ये आमचा किती हिस्सा आहे हे आम्हाला समजू द्या. 1 लाख 85 हजार कोटीच्या कर्जामध्ये सुध्दा आमची भागीदारी किती आहे हे तरी समजू द्या.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी...

आम्हाला एकदा सांगून टाकावे. या राज्यावर 1 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. कोकणाला काही देता आले नाही तरी हे कर्ज झालेले आहे. तुम्हाला काही देता आले नाही तरी तुमच्या डोक्यावर कर्जाचे ओझे आहे. सभापती महोदय, हा अर्थसंकल्प चांगला आहे. परंतु राज्याची अर्थव्यवस्था मजबूत आहे, ठिकाणावर आहे हे जरी खरे असले तरी कोकणावर मात्र मोठया प्रमाणावर अन्याय झालेला आहे. हा अन्याय सरकारने दूर करावा एवढीच यानिमित्ताने मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्याचे सन्माननीय वित्त राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी या वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहात मांडला आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्यावतीने गेले दोन दिवस सभागृहात तमाशा चालू आहे. प्रत्येक कामामध्ये अडथळा निर्माण करण्याचे काम त्यांच्याकडून सुरु आहे या अर्थाने मी तमाशा हा शब्द वापरला आहे. आघाडी सरकारने अतिशय चांगला अर्थसंकल्प मांडला असल्यामुळे विरोधी पक्षाला बोलण्यासाठी काहीच ठेवले नसल्यामुळे विरोधी पक्षाने या चर्चेत भाग न घेण्याची भूमिका घेतली आहे. राज्यातील सर्व घटकांना सामाजिक न्याय देण्याची या राज्याची जी उज्जवल परंपरा आहे. या आघाडी सरकारची सामान्य माणसाच्या हिताकडे लक्ष देण्याची परंपरा आहे. हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक असल्यामुळे विरोधी पक्षाला बोलण्यासाठी काही राहिले नसल्यामुळे व त्यांच्याकडे या अर्थसंकल्पावर टीका करण्यासारखे काही मुद्दे नव्हते म्हणून त्यांनी बहिष्कार घातला असावा. मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या अर्थसंकल्पावर बोलताना निगेटिव्ह बाजू मांडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु राज्याची विकासाची परिस्थिती पाहिली तर औद्योगिक उत्पादन वाढल्याचे दिसते, कृषी उत्पादनात प्रगती झाल्याचे दिसते. गेल्या वर्षी महागाईचा दर वाढला होता. परंतु केद्र सरकार व राज्य सरकारने जे धोरण स्वीकारले त्याचा परिणाम म्हणून महागाईचा दर कमी झाल्याचे दिसून येते. जागतिक मंदीच्या काळामध्ये संबंध जगात मंदी असताना, संपूर्ण जग मंदीच्या खाईत सापडले असताना देशाने व विशेषत: महाराष्ट्र राज्याने मंदीचा परिणाम कमी करण्याचा उत्तमरित्या प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, राज्यातील विविध घटकांना, शेतक-यांना कर्जे दिली जातात. ही कर्जे शासनाने माफ करण्यासाठी तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे सामाजिक न्याय विभागाच्या महामंडळामार्फत दिले जाणारे खावटी कर्ज माफ केले आहे. याचे कारण असे की, राज्यातील गरीब माणूस या महामंडळांकडून कर्जे घेतात, परंतु ते त्यांना परत करता येत नाही, त्यामुळे ते कर्ज त्यांच्या अंगावर तसेच राहते, या लोकांना या कर्जातून बाहेर काढण्याचे काम शासनाने केले आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून या लोकांना मदत करण्याचे काम सन्माननीय वित्तमंत्र्यांनी केले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड....)

पण मौलाना आर्थिक विकास महामंडळासारख्या ज्या महामंडळांनी समाजातील तळागाळातील लोकांना आपल्या पायावर उभे राहाता यावे यासाठी जी काही कर्जे दिली असतील ती कर्जे देखील माफ करण्याचा विचार करणे गरजेचे आहे हे मी या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या अर्थसंकल्पामध्ये राज्य सरकारने सर्व घटकांचा विचार केलेला आहे. रस्त्यांचा, सिंचनाचा, उद्योगाचा विचार केलेला आहे. मला आणखी एक विनंती माननीय वित्त मंत्र्यांना करावयाची आहे की, आपण अनेकांना कर्जमुक्त केलेले आहे. परंतु गेल्या वर्षभरामध्ये जागतिक मंदीमुळे आपल्या राज्यातील जवळ जवळ अडीच ते तीन लाख कामगार बेरोजगार झालेले आहेत, रस्त्यावर आलेले आहेत. या कामगारांनी घरासाठी कर्ज घेतलेले असेल, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज घेतलेले असेल, खाजगी बँकाकडून वाहनांसाठी कर्ज घेतलेले असेल ते कर्ज माफ करण्याची गरज आहे. सभापती महोदय, जागतिक मंदीमुळे राज्यातील जे तीन लाख कामगार बेकारीच्या खाईत लोटले गेलेले आहेत, ज्या बंद पडलेल्या कंपन्यातील कामगारांना पगार मिळत नाही परंतु त्याच्या कर्जाचा बोजा कमी झालेला नाही अशा कामगारांकरिता काही तरी आर्थिक व्यवस्था करणे अतिशय गरजेचे आहे. या जागतिक मंदीमुळे नोक-या गेल्यामुळे कर्जाचे हप्ते भरता न आल्यामुळे ज्यांच्या घरावर जप्ती आलेली आहे, ज्यांना आपल्या मुलांच्या मेडिकल आणि इंजिनिअरिंग शिक्षणाची फी भरता येत नाही अशा कामगारांच्या घरावर जप्ती येऊ नये त्यांच्या मुलांचे शिक्षण पूर्ण व्हावे यादृष्टीने काही ना काही उपाययोजना करायला पाहिजे. म्हणून माझी विनंती आहे की, ज्या कामगारांचे रोजगार गेलेले आहेत अशा कामगारांची आणि बंद पडलेल्या कंपन्यांची माहिती कामगार आणि उद्योग विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी आणि त्या बेरोजगार झालेल्या कामगारांना बीपीएलचे कार्ड द्यावे जेणेकरुन सरकारच्या योजनेमध्ये त्यांना 75 रुपयामध्ये 25 किलो धान्य मिळू शकेल. बंद पडलेल्या कंपन्यातील कामगारांनी घरासाठी कर्ज घेतलेले असेल तर कंपनी चालू होई पर्यन्त अशा कामगारांच्या कर्जावरील कमीत कमी व्याज भरण्याची तरतूद आपण केली पाहिजे. हे पुरोगामी राज्य आहे. या अर्थसंकल्पामध्ये सर्व राज्य सरकारी कर्मचा-यांना सहावा वेतन आयोबग लागू केला. माननीय परिवहन मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत.जी एस.टी.गेली 25 वर्षे तोट्यात चालत होती ती गेल्या तीन वर्षामध्ये नफ्यात चालत आहे. राज्य

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड...)

परिवहन महामंडळाला 282 कोटी रुपयांचा नफा झालेला आहे. गेल्या दोन वर्षामध्ये एस.टी. महामंडळातील कर्मचा-यांच्या वेतनाच्या संदर्भात करार झालेला नाही. एस.टी. ही राज्याची अतिशय महत्वाची आणि प्रतिष्ठेची सेवा आहे. जर राज्यातील सर्व महामंडळातील कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करणार असाल तर या एस.टी.मधील कर्मचा-यांना देखील तो लागू करावा किंवा त्या दर्जाचा करार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे. सर्वांना बरोबर घेऊन जाणारा हा अर्थसंकल्प शासनाने तयार केलेला आहे. हा आशादायी अर्थसंकल्प असून राज्यामध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे. तेव्हा या अर्थसंकल्पाबद्दल मी राज्य सरकारचे अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदया, वर्ष 2009-10 के अर्थसंकल्प को समर्थन देने के लिए मैं खड़ी हूँ. माननीय वित्त मंत्री की भूमिका एक बहती हुई नदी की तरह होती है, जिसको हर घटक, हर चीज की जरुरतों को पूरा करना ही होता है. जिस तरह से पानी को जीवन कहा जाता है, उस तरह से क्या बिना पैसे के समाज की जरुरतें पूरी हो सकती हैं ? नहीं हो सकतीं. समाज के हर कोने तक सुविधाओं की उपलब्धता की चिंता वित्त मंत्री की नैसर्गिक जिम्मेदारी है और इसके लिए यह बजट तैयार तैयार करने वाले के पास एक ब्रिलिएंट माइंड के साथ साथ विशाल हृदय की भी आवश्यकता होती है. एक ऐसा हृदय जो हर किसी के लिए दर्द रखता हो, जो हर किसी के लिए खून के आँसू रोता हो, ऐसा दिल वित्तमंत्री को चाहिए. एक कवि ने कहा है :

"रगों में दौड़ते फिरने के हम नहीं कायल,
जो आँख से ही न टपका, वह फिर लहू क्या है."

सभापति महोदया, अगर आँख से लहू टपकता है, तभी दिल में दर्द उभरता है. हमारे वित्त मंत्री के पास दिल भी है और दिमाग भी है, ऐसा मैं कहना चाहती हूँ.

सभापति महोदया, हमारी सरकार ने समाज के दर्द को समझकर कुछ ही दिनों में ऐतिहासिक निर्णय लिए हैं, जो इससे पहले शायद ही कभी लिए गए हों. खास तौर पर जिसका जिक्र मुझसे पहले बोलने वाले माननीय सदस्य ने किया है कि जागतिक मंदी के बावजूद भी हमारी सरकार इस प्रकार के निर्णय ले सकी. यह विशेष रुप से उल्लेख करने की बात है. जब सारी दुनिया में लोगों की नौकरियां जा रही हैं, लाखों लोग बेरोजगार हो रहे हैं, उस समय हमारी सरकार छठवाँ वेतन आयोग लागू करने का निर्णय ले सकी., किसानों के लिए कर्ज माफी का निर्णय ले सकी और 78 लाख किसानों को इसका फायदा हुआ, 4 प्रतिशत की दर से महिला बचत गटों को कर्ज देने का निर्णय किया गया और इसका फायदा लोकसंख्या के 50 प्रतिशत हिस्से को हुआ, घरेलू कामगारों और बाल कामगारों के लिए कायदा बनाया गया, माहिती के अधिकार का कायदा बनाया गया, रोजगार गारन्टी के कायदे से ग्रामीण भाग में लोगों को रोजगार मिला, जीवनदायी योजना का स्कोप बढ़ाकर मेजर सर्जरी को इसमें शामिल किया गया और अल्पसंख्यक समाज का विकास करने का निर्णय लिया गया. न सिर्फ ये निर्णय लिए गए, बल्कि इनके ऊपर अमल भी किया गया और अगर मैं सारी बातों का उल्लेख करुँगी तो मेरा समय खत्म

. . . 3B 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान

हो जाएगा. इसीलिए हाल ही में लोकसभा के चुनाव में हमारे देश की जनता ने हमारी सरकार के पक्ष में निर्णय लिया. मैं ऐसा समझती हूँ कि वित्त मंत्री का यह भाषण सरकार की नेक-नीयती की फोटो-कॉपी है, सरकार के काम का रोड मॅप है. सरकार की प्रशंसा करते हुए मैं यह नहीं भूल सकती कि कहीं न कहीं, कुछ न कुछ सुझाव का स्कोप रह ही जाता है.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान..... पूर्वी श्री शर्मा

क्योंकि कभी ऐसा भी होता है कि जब,

दुआ की बहारों के लिए तो इतने फूल खिले
कि जगह न रही हमारे ही आशियाने के लिए.

इसलिए मैं वित्त मंत्री जी को कुछ सुझाव भी देना चाहती हूं. आपने एससी और नव बौध्द के लोगों को पावर टिलर्स देने का निर्णय लिया है. मैं इस निर्णय का स्वागत करती हूं. नव बौध्द अल्पसंख्याक है लेकिन वित्त मंत्री जी मुस्लिम अल्पसंख्याक को इस सुविधा से क्यों वंचित रखा जा रहा है ?

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : सभागृहाची वेळ 4.00 वाजेपर्यंत होती परंतु अर्थसंकल्पावरील चर्चा व उत्तर बाकी आहे, ही चर्चा संपेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मैं मंत्री महोदय को याद दिलाना चाहती हूं कि सच्चर समिति ने इस देश में जो तुलनात्मक संशोधन किया है, उसके द्वारा यह सिध्द हुआ है कि इस देश में हर क्षेत्र में एससी, एसटी, ओबीसी इन सभी समाजों से मुस्लिम अल्पसंख्याक समाज उपेक्षित है आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक हर क्षेत्र में ही ज्यादा उपेक्षित है. इसलिए अब मुस्लिम समाज के लिए एक मोर फोकस युक्त पॉलिसी और एप्रोच की जरुरत है, जो इस बजट भाषण में नज़र नहीं आती. इसलिए इस ओर ध्यान दिया जाए. अगर सच्चर समिति की सिफारिशों को फोकस करके अमल नहीं होगा तो मुस्लिम समाज का विकास नहीं होगा ओर इस समाज के बारे में इस तरह हो जाएगा कि,

जला है जिस्म जहां दिल भी जल गया होगा
कुरेदते हैं जो अब राख, जुत्सजू क्या है

सभापति महोदय, मुस्लिम समाज के विकास के लिए कोई ठोस निर्णय लिया जाना आवश्यक है. जहां तक बजट तरतूद का सवाल है तो 10 प्रतिशत एस.सी. समाज के लिए दो हजार करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. उसी तरह से 4.5 प्रतिशत एस.टी. समाज के लिए

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान..... पूर्वी श्री शर्मा

आदिवासी सब प्लान का आऊट-ले लगभग 2314 करोड़ रुपये का है. मगर मुस्लिम अल्पसंख्याक इतना पिछड़ा है कि वह हर क्षेत्र में पिछड़ गया है. राज्य में मुस्लिम अल्पसंख्याक 13.6 प्रतिशत है और खिश्चन, बौध्द, शीख, पारशी तथा जैन यह अल्पसंख्याक समाज 18 प्रतिशत है, उसके लिए आपने सिर्फ 210 करोड़ रुपये का प्रावधान किया है, इतनी कम धनराशि से क्या इन अल्पसंख्याक समाज का विकास हो जाएगा ? जिसमें से 14 करोड़ रुपये सिर्फ यूनिफॉर्म बांटने के लिए दिए है. मैं यह कहती हूं कि समाज का ठीक प्रकार से विकास करने के लिए आवश्यक धनराशि का प्रावधान करने की जरुरत है. मेरा यह सुझाव है कि, जिस तरह से ट्रायबल सब-प्लान बनाया गया है, उसी तरह से मायनारिटी सब-प्लान अलग से होना चाहिए और डीपीडीसी में उसकी चर्चा होनी चाहिए. सम्मानीय सदस्य श्री जयप्रकाश छाजेड़ ने जैसे कहा कि महामंडलों का कर्ज माफ होना चाहिए, मैं उसका समर्थन करती हूं. लेकिन मेरा यह सुझाव है कि सभी महामंडलों का कर्ज माफ होना चाहिए. मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडल को अलग रखा गया है इसलिए उसको भी शामिल किया जाए. इस महामंडल के लिए अधिक से अधिक तरतूद की जाए. उसी प्रकार से मैं ट्रांसफर ऑफ वतन एंड इनाम लैंड एक्ट के संबंध में जो निर्णय लिया गया है, उसका भी स्वागत करती हूं. इसके अन्तर्गत लैंड वापस करने का निर्णय लिया गया है.लेकिन मैं यह कहना चाहती हूं कि इसके पहले यह निर्णय लिया गया है कि वक्फ़ लैंड के बारे में इनक्वारी की जाएगी.

यानंतर श्री शर्मा ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीय नहीं

. . . श्रीमती फौजिया खान (पूर्वी तालेवार)

हजारों एकड़ जमीन पर लोगों ने अतिक्रमण कर रखा है. इसको दूर करने के लिए स्पेशल टास्क फोर्स बनाने का निर्णय शासन कब लेगा ? इस बारे में कब इन्क्वायरी की जाएगी ? अतिक्रमण को हटाकर औकाफ की जमीन वक्फ बोर्ड को को कब वापस की जाएगी ?

सभापति महोदय, एक और बात की तरफ मैं सरकार का ध्यान आकर्षित करना चाहती हूँ कि वक्फ बोर्ड की समय सीमा वर्ष 2007 में खत्म हो गई है. वक्फ बोर्ड का 5 साल का समय खत्म हो चुका है. अभी इसका कोई चेयरमेन नहीं है. यह भंग हो चुका है और सरकार इसकी वेकेन्सी नहीं भर सकती है. लेकिन सरकार ने वेकेन्सी भरने के बारे में नोटिफिकेशन निकाला है, लेकिन कानूनी रुप से यह संभव नहीं है. बोर्ड को रि-कन्सटिट्यूट करने के लिए सरकार को नोटिफिकेशन निकालना पड़ेगा और जब तक सरकार ऐसा नहीं करती है, तब तक रेवेन्यू कमिश्नर को एडमिनिस्ट्रेटर अपाइंट किया जाए. यह सही कदम होगा. सरकार की तरफ से गैर-कानूनी काम हो तो यह हमारी सरकार को शोभा नहीं देता है.

सभापति महोदय, मैं यह कहना चाहती हूँ कि ब्यूरोक्रेटिक एटीट्यूड की वजह से जो चाओस होता है, उसकी एकाउन्टीबिलिटी तय करने के लिए लेजिस्लेशन बनाने की बात शासन को सोचनी चाहिए. सरकार की नीयत साफ होती है, लेकिन ब्यूरोक्रेसी के दृष्टिकोण की वजह से हमारे काम रुक जाते हैं. ब्यूरोक्रेट्स को एकाउन्टेबल बनाने के लिए लेजिस्लेशन की जरुरत है.

सभापति महोदय, इसी तरह से अल्पसंख्यक समाज के शिक्षण की समस्या है. सरकार ने शिक्षण के लिए काफी पैसे का प्रावधान तो किया है, लेकिन इसके लिए "More Focussed Policy" बनाने की जरुरत है. परमानेंट नो ग्रान्ट बेसिस पर मॉयनोरिटीज के स्कूल्स नहीं चल सकते हैं. अल्पसंख्यक समाज एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. से भी अधिक आर्थिक रुप से पिछड़ा है. एस.सी., एस.टी., ओ.बी.सी और आर्थिक, सामाजिक रुप से पिछड़े हुए गरीब लोगों की फी रि-एम्बर्समेंट के लिए 1200 करोड़ रुपए का प्रावधान किया है. लेकिन बहुत खेद के साथ कहना पड़ता है कि अल्पसंख्यक विद्यार्थियों के लिए स्कॉलरशिप बहुत कम है और केवल 32 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. इनके लिए 36 हजार प्रि-मेट्रिक, 16 हजार पोस्ट-मेट्रिक और 1100 अन्य स्कॉलरशिप रखी गई हैं. अल्पसंख्यक समाज में जिनकी इनकम कम है, उनके लिए

. . . 3 D 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान जारी

ई.बी.सी. की सुविधा क्यों नहीं दी जा रही है. अगर अल्पसंख्यक समाज का बच्चा ई.बी.सी. की सुविधा मांगता है तो उसे कहा जाता है कि आप अल्पसंख्यक समाज को दी जाने वाली स्कॉलरशिप लें, आपको ई.बी.सी. की सुविधा नहीं मिलेगी. यह बहुत गंभीर बात है. अल्पसंख्यक समाज के बच्चों को ई.बी.सी. की सुविधा मिलनी चाहिए. इसमें सरकार ने अधिक प्रावधान किया है. अगर आप अल्पसंख्यक समाज के बच्चों को ई.बी.सी. की सुविधा देते हैं तो फिर उनको दी जाने वाली स्कॉलरशिप की संख्या में बढ़ोतरी करनी चाहिए. मेरी वित्त मंत्री से गुजारिश है कि इस मसले को मंत्रिमंडल में लेकर जल्दी से जल्दी इस को हल करना चाहिए.

सभापति महोदय, अल्पसंख्यकों के स्कूल के लिए सरकार की तरफ से रोस्टर लागू करने के लिए कहा जाता है, जबकि कोर्ट के डिसीजन के अनुसार उनके लिए रोस्टर लागू नहीं होता है. मराठी मीडियम के स्कूलों के लिए ग्रान्ट मंजूर कर दी गई है, जबकि अल्पसंख्यकों के स्कूलों से कहा गया है कि पहले आप रोस्टर लागू करने की शर्त पूरी कीजिए.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपासून नाही

जब कोर्ट ही यह कहता है कि यह लागू नहीं होता है और अल्पसंख्याक मंत्रालय ने भी सकुर्लर निकाला है तो फिर ब्यूरोक्रेसी के द्वारा हरेसमेंट क्यों की जा रही है, यह मेरी समझ में नहीं आता है. इसलिए इस पर रोक लगानी चाहिए. दूसरा मेरा मुद्दा यह है कि भटक्या व विमुक्त जमाति के मुस्लिम विद्यार्थियों और एसबीसी के विद्यार्थियों के लिए स्थापित आश्रमशालाओं को स्वतंत्र आश्रम शालाओं की सूची में रखा गया है. माहिती के अधिकार के अन्तर्गत मिली जानकारी के अनुसार 98 हजार विद्यार्थियों में भटक्या व विमुक्त जमाति के सिर्फ 15 मुस्लिम विद्यार्थी है. इसलिए मेरी यह मांग है कि संविधान के अनुसार जो सुविधा दी गई है, उसके अनुसार सरकार द्वारा एसबीसी और भटक्या व विमुक्त जमाति के मुस्लिम विद्यार्थियों के लिए स्वतंत्र आश्रम शाला बनायी जानी चाहिए या कम से कम उनके लिए रिजर्वेशन रखना चाहिए और यह भी देखना चाहिए कि बच्चे पढ़ रहे है या नहीं. कई बच्चों को स्कूल ही मालूम नहीं है, वे दर दर भटक रहे हैं. इसलिए इस ओर ध्यान दिया जाना चाहिए. मैं सरकार की प्रशंसा करती है कि सरकार ने चाईल्ड लेबर एक्शन प्लान बनाने का निश्चय किया है. मेरा सुझाव है कि चाईल्ड बेगर्स को भी इस योजना के अन्तर्गत शामिल किया जाए. क्योंकि हर सिग्नल पर बच्चे भीख मांगते नजर आते हैं.

सभापति महोदय, जिस प्रकार से सती प्रथा, दहेज प्रथा सामाजिक बुराई है, उसी प्रकार से आज परीक्षा में कॉपी करना भी सामाजिक बुराई हो गई है. परीक्षा में हो रही कॉपी को नियंत्रण में लाना बहुत मुश्किल हो गया है. लातुर में 12 वीं क्लास के विद्यार्थियों ने बड़ी संख्या में कॉपी की है. 3500 विद्यार्थियों के रिजल्ट रोक दिए गए हैं. श्री कदम, उप संचालक ने भी कॉपी की घटना को स्वीकार किया है. 2883 विद्यार्थियों की उत्तरपत्रिका एक दूसरे की उत्तरपत्रिका से मिलती है. ये उत्तरपत्रिका ऐसी लगती है जैसे झेरॉक्स कॉपी हो. वहां सामूहिक कॉपी हुई है. इसलिए अब समय आ गया है कि कॉपी को रोकने के लिए कानून बनाया जाए. जब किसी बुराई से निपटा नहीं जा सकता हो या जब कोई समस्या हल नहीं हो रही हो तो उसके खिलाफ कठोर भूमिका ली जानी चाहिए. अत: कॉपी के मामले में कठोर कार्रवाई होनी चाहिए अन्यथा शिक्षा का कोई अर्थ नहीं रहेगा.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान....

सभापति महोदय, औरंगाबाद में लॉ युनिवर्सिटी स्थापित करने का निर्णय लिया गया है. यह सवाल में पिछले तीन सालों से यहां उठाती रही हूं. दो बार मुझे लिखित उत्तर भी दिया गया था कि यह प्रश्न विचाराधीन है. सरकार ने औरंगाबाद में लॉ युनिवर्सिटी स्थापित करने का जो निर्णय लिया है, उसका मैं स्वागत करती हूं. लेकिन इस से संबंधित मेरी यह मांग है कि परभणी में इस युनिवर्सिटी का सब-सेंटर स्थापित किया जाए. परभणी में इस युनिवर्सिटी का पहला सब-सेंटर रखा जाए.

सभापति महोदय, महिला बचत गट द्वारा तैयार किए गए माल के लिए बाजार उपलब्ध कराने के लिए जिला एवम् तालुका स्तर पर बिक्री केन्द्र निमार्ण करने का निर्णय सरकार ने किया है, मैं उसका स्वागत करती हूं. सरकार ने बहुत अच्छा कदम उठाया है. इस हेतु आर्थिक तरतूद की गई है. लेकिन मैं यह कहना चाहती हूं कि इस संबंध में इम्पेक्ट एनालीसिस का अभ्यास होना जरुरी है.

इसके बाद श्री शर्मा...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपात्र नाही

. . . श्रीमती फौजिया खान का भाषण जारी (पूर्वी तालेवार)

बचत गट को सरकार की तरफ से मिलने वाले लोन की प्रोग्रेस बहुत धीमी हो गई है. हमारे प्रदेश के अन्दर कई प्राईवेट एजेन्सी हैं, जो कि लोन दे रही है. एक दिन में बचत गट बनता है और उसी दिन उसको प्राईवेट एजेन्सी की तरफ से लोन भी दे मिल जाता है. बचत गट की मदद करने के लिए एक स्टडी की आवश्यकता है. आप कितने लोगों को मार्केटिंग आउट-लेट्स में भेज रहे हैं. इसके लिए इम्पेक्ट एनालायसिस की स्टडी होना आवश्यक है.

सभापति महोदय, मेरा आखिरी मुद्दा यह है कि 200 विद्यार्थियों ने कर्नाटक विश्वविद्यालय से डी.एड. की परीक्षा दी है. पिछले नागपुर अधिवेशन में शिक्षण मंत्री ने आश्वासन दिया था कि महाराष्ट्र में शिक्षण सेवक की भर्ती करते समय उनको लिया जाएगा. मुझे शिक्षण विभाग के सचिव ने भी ऐसा आश्वासन दिया था, लेकिन अब तक इस तरह का कोई जी.आर. नहीं निकला है. मैं यह मांग करती हूँ कि इनके ऊपर अन्याय न हो और इनको शिक्षण सेवक की भर्ती में शामिल किया जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूँ. धन्यवाद.

. . . .

भाषण पूर्ण, नंतर 3F2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, याठिकाणी मला भाषण करण्यासाठी 10 मिनिटांचा वेळ देण्यात यावा अशी माझी विनंती आहे. कारण बाकीच्या सन्माननीय सदस्यांना 25 मिनिटे देण्यात आली आहेत.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 या वर्षाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

समाजातील दलित, पददलित, आदिवासी व शेतकरी या सर्वसामान्यांना सामाजिक न्यायाचा लोकानुनय करणारा अतिरिक्त अर्थसंकल्प वित्तमंत्री मा.श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी सभागृहात मांडला. त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

देशामध्ये जागतिक मंदी असतानाही राज्याने विक्रीकराच्या माध्यमातून 33 हजार कोटीचा महसूल प्राप्त केला आहे, ही बाब अभिनंदनीय आहे.

जागतिक मंदीच्या काळात देशाचे नेतृत्व करणारे आंतरराष्ट्रीय किर्तीचे प्रथितयश अर्थतज्ञ पंतप्रधान सन्माननीय श्री.मनमोहन सिंग यांचा आपण आपल्या भाषणात सुरुवातीलाच उल्लेख करुन त्यांचा गौरव केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताची अर्थव्यवस्था स्थिर राहिली आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या आर्थिक व्यवस्थापनेचे जगामध्ये कौतुक झाले.

केंद्रामध्ये आमचे सरकार असल्यामुळे सन्माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी मुंबईसाठी भरपूर दिले. मग त्या पायाभूत सुविधा असोत, मेट्रो/वाहतूक/रस्ते/पूल/केंद्रीय मार्ग निधी इत्यादी.सध्या मुंबईमध्ये सुमारे वीस हजार कोटी रुपयांची कामे सुरु आहेत. त्यामुळेच मुंबईत आमच्या पक्षाच्या सहाही जागा जिंकून घवघवीत यश प्राप्त केले आहे. तद्प्रीत्यर्थ आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांचे आम्ही शतश: आभारी आहोत.

राज्य व केंद्र सरकार या दोहोंमध्ये समन्वय आहे. राज्यातून प्रस्ताव गेला की, त्याला त्वरीत मंजूरी मिळते. त्यामुळे शहराला/ग्रामीण भागाला विकास-पैसा-समृध्दी प्राप्त होते.

आता तर या सर्व गोष्टींचा पाठपुरावा करण्यासाठी आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी महाराष्ट्रातून नऊ मंत्री दिलेले आहेत. त्यात राज्याचे तीन माजी मुख्यमंत्री सन्माननीय श्री.शरदचंद्रजी पवार, सन्माननीय श्री.सुशीलकुमारजी शिंदे, सन्माननीय श्री.विलासरावजी देशमुख लाभलेले आहेत.

गेल्या वर्षी शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली. त्याच धर्तीवर शासनाने समाजातील दबलेला .....

.. . .3 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घटक/मागासवर्गीय/दलित/आदिवासी इत्यादी कारागीर सभासदांची शासनाच्या महात्मा फुले विकास महामंडळ, रोहिदास विकास महामंडळ इत्यादी विविध मागासवर्गीय महामंडळाकडून रुपये दोन हजार ते रुपये तीस हजार रुपये पर्यंतची सुमारे 1000 कोटीची कर्जे शासनाने माफ केलेली आहेत. त्याचबरोबर आदिवासी समाजाची सुमारे रु.200 कोटीची कर्जे माफ करण्यात आलेली आहेत. याचा फायदा सुमारे 15 लक्ष कर्ज लाभार्थींना होणार आहे.

देशामध्ये या समाजासाठी जास्तीत-जास्त निधी उपलब्ध करुन देणारे त्यांच्या हितासाठी काम करणारे हे एकमेव राज्य आहे. आपल्या राज्याने आपले पुरोगामित्व सिध्द केले आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांचा वारसा जपला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

सभापती महोदया, राज्यातील चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना माजी उपपंतप्रधान कै. बाबू जगजीवनराम यांच्या प्रेरणेतून झालेली आहे. कै. रा.अ.खैरे मुंबईतून लोअर परळ या विभागातून निवडून आलेले आमदार होते. ते महाराष्ट्रातील बाबुजींचे प्रमुख कार्यकर्ते होते. चर्मोद्योग विकास महामंडळ व्हावे म्हणून त्यांनी मुंबईत आंदोलन केले. त्यावेळेचे मुख्यमंत्री दिवंगत कै. वसंतराव नाईक यांचेकडे बाबूजींनी गटई कामगारांच्या कल्याणासाठी या महामंडळाची आग्रही मागणी केली. आणि त्यांच्यामुळेच या महामंडळाची स्थापना झाली.

सभापती महोदया, महामंडळाच्या कर्जाची परतफेड करुन प्रश्न सुटणार नाहीत. महामंडळाच्या खेळत्या व बीज भागभांडवलात वाढ झाली पाहिजे. अर्थसंकल्पात या महामंडळासाठी फक्त 86 कोटी 33 लक्ष रुपये इतकी तरतूद केली आहे. ती अपुरी असून त्यात वाढ करुन किमान रुपये 500 कोटी रुपयांची तरतूद करावी असे माननीय सभापतीच्या मार्फत मी शासनाला सुचवितो.

सभापती महोदया, अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ हे आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी सुरु केले आहे. त्याचाही कर्जमाफीमध्ये समावेश करावा. अंदाजे रु 10 कोटी रुपयांची कर्ज माफी करावी लागेल. त्याचप्रमाणे अल्पसंख्याकांचे मौलाना आझाद महामंडळ यांनाही कर्ज माफीचा लाभ मिळावा असे मी सुचवितो.

सभापती महोदया, घटनेचे शिल्कार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या भारतीय लोकशाहीच्या इतिहासात माजी उपपंतप्रधान कै. बाबू जगजीवनराम यांच्या कन्या सौ. मीरा कुमार यांची 15 व्या लोकसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. त्या चर्मकार समाजातील पहिल्या दलित महिला आहेत. देशामध्ये 'महिला राज' येऊ लागले आहे. महिला वर्ग खूष आहे. दलित वर्ग खूष आहे. कै. दिवंगत राजीव गांधी यांचे स्वप्न साकार होत आहे. अशावेळी लोकसभेतही सर्व पक्षांनी पाठींबा देऊन एकमताने त्यांची निवड केलेली आहे. विधिमंडळात विविध पक्षाच्या महिला आमदारांनी नारी शक्तीचा विजय साजरा केला त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदया, महिला आरक्षण विधेयक येत्या 100 दिवसात मंजूर करुन घेण्यास केंद्र सरकारचा अग्रक्रम रहाणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

श्री. सुभाष चव्हाण....

सभापती महोदया, या राज्याचे`पहिले दलित मुख्यमंत्री म्हणून सन्माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांना मान मिळाला. त्यावेळी विरोधी पक्षाने कोणताही भेदभाव न ठेवता खालच्या सभागृहात एकमताने बहुमत सिध्द केले होते. त्यांनीही त्यावेळी राज्याचा बॅकलॉग भरण्याचा कार्यक्रम हाती घेतला व समाजिक न्यायाचा अर्थसंकल्प सादर केला होता.

सभापती महोदया, यावेळी केंद्रीय मंत्रिमंडळात जास्तीत-जास्त दलित व त्यातही समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधीत्व देऊन मागासवर्गीयांची मक्तेदारी समजणाऱ्या मायावतींना राजकीय शॉक दिला आहे.

सभापती महोदया, आपल्या शासनात श्री. जे.पी.डांगे 1973 च्या बॅचचे आय.ए.एस. अधिकारी आहेत. ते चर्मकार समाजातील दलित असून सध्या अतिरिक्त मुख्य सचिव आहेत. लोकसभेच्या विद्यमान सभापती मीरा कुमार या त्यांच्या बॅचमेट आहेत. सन 1973 ला त्यांनी लाल बहादूर शास्त्री ॲकॅडमी, मसूरी येथे आयएएस व आयएफएस याचे पहिले सहा महिने एकत्र ट्रेनिंग घेतलेले आहे.मुख्य सचिव या पदासाठी या दलित अधिकाऱ्याचे पहिले नाव असताना विद्यामान मुख्य सचिवांना सहा महिन्याची मुदत वाढ देऊन त्यांच्यावर अन्यय केलेला आहे. सन्माननीय सभापती महोदय, आपल्या मार्फत ही बाब मी शासनाच्या लक्षात आणून देत आहे.

सभापती महोदया, रोजगार हमी योजनेचे जनक कै. वि.स.पागे यांनी रोजगार हमीची पहिली संकल्पना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यकारीणीमध्ये मांडली आणि तो प्रस्ताव संमत झाला. नंतर राज्य शासनाने त्यांची अंमलबजावणी केली.

सभापती महोदया, ही योजना कै. वि.स.पागे यांनी त्यावेळी आमच्या दिवंगत नेत्या इंदिरा गांधी यांना 5/6 तास समजावून दिली.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

श्री. सुभाष चव्हाण .....

आज सन्माननीय राहुल गांधी या युवक नेत्यांनीही आत्मसात केली. स्वत: अभ्यास केला. ग्रामीण भागात दौरे केले. केंद्र सरकारच्या माध्यमातून इतर राज्यात आज ती राबविली जात आहे. या योजनेचे प्रणेते कै. वि.स.पागे यांचे त्यांच्या जन्म शताब्दीच्या निमितने शासनाने स्मरण केले आहे.

सभापती महोदया, राज्य शासनाने युध्द पातळीवर वीज निर्मितीचे काम हाती घेतले असून परळी, पारस, घाटघर, टाटा पॉवर कंपनी, ट्रॉम्बे, दाभोळ इत्यादी प्रकल्पांचे काम सुरु आहे. केंद्रात आपल्याच राज्याचे ऊर्जा मंत्री असल्याने राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा प्रकल्प (एनटीपीसी) सोलापूर व मौदा ऊर्जा प्रकल्प, नागपूर येथे सुरु झाले आहेत. दहाव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत देशात 55 हजार मेगावॅट वीज निर्माण होत होती. आता अकराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत 92 हजार मेगावॅट वीज निर्माण होणार आहे. येत्या 3 ते 4 वर्षात देश विजेबाबत स्वयंपूर्ण होईल अशी आशा आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्र शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून देशात एकमेव जिल्हा घोषित केलेला आहे. निसर्गरम्य सुदर जिल्हा, पर्यटनासाठी पर्यटक जिल्हा आहे. त्या ठिकाणी विमानतळ नाही. पर्यटकांसाठी योग्य त्या सुविधा नाहीत. म्हणून या जिल्ह्याच्या पर्यटनाच्या विकासासाठी पॅकेज घोषित करावे अशी मी सभागृहामार्फत शासनाला विनंती करुन माझे भाषण आवरते घेतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, राज्याचे माननीय वित्तमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी 4 जून, 2009 रोजी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पावर काही मुद्यांच्या बाबतीत अगदी थोडक्यात आपले विचार आपल्यापुढे ठेवण्यासाठी मी या ठिकाणी बोलत आहे. या अर्थसंकल्पामध्ये ज्या अनेक चांगल्या गोष्टी आहेत त्यांचा उल्लेख माझ्या आधीच्या वक्त्यांनी केलेला आहे. अर्थसंकल्पामध्ये जे प्रचंड प्रमाणावर आकडे आहेत त्यामध्ये 1 लाख आणि काही हजार कोटी रुपयांचे कर्ज म्हणजे किती हे माझ्यासारख्याला लिहावयास सांगितले तर तेवढे शून्य सुध्दा लिहिता येणार नाहीत अशा प्रकारची आकडेवारी आपल्यासमोर आलेली असते. अर्थसंकल्प म्हणजे या राज्याच्या शासनाची, आघाडी सरकारची एकूण धोरणे काय आहेत, त्यांची नीती काय आहे आणि त्यांना या राज्यातील सर्वसामान्य माणसांची काळजी घेताना काय काय गोष्टी करणे आवश्यक वाटते त्याचा उल्लेख अर्थसंकल्पात आढळून येतो. अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्रमांक 79 मध्ये सामुहिक प्रोत्साहन योजना यासाठी 400 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि ती योजना ज्या जिल्ह्यांचा मानवी विकास निर्देशांक कमी आहे अशा जिल्ह्यांसाठी लागू करण्यासाठी आहे. मला असे वाटते की, या राज्याच्या दृष्टीने एकूण समतोल विकासामध्ये अडसर ठरु शकेल अशा प्रकारचा हा मुद्दा आहे. हा मुद्दा अतिशय गांभीर्याने घेतला पाहिजे. मानवी विकास निर्देशांक कमी असलेले जिल्हे कोणते आहेत, तो निर्देशांक कमी असण्याची कारणे काय तसेच ज्या योजना आपण त्यासाठी आणत आहोत त्या योजनांची परिणामकारकता किती प्रमाणात आहे याची वांरवार तपासणी करुन त्या दिशेने कार्यक्रम राबविला जातो की नाही याची माहिती घेणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थसंकल्पीय भाषणातील मुद्दा क्रमांक 78 मध्ये राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि नक्षग्रस्त भागामधील विशेष कृती कार्यक्रमाच्या बाबतीत उल्लेख आहे. हे दोन्ही प्रश्न अतिशय महत्वाचे आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात अत्याधुनिक शस्त्रास्त्रे देत असताना, आधुनिक अशी वाहने किंवा त्यांना आवश्यक असलेली हवाई पाहणी करण्यासाठी साधने, त्यांची क्षमता यादृष्टीने विचार करताना जी तरतूद या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आली आहे त्यामध्ये वाढ व्हावयास हवी असे प्रामाणिकपणे वाटते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

नक्षलग्रस्त भागासाठी राबविण्यात येणा-या विशेष कृती कार्यक्रमावर वारंवार चर्चा केली जाते. त्याचा परिणाम नक्षलग्रस्त भागामध्ये होतो. अशा भागामध्ये काही एन.जी.ओ.मार्फत जी कामे चाललेली असतात त्या कामांचा यामध्ये समावेश करावा. जसे वेगवेगळया उद्योगामध्ये खाजगी क्षेत्राची पार्टनरशिप असते त्याप्रमाणे नक्षलग्रस्त भागामध्ये एन.जी.ओ.ना समाविष्ट करता येईल काय याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पातील मुद्दा क्रमांक 74 मध्ये सन 2009 ते 2011 हा कालावधी सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्र म्हणून साजरा केला जाणार आहे. त्यामुळे अनेक कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. हे अतिशय ब्रॉड आऊटलूक किंवा ऑब्जेटिव्ह असे आहेत. शेती, उद्योग, नगरविकास आणि गृहनिर्माणाबरोबरच महिला, बाल, युवक, अल्पसंख्याक, आदिवासी आणि मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या नवीन योजना आणि प्रकल्प सुरु करुन सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राचा प्रारंभ आपण करणार आहोत असे नमूद केले आहे. हा प्रारंभ करण्यासाठी या सर्व विषयांचा भाषणात उल्लेख केलेला आहे. या सगळया बाबींबरोबर काही तज्ज्ञांची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी एक निश्चित कार्यक्रम असावा व त्यासाठी होणा-या खर्चाचा अंतर्भाव या अर्थसंकल्पात व्हावा.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 73 मध्ये अहमदनगर शहरात असलेला भुईकोट किल्ल्याचा उल्लेख आहे. हा किल्ला म्हणजे हेरिटेज प्रॉपर्टी म्हणता येईल. या किल्ल्याच्या सुशोभिकरणासाठी या वर्षी 25 कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या किल्ल्यात पंडित नेहरु, सरदार पटेल, मौलाना आझाद यांचे वास्तव्य होते. डिस्कव्हरी ऑफ इंडियाचे कायमस्वरुपी प्रदर्शन मांडणी करण्यासाठी एक कार्यक्रम हाती घेतलेला आहे. मुंबईमध्ये डिस्कव्हरी ऑफ इंडियाचे प्रदर्शन अव्याहतपणे सुरु आहे. त्याप्रमाणे नेहरु सेंटरला जेवढे महत्व आहे तेवढी व्याप्ती विचारात घेऊन विज्ञानाच्या दृष्टीकोनातून त्याचा वापर झला पाहिजे. राज्याच्या तरुण पिढीला पुढे नेण्यासाठी या योजनेचे केवळ सुशोभिकरण करणे म्हणजे स्मारक होऊ शकत नाही. त्यादृष्टीने यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MAP/

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 64 मध्ये रोजगार हमी योजनेसाठी 953 कोटींची तरतूद केल्याचा उल्लेख आलेला आहे. यापूर्वी असा उल्लेख आलेला आहे की, ब-याच वेळा या योजनेचा निधी इतर कामांसाठी वळविला जातो. वि.स.पागे यांनी निर्माण केलेल्या या योजनेकडे पाहतो तेव्हा मला असे वाटते की, 953 कोटी रुपये जरुर खर्च करावेत, परंतु या योजनेतून जी रोजगार निर्मिती होती ती आता कालबाहय झाली आहे काय हे तपासून पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. आता किती दिवस गावातील लोकांना रस्त्यावरील खडी फोडण्याचे काम देणार आहोत ? त्याऐवजी त्यांना कुशल कामाचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक तालुक्यातील आयटीआयच्या धर्तीवर किंवा इतर कोणत्याही योजनेमार्फत त्यांच्यात कौशल्य निर्माण केले पाहिजे आणि ग्रामीण भागातील हा वर्ग त्या योजनेकडे वर्ग करता आला तर जरुर केला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 58 मध्ये कोल्हापूर, नागपूर व पुणे या तीन जिल्हयात नवीन अध्यासने प्रस्तावित केल्याचे नमूद केले आहे. त्यासाठी प्रत्येकी 2-2 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मला वाटते की, गेल्या 20-25 वर्षातील सगळयात महत्वाची घटना म्हणजे राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची झालेली स्थापना ही म्हटली पाहिजे. या देशात अनेक मुक्त विद्यापीठे स्थापन झाली आहेत. देशात इंदिरा गांधी राष्ट्रीय विद्यापीठानंतर यशवंतराव मुक्त विद्यापीठाचा क्रमांक लागतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये, त्याचा विचार होण्यासाठी, अभ्यास होण्यासाठी हे एक अधिकचे अध्यासन व्हावे व त्यासाठी 2 कोटींची तरतूद करावी अशी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्करोगासाठी औरंगाबादला यावर्षी 25 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. कर्करोगा बरोबरच किडनी किंवा हृदय विकारासारख्या रोगाच्या बाबतीत देखील तरतूद करण्याची आवश्यकता आहे. मुद्दा क्रमांक 50मध्ये क्रीडा व युवकसेवा संचालनालयांतर्गत 127 क्रीडा मार्गदर्शक सध्या कार्यरत असून आणखी 153 क्रीडा मार्गदर्शकांची पदे आकर्षक मानधनावर करार पध्दतीने नियुक्त करण्याचा शासनाचा मानस असून त्यासाठी तरतूद केलेली आहे. आज वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की आपल्या राज्यातील एका जलतरणपटूला राज्य शासनाकडून रक्कम मिळत नसल्यामुळे तो दुस-या राज्यात जाण्याच्या तयारीत आहे. तेव्हा या गोष्टीची देखील शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान ही केन्द्राची महत्वाकांक्षी योजना आहे. यामधील राज्य शासनाचा हिस्सा नेमून दिलेल्या कोष्टका प्रमाणे आहे. दोन व्यापारी ज्याप्रमाणे 70 टक्के तुझे आणि 30 टक्के माझे या प्रमाणे आपापसात सौदा करतात त्या प्रमाणे या योजनेमध्ये भाग नसावा. ही योजना आपल्याला अधिक सक्षमपणे राबवायची असेल तर या योजनेच्या कोष्टकाच्या पलिकडे जाऊन राज्य शासनाने आपला हिस्सा वाढविला पाहिजे. म्हणजे आजार होण्यापेक्षा मुळातच आजार होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. म्हणून सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ज्या महत्वाच्या समस्या आहेत त्याकडे शासनाने अधिक लक्ष द्यावे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. विदर्भातील सहा जिल्ह्यासाठी कृषि विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी 8 वर्षाकरिता 683 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या वर्षासाठी 25 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. 8 वर्षासाठी 683 कोटी रुपये याप्रमाणे हिशेब केला तर दरवर्षी 25 कोटीची तरतूद उपलब्ध होऊ शकेल ? यामध्ये अनेक स्त्रोतातून पैसे येणार आहेत. या प्रकल्पाला गती द्यावयाची असेल तर ही 25 कोटीची अपुरी असलेली तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, पर्यटनाच्या संदर्भात माझ्या आधीच्या वक्त्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. पर्यटन हा एक अतिशय चांगला व्यवसाय असून त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकते. या पर्यटनाच्या संदर्भात केरळ राज्याने ज्या पध्दतीचा अवलंब केला त्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य पर्यटनाचा विकास का करु शकत नाही असा माझा प्रश्न आहे. तेव्हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.हेमंत टकले...)

पर्यटनाच्या संदर्भातील तरतुदीचा फेरविचार करावा अशी माझी सूचना आहे. या राज्यातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी हे शासन काम करीत असताना मला एका नाविन्यपूर्ण उपक्रमाचा उल्लेख करावासा वाटतो. लिव्ह ॲण्ड लायसन्सवर 5 लाख सदनिका मुंबईमध्ये बांधण्याचा एक ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतलेला आहे. हा निर्णय निश्चितपणे सर्वामान्य माणसाला दिलासा देईल.

सभापती महोदय, सीमा प्रश्नासंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये तसेच माननीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये "सीमा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही बांधिल आहोत, हा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत" अशा प्रकारचा उल्लेख असतो. या सीमाप्रश्नाच्या संदर्भात एक नामवंत वकील आपली केस लढण्यासाठी देऊ असे शासनाने म्हटलेले आहे. असे म्हणणे म्हणजे रोगावर काडीने औषध लावण्यासारखे आहे. तेव्हा या सीमाप्रश्नासंबंधी प्रथम आपण आपली मानसिकता तपासून बघितली पाहिजे. कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्या सीमेच्या अलीकडे आणि पलीकडे असलेल्या लोकांचे भावनिक मिलन होण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल महाराष्ट्र टाकणार असेल तर महाराष्ट्राने ते जरुर टाकावे. या बाबतीत कर्नाटक राज्याशी संवाद सांधावा. आपापसातील दुही ही आपल्या मराठी भाषेवर आक्रमण करणारी असेल तर मराठी भाषेच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी, मराठी भाषिकांवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही यासाठी वेगळे प्रयत्न केले पाहिजे. या दोन्ही भागातील सामाजिक स्थितीचा अभ्यास करुन कर्नाटकाशी सामंजश्याची भूमिका घ्यावी, आम्ही तुमचे आणि तुम्ही आमचे, आमची आणि तुमची भाषा आपण एकमेकांनी समजावून घेऊन आपल्या दोघांचे जीवन आपण कसे अधिक चांगले करु शकू अशा पध्दतीचा विचार आपण दोन्ही राज्यांनी केला तर तो निश्चितपणे आशादायी आणि फलदायी ठरेल असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदय, आपण मला माझे विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. गिते....

अशुधीत प्रत / शोधनीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, 2009-2010 या वर्षाच्या अर्थसंकल्पावर माझे मत मांडण्यासाठी आणि अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये भारतीय सर्व धर्मियांच्या आशा-आकांक्षाचे प्रतिबिंब आहे. महाविद्यालयात शिकत असताना मला माझ्या गुरुजींनी असे सांगितले की, संस्कृतीचे मूळ शोधावयाचे असेल तर व्यक्तीच्या प्रकृतीत शोधावे लागेल. माणूस पुढे पाहू शकतो. पाठिमागचे आठवू शकतो. माणूस विचार करु शकतो. माणसामध्ये शब्दशक्तीचे बळ आहे. या शब्दशक्तीच्या बळावर भूतकाळात घडलेल्या घटना आणि भविष्यकाळामध्ये घडू पाहणा-या घटना माणूस निश्चितपणे शब्दबध्द करु शकतो. माणसाकडे हत्तीचे बळ आहे पण माणूस हत्तीच्या पाठीवर बसू शकतो. सिंहाचे ऐश्वर्य नाही, पण सिंहाला सर्कसीमध्ये खेळवू शकतो. जीवशास्त्राच्या अपेक्षेने माणूस हा प्राणी आहे. पण माणूस जीवशास्त्रज्ञ होऊ शकतो. शक्यता आणि अशक्यता या सगळयांना आपल्या कल्पना शक्तीमध्ये बसविण्याचे सामर्थ्य माणसामध्ये आहे. त्यामुळे आमच्याकडे अर्थशास्त्रज्ञ नसले तरी अर्थतज्ञ म्हणून या दोन्ही अर्थ मंत्री आणि अर्थ राज्यमंत्र्यांकडे पाहता येऊ शकेल. राज्य आणि केंद्र शासनाने संयुक्त प्रयत्नांचा परिपाक म्हणून महागाईवर नियंत्रण ठेवले. महाराष्ट्रामध्ये 16 मे अखेर चलनवाढीचा दर 0.61 एवढा होता. याचा अर्थ मागच्या वर्षाच्या चलनवाढीमध्ये आणि या वर्षाच्या चलनवाढीमध्ये बरेच अंतर आहे. चलनवाढीचा दर कमी करण्यामध्ये राज्य शासनाला यश मिळालेले आहे त्यामुळे राज्य शासनाचा मी मन:पूर्वक आभारी आहे. या अर्थसंकल्पामध्ये सिंचनाच्या अनुशेषावरती 947.76 कोटी रुपये प्रस्तावित आहेत. ही प्रस्तावित रक्कम या राज्यामधील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी कारणीभूत ठरणार आहे. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, सिंचनाचा अनुशेष दूर होणार असेल तर निश्चितपणे महाराष्ट्रातील जनतेला आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. याच बरोबर आठ विभागाचा अनुशेष दूर करण्यामध्ये राज्य शासनाला यश प्राप्त झालेले आहे. परंतु उर्वरित जे काही विभाग आहेत, या विभागाचा जो अनुशेष आहे, हाही दूर करण्याचा राज्य शासनाच्या वतीने करणे आवश्यक आहे. जसा एखादा पाहुणा घरातून जाण्यास तयार नसेल, त्या पाहुण्याला अजिर्ण होईपर्यंत खाऊ पिऊ घाला की, तो पाहुणा आपोआप घर सोडून पळाला पाहिजे. तशी राज्य शासनाला विनंती करावयाची आहे की,

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. हेमंत टकले)

प्रा.सुरेश नवले....

सिंचनाचा अनुशेष दूर करावयाचा असेल तर अतिरक्त तरतूद केल्याशिवाय, अतिरिक्त खाऊ पिऊ घातल्याशिवाय महाराष्ट्रातील अनुशेष निश्चितपणे दूर होणार नाही. महाराष्ट्रातील सिंचनाचा अनुशेष दूर करावयाचा असेल तर अतिरिक्त तरतुदीची आवश्यकता निश्चितपणे आहे. 37915 कोटी रुपयाचा राज्य शासनास निधी उपलब्ध होणार आहे आणि या निधीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील भौगोलिक,सामाजिक आणि आर्थिक विकास साधण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. गेल्या चार वर्षामध्ये 5 लाख 40 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली आहे.

यानंतर श्री. खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

आणि राज्यातील जवळपास सर्वच साईट्स आज संपुष्टात आलेल्या आहेत.. यानंतर राज्यासमोर एकच पर्याय उरलेला आहे तो म्हणजे शासनाला आता विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेऊन त्या माध्यमातून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवावी लागेल. सर्वात महत्वाचा व महत्वाकांक्षी कार्यक्रम म्हणजे शासनाला या राज्यात शेततळ्यांची क्रांती घडवून आणण्याच्या दृष्टीने देखील विचार करण्याची गरज आहे. परवाच या देशाचे माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी एक स्टेटमेंट केले त्यात त्यांनी जाहीर केले होते की, यावर्षी 25 हजार कोटी रुपये शेततळ्यांसाठी उपलब्ध करणार आहोत. एवढ्या मोठ्या प्रमाणात केंद्रशासन रक्कम देणार असेल तर त्यात राज्यशासनाने देखील भर टाकावी. जर शासनाने अशी भर घातली तर निश्चितपणे या राज्यात शेततळ्यांची क्रांती होईल आणि जास्तीत जास्त जमीन ओलिताखाली आल्याशिवाय राहणार नाही. केंद्रशासनाकडून 2257 कोटी रुपये सन 2008-09 मध्ये आपल्याला मिळाले होते. अशा प्रकारे राज्यशासनाने प्रयत्न केल्यानंतर व केंद्राकडे पाठपुरावा केला तर अशा योजनांसाठी केंद्राकडून निधी उपलब्ध होऊ शकतो. याच अनुषंगाने आपल्या शासनाने यावर्षी देखील अपेक्षा व्यक्त केली आहे की, राज्यात सिंचन योजनांसाठी 3 हजार कोटी रुपये केंद्राकडून मिळणार आहेत. अशा प्रकारे 3 हजार कोटीची रक्कम मिळणार असेल तर राज्याच्या दृष्टीने निश्चितच लाभाची गोष्ट आहे. सुदैवाने आपल्या राज्याला 720 किलोमीटरचा संपन्न असा समुद्रकिनारा लाभलेला आहे. त्या अनुषंगाने माझी अशी विनंती आहे की, या किनाऱ्यावर वारंवार आदळणाऱ्या लाटांपासून वीजनिर्मिती प्रकल्प घेता आले तर ते घ्यावेत. आज राज्यातील शेतकऱ्यांची विजेच्या बाबतीतील स्थिती पाहिली तर 1/3 विजेचे बिल हा शेतकरी भरतो आणि 2/3 विजेचे बिल शासन भरते. म्हणून माझी विनंती आहे की, राज्यातील शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी त्यांच्याकडून वसूल करण्यात येत असलेली 1/3 विजेच्या बिलाची रक्कम भरण्यापासून शेतकऱ्याला मुक्ती द्यावी व त्यांच्याकडून एकही पैसा विजेच्या बिलासाठी वसूल करु नये, अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

महोदय, अर्थसंकल्पामध्ये तीर्थक्षेत्र विकास हा कार्यक्रम देखील अंतर्भूत आहे. राज्यातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्याची आवश्यकता आहे त्यानुसार पुढील पाच वर्षाच्या कालावधीत कालबध्द कार्यक्रम आखून अशा तीर्थक्षेत्रांचा विकास होणे आवश्यक आहे. जिल्ह्या-जिल्ह्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

असलेल्या तीर्थक्षेत्रांचा विकास होण्याची मागणी नेहमी होत असते परंतु शासनाने तीर्थक्षेत्राच्या विकासाबाबत जी तीर्थक्षेत्राची व्याख्या केली त्यात जी तीर्थक्षेत्रे बसतात त्यांचा निश्चितपणे विकास करणे गरजेचे आहे. त्यानुसार पोहरादेवी हे देवस्थान म्हणजे बंजारा समाजाची काशी म्हटले तरी चालेल. राज्यातील आणि महाराष्ट्राच्या बाहेरील लाखो भाविक या देवीच्या दर्शनासाठी येत असतात. म्हणून या पोहरादेवी तीर्थक्षेत्रातील परिसराचा भौगोलिक विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचा संकल्प शासनाने सोडलेला आहे त्याबद्दल मी प्रथम शासनाचे मनापासून आभार मानतो. परंतु माझी विनंती आहे की, पोहरादेवीचा विकास केल्यानंतर खरोखरच ती भरुन पावेल आणि राज्यशासनाच्या पोहऱ्यामध्ये राज्यातील जनतेचे आशीर्वाद मिळतील. परंतु आचारसंहिता सुरु होण्यापूर्वी या सर्व योजनांची उद्घाटने करावीत, अन्यथा आचारसंहिता नावाची आणिबाणी सुरु झाली तर आपल्या पोहऱ्यातील हा विकास ही आचारसंहिता केव्हा पळवेल हे सांगता येत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, जग हिंसेने कावरे बावरे झालेले आहे. परंतु जगाला फक्त "बुध्दांचा" विचारच वाचवू शकेल असा मला ठाम विश्वास आहे. "बुधद" की, "युध्द" यामध्ये जगाला ठामपणे सांगावे लागेल की, जगाला फक्त "बुध्दांचा" विचारच वाचवू शकेल. नांदेड जिल्हयातील बावरी नगर येथे शासन बुध्द स्थळ विकसित करणार असल्यामुळे आम्हाला आनंद होत आहे. आपल्याला सर्व धर्मीयांचे प्रतिबिंब पहावयाचे असेल तर या अर्थसंकल्पाकडे पहावे लागेल. बावरी नगराचा आपण जो विकास करणार आहोत त्यासंदर्भात काहीही रक्कम शासनाने प्रस्तावित केलेली नाही. त्यामुळे या अर्थसंकल्पात "बावरी स्थळ" येथे बुध्द स्थळ वसविण्यासाठी रक्कम प्रस्तावित करावी अशी आग्रह पूर्वक मी राज्यशासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आज लाखो लोकांना घरे नाहीत. लाखो लोक उघडयावर आहेत, आकाश हेच त्यांचे घर आहे. गरिबांना घरे मिळावीत यासाठी राज्यशासनाने 2,24,323 लोकांना घरे देण्याचा संकल्प केला असून त्यासाठी 216 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात प्रस्तावित केली त्याबद्दलही मी राज्य शासनाचा आभारी आहे. मी राज्यशासनाला विनंती करणार आहे की, या योजनेमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार आहे. जसे वन खात्यात पहिल्या वर्षी झाडे लावली जातात पुन्हा दुस-यावर्षी त्याच ठिकाणी झाडे लावली जातात परंतु 3-4 वर्षानंतर आढावा घेतला तर 3-4 वर्षापूर्वी लावलेले एकही झाड आढळून येत नाही तशा प्रकारे ग्रामीण भागात अनेक गावात अनेक ठिकाणी घरकुले दिली जातात. परंतु कागदावर शेतक-यांना हप्ते दिले जातात व प्रत्यक्षात गरीब लोकांना घरेच उपलब्ध करुन दिली जात नाहीत. ज्यांच्यासाठी घरांची योजना आहे त्यांना ती घरे दिली जात नाही यामध्ये जो भ्रष्टाचार आहे हा दूर करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने कापसाची योजना सुरु ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे गेल्यावर्षी 2800 ते 3000 रुपये क्विंटल भाव शेतक-याच्या कापसाला मिळला त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी सक्षम होण्याच्या दृष्टीने अप्रत्यक्ष रितीने का होईना हे शासन शेतक-यांच्या पाठीमागे उभे आहे असे शेतक-याला वाटले. या धोरणामुळे शेतक-यांना निश्चितपणे फायदा झालेला आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, श्वान दंश आणि सर्प दंशाची लस मागच्यावर्षापर्यंत दारिद्रय रेषेखालील लोकांनाच उपलब्ध करुन दिली जात होती परंतु या वर्षी मात्र सर्वसामान्य जनतेला सर्प दंश आणि श्वान दंशाची लस शासनाने मोफत उपलब्ध करुन दिलेली आहे. सर्वसामान्य जनतेला ही लस उपलब्ध करुन देण्याचा संकल्प राज्यशासनाने केल्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, तालुका, जिल्हा आणि विभागीय क्रीडासंकुलासाठी 1 कोटी, 8 कोटी आणि 24 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात उपलब्ध करुन दिलेली आहे. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये खेळाचे आकर्षण वाढले पाहिजे. क्रिकेट शिवाय इतरही खेळ असतात हे तरुणांच्या मनावर रुजवले पाहिजे यासाठी राज्यशासनाच्या वतीने नवीन क्रीडा धोरण आखण्याची आवश्यकता आहे. 50 विद्यार्थ्यांच्या पाठीमागे एक क्रीडा शिक्षक असेल तरच महाराष्ट्रातील तरुणांना खेळाचे कौशल्य मिळू शकेल. नाही तर

"कोण पुसे अशक्ताला रोगी बरा दिसे,
कळा नाही कांती नाही
युक्ती बुध्दी दुरावली"

अशा प्रकारची स्थिती महाराष्ट्रातील तरुणांमध्ये खेळाअभावी आढळेल. टपरीवर गुटखे,पान, तबांखू खावून खावून हे तरुण देशोधडीला लागण्याची वेळ आलेली आहे. या तरुणांना वाचवायचे असेल तर आपल्याला क्रीडा धोरण आखल्याशिवाय पर्याय नाही. अशा प्रकारचे क्रीडा धोरण राबविले तर महाराष्ट्रातील तरुण मुले ऑलंपीक आणि आशियाई खेळामध्ये सुवर्णपदक मिळवू शकतील म्हणून या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने क्रीडा धोरण आखण्याची गरज आहे अशी विनंती मी आपल्या मार्फत राज्य शासनाला करणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये मुस्लीम, ख्रिश्चन, बौध्द, शीख, पारशी, जैन इत्यादी धर्मियांच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबद्दल मीशासनाला धन्यवाद देतो. साामाजिक उत्थानाची दिंडी घेऊन आपल्याला पुढे जावयाचे असल्यामुळे महाराष्ट्रातील सर्व धार्मियांचा विचार करणे आवश्यक असून तो पवित्र विचार राज्य शासनाच्या मनात असल्याने व तो प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे..

सभापती महोदय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील आणि महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने अध्यासने सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला असून हा निर्णय अत्यत स्तूत्य आहे. भविष्यकाळातील पिढीला महाराष्ट्राचे जे शिल्पकार आहेत आणि महाराष्ट्राच्या जडण घडणीतील जे थोर व्यक्तिमत्व आहे त्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास निश्चितपणे करता येऊ शकेल.

सभापती महोदय, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकाचे काम या वर्षी राज्य शासनाच्या वतीने पूर्ण करण्यात येणार आहे त्याबद्दल मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो.महात्मा फुले यांनी आपले आयुष्य चंदनाप्रमाणे झिजवले असून त्यांच्या स्मारकाचे काम या वर्षी पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या वतीने प्रयत्न केले जात असून ते प्रयत्न अत्यंत स्तूत्य आहे.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्यासाठी या वर्षी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. श्रीमंत योगी, हिंदवी स्वराज्याची उभारणी करणारे छत्रपती शिवाजी महाराज असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने राजकारण करणारे महाराष्ट्रातील धर्मवादी लोक एका बाजूला आहेत आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श लोकासमोर उभा राहिला पाहिजे म्हणून त्यांचे स्मारक उभे करणारे राज्य शासन दुस-या बाजूला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात येणार असून जगाला हेवा वाटेल असे स्मारक राज्य शासन उभे करणार असल्यामुळे राज्य शासनाला मी मनापासून धन्यवाद देतो.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय अहमदनगर येथील किल्ल्यामध्ये पंडित जवाहरलाल नेहरु यांनी "डिसकव्हरी ऑफ इंडिया "हे पुस्तक लिहिले होते आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे मोठेपण त्यांनी मान्य केले होते . पूर्वीचे सर्व देशभक्त मनाचे मोठे होते. देशासाठी त्यांनी तुरुंगवास भोगला होता. पंडित जवाहरलाल नेहरु हे चांगले अभ्यासक आणि देशाचे पहिले पंतप्रधान होते. त्यांचे व्यक्तिमत्व अभ्यासू होते.

(सभापती स्थानी माननीय उपसभापती)

अहमदनगर येथील किल्ला पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील राहणार असल्यामुळे मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय,राज्यामध्ये काही भाग आदिवासी असून त्या भागात आदिवासी समाजाचे लोक राहतात. आदिवासीचे 200 कोटी रुपयांचे खावटी कर्ज माफ करण्याचा निर्णय शासनाने घ्ेतला असून राज्याच्या लौकिकात भर टाकणारा हा निर्णय असल्यामुळे मी शासनाला धन्यवाद देतो. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी विचाराने वाटचाल करणारे राज्य असून पुरोगामी वाटचालीला आदिवासी भागातील लोकांचा आशीर्वाद निश्चितपणे मिळणार आहे. या निर्णयामुळे 10 लाख 3 हजार 662 आदिवासी व्यक्तिना फायदा होणार आहे.

सभापती महोदय, केन्द्र शासनाने शेतक-यांचे 71 हजार कोटी रुपयाचे कर्ज माफ केले असून राज्य शासनाने शेतक-यांचे 6 हजार 208 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते त्या नतर आदिवासी लोकांवरील 200 कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज माफ केलेले आहे त्याबद्दल पुरोगामी राज्य शासनाला मी मनापासून धन्यवाद देतो आणि या सरकारने शेकडो साल सत्तेवर रहावे अशी सदिच्छा व्यक्त करतो. राज्य शासनाची अशाच प्रकारे चांगली वाटचाल चालू असल्यामुळे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना निवडणुकी नंतर या सभागृहात येण्याची इच्छा देखील राहणार नाही. असा कौल दिल्याशिवाय जनता राहणार नाही. तो कौल जनतेने द्यावा अशी आशा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो. जयहिद. जय महाराष्ट्र.

नंतर श्रीमती रणदिवे

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सदनामध्ये सादर करण्यात आलेल्या 2009-2010 या वर्षाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एक महत्वाकांक्षी अर्थसंकल्प, सामाजिक न्याय मिळवून देणारा अर्थसंकल्प, या पुरोगामी राज्याला, देशाला शोभेल अशा पध्दतीचा असा हा अर्थसंकल्प आहे. अशा प्रकारे एवढा चांगला अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी राज्य शासनाचे, माननीय वित्त मंत्र्यांचे आणि माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे आजच्या प्रसंगी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, राज्याची वार्षिक योजना 26 हजार कोटींची असून, याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. परंतु अजून नियोजन मंडळाने मान्यता दिलेली नाही. आपल्याला नियोजन मंडळाकडून मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. या देशातील सर्वात मोठी वार्षिक योजना ही महाराष्ट्र राज्याची असणार आहे. या राज्याच्या निमिर्तीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 11,915 कोटी रुपयांचा एकूण विशेष कार्यक्रम जाहीर केला आहे. या वर्षात विविध विभागांच्या विकास कामांसाठी एकूण 37,915 कोटी रुपये देत आहोत. परंतु मी माननीय वित्त मंत्र्यांना या चर्चेच्या निमित्ताने विचारु इच्छितो की, आपण हा निधी कसा उपलब्ध करणार आहोत? माननीय वित्त मंत्र्यांनी 11,915 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील माहिती सदनाला आणि राज्याला द्यावी. मघाशीच सुरुवातीला असे म्हटलेले आहे की, मी राज्य शासनाचे आणि माननीय वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्याचे कारणे अशी आहेत की, आदिवासी विभागाला 2000 कोटी, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष जवळपास संपविण्यासाठी केलेला प्रयत्न, जल सिंचनासाठी 8,170 कोटी रुपये, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी 2004-2005 ते 2008-2009 या पाच वर्षाच्या कालावधीत एकूण 22,368 कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला. त्यामुळे गेल्या चार वर्षामध्ये 5 लाख 40 हजार हेक्टर इतके सिंचनाचे क्षेत्र वाढलेले आहे.गोसीखूर्द या राष्ट्रीय प्रकल्पाच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथील कार्यक्रमासाठी आपण गेलो होतो. त्यावेळी माननीय वन मंत्री देखील सोबत होते. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाचे 90 टक्के अर्थसहाय्य असून त्या माध्यमातून 2 लाख 50 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, असा हा अत्यंत महत्वाचा प्रकल्प केंद्र शासनाच्या मदतीने सुरु केलेला आहे. तसेच केंद्र शासनाच्या वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडून सहाय्य प्राप्त झालले आहे. सन 2009-2010 या ...

. . . .3 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी . . . .

वर्षामध्ये देखील केंद्र शासनाकडून या योजनेखाली ए.आय.बी.पी.च्या माध्यमातून 2,300 कोटी रुपयांचे सहाय्य मिळणे अपेक्षित आहे. तसेच ए.आय.बी.पी.च्या माध्यमातून राज्यातील विजेची समस्या सोडविण्यासाठी वीजनिर्मिती, वितरण व पारेषण या तीनही क्षेत्रात आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी 1,945 कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन घेतला आहे,अशा अनेक गोष्टी सांगता येतील. सरपंचाच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय देखील शासनाने घेतलेला आहे. ग्रामपंचायतीतील महिला सरपंच, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमधील महिला सदस्यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने शासकीय कामासाठी मोफत प्रवास करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जीवनदायी आरोग्य योजनेच्या बाबतीत सांगावयाचे तर या योजनेसाठी 2008-2009 मध्ये 23 कोटी रुपये इतका खर्च झाला आहे. आता सन 2009-2010 मध्ये या योजनेसाठी 45 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला आहे. आमची शासनाकडे मागणी आहे की, हा निधी 100 कोटी रुपयांपर्यंत केला पाहिजे. आज अशी स्थिती आहे की, "भाकरी स्वस्त आहे पण औषधे महाग आहेत". जर एखाद्या व्यक्तीला दोन-तीन दिवसांसाठी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागले तर कमीतकमी 10 ते 15 हजार रुपयांचे बिल येते. त्यामुळे जीवनदायी योजनेच्या बाबती शासनाने पुनर्विचार करावा अशी माझी विनंती आहे. "गरीब दर्द को नहीं मिटा सकता, लेकिन दर्द गरीब को मिटा देता है" अशी स्थिती आहे. तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी देखील शासनाने विविध योजना जाहीर केल्या आहेत. तसेच या विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी सन 2008-2009 या वर्षापासून शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचे उत्तम काम केले आहे. तसेच गरीब आदिवासींचे खावटी कर्ज माफ करण्यात आले आहे. आमच्या जळगाव जिल्हयात माननीय मंत्री महोदय तीन ते चार वेळा आले आहेत. त्या भागामध्ये मोठया प्रमाणात आदिवासींची वस्ती आहे. माझी माननीय सामाजिक न्यायमंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांना विनंती आहे की, त्यांनी या भागामध्ये यावे. गरीब आदिवासींचे खावटी कर्ज योजनेअंतर्गत 184 कोटी 41 लक्ष रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले आहे, ही सामाजिक न्यायाच्या दृष्टीने एक चांगले चिन्ह आहे.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. अरुण गुजराथी...

घरेलू कामगारांच्या संदर्भातील राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना, सामाजिक न्याय विभागा अंतर्गत असलेल्या महामंडळाने दिलेले कर्ज माफ. शासनाने आतापर्यंत शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले होते. आताझोपडीत राहणाऱ्या गरीब माणसांचे कर्ज माफ केले आहे. इतर राज्याने आपले अनुकरण करावे, यापध्दतीने 1100 कोटी रुपयांचे विविध महामंडळाचे कर्ज माफ करण्याचा शासनाने निर्णय घेतला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. व्हॅटच्या संदर्भात परतावा देण्यासाठी सुलभ परतावा योजना आणली. व्यवसाय कराची मर्यादा 2500 रुपयापासून 5000 रुपयांपर्यंत वाढविली. या विधानभवनात काम करणाऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याला देखील व्यवसाय कर द्यावा लागत होता. त्याबाबतीत राज्य शासनाने एक चांगला निर्णय घेतला आहे. हॉटेल मालकांना दिलासा दिला आहे. गॅस शेगडीवर कर कपात, प्लॅस्टिक चटईवर कर कपात, कुटीरोद्योग, अगरबत्ती, नकली दागिने यावरील कर माफ करण्यात आला आहे. मंगळसूत्रावर 100 टक्के कर माफ करावा, अशी आमची विनंती आहे.त्यासंदर्भात 3000,4000, 5000 अशी काही तरी रक्कम नमूद करण्यात यावी. तंबाखू, सिगारेट, दारु वगैरेच्या संदर्भात कर वाढविण्यात आला आहे. त्यासंदर्भात आमची तक्रार नाही.

सभापती महोदय, मंदीची चाहूल या अर्थसंकल्पात दिसते. या अर्थसंकल्पाचे मूल्यमापन करीत असताना जागतिक मंदीच्या पाश्वभूमिवर याचे मूल्यमापन व्हावयास पाहिजे. सन 2007-2008 या वर्षामध्ये रुपये 4,16,248 कोटी हे मागच्या सन 2006-2007 पेक्षा 9 टक्के जास्त लाभ झाला, तर चालू किंमतीनुसार 16 टक्के वाढ निश्चितपणे दिसून येते. मंदीच्या काळात देखील महाराष्ट्र मागे नाही असे चित्र या आकडयांवरुन दिसते. राज्याचे उत्पन्न दरडोई रुपये 47000 इतके झालेले आहे. ते 2006-2007 मध्ये रुपये 41141 इतके होते. पण महसुली जमेचा विचार केला तर 2008-2009 या वर्षी अपेक्षित जी रक्कम दिलेली आहे ती 79911 काटी रुपये इतकी आहे. ती 2007-2008 पेक्षा फक्त 50 कोटी रुपये जास्त आहे. मी माननीय वित्त राज्य राज्यांना विनंती करीन की, महसुली जमा वाढविण्याच्या संदर्भातील एक जाणीवपूर्वक प्रयत्न शासनाच्या माध्यमातून झाला पाहिजे. थकित कर्जाच्या संदर्भात विरोधी पक्ष सातत्याने टिका करते. 1,58,520 कोटी रुपये या राज्यावर कर्ज आहे. थकित शब्द मला तितकासा बरा वाटत नाही. थकित याचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी.....

अर्थ अरिअर्स असलेला. पण सर्वच ठिकाणी या शब्दाचा वापर झालेला आहे. विरोधी पक्षाचा यावर टिका करण्यचा रोख आहे. आपल्या महाराष्ट्राची थकित कर्जाच्या स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी 25.8 टक्के इतकी आहे. थकित कर्जाच्या संदर्भात इतर राज्याची काय परिस्थिती आहे ते पाहू. गुजराथ हे प्रगत राज्य आहे असे म्हटले जाते. महाराष्ट्राचा गुजरात बनवू अशा प्रकारचे लोकसभेच्या निवडणुकीत एक वेगळेच राजकारण आणले गेले. गुजरातची थकित कर्जाच्या स्तूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी 30.4 टक्के इतकी आहे. महाराष्ट्राची 28.8 टक्के आणि आता ती 25.8 टक्के इतकी होणार आहे. माननीय मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, ही टक्केवारी 20 टक्क्याच्या आत आणण्याचा प्रयत्न करु या. देशातील पहिल्या क्रमांकाचे हे राज्य आहे.उत्तर प्रदेश 48 टक्के, बिहार 46 टक्के, राजस्थान 44 टक्के, पश्चिम बंगाल 41 टक्के, पंजाब 39 टक्के, केरळ 39 टक्के, मध्यप्रदेश 38 टक्के, आंध्रप्रदेश 35 टक्के पण आपल्यापेक्षा दोन राज्यांची टक्केवारी कमी आहे. कर्नाटकची 26.6 टक्के आणि तामिळनाडू 23.9 टक्के इतकी आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

म्हणून मी विनंती करीत होतो की, ते 20 टक्क्याच्या आत आणण्याचा प्रयत्न आपल्या माध्यमातून झाला तर आपल्याला प्रगतीच्या संदर्भात, विकासाच्या संदर्भात फार चांगल्या पध्दतीने काम करता येईल.

सभापती महोदय, रस्त्याच्या बाबतीत मार्च, 2008 अखेर 2.36 लाख किलोमीटरचे रस्ते आहेत. महाराष्ट्र विमानतळ कंपनी इन्फ्रॉस्ट्रक्चर बाबत उल्लेख करण्यात आला आहे. इन्फ्रॉस्ट्रक्चर हा शब्द फार लोकप्रियतेने वापरला जातो. विमानाच्या इन्फ्रॉस्ट्रक्चरच्या संदर्भात देखील शासनाने चांगला निर्णय घेतलेला आहे. कारखान्याचा सरासरी रोजगार 2006 ला 12.8 लाख होता तो 2007 मध्ये 13.8 लाख झालेला आहे. म्हणजे फक्त 1 लाखाने वाढलेला आहे. रोजगार वाढण्याच्या संदर्भातील प्रयत्नाला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न केला पाहिजे. रोजगाराच्या दृष्टीकोनातून मी काही आकडेवारी देऊ इच्छितो. सन 2004-05 मध्ये 4.3 कोटी रोजगार होता तो कमी होऊन 2007-08 मध्ये 4.1 कोटी झाला. मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, रोजगार कमी होत आहे. उद्योगात गुंतवणूक वाढत आहे पण रोजगार कमी होत आहे हे चित्र विलोभनीय आहे असे मला वाटत नाही. दारिद्र्याच्या संदर्भात एक मुद्दा आहे. दारिद्र्याच्या संदर्भात देशाची टक्केवारी 27.5 टक्के आहे आणि आपल्या राज्याची टक्केवारी 30 टक्के आहे. म्हणजे दारिद्र्याच्या संदर्भात सरासरीपेक्षा ही टक्केवारी जास्त आहे. ही टक्केवारी कमी करण्याच्या संदर्भात आपण प्रयत्न केला पाहिजे. याबाबतीत आपला खालून तिसरा क्रमांक आहे. आपले सरकार असल्यामुळे मुक्तपणे विचार मांडले पाहिजेत. आपल्या राज्याचा दारिद्र्याच्या संदर्भात खालून तिसरा क्रमांक येत असेल तर मी माननीय राज्यमंत्री श्री. देशमुख साहेबांना विनंती करीन की, आपण या दृष्टीकोनातून प्रयत्न केला पाहिजे. याबाबतीत पहिला क्रमांक उत्तर प्रदेशचा आहे. त्या राज्यात दारिद्र्याची टक्केवारी 59 टक्के आहे. बिहारची टक्केवारी 369 टक्के आहे आणि महाराष्ट्राची टक्केवारी 317 टक्के आहे. बाकीच्या सर्वांची टक्केवारी कमी आहे. कर्नाटकची टक्केवारी 138 टक्के आहे. मध्य प्रदेशची टक्केवारी 259 टक्के आहे. राजस्थानची टक्केवारी 134 टक्के आहे. जी राज्ये आपल्या पेक्षाही कमी वेगाने आणि कमी गतीने काम करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

आहे त्या राज्याची देखील दारिद्र्यरेषेखालची टक्केवारी आपल्यापेक्षा कमी आहे. मी आपल्याला विनंती करीन की, दारिद्र्य निर्मुलनाच्या संदर्भात आणि दारिद्र्य रेषेच्या खाली असणाऱ्या लोकसंख्येच्या संदर्भात वेगळी योजना राज्य शासनाच्या माध्यमातून आपण तयार केली पाहिजे. आपल्या राज्याच्या दृष्टीकोनातून त्यांची अत्यंत गरज आहे.

सभापती महोदय, राज्य उत्पादनाची क्षेत्रवार विभागणी पृष्ठ क्रमांक 21 वर दिलेली आहे. यामध्ये कृषीची टक्केवारी 17 टक्के होती ती 2008 मध्ये 15 टक्के झाली आहे. उद्योग क्षेत्राची टक्केवारी 27 टक्क्यावरुन 25 टक्क्यावर आलेली आहे. सेवा क्षेत्रात मात्र टक्केवारी 55 टक्क्यावरुन 59 टक्क्यावर गेलेली आहे. 2 टक्क्याने उद्योग क्षेत्र मागे गेले. 2 टक्क्याने कृषी क्षेत्र मागे गेले आणि 4 टक्क्याने सेवा क्षेत्र पुढे गेले. सर्वच ठिकाणी सेवा क्षेत्राचा वाटा वाढत आहे. परंतु आपल्याकडे कृषी आणि उद्योगाचा वाटा कमी होणार नाही यासंदर्भात लक्ष घातले पाहिजे. मी आपल्याला योजनांतर्गत खर्च आणि योजनेतर खर्च याबाबत सांगू इच्छितो. सन 2002-03 मध्ये योजनांतर्गत खर्च 8.4 टक्के होता. सन 2008-09 मध्ये तो खर्च 26.4 टक्के झालेला आहे. योजनांतर्गत खर्चाची टक्केवारी वाढली ही समाधानाची बाब आहे. योजनेतर खर्च 2002-03 मध्ये 91 टक्के होता तो 73 टक्क्यावर आलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तकाच्या पृष्ठ क्रमांक 57 वर असे म्हटले आहे की, योजनेंतर्गत खर्च 5192 कोटी आणि योजनेतर खर्च 40 हजार कोटी रुपये आहे. पहिल्या 9 महिन्यामध्ये योजनांतर्गत झालेल्या खर्चाचे प्रमाण केवळ 11 टक्के आहे. योजनेतर खर्च 89 टक्के आहे. मग उत्पादन खर्च कसा वाढेल ? प्लॅन एक्सपेंडिचर कसा वाढेल, भांडवली खर्च कसा वाढेल यासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात पहिल्या क्रमांकावर नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. मागील वर्षाच्या अर्थसंकल्पावर बोलत असताना मी असे म्हणालो होतो की, राज्यामध्ये पेन्शनवर फार मोठा खर्च होत आहे. वेतनावर खर्च होणे मी समजू शकतो, कारण ते काम करतात आणि वेतन घेतात. मी असे म्हणणार नाही की, त्यांना पेन्शन देऊ नये, कारण ते एक सामाजिक संरक्षण आहे. परंतु त्याची टक्केवारी यापूर्वी कमी होती. 2003-04 मध्ये वेतन, मजुरी व पेन्शनची टक्केवारी 56 टक्के होती. सन 2007-08 चा अंदाज 35 टक्के इतका होता. परंतु पुन्हा हा खर्च 48 टक्क्यांवर आला आहे. त्याचे कारण काय आहे ते आम्हाला सांगावे. राज्याला द्याव्या लागणा-या व्याजाची आकडेवारी मी सांगतो. सन 2003-04 मध्ये 28 टक्के व्याज द्यावे लागत होते, 2007-08 मध्ये ते 15.4 टक्के झाले आणि 2008-09 मध्ये 16.2 इतके झालेले आहे. व्याजाचा हा बोजा कमी कसा करता येईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाची भांडवल निर्मिती वाढविली पाहिजे असे मघाशी सांगितले होते. अलिकडच्या काळात महसुली खर्च वाढत आहे आणि भांडवली खर्च कमी होत आहे. भांडवली खर्च कमी करुन तो निधी महसुली खर्चासाठी वापरला पाहिजे यासंदर्भात शासनाने लक्ष घालावे. राज्य शासनाची भांडवल निर्मिती 2002-03 मध्ये 6206 कोटी इतकी होती, 2004-05 मध्ये 13 हजार कोटी झाली. मग ती कमी का झाली आहे ? माझ्या दृष्टीकोनातून ते वर्ष असाधारण होते. पण 2005-06 मध्ये 7895 कोटी, 2006-07 मध्ये 7630 कोटी आणि 2007-08 मध्ये पुन्हा कमी होऊन ती 7618 कोटी इतकी झाली आहे. माझी विनंती आहे की, भांडवल निर्मितीकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. मागील वर्षापेक्षा स्थूल उत्पन्नाची टक्केवारी 1.7 पासून 1.5 पर्यंत खाली आली आहे. मघाशी सांगितल्याप्रमाणे कर्ज घेण्यास हरकत नाही, पण त्या कर्जाचा उपयोग उत्पादक बाबीवर होणे आवश्यक आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी....

सभापती महोदय, आर्थिक पाहणीबरोबर वित्तविषयक विवरण नावाचे हिरव्या रंगाचे पुस्तक दिले जाते ते अत्यंत महत्वाचे पुस्तक आहे. त्यामध्ये वित्तीय तूट कशी आहे ते नमूद केलेले आहे. गेल्या 3-4 वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याने तुटीचा अर्थसंकल्प सादर केला नव्हता. पण यावर्षी मात्र तुटीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. ही तूट फार मोठी आहे. 2009-10 मधील अर्थसंकल्पीय स्थितीत 1369 कोटीची तूट दाखविली आहे. महसुली जमा 8710 कोटी इतकी दाखविली आहे. महसुली जमा 89173 कोटी आहे, म्हणजे महसुली तूट 8462 कोटी आहे. भांडवली जमा 1 लाख 20 हजार कोटी इतकी आहे. भांडवली खर्च 1 लाख 11 हजार कोटी आहे, भांडवली शिल्लक 8714 कोटी आहे ती शासन महसुलामध्ये वर्ग करीत आहे. एकूण 1369 कोटी इतकी तूट आहे. परंतु याठिकाणी 8462 कोटी दाखविली आहे, यासंबंधी उत्तराच्या भाषणातून निवेदन व्हावे अशी विनंती करतो. मंत्रिमहोदयांच्या माहितीसाठी रुपया येतो कसा आणि जातो कसा हे सांगतो. राज्य शासनाच्या उत्पन्नातून 52 पैसे येतात आणि बाहेरुन 48 पैसे येतात.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...)

हा एक रुपया जातो कोठे ? तर या 100 रुपयात फक्त 15.33 टक्के इतका भांडवली खर्च होतो. हा भांडवली खर्च वाढवावा अशी माझी सातत्याने मागणी असते. त्या बाबतीतील हे एक उदाहरण आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी वेळ मिळाला नाही. त्यामध्ये रोजगार हमी योजनेचा एक मुद्दा मांडलेला आहे. रोजगार हमी योजना ही गरीब शेतक-यांच्या शेतावर राबवावी. माननीय श्री. शरदचंद्र पवार यांनी फलोद्यानाचा एक चांगला निर्णय घेतला होता. शेती तुमची, उत्पन्न तुमचे, मजुरी आमची अशा पध्दतीने निर्णय घेतला. रोजगार हमी योजनेवरचा खर्च हा अनुत्पादक खर्च नसून तो उत्पादक खर्च आहे असे समजून ही योजना राबवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, मुंबईसाठी मोनोरेल, मेट्रोरेल, उड्डाण पूल, ब्रिमस्टोवॅड, 5 लाख सदनिका हे प्रकल्प झाले पाहिजेत. या प्रकल्पांसाठी केन्द्राकडून जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सुदैवाने केन्द्रामध्ये 9 मंत्री आहेत. 70-75 हजार कोटी रुपये आपण सेंट्रल एक्साईज आणि इन्कम टॅक्सच्या माध्यमातून केन्द्राला देतो. महाराष्ट्रासाठी केन्द्राकडून जास्तीत जास्त रक्कम कशी ओढता येईल याचा प्रयत्न शासनाने करावा. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणासाठी वैधानिक विकास महामंडळाची मागणी केली. खानदेशासाठी वेगळे वैधानिक विकास महामंडळ द्यावे अशी आमची देखील अनेक वर्षापासूनची मागणी आहे. या सभागृहामध्ये खानदेशचे जे जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांनी खानदेशासाठी वेगळे वैधानिक विकास महामंडळ करण्याच्या संदर्भातील निर्णय शासनाने त्वरेने करण्यासंबंधी शासनाकडे आग्रह धरावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या अतिरिक्त अर्थसंल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

शासनाने विकासात्मक आणि लोकाभिमुख अशा प्रकारचा अर्थसंकल्प मांडल्या बद्दल मी शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. सर्व सामान्य लोकांना बरोबर घेऊन जाणारे आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा देणारे हे सरकार आहे अशा प्रकारचे चित्र या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून निर्माण केलेले आहे. शासन जेव्हा आपल्या एवढया जबाबदा-या पार पाडते त्यावेळी सहाजिकच लोकांच्या शासनाकडून अपेक्षा वाढतात. केन्द्र सरकारने देखील 71 हजार कोटी रुपयाचे कर्ज माफ केले. आमच्या सरकारने देखील 6208 कोटी रुपयाचे कर्ज माफ केले. त्याची फलश्रृती अशी झाली की या देशाच्या सर्वोच्च सभागृहामध्ये युपीअे सरकार स्थानापन्न झाले. आपण जेव्हा समाजाच्या तळागाळातील सर्व लोकांना बरोबर घेऊन जाण्याचा संकल्प करतो त्यावेळी ख-या अर्थाने विरोधी पक्षाने देखील या सभागृहामध्ये या चर्चेच्या वेळी उपस्थित राहून आपले कौतुक करायला पाहिजे होते. पण दुर्दैवाने या अर्थसंकल्पांच्या संदर्भात त्यांना सरकारच्या विरुध्द बोलण्यासारखे काही मुद्देच नाही म्हणून त्यांनी सभागृहातून बहिर्गमन करुन या चर्चेवर बहिष्कार टाकला. हे लोकाभिमुख आणि रयतेचे राज्य आहे हे विरोधकांच्या या कृतीतून सिध्द झालेले आहे असे मला वाटते. सिंचनाचा अनुशेष भरुन काढताना खानदेश आणि विदर्भातील कामे केल्याचा उल्लेख अर्थसंकल्पीय भाषणामध्ये आहे. सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचे काम केले हे मान्य. खानदेशमध्ये तापी खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून अनेक बॅरेजेस झाली . तापीचे पाणी अडविण्याचा प्रयत्न आपण करीत होतो. परंतु तापीचा एक थेंबही पाणी न अडविल्यामुळे दुर्दैवाने गुजराथला पाणी गेले आणि गुजराथ समृध्द झाला. तापी नदीवर प्रकाशा, सारंगखेडा, सुरवाडे असे बॅरेजेस आहेत. परंतु तापीचे पाणी सामान्य शेतक-याच्या शेतापर्यन्त पोहोचू शकत नाही. तापी नदीच्या पात्रामध्ये पाणी दिसते परंतु ते शेतीपर्यन्त पोहोचत नाही. जे थकीत शेतकरी होते त्याचे 71 हजार कोटीचे कर्ज तुम्ही सुरुवातीला माफ केले.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.चंद्रकांत सूर्यवंशी.....

सभापती महोदय, जे प्रामाणिक शेतकरी होते त्यांना कर्जमाफीचा फायदा मिळाला नव्हता. परंतु जो शेतकरी प्रामाणिक होता, त्याने कर्जाची परतफेड वेळेवर केली आहे, अशा शेतक-यांना सुध्दा 20 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले. ही मर्यादा 25 हजार रुपयांपर्यंतची राहिली असती तर खानदेशामध्ये सहकाराच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सर्व उपसा सिंचन योजनेचे कर्ज सुध्दा माफ झाले असते. परंतु 20 हजार रुपयांपर्यंतची मर्यादा होती, म्हणून उपसा सिंचन योजनेच्या अनुषंगाने ज्या शेतक-यांकडे कर्ज थकीत आहे त्यांचे कर्ज माफ होऊ शकलेले नाही. या ठिकाणी सांगितले जाते की, 6208 कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले. खरे म्हणजे यात सुध्दा 1 हजार कोटी रुपये शासनाकडे उरलेले आहेत अशी माझी खात्री आहे. माझी माहिती जर चुकीची नसेल तर माननीय वित्त राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, शेतक-यांच्या सहभागातून उपसा सिंचन योजना निर्माण केल्या होत्या. शेतक-यांकडे उपसा सिंचन योजनेचे कर्ज कोणत्याही परिस्थितीत माफ करण्याचा धोरणात्मक निर्णय घ्यावा. या संदर्भात मंत्रिमडळाच्या बैठकीत निर्णय झालेला आह. मंत्रिमंडळाने या गोष्टीस मान्यता देखील दिलेली आहे. परंतु मंत्रिमंडळात घेण्यात आलेल्या निर्णयाची अद्यापपर्यंत अंमलबजावणी आतापर्यंत झालेली नाही हे आमचे सर्वांचे दुर्दैव आहे. सहकाराच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सर्व उपसा सिंचन योजनांचे कर्ज माफ करावे अशी मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना आपल्या माध्यमातून विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी खानदेशा बाबतची जी व्यथा सांगितली ती सत्य आहे. आम्ही उर्वरित वैधानिक विकास महामंडळामध्ये आहोत. ज्या प्रमाणे कोकण विभागाची स्थिती आहे, तशीच स्थिती खानदेशाची आहे. खानदेश भाग हा पश्चिम महाराष्ट्रात येत नाही. विदर्भात येत नाही. मराठवाडयात येत नाही. खानदेश हा कायम दुर्लक्षित असलेला भाग आहे. सर्व राजकीय लोक एकत्र आलो म्हणून खानदेश पॅकेजच्या माध्यमातून आम्हाला काही तरी मिळाले. पुन्हा सर्व राजकीय लोकांनी येऊन खानदेश पॅकेजची पुन्हा शासनाकडे करावी लागेल. खानदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ निर्माण करावे म्हणून एकमताने ठराव करुन केंद्र शासनाकडे पाठविला आहे. महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील सुध्दा खानदेशातील आहेत. त्यांच्या माध्यमातून खानदेशासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ निर्माण करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

करावेत अशी माझी राज्य शासनास विनंती आहे. मला या ठिकाणी एका गोष्टीसाठी शासनाचे मन:पूर्वक आभार मानले पाहिजे की, "मनमाड-मालेगांव-धुळे-इंदोर" रेल्वे मार्गाची अनेक दिवसापासूनची आमच्या विभागातील जनतेची मागणी होती. ती मागणी पूर्ण होऊन या रेल्वेमार्गाच्या कामासाठी या अर्थसंकल्पात राज्य शासनाने तरतूद ठेवली आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणे लोकप्रतिनिधी म्हणून आपले सगळयांचे कर्तव्य आहे. आपण सरपंचाना सुध्दा सन्मानाने मानधन मिळाले पाहिजे. त्यांचा बैठकीचा भत्ता दहा रुपये होता तो वाढविला. आमच्या भगिनी जिल्हा परिषद वा पंचायत समितीच्या सदस्या असतील त्यांना जिल्हयातील मुख्यालयापर्यंत येता यावे म्हणून एस.टी.चा प्रवास मोफत केला त्याबद्दल शासनाचे मी अभिनंदन करतो. चांगले निर्णय लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम या माध्यमातून आपण करणार आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी शेतक-याच्या संदर्भात जे सांगितले ते खरे आहे. एक वेळ अशी होती की, आम्ही कापसाला चांगला भाव मिळाला पाहिजे अशी मागणी करीत होतो. कापसाला योग्य भाव मिळावा म्हणून मोर्चे आयोजित करीत होतो. केंद्राच्या माध्यमातून, राज्य शासनाच्या माध्यमातून, नाफेडच्या माध्यमातून,सी.सी.आय.च्या माध्यमातून कापसाला शेवटी 2800 रुपये भाव मिळाला. आमच्या खानदेशात मोठया प्रमाणात कापूस होतो. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी हे त्याचे साक्षीदार आहेत. सर्वसामान्य शेतक-यांना समृध्द करण्याचे काम सुध्दा शासनाच्या चांगल्या धोरणामुळे झाले आहे. भविष्यात सुध्दा अशाच प्रकारचे चांगले धोरणात्मक निर्णय घेईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, अल्पसंख्याक समाजाचा विकास व्हावा म्हणून शासनाने मोठया प्रमाणात तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. आदिवासी समाजातील कुटुंबियांकडे खावटीचे कर्ज होते ते राज्य शासनाने माफ केले. मी नंदुरबार जिल्हयातील लोकप्रतिनधी आहे. महाराष्ट्रात सगळयात जास्त आदिवासी माझ्या जिल्हयामध्ये आहेत. आदिवासी समाजाकडे 200 कोटी रुपयांचे खावटी कर्ज होते ते सरकारने माफ केले म्हणून मी सरकारचे ख-या अर्थाने आभार मानतो. परंतु या ठिकाणी मला एक गोष्ट नमूद केली पाहिजे. आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासी समाजाच्या विकासासाठी योजना राबविल्या जातात. परंतु योजना राबविताना अधिका-यांकडून चुकीच्या मार्गाचा अवलंब होतो. आदिवासी माणसाकडून 800 रुपये प्रति क्विंटल या भावाने गव्हाची खरेदी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी...

शासनाकडून केली जाते. खावटी कर्जाच्या माध्यमातून आदिवासी माणसाला आम्ही गहू देतो. त्यावेळी शासनाकडून तो गहू त्यांना 1250 रुपये प्रति क्विंटल या भावाने दिला जातो. ही फार मोठी विसंगती आहे. योजनांमध्ये लुपहोल्स असतील ते दूर केले पाहिजेत. या योजना ख-या अर्थाने लोकांसाठी आहेत. ही गोष्ट अधिका-यांनी जाणून घेण्याची आवश्यकता आहे. आदिवासींचा गहू शासन 800 रुपये प्रति क्विंटल या भावाने खरेदी करते. परंतु त्यांना गहू देताना 1250 रुपये भावाने देतो. म्हणजे त्या लोकांवर एक प्रकारे अन्याय केल्या सारखेच आहे असे मला वाटते. विविध योजनांमध्ये ज्या अडचणी असतील, त्या अडचणी बाजुला सारुन सर्व सामान्य लोकांच्या हितासाठी या योजनांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करण्यात येईल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री. खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

आदिवासी भागातील नळ पाणीपुरवठा योजनांची वीज बिले थकलेली आहेत त्यामुळे बऱ्याच वेळेस विजेची कनेक्शन्स कट करण्यात येतात. शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रातील नळ पाणीपुरवठा योजनेची विजेची बिले थकलेली असतील तर ती सर्व बिले राज्यशासन भरणार. या निर्णयाबद्दल मी शासनाने मन:पूर्वक आभार मानतो.

महोदय, क्रीडा संकुलाच्या संदर्भात तालुका स्तरावर 1 कोटी इतका निधी देण्याचे मान्य केले आहे. खरे म्हणजे आमच्या विभागाचे माजी क्रीडा मंत्री श्री. अमरिशभाई पटेल यांनी 25 लाख रुपये तालुका स्तरावरील क्रीडा संकुलासाठी देण्याचे मान्य केले होते. परंतु 25 लाख एवढ्या रकमेत क्रीडा संकुल होत नाही म्हणून आपण जी 1 कोटीची मर्यादा वाढविली त्याबद्दल मी पुन्हा शासनाचे आभार मानतो.

त्यानंतर मला असेही निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, नंदुरबार जिल्हा तयार होऊन 12 वर्षांचा काळ लोटलेला आहे. एवढ्या काळात या ठिकाणी जिल्हा न्यायालय मंजूर झालेले नाही. जिल्हा न्यायाधीशांची निवासस्थाने तयार झालेली आहेत परंतु जिल्हा न्यायालयाची इमारत अजुनही बांधलेली नाही, त्यादृष्टीने सरकारने विचार करावा व अशा इमारतीसाठी मंजुरी द्यावी, अशी माझी मागणी आहे.

महोदय, नव्याने तयार झालेल्या नंदुरबार जिल्ह्यात जिल्हा परिषदेची इमारत तयार झाली, अधिकाऱ्यांचे बंगले तयार झाले परंतु पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांना शासनाने मान्यता दिलेली नसल्यामुळे जिल्हा परिषदेचे पदाधिकारी अजुनही भाडयानेच राहतात, म्हणून माझी विनंती आहे की, जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवासस्थानांना शासनाने मंजुरी द्यावी अशीही मी मागणी करीत आहे. उपरोक्त सूचनांचा विचार करुन भविष्यात सर्वसामान्य व गरीब जनतेचे प्रतिबिंब आपल्या प्रत्येक कार्यातून उमटेल अशी अपेक्षा व्यक्त करतो व पुन्हा अर्थसंकल्पाबद्दल शासनाचे अभिनंदन करतो आणि याच ठिकाणी थांबतो.

धन्यवाद.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2009-2010 च्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, महिला किंवा मुले असतील या सर्वांनाच समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच मध्यम वर्गीयांसाठी सर्वात महत्वाच्या कल्याणकारी योजना देऊन या अर्थसंकल्पामध्ये काही ना काही तरी देण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल माननीय अर्थमंत्र्यांचे मी अभिनंदन करते.

महोदय, जागतिक मंदीची झळ देशाला लागत असताना दुसरीकडे राज्याचा अर्थसंकल्प सादर करुन शासनाने गोरगरिबांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे त्याबाबत देखील माननीय मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील व माननीय राज्य मंत्री डॉ. सुनील देशमुख यांचे मी आभार व्यक्त करते.

सभापती महोदय, या देशाच्या महामहिम राष्ट्रपती माननीय श्रीमती प्रतिभा पाटील या सर्वोच्च पदावर आरुढ झालेल्या आहेत. तसेच मघाशी उल्लेख झाल्याप्रमाणे लोकसभेच्या सर्वोच्च पदावर देखील श्रीमती मीराकुमार या विराजमान झाल्या आहेत. त्यामुळे आम्हा महिलांनाही आशा वाटायला लागली आहे की, आता कुठेतरी 33 टक्के आरक्षण आम्हाला मिळणार. कारण गेली 35 वर्षे महिलांसाठी 33 टक्के आरक्षण मिळावे म्हणून वेगवेगळी आंदोलने होत आहेत. श्रीमती मृणाल गोरे, श्रीमती अहिल्यादेवी रांगणेकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात आम्ही त्यांच्यासोबत होतो. या अर्थसंकल्पात देखील महिलांना प्राधान्य देण्यात आलेले आहे त्याबाबत शासनाचे अभिनंदन करावे लागणार आहे. गेली दोन वर्षे सातत्याने आमच्या जिल्ह्यातील महिला सरपंचांना एस.टी. चा पास मोफत मिळावा म्हणून वेगवेगळी आयुधे, मग लक्षवेधी सूचना असेल, नियम 93 च्या सूचना असतील तर कधी अर्थसंकल्पावरील भाषणातून असेल अशा वेगवेगळया प्रकारे मागणी करीत आहोत. कारण आमच्या खेड्यातील महिला गरीब आहेत. माननीय जयंत पाटील अर्थमंत्री असतांना त्यांच्या दालनात सुध्दा यासंदर्भात बैठक झाली होती. त्यावेळेस त्यांनी अशा पाससाठी राज्यावर 5 कोटीचा बोजा पडणार असल्याचे सांगितले होते. परंतु ज्या महिलांना आपण झंडा फडकविण्याचा अधिकार देतो त्यांच्या बाबतीत 5 कोटीचा बोजा पडणार आहे त्याबाबत विचार करावा अशी मागणी आम्ही करीत होतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ...

त्यांना एसटीचा मोफत पास दिला तर त्यांना तालुक्याच्या ठिकाणी जाऊन ग्रामपंचायतीची कामे तहसील कचेरीमध्ये जाऊन करुन घेता येतील. तालुक्याच्या ठिकाणी एखादा पुरुष गाडी घेऊन गेला आणि त्या पुरुषाच्या गाडीतून महिला गेली तर त्या महिलेकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा होतो म्हणून मी गेल्या 2 वर्षापासून महिला सरपंचाना मोफत एसटी पास देण्याची जी मागणी करीत होते ती मागणी या अर्थसंकल्पात मंत्रीमहोदयांनी पूर्ण केल्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करते.

सभापती महोदय, बचत गटाच्या माध्यमातून आमची महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावी यासाठी राज्यशासनाने महिला बचतगटासाठी विविध योजना निर्माण केलेल्या आहेत. महिलांनी अगरबत्ती आणि धूप निर्माण केला तर त्यावरील 4 टक्के टॅक्स माफ करण्यात आलेला आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण महिलांना अगरबत्ती आणि धूप पर्यंतच मर्यादित ठेवणार आहात काय ? आज राज्यात महिला बचत गटाकडून गार्मेंट फॅक्टरीज चालविल्या जात आहेत. पनवेल, रायगड या ठिकाणी 3 हजार महिलांना गार्मेंट मध्ये रोजगार प्राप्त झालेला आहे. महिला बचत गट गार्मेंटमध्ये शर्ट तयार करुन परदेशात पाठवित आहेत. त्यामुळे शासनाने महिलांना धूप आणि अगरबत्तीपर्यंतच सीमित ठेवू नये. महिला बचत गटाच्या माध्यमातून पत्रावळी असेल, फाईल्स बनवण्याचे काम असेल, साबू तयार करणे, सुगंधी तेल, आयुर्वेदिक औषधी , लोणचे, पापड तयार करण्याचे काम महिला बचत गटाकडून केले जात आहे. या वस्तू तयार झाल्यानंतर या महिलांना जर 4 टक्के टॅक्स लागत असेल तर त्यामध्ये सुध्दा 4 टक्के सवलत द्यावी अशी विनंती करते.

सभापती महोदय, महिला बचत गटासाठी प्रदर्शन लावण्यासाठी 72.55 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. महिला बचत गटाने तयार केलेल्या मालाची विक्री करण्यात मदत व्हावी यासाठी शासनाने 72.55 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, मी गेल्या चार वर्षापासून यासंदर्भात मागणी करीत आहे. शासन जर प्रदर्शनासाठी 72.55 कोटी रुपये खर्च करु शकते परंतु जर आपण तालुक्याच्या ठिकाणी महिला बचत गटासाठी प्रशिक्षण आणि विक्री केंद्र तयार करुन दिले तर या महिला त्या भागात कोणता माल लागतो, कोणता कच्चा माल स्वस्त मिळतो हे पाहून आपले प्रॉडक्टस् सुरु करु शकतील व आपला माल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ...

त्या ठिकाणी विकू शकतील. प्रदर्शनाचा ख-या अर्थाने फायदा जे प्रदर्शन भरवतात त्यांनाच जास्त होतो. बचत गटांना केवळ जाण्याचे व येण्याचे भाडे दिले जाते, 1-2 टेबल्स लावून दिले जातात व सांगितले जाते की, या प्रदर्शनामध्ये लाईटसाठी एवढा खर्च आला, मंडपासाठी एवढा खर्च आला व हे प्रदर्शन भरवणारे लोकच याचा फायदा घेतात. त्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी महिला बचत गटाने तयार केलेला माल विकण्यासाठी जागा आणि वरच्या माळयावर प्रशिक्षण केंद्राची सोय करुन दिली तरच महिला बचत गटांना याचा चांगला उपयोग होऊ शकेल. यासंदर्भात मी गेल्या चार वर्षापासून सातत्त्याने मागणी करीत आहे. त्यामुळे माझी विनंती मान्य करावी एवढी विनंती आहे. असे जर झ ाले तर महिलांची आर्थिक स्थिती निश्चित सुधारु शकेल.

सभापती महोदय, मच्छीमारांना नौका बांधण्यासाठी भाग भांडवल पुरवण्यात आलेले आहे. शासनाने रायगडमध्ये मच्छीमारांना प्लॅटफॉर्म बांधण्यासाठी पैसे दिलेले आहेत. ठाणे आणि नवी मुंबई या ठिकाणी मोठया प्रमाणात समुद्र किनारा आहे. ठाणे आणि नवी मुंबई या ठिकाणी जेट्टी बांधण्याची गरज आहे, प्लॅटफॉर्म बांधण्याची गरज आहे परंतु या ठिकाणी आपण तरतूद केलेली नाही त्यामुळे या ठिकाणीही आमच्या कोळी बांधवासाठी तरतूद करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, होम गार्डसची भरती बाहेरुन होणार आहे परंतु बाहेरुन भरती न करता ज्यांना रोजचा समुद्राचा अनुभव, ज्यांना पोहता येते त्यांना म्हणजे समुद्र किना-यावरील मुलांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण दिले व होर्मगार्ड बनवले तर समुद्र सुरक्षेच्या बाबतीत त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. आपण आता समुद्र सुरक्षेसाठी ज्या तरुणांना नियुक्त करतो त्यांना समुद्राचा अनुभव नसतो आणि समुद्रात स्पीड बोट गेली की, ते घाबरतात. त्यामुळे समुद्र किनारी ज्या ज्या वस्त्या आहेत त्या ठिकाणच्या मुलांना या भरतीमध्ये प्राधान्य दिले तर आमच्या कोळी बांधवाना एक दुसरा रोजगार देखील मिळू शकेल.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात एक महत्वाचा मुद्दा मांडला आहे. महामंडळाकडून ज्या गरीब व्यक्तिनी व्यवसायासाठी कर्जे घेतलेली आहेत त्यांची कर्जे माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे त्याप्रमाणे मौलाना अझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळातर्फे काही गरीब व्यक्तिनी कर्ज घेतलेले आहे तेव्हा त्यांचे कर्जसुध्दा माफ करण्यात आले पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ असो व इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ असो वा अन्य विकास महामंडळाच्या मार्फत ज्या ज्या गरीब व्यक्तिनी कर्जे घेतलेले आहेत त्यांची कर्ज माफ करण्याचा ज्याप्रमाणे शासनाने निर्णय घेतला आहे त्याप्रमाणे मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळातर्फे किती गरीब व्यक्तिनी कर्ज घेतले आहे आणि ते माफ करण्याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने एखादी समिती नेमावी व अभ्यास करुन हे कर्ज माफ करण्यात यावे अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. सन्माननीय सदस्या प्रो.फौजिया खान यांनी बाल कामगारांचा एक मुद्दा येथे उपस्थित केला होता या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की बाल कामगारांची सोडवणूक केल्यानंतर त्यांचे नेमके काय केले जाते हे पाहणे आवश्यक असहे. मानखूर्द येथील रिमांड होममधून काही मुले पळून गेली होती अशी बातमी कालच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती तेव्हा तेथून ही मुले का पळून गेली याची कारणे शोधण्याकरता आपण तेथे भेट दिली पाहिजे. त्यांना तेथे योग्य प्रकारे जेवण मिळते काय त्यांना कपडे दिले जातात काय, त्यांना शिक्षण दिले जाते काय ,त्यांच्या राहण्याची व्यवस्था योग्य प्रकारची आहे किंवा नाही याबाबी पाहणे आवश्यक आहे. मध्यंतरी आम्ही तेथे भेट देण्यासाठी गेलो असतांना तेथील अवस्था अत्यंत वाईट असल्याचे आम्हाला पहवयास मिळाले होते. बाल कामगारांना रोजच भटकंतीची सवय लागलेली असते तेव्हा बाल कामगारांची सोडवणूक केलयानंतर त्यांच्या चांगल्या भविष्याच्या दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..

सभापती महोदय, तीर्थ क्षेत्राचा विकास करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून त्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. सर्व महाराष्ट्रातील लोकांचे जेजुरीचा खंडोबा हे कूल दैवत आहे .परंतु त्याचे दर्शन घेण्याकरिता वयोवृध्द लोकांना चढून जाता येत नसल्यामुळे ते पायथ्याशी थांबतात. तेव्हा या ठिकाणी रोपवेची व्यवस्था केल्यास वयोवृध्द मंडळींना दर्शन घेणे सुलभ होईल. अशी मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपविते.

नंतर हिंदी भाषण

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपुर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, महाराष्ट्र शासन की तरफ से वर्ष 2009-10 का अर्थसंकल्प पेश हुआ है, मैं इसका समर्थन और स्वागत करता हूँ.

सभापति महोदय, गडचिरोली और चंद्रपुर जिले नक्सलवाद से ग्रस्त जिले हैं. ये औद्योगिक जिले भी हैं और यहां पर कोयला और खनिज बड़ी मात्रा में पाया जाता है. इन जिलों में उद्योग होने से रोड के ऊपर ट्रॅफिक का बहुत लोड है. हैवी ट्रॅफिक वहां से निकलता है, इसलिए उस स्तर के रोड होना आवश्यक हैं. सार्वजनिक बांधकाम विभाग ने कई योजनाओं को मंजूरी दी है, मैं उसका स्वागत भी करता हूँ, लेकिन कम पैसे को प्रावधान किया गया है, इसलिए बजट में ज्यादा तरतूद करनी चाहिए. इसके अतिरिक्त कई कामों का प्रावधान इस अर्थसंकल्प में नहीं है. इसलिए बजट में इस कामों को शामिल करने के लिए तथा गडचिरोली और चंद्रपुर जिले में हॅवी ट्रॅफिक के हिसाब से रोड बनाने के लिए ज्यादा पैसे का प्रावधान करना चाहिए. चंद्रपुर शहर के मध्य भाग में रेल्वे लाईन पर 2 गेट हैं, एक साउथ सेन्ट्रल रेल्वे का गेट है और दूसरा सेन्ट्रल रेल्वे का गेट है. जब ये दोनों गेट बंद रहते हैं तो घंटों तक ट्रॅफिक रुक जाता है.यहां पर ओवरब्रिज बनाने के बारे में 2 बार घोषणा हो चुकी है और हमारे माननीय मुख्य मंत्री श्री. अशोक चव्हाण ने भी इस ओवरब्रिज को बनाने के बारे में कहा है. इसमें 25 करोड़ रुपए का खर्चा है. इसमें से 8 करोड़ रुपए खनिज निधि देने को तैयार है, 10 करोड़ रुपए सरकार खर्च करेगी और बाकी का पैसा रेल्वे देने को तैयार है. इसलिए सरकार को जल्दी से जल्दी यहां पर ओवरब्रिज बनाने का काम करना चाहिए. इसी तरह से बल्लारशाह विसापुर मार्ग का डांबरीकरण नहीं हुआ है. इसमें 65 लाख रुपए का खर्च है. सरकार को यह कार्य जल्दी से जल्दी करना चाहिए.

सभापति महोदय, सरकार ने मुंबई पुणे हाईवे के ऊपर ज्यादा ध्यान केन्द्रित किया है. मैं माननीय मंत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ कि चंद्रपुर जिले में से 20 हजार ट्रक रोजाना निकलते हैं और इस हॅवी ट्रॅफिक की वजह से 350 लोगों की मौत हो चुकी है, इसलिए चंद्रपुर जिले में बल्लारशाह बायपास रोड बनाना बहुत जरुरी है. इसके अलावा चंद्रपुर-विसापुर रोड का निर्माण कार्य करना अत्यन्त आवश्यक है. चंद्रपुर जिले की आवश्यकताओं को देखते हुए

. . . 3X 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री जव्हेरी

सरकार को वहां पर बड़े पैमाने पर रोड बनाने का कार्य करना चाहिए. चंद्रपुर-नांदा में ब्रिज बनाना बहुत जरुरी है, इसके ऊपर केवल 3.5 करोड़ रुपए का खर्च है. सरकार को ये सारे कार्य जल्द से जल्द पूरे करने चाहिए.

सभापति महोदय, एक बात तो यह है कि महाराष्ट्र शासन की तरफ से सार्वजनिक बांधकाम विभाग को जितना पैसा दिया जाता है, उतना पैसा इस्तेमाल नहीं होता है. हम यहां पर सरकारी योजनाओं के लिए करोड़ों रुपए का बजट मंजूर करते हैं, लेकिन काम के ऊपर सचमुच में कम पैसा खर्च होता है, इसलिए काम की क्वालिटी कम रह जाती है और उच्च स्तर का कार्य नहीं होता है. हम देखते हैं कि प्राईवेट बिल्डिंग में 20 साल तक कुछ नहीं होता है और सार्वजनिक बांधकाम विभाग द्वारा बनाने गए स्कूल में पहले साल से ही लीकेज शुरु हो जाता है. इसलिए क्वालिटी सुधारने की तरफ सरकार को विशेष ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, मैं सरकार का ध्यान इस बात की ओर खींचना चाहता हूँ कि महाराष्ट्र में नगरपरिषदों की हालत बहुत खस्ता है. नगरपरिषदें पानी और बिजली के पैसे भी नहीं दे सकती हैं. इसलिए महाराष्ट्र शासन द्वारा नगरपरिषदों के लिए ज्यादा से ज्यादा तरतूद करनी चाहिए. ऑक्ट्राय रद्द होने की वजह से नगरपरिषदों की आमदनी कम हो गई है, इसमें उनका क्या कसूर है. उनका बजट घाटे में चल रहा है. आप जिला परिषद के लिए पैसा देते हैं, लेकिन नगर परिषदों को बहुत कम पैसा मिलता है. मेरी शासन से विनंती है कि नगरपरिषदों की ज्यादा से ज्यादा मदद महाराष्ट्र शासन को करनी चाहिए.

सभापति महोदय, हमारे देश में थ्री टायर सिस्टम है, सेन्ट्रल गवर्नमेंट है, स्टेट गवर्नमेंट है और लोकल सेल्फ गवर्नमेंट है. नगर परिषद की बैठक 2 महीने में एक बार होती है और उसके सदस्य को केवल 100 रुपए भत्ता मिलता है, इससे उनका चाय-पानी का खर्चा भी नहीं निकलता है. यह भत्ता उनको कम से कम 200 रुपए मिलना चाहिए और अध्यक्ष के भत्ते में भी बढ़ोतरी होनी चाहिए.

सभापति महोदय, सरकार ने गरीब और पिछड़ी जातियों का विकास करने के लिए कई आर्थिक महामंडल बनाए हैं. अल्पसंख्यकों के लिए सरकार ने मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल का निर्माण किया है. सरकार ने इसके लिए पिछले वर्ष 160 करोड़ रुपए दिए थे और

. . . 3X 3

. . . . श्री जव्हेरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इस साल 210 करोड़ रुपए का प्रावधान किया है. अल्पसंख्यक लोगों में ऐसे लोगों की संख्या अधिक है जो कि 10-20 हजार रुपए का कर्जा लेकर फुटपाथ पर छोटा-मोटा धंधा करते हैं. किसी कारणवश नगरपालिका अतिक्रमण हटा देती है और उन्होंने जो 10-20 हजार रुपए का कर्जा लेकर अपना धन्धा शुरु किया है, वह बंद हो जाता है. नगरपालिका उनकी टपरी हटा देती है, उनके पास परमानेंट जगह नहीं है. उनका धंधा बंद हो जाता है और फिर दूसरा धंधा शुरु करने में उनको फिर से पूँजी जुटानी पड़ती है. सरकार ने गरीब और पिछड़ी जातियों का विकास करने के लिए जो आर्थिक महामंडल बनाए हैं, उनका कर्जा सरकार ने इस बजट में माफ किया है, लेकिन मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल का कर्जा सरकार ने माफ नहीं किया है. गरीब जनता को फायदा पहुँचाना इस सरकार का उद्देश्य है. किसी पिछड़े हुए समाज को ऐसा महसूस न हो कि सरकार हमारे हक में नहीं है. अगर ऐसा हुआ तो सरकार को बदनामी सहन करनी पड़ेगी. इसलिए मेरी सरकार से विनंती है कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल का जो लोग कर्जा नहीं भर सकते हैं, उनका कर्जा माफ किया जाए.

सभापति महोदय, अल्पसंख्यक समाज के शिक्षण के बारे में मैं कहना चाहता हूँ कि हमारे मुसलिम समाज के लोग उर्दू माध्यम के स्कूल में शिक्षण लेते हैं. मेरा कहना है कि उर्दू के साथ मराठी और अंग्रेजी भाषा को जोड़कर उनको शिक्षण दिया जाए. आज के नए दौर में एज्यूकेशन बहुत जरुरी है, अल्पसंख्यक समाज का विकास करने के लिए उसको इसमें शामिल करना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र शासन ने एक अच्छा बजट पेश किया है. चंद्रपुर और गडचिरोली जिले में बहुत से उद्योग आ रहे हैं, सरकार ने प्रदूषण रोकने के लिए कड़क नियम बनाए हैं, लेकिन नियम सिर्फ कागज पर रहते हैं और बहुत से उद्योग गंदा पानी नाले में छोड़ देते हैं और उससे लोगों को त्रास होता है.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / शीघ्रटुपसाठी नाही

प्रदूषण के कारण लोगों को तकलीफ हो रही है. प्रदूषण रोकने संबंधी कानून का पालन नहीं किया जा रहा है. इसलिए मेरा सरकार से निवेदन है कि प्रदूषण को रोकने के लिए जो कानून और नियम बनाए गए हैं, उन का पालन करवाना चाहिए और जो कर्मचारी नियमों को पालन नहीं कर रहे हैं, उन पर कार्रवाई होनी चाहिए. चंद्रपुर में गंदे पानी की समस्या और हर प्रकार के प्रदूषण की समस्या गहन हो गई है. दुनिया में सबसे ज्यादा प्रदूषित चंद्रपुर शहर है. इसलिए चंद्रपुर के प्रदूषण को रोकने के लिए प्रदूषण नियंत्रण विभाग द्वारा ध्यान दिया जाना अत्यंत आवश्यक है. मेरी सरकार से विनती है कि चंद्रपुर को सभी प्रकार के प्रदूषण से मुक्त किया जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.....

इसके बाद श्री शेंडगे का भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने 2009-2010 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे,त्यामध्ये ज्यापध्दतीने योजनांचे नियोजन केलेले आहे, ते पाहिल्यानंतर असे दिसून येते की, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्रीमती अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा पगडा घेऊन पुढे जात असताना, जगा बरोबर स्पर्धा करीत असताना, औद्योगिकीकरण, समाजकारण तसेच शैक्षणिक योजनांच्या बाबतीत या राज्याला पुढे नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आलेला आहे. या राज्याला देशापुढे, संपूर्ण जगापुढे एक आदर्श राज्य म्हणून कसे ठेवता येईल याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पामध्ये दिसत आहे. सर्वप्रथम अशा प्रकारचा अतिशय चांगल्या प्रकारचा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्री, माननीय अर्थ राज्यमंत्री आणि महाराष्ट्र शासन या सर्वांचे अभिनंदन करतो.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

सभापती महोदय, एकूण 37915 कोटी रुपयांच्या या योजना आहेत. संपूर्ण महाराष्ट्राला एकत्र घेऊन जात असताना कोणावर अन्याय झाला, कोणाला न्याय दिला याच्यापेक्षा सर्वांना बरोबर घेऊन जायला पाहिजे या या भावनेतून हजारो कोटी रुपयांचा अनुशेष भरुन काढून या अर्थसंकल्पामध्ये एक आदर्श दाखवून दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी कितीही म्हणत असले की, विदर्भावर अन्याय होत आहे तरी हा अनुशेष भरुन काढून राज्य सरकारने आपल्याला दाखवून दिलेले आहे की, आपण कायम आमच्या हृदयात दुसरी झडप राहिलेले आहात. हृदयामध्ये दोन झडपा काम करीत असताना एक झडप बंद पडली तरी हृदय बंद पडते म्हणून मला विनंती करावयाची आहे की, आपला भरुन काढलेला अनुशेष यासाठी सरकार कायम कौतुकास पात्र रहाणार आहे. सिंचनाचा 947.76 कोटी रुपयांचा अनुशेष आहे. आरोग्याचा 807.51 कोटी रुपयांचा अनुशेष आहे. तंत्रशिक्षणाचा 40.51 कोटी रुपयांचा अनुशेष आहे.पशुसंवर्ध विभागाचा 36 कोटी रुपयांचा अनुशेष आहे.राज्य शासनाने जाणीवपूर्वक हा अनुशेष भरुन काढलेला आहे. या अर्थसंकल्पामध्ये सर्व क्षेत्रातील घटकांकडे लक्ष देण्यात आलेले आहे. पुरोगामी महाराष्ट्राचे उदाहरण देत असताना सामाजिक न्याय विभागासाठी 2652 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. आदिवासी उपाययोजनांसाठी 2314 कोटी रुपयांच्या योजना मंजूर केल्या आहेत. संपूर्ण जग मंदीच्या खाईमध्ये जात असताना आणि महान आर्थिक सत्तासुध्दा डबघाईला आलेल्या असताना या जगासमोर भारतीय अर्थव्यवस्था आणि महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था कशी मजबुतीने उभी आहे हे या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दाखविण्यात आलेले आहे. आज सुवर्णमहोत्सवी वर्षाची सुरुवात करीत असताना कुठल्याही परिणामांची तमा न बाळगता मोठया आत्मविश्वासाने 11915 कोटी रुपयांच्या विविध विभागांच्या विकास कामाच्या योजना मंजूर केलेल्या आहेत हे मला या ठिकाणी सांगावयास आनंद वाटतो.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी महाराष्ट्र राज्याची तुलना जे स्वत:ला देशातील प्रगतीशील राज्य म्हणवत आहेत अशा गुजरात राज्याशी करत असताना गुजरातपेक्षा महाराष्ट्र कसा अग्रेसर आहे आणि तो कसा अग्रेसर होणार आहे हे या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दाखवून दिलेले आहे. 5 लक्ष 40 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MAP/ KGS/ ST/

श्री. रमेश शेंडगे.....

आली असून यासाठी 7578 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करत असताना केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी केंद्र सरकारला एक प्रस्ताव दिला आणि त्या माध्यमातून 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी संपूर्ण देशातील शेतकऱ्यांची झाली. त्यामध्ये आपला हक्काचा वाटा असावा म्हणून राज्य सरकारने 6200 कोटी रुपयाचा हिस्सा उचलला आहे. सन 2008-2009 मध्ये 2100 कोटी आणि 2009-2010 मध्ये 2500 कोटी रुपयांची तरतूद यासाठी करण्यात आलेली आहे. यातून हे लक्षात येते की, मागील अनेक वर्षापासून मग ते स्व. यशवंतरावजी चव्हाण असतील, स्व. वसंतदादा पाटील असतील किंवा आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार असतील, या राज्यातील आघाडी सरकारच्या माध्यमातून काम करणारी नेते मंडळी असतील यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या अर्थसंकल्पात हजारो कोटी रुपयांची तरतूद केल्याचे तुम्ही आणि आम्ही पहात आहोत. ऊर्जा असेल,रस्ते असतील, कृषी विभाग असेल वा आमचा सन्माननीय अल्पसंख्याक समाज असेल या सगळयांसाठी भरीव तरतूद या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे. आज तांडा वस्ती सुधार योजनेसाठी 23 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, संपूर्ण जग ज्यांच्याकडे सन्मानाने आणि शौर्याने पहाते त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी 100 कोटी रुपयांची योजना जाहीर केलेली असताना या वर्षीच्या अर्थसंकल्पात 50 कोटी रुपयांची भरीव तरतूद केलेली आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विचार करीत असताना महात्मा फुले यांचे जे स्मारक अपूर्ण राहिलेले आहे ते पूर्ण करण्यासाठी सुध्दा तरतूद केलेली आहे. आम्ही महाराष्ट्रामध्ये शाहू, फुले, आंबेडकर, अहित्याबाई होळकर यांच्या विचारांच्या योजना राबवित असताना आज आपण इंदिरा आवास सारखी योजना गोरगरिबांसाठी राबवितो. शेतकऱ्यांसाठी दिलेल्या योजना असतील, कापसाला दिलेला भाव असेल किंवा गोरगरीब जनतेसाठी इंदिरा आवास योजनेच्या अंतर्गत बांधलेली 1 लाख 14 हजार 176 घरे असतील हे सर्व आपण करीत आहोत. आता 2 लाख 24 हजार 323 घरांचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. म्हणजे अन्न, वस्त्र आणि निवारा हे जे महत्वाचे घटक आहेत ते देण्याचा आटोकाट प्रयत्न सरकारने केलेला दिसतो. उद्योगधंद्याला चालना मिळावी, प्रोत्साहन मिळावे याकरिता ज्यांच्याकडे पैसे आहेत त्यांच्याकडून चैनीच्या वस्तूंवरील कराच्या रुपाने कसे पैसे मिळविता येतील यादृष्टीने अत्यंत चांगले धोरण राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आदिवासींसाठी 200 कोटी रुपयांचे खावटी कर्ज माफ केले. शासनाने वेगवेगळ्या महामंडळांचे कर्ज माफ केलेले आहे. जे बाराबलुतेदार आहेत, जो बहुजन समाज आहे, जे मागासवर्गीय आहेत त्यांचे शेकडो कोटीचे कर्ज माफ करावे अशी अनेक दिवसांची मागणी होती. सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या महामंडळांचे कर्ज माफ केले. सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत थोडी महामंडळे येतात. सन्माननीय सदस्य प्रा. फौजीया खान असतील, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे असतील किंवा सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी असतील त्यांनी मागणी केली त्याप्रमाणे जी महामंडळे सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत नाहीत परंतु बाराबलुतेदार, भटके-विमुक्त आणि इतर मागासवर्गीयांसाठी काम करतात, त्यांच्यासाठी योजना देतात, त्यांना कर्ज देतात त्या महामंडळांचे सुध्दा कर्ज माफ होणे आवश्यक आहे. ही बाब अत्यंत महत्वाची आहे. काही ठराविक महामंडळांना कर्जमाफी दिली परंतु इतर घटकांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झाली. त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होत आहे. म्हणून मी माननीय वित्त राज्यमंत्र्यांना विनंती करतो की, यामध्ये जातीने लक्ष घालून या महामंडळांचे सुध्दा कर्ज माफ व्हावे याकडे शासनाने लक्ष द्यावे. तांडा सुधार असेल किंवा बाकीच्या विविध गोष्टींकडे शासनाने लक्ष दिले. आदिवासी विभाग असेल किंवा अनुसूचित जाती जमातीसाठी शासनाने हजारो कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रमेश शेंडगे .....

रुपयांची तरतूद केली त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. परंतु जे इतर मागासवर्गीय आहेत, भटके विमुक्त आहेत त्यांच्यासाठी सुध्दा त्याप्रमाणात तरतूद केली पाहिजे. कारण महाराष्ट्रामध्ये त्यांची लोकसंख्या सुध्दा मोठ्या प्रमाणावर आहे. मी या ठिकाणी एकच उदाहरण देतो. मच्छिमार समाजाला वेगवेगळ्या सवलती देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये 47 कोटी 36 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु जे शेतीपूरक व्यवसाय आहेत, शेळी-मेंढीचा व्यवसाय आहे अशा शेतीपूरक व्यवसायाकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये शेळी-मेंढी व्यवसाय करणारा धनगर समाज असेल किंवा शेती करणारा वर्ग असेल त्यांच्याबाबतीत आपण मागे वळून पाहिले तर सन 1978 पासून 2008 पर्यंत या महामंडळावर अन्याय झालेला आहे. 1978 पासून 2008-09 पर्यंत या महामंडळाला फक्त 10 कोटी रुपये दिलेले आहेत. सन्माननीय वन मंत्री हे दऱ्याखोऱ्यांमध्ये फिरणारे आहेत. या राज्यातील मेंढपाळांबाबत त्यांना सहानुभूती आहे. परंतु या सदनाने फक्त 10 कोटी रुपये दिले. कर्जाची वारंवार मागणी करुनही हा व्यवसाय करणाऱ्याला एक रुपया सुध्दा निधी दिलेला नाही. आपण इतर महामंडळांना कर्ज माफी देत असताना हे 10 कोटी रुपये माफ केलेले नाहीत. कर्ज माफ केलेल्या महामंडळांमध्ये या महामंडळाचे नाव नाही. या महामंडळाचे कर्ज सुध्दा माफ करावे. तांडे वस्त्यांच्या विचार करीत असताना जो मेंढपाळांचा व्यवसाय राज्यामध्ये चालतो त्यामध्ये तो मेंढपाळ 8 महिने सातत्याने भटकंती करीत असतो. त्याची बायको असेल, त्याची मुले असतील, त्याचे एक दोन महिन्याचे लहान बाळ असेल त्यांना आपल्या घोड्यावर बसवून तो मेंढपाळ आठ महिने भटकंती करीत असतो. एका गावावरुन दुसऱ्या गावी घोड्यावरुन जाताना त्याच्या घोड्यावर त्या मेंढपाळाच्या मेंढीचे पिल्लू असते. त्या घोड्यावर त्या मेंढपाळाच्या कुत्र्याचे पिल्लू असते. त्या घोड्यावर त्याच्या कोंबडीचे पिल्लू असते. या जनावरांबरोबरच त्या माणसाचे लहान मूल सुध्दा त्या घोड्यावर असते. अशा प्रकारे ते भटकंती करीत असतात. ज्या ठिकाणी ते थांबतात त्या ठिकाणी वादळ झाले तर त्यांचे तंबू उडून जातात आणि त्यांचे कुटुंब रस्त्यावर येते. मागे जळगाव जिल्ह्यामध्ये, धुळे जिल्ह्यामध्ये वास्तव्य करणाऱ्या मेंढपाळांच्या कुटुंबावर दरोडे पडले. त्यांच्या बायकांवर बलात्कार झाले. त्यांच्यासाठी कोणत्याही प्रकारचे संरक्षण किंवा कोणत्याही प्रकारच्या सोयीसवलती या अर्थसंकल्पामध्ये दिसत नाहीत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

सर्वात मोठा असलेला हा घटक दुर्लक्षित राहिला आहे. अनेक वेळा योजना त्या वर्गापर्यंत पोहोचत नाही. त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले आहे. एखाद्यावेळी वादळ आले आले आणि त्या वादळाच्या परिस्थितीत एखाद्या लहान मुलाला ताप आलेला असेल तर अशावेळी या लोकांना कोणतीही वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत नाही. मुलगा तापाने तडफडतो. अशावेळी ती माता आपल्या मुलाला हृदयाकडे धरते आणि तिच्या हृदयाच्या स्पंदनामुळे त्याचा ताप उतरतो. कोणत्याही डॉक्टरी इलाजामुळे तो बरा होत नाही. अशा परिस्थितीचाही शासनाने विचार केला पाहिजे. सभापती महोदय, शासनाने इतर योजनांसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याबद्दल शासन अभिनंदनास पात्र आहे. परंतु हा वर्ग दुर्लक्षित होणार नाही याचीही काळजी घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्याची सिंचन क्षमता वाढण्यासाठी शासनाने तरतूद केली आहे, पण ती अपुरी आहे. त्यासाठी भरीव तरतूद केली पाहिजे. देशाचा सिंचनाचा आराखडा पाहिला तर देशात सरासरी 40 टक्के सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. पंजाबमध्ये 97 टक्के इतकी आहे. पण आपल्याकडे 17 टक्के इतकी कमी सिंचनक्षमता आहे. त्यामुळे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे मागणी करुन, केंद्राकडे पाठपुरावा केला पाहिजे. जोपर्यंत महाराष्ट्राची सिंचन क्षमता 40 टक्के होत नाही तोपर्यंत इतर राज्यांचा निधी आपल्या राज्याकडे वळविला पाहिजे तरच संपूर्ण राज्याची सिंचन क्षमता 17 टक्क्यांवरुन 40 टक्क्यापर्यंत येऊ शकते. पण सिंचन क्षमता 40 टक्क्यांपर्यंत नेत असताना जे कायम दुष्काळी तालुके असतील मग कवठेमहांकाळ असेल, जत असेल, सोलापूर, सातारा जिल्ह्यातील काही तालुके असतील त्यांचा सुध्दा अनुशेष भरुन काढणे आवश्यक आहे. राज्याची सिंचन क्षमता 17 टक्क्यांवरुन 40 टक्क्यापर्यंत आणत असताना जिल्हा हा घटक न मानता तालुका हा घटक मानला पाहिजे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय वित्त मंत्र्यांनी दिनांक 4 जून, 2009 रोजी सभागृहामध्ये सन 2009-2010 या वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये 7123 कोटीची महसुली व भांडवली तूट 113 कोटींची दाखविली आहे. तरी सुध्दा सरकारने पायाभूत सुविधांसाठी 1955 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, विविध महामंडळाच्या माध्यमातून देण्यात आलेले 1100 कोटी रुपयांचे कर्ज माफ केलेले आहे. आदिवासी बांधवांचे 200 कोटींचे खावटी कर्ज माफ करण्यात येऊन या घटकाला दिलासा दिलेला आहे. म्हणून मी सन्माननीय वित्तमंत्र्यांचे, सन्माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे आणि शासनाचे अभिनंदन करतो. मृदसंधारणासाठी 40 कोटी 49 लाख रुपये, पशुसंवर्धनासाठी 36 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हा जो अनुशेष आहे तो दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, कोकण या भागामध्ये रोजगाराची निर्मिती होऊ शकते. सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री असताना रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील फलोत्पादन योजनेचे महत्व वाढावे म्हणून 1 लाख हेक्टर पेक्षा जास्त जमीन फळ बागायतीखाली आणली. सरकारच्या माध्यमातून कोकणातील 4 जिल्हयांमध्ये आतापर्यंत फळ प्रक्रियांची युनिटस निर्माण केली आहेत काय ? कोकणात काजू, आंबा या फळांचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. परंतु आंब्यावर प्रक्रिया करण्यासाठी आंबा गुजरात राज्यात जातो, कर्नाटक व गोव्यात काजू जातो. कोकमावर प्रक्रिया करण्यासाठी कोकम केरळमध्ये जातो. म्हणून राज्यातील चारही जिल्हयात फळ प्रक्रिया युनिटस् तयार झाली पाहिजेत. विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात आंबा, काजू, जांभूळ अशी अनेक फळे तयार होतात, म्हणून फळांवर प्रक्रिया करणारी युनिट्स तयार झाली तर राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, राज्याच्या तिजोरीत भर पडेल असे मला वाटते.

सभापती महोदय, कोकणात मृदसंधारणाची कामे घेण्यासाठी निकष बदलण्याची आवश्यकता आहे. मागील 3 वर्षापासून मी या सदनामध्ये ही मागणी करीत आहे. या कामांसाठी कोकणात जे मापदंड लावले आहेत ते बदलण्यात यावेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत मत / मुद्रितशोधन नाही

तंत्र शिक्षणासाठी 40 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी या सभागृहामध्ये दोन वर्षापासून हे सांगत आहे की आमच्या मालवण तंत्रनिकेन कॉलेजमध्ये 50 टक्के स्टाफ कमी आहे. कोकणामध्ये आटीआय सुरु केले परंतु शिक्षक नसल्यामुळे तेथे प्रवेश घेतला जात नाही. जे शिक्षक कमी आहेत ते सहा महिन्याच्या आत भरण्यासंबंधीचा एक प्रस्ताव मी माननीय मंत्री महोदयांकडे दिलेला आहे. तेव्हा हे शिक्षक लवकरात लवकर भरण्यात यावेत अशी माझी शासनाला विनंती आहे. उर्वरित महाराष्ट्रातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी 364 कोटी 21 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. उर्वरित महाराष्ट्रामध्ये कोकणाचा समावेश होतो. परंतु आतापर्यन्त सिंचनाच्या कामासाठी कोकणाला किती रक्कम मिळालेली आहे हा एक संशोधसनाचा विषय आहे. कोकणातील पाटबंधा-याची कामे गेल्या तीन वर्षापासून बंद आहेत. कोकणातील तिल्लारी प्रकल्प 1982मध्ये सुरु झाला. तसेच ब-याच छोट्या आणि मध्यम प्रकल्पांना तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. कोकणामध्ये काळंबा हा एक प्रकल्प आहे. पण त्याचे कामही म्हणावे तसे सुरु नाही. कोकणामध्ये 11 मध्यम आणि 75 छोटे प्रकल्प आहेत. या प्रकल्पासाठी 6700 कोटीची गरज आहे. जर कोकणासाठी स्वतंत्र असे वैधानिक विकास महामंडळ केले तरच कोकणाला काही तरी न्याय मिळेल. त्यादृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करावेत अशी माझी आपणा सर्वांना विनंती आहे. कोकणातील पाटबंधा-यांसाठी लागणारी आधीची रक्कम 3700 कोटी एवढी होती. परंतु वेळेवर कामे न झाल्याने या रकमेत वाढ होत गेली. तेव्हा दरवर्षी 100 कोटी रुपये दिले तरच कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांची कामे होऊ शकतील.

सभापती महोदय, पूर नियंत्रणासाठी शासन मदत करते. परंतू ही मदत पूर आल्यानंतर केली जाते. ज्या गावामध्ये पूर येतो तेथील लोकांना खूप त्रास सहन करावा लागतो. कित्येक वेळा आजूबाजूच्या गावाशी लोकांचा संपर्क तुटतो. तेव्हा अशा पूरसदृश्य गावातील लोकांना पूरपरिस्थितीमध्ये मदत करता यावी यासाठी फायबर बोटींची व्यवस्था करावी. पूर आल्यानंतर तेथील लोकांना आपली घरेदारे सोडून 15-15 दिवस अन्यत्र रहावे लागते. म्हणून अशा लोकांना राहाण्यासाठी समाज मंदिर बांधावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली...)

सभापती महोदय, धूप प्रतिबंधक बंधारे आणि खार भूमी विकासाच्या संदर्भात या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. कोकणातील चार जिल्ह्यामध्ये धूप प्रतिबंधक बंधारे आणि खार भूमी विकासाच्या संदर्भातील कामे मोठ्या प्रमाणावर करण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी मोठी रक्कम लागते. तेवढी रक्कम डीपीडीसी कोठून देणार ? तेव्हा कोकणातील धूप प्रतिबंधक बंधारे आणि खार भूमी विकासाच्या कामासाठी 150 ते 200 कोटी रुपये उपलब्ध झाले तरच ती कामे होऊ शकतील.

सभापती महोदय, डोंगरी विकास कार्यक्रमामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन तालुक्यांचा समावेश झालेला नाही. सावंतवाडी तालुक्याचे सावंतवाडी आणि दोडामार्ग असे दोन तालुके झाले. या तालुक्यासाठी आणि वेंगुर्ला तालुक्यासाठी डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत निधी मिळत नाही. तेव्हा या तालुक्यांचा डोंगरी विकास कार्यक्रमामध्ये समावेश करुन निधी उपलब्ध करुन द्यावा. तसेच कै. शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळासाठी भरीव आर्थिक तरतूद करावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. शिक्षणाच्या बाबतीत सांगायचे तर, कोकणातील ब-याच जिल्ह्यामध्ये गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, प्राथमिक, शिक्षणाधिकारी, माध्यमिक ही पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याच्यादृष्टी कार्यवाही करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. आणखी एक गोष्ट मला कोकणाच्या संदर्भात सांगावयाची आहे आणि ती म्हणजे कोकणामध्ये रल्वे सुरु झालेली आहे.

....नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजन तेली....

कोकण रेल्वे सुरु झाली आहे. महाराष्ट्रातील काही रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाने तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. कोकणातून कोल्हापूरला जोडणारा, पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा रेल्वे मार्ग व्हावा अशा प्रकारचा सभागृहात ठराव आला होता. त्यावेळी माननीय सभापतींच्या माध्यमातून मी विनंती केली होती की, कोकण रेल्वे ही कोकण रेल्वेच राहिलेली आहे. कोकण रेल्वेला किती फायदा होतो आहे हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. पर्यायी रेल्वे सावंतवाडीपर्यंत सुरु व्हावी असे प्रयत्न करावेत. या पर्यायी रेल्वेसंदर्भात कोकण रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना बोलावून माननीय सभापतींनी चर्चा करावी अशीही विनंती त्यावेळी मी केली होती. सभापती महोदय, आपण माझ्या विनंतीचा पुन्हा गांभीर्याने विचार करावा अशी माझी पुन:श्च विनंती आहे.

सभापती महोदय, जल वाहतुकीच्या संदर्भात सुध्दा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पर्यटनाचा विषय अतिशय महत्वाचा आहे. आमच्या सिंधुदूर्ग जिल्हयाला लागून गोवा राज्य आहे. पर्यटनावर आधारित त्या राज्याचे बजेट आहे. आज केरळ राज्यात मोठया प्रमाणात पर्यटक जात आहेत. सिंधुदूर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून 1998 मध्ये जाहीर करण्यात आला आहे. परंतु या जिल्हयात पर्यटकांसाठी कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. माझी शासनास नम्र विनंती आहे की, सिंधुदूर्ग जिल्हयात पर्यटनाच्या विकासासाठी एक हजार कोटी रुपये खर्च करावेत. शासनाने खर्च केलेले पैसे चार ते पाच वर्षात शासनाच्या तिजोरीत परत येऊ शकतील. त्या जिल्हयात चांगल्या प्रकारे पर्यटन स्थळाचा विकास होऊन तेथे मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होईल. सिंधुदूर्ग जिल्हयाच्या पर्यटनाच्या विकासासाठी शासनाने वेगळे महामंडळ निर्माण केले होते. ते महामंडळ कार्यरत करावे अशी मी शासनास विनंती करतो.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील सागरी महामार्ग बहुतांशी पूर्ण झालेला आहे. सागरी महामार्गाचा काही भागाचे काम राहिले आहे. ते काम तातडीने पूर्ण करावे. त्याचप्रमाणे एनएच-17 हा गोवापर्यंत जाणारा रस्ता आहे. हा रस्ता चार पदरी करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावा. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय बांधकाम राज्यमंत्री उपस्थित आहेत. रत्नागिरी येथे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली...

सार्वजनिक बांधकाम विभागात अधीक्षक अभियंता श्री.मंडपे होते आणि आमच्या जिल्हयात श्री. खोब्रागडे हे कार्यकारी अभियंता होते. यांच्या कार्यकाळात प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे. एक वर्षापूर्वी मंजूर झालेल्या रस्त्याची कामे करण्यात आलेली नाहीत. आम्हाला वर पैसे द्यावयाचे आहेत, ठेकेदारांना पैसे द्यावयाचे आहेत असे ते उघडपणे सांगत होते. त्यांच्या त्या कार्यकाळातील कारभारासंबंधी व केलेल्या भ्रष्टाचारासबंधीची चौकशी करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो. त्याच प्रमाणे साकवासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यावा. माझी आपल्या मार्फत माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे की, महाराष्ट्राचा इतिहास खरा कोकण विभागात आहे. सिंधुदूर्गसह संपूर्ण कोकण बेल्टमध्ये 107 गडकिल्ले आहेत. सिंधुदूर्ग जिल्हयाचे नाव सिंधुदूर्ग गडकिल्ल्यावरुनच ठेवण्यात आले आहे. देशात कुठेही छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर नाही. परंतु सिंधुदूर्ग किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजाचे मंदिर आहे. त्या मंदिराची दुरुस्ती व्हावी. सिंधुदूर्ग किल्ल्यास मोठे भगदाड पडलेले आहे, त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घ्यावे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी शासनाने 50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसे राज्यातील जे गडकिल्ले आहेत, त्यासाठी देखील तशा प्रकारची तरतूद शासनाने करावी अशी या निमित्ताने मी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, सभागृहात गृह विभागाची चर्चा सुरु झाली की, आमची विरोधी पक्षाची मंडळी वेगवेगळे विषय काढून एखाद्याला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. कै.अकुश राणे असतील,रमेश गोवेकर असतील, रमेश गावेकर जीवंत असताना या लोकांनी त्यांना किती वेळा विचारले हा एक प्रश्नच आहे. ही जी सगळी मंडळी आहे, ती एखाद्याला बदनाम करण्यासाठी, संशय निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत असतात. या प्रकरणाबाबत सी.बी.आय.मार्फत चौकशी सुरु आहे. सभापती महोदय, या प्रकरणांबाबतची माहिती घेऊन ती माहिती विरोधी पक्षाच्या सदस्यांना आपल्यामार्फत देण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणचे महात्मा गांधी कै. अप्पासाहेब पटवर्धन यांचे स्मारक व्हावे म्हणून शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, वन संज्ञेच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर कोकणातील विशेषत: सिंधुदूर्ग जिल्हयातील 42 हजार हेक्टर जागा वन संज्ञेखाली गेलेली आहे. महाराष्ट्रातील 62

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

हजार हेक्टर व त्यातील 42 हजार हेक्टर जागा सिंधुदूर्ग जिल्हयातील वन संज्ञेत गेली आहे. ज्या अधिका-यांनी हे चुकीचे काम केलेले आहे, त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात यावी. ही जमीन वन सज्ञेतून सुटण्यासाठी कोर्टात शासनाने प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत व शेतक-यांना यासंदर्भात दिलासा द्यावा अशा प्रकारची मागणी करतो आणि आपण मला बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी मी उभा आहे. राज्यातील 10 कोटी जनतेसाठी माननीय अर्थमंत्र्यांनी हा जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याचे मी मन:पूर्वक स्वागत करतो. महाराष्ट्राच्या जवळपास 3.08 लाख चौरस किलोमीटरच्या परिसरातील जनतेला 5,90,995/- कोटी एवढया राष्ट्रीय उत्पन्नाचा 13 टक्के वाटा मिळतो आणि राज्यात व देशातही आज जी आर्थिक मंदी जाणवत आहे अशा परिस्थित सुध्दा सन 2007-08 मध्ये 9 टक्क्यांनी त्यात वाढ झाली होती त्यात सन 2008-09 मध्ये 7.01 टक्क्यांनी वाढ झाली आहे. याचा अर्थ आपले उत्पन्न घटले आहे. त्याचप्रमाणे महसुली खर्च 78946 कोटीचा असून त्यात 19 टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामध्ये 16.04 टक्के इतके व्याज म्हणजेच 12953 कोटीचे व्याज आपण भरतो. तसेच 1,58,520/- कोटीचे कर्ज हेही आज आपल्या राज्याच्या डोक्यावर आहे याची जाणीव ठेवून हा तुटीचा अर्थसंकल्प माननीय अर्थमंत्र्यांनी मांडला आहे. त्यामध्ये सुध्दा अत्यंत चांगल्या प्रकारचा समतोल, राज्यातील प्रत्येक माणसाचे दरडोई उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने, जीवनावश्यक वस्तुंचा निर्देशांक आणि महागाई सुध्दा कमी झालेली आहे व त्यामुळेच राज्यस्तरीय योजना, समाजकल्याण, जिल्हापरिषदा, आदिवासी विकास या सर्वांसाठी भरपूर तरतूद या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शासनाने करुन दिलेली आहे.महाराष्ट्र शासनाचे मला अभिनंदन करावे लागणार आहे की, राज्यातील आठही क्षेत्रातील संपूर्ण अनुशेष शासनाने पूर्ण केलेला आहे. त्यात सिंचन, रस्ते, सामान्य शिक्षण, पाणीपुरवठा, मृद व जलसंधारणा, फलोत्पादन, कृषीपंप उर्जीकरण अशा क्षेत्रातील अनुशेष आजच्या स्थितीत पूर्ण झाला आहे. पण आरोग्याचा 807 कोटीचा, तंत्रशिक्षणाचा 40 कोटीचा आणि पशुसंवर्धन या महत्त्वाच्या विभागांचा अनुशेष मात्र शिल्लक राहिलेला आहे. माझी शासनाला या माध्यमातून नम्रपणे विनंती आहे की, आजही राज्यात जन्माचा दर 18.1 टक्का आहे, मृत्यूचा दर 6.6 टक्के आणि बालमृत्युचा दर 34 टक्के आहे. यामध्ये अजुनही जास्तीत जास्त सुधारणा करुन नागरी आणि अनागरी भागामधील ही तफावत कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. त्याचबरोबर आरोग्यासाठी ज्या सुख-सुविधा दिलेल्या आहेत त्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार .....

महोदय, पाटबंधारे प्रकल्पांसाठी शासनाने चांगली तरतूद केलेली आहे. नाशिक जिल्ह्यातील अनेक धरणांची कामे चालू आहेत ती कामे त्वरित पूर्ण होण्याबाबतचे अभिवचन शासनाने द्यावे, अशी खास करुन माझी मागणी आहे. तसेच राज्यातील विजेचे लोडशेडिंग आणि वीजनिर्मिती प्रकल्पांच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर राज्याला एकूण 21654 मेगा वॅट एवढया विजेची गरज आहे पण त्यात 4500 मेगा वॅट इतक्या विजेची तूट आपल्याला आहे. त्यात आपली पारेषण हानी 5 टक्क्यावर असून वितरण हानी अजुनही 24.1 टक्क्यावर आहे. म्हणजे कंडक्शन आणि डिस्ट्रीब्युशन अशी दोन्ही मिळून जी हानी आहे ती जवळपास 16 टक्क्यापर्यंत कमी करण्याची गरज आहे. असे झाले तर आपल्याला जास्तीत जास्त वीज मिळू शकेल. त्याचप्रमाणे परळी, पारस या औष्णिक वीज केंद्रातून 500 मेगा वॅट, घाटघर जलविद्युत प्रकल्पातून 125 मेगा वॅट तर दाभोळ प्रकल्पातून 940 मेगा वॅट इतकी वीज निर्माण होणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ...

त्यामुळे पुढच्या वर्षी राज्यामध्ये लोडशेडींगचा विषयच शिल्लक राहणार नाही अशी खात्री वाटते. शेतक-यांना वीज बिलामध्ये सवलत या शासनाने दिलेल्या आहेत तसेच लिफट् इरिगेशनसाठी आणि अन्य उद्योगांसाठी जी काही सवलत दिली जात होती त्या सर्व सवलती सुरु ठेवल्याबद्दल मी शासनास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शासनाने स्वतंत्र गावठाण फिडची योजना राबविलेली आहे. सिंगल फेजींगसाठी 126 कोटी रुपयांची तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मागील वर्षी 10700 गावे तसेच यावर्षी 696 गांवे सिंगल फेजींगमध्ये घेण्यात आलेली आहेत त्यामुळे समाज जीवन निश्चितपणे चांगले होईल अशी खात्री आहे.

सभापती महोदय, रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे तसेच न्यायालयीन इमारतींसाठी 123 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, निफाड तहसिलमध्ये न्यायालयाची इमारत आणि न्यायाधिशांचे निवास्थान तसेच मालेगाव आणि सटाणा या तिन्ही ठिकाणी जास्तीत जास्त निधी देऊन न्यायालयीन इमारती आणि निवासस्थाने बांधण्याची गरज आहे.

सभापती महोदय, रेल्वेबद्दल मला शासनाला धन्यवाद द्यावेसे वाटतात. मनमाड-मालेगाव-धुळे- इंदौर हा जो नाशिकशी जोडणारा रेल्वेमार्ग आहे त्यामध्ये राज्याचा हिस्सा 196 कोटी रुपये मंजूर केलेला आहे. माझी एवढीच मागणी आहे की, आपण सांगितले आहे की, सुरत-पुणे-नाशिक असा जो रेल्वे महामार्ग आहे त्या रेल्वे महामार्गाचे सर्व्हेक्षण पूर्वीच सुरु झालेले आहे त्यासाठी सुध्दा निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी मागणी करतो.

सभापती महोदय, विमानतळासाठी 238 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. मुंबईमधील 14-15 लक्ष पॅसेंजर विमानाचा उपभोग घेत आहे.

सभापती महोदय, नाशिक येथील गांधीनगर आणि एचएलच्या ठिकाणी विमानाच्या ज्या काही सुविधा आहेत त्या सुविधा अपग्रेड करण्याची गरज आहे. गांधीनगर येथील विमानाचा रन-वे अधिक लांब करण्याची गरज आहे तसेच गांधीनगर येथे प्रवासी विमाने उतरवण्यासाठी सोयी उपलब्ध करुन देणे ही काळाची गरज आहे त्यामुळे मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार.....

सभापती महोदय, अनेक चांगल्या योजना या शासनाने राबविल्या आहेत. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, महिला बचत गटासाठी 72.55 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. महिला बचत गटांना चार टक्के दराने जे कर्ज मिळणार आहे त्यासंदर्भातील जीआर मला अजूनही बघावयास मिळाला नाही. त्यामुळे महिला बचत गटांना 4 टक्के व्याजाने पैसे उपलब्ध करुन देण्याचा जीआर त्वरीत काढावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हापरिषदेच्या पदाधिका-यांचा शासनाने बैठक भत्ता वाढविलेला आहे. महिला सरंपच तसेच इतर पदाधिका-यांसाठी एसटीचा प्रवास मोफत करण्यात आलेला आहे, त्याबद्दल शासनाला खास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, तीर्थक्षेत्रांची भूमी आहे. तीर्थस्थळाचा विकास करण्यासाठी शासनाने 100 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. वाशिम येथील पोहरादेवी, अर्धापूर, महाविहार इत्यादी ठिकाणचा विकास करण्यासाठी या निधीचा वापर होणार आहे. माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, श्री श्रेत्र नाशिक आणि श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी तीर्थक्षेत्राच्या दृष्टीने सिंहस्थनगरी आणि कुंभनगरीच्या विकासासाठी खास निधीची तरतूद करुन द्यावी, एवढी या निमित्ताने विनंती करतो.

शेतक-यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले असल्यामुळे या विषयाच्या संदर्भात मी जास्त काही बोलणार नाही. सहकारी साखर उद्योगाच्या निमित्ताने साखर उद्योगाला चांगले प्रोत्साहन शासनाने दिलेले आहे. साखर उद्योगामध्ये घट उतारा किंवा ट्रान्सपोर्ट सबसीडी असेल किंवा निर्यात सबसीडी असेल, को-जनरेशन असेल यासाठी शासनाने चांगल्या प्रकारची भरीव तरतूद केलेली आहे. मागच्या वर्षी शासनाने 276 कोटी रुपये डिस्ट्रीब्यूट केलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ...

त्यामुळे उत्पन्नात घट येत असून आज ऊसाचे उत्पन्न कमी होत चालले आहे. ऊसाची लागवड 30 टक्क्यापेक्षा कमी झालेली आहे. इतर पिकाचे उत्पन्न जरी वाढत असले तरी तेलबियांचे आणि ऊसाचे उत्पन्नसुध्दा कमी झालेले आहे त्यामुळे पुढच्या वर्षी या संदर्भात योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. असे मला सांगावयाचे आहे. आमचे नेते माननीय श्री.शरद पवार हे साखर उद्योगाच्या पाठीशी चांगल्या प्रकारे उभे असून त्यांनी अनेक योजना यासाठी राबविलेल्या आहेत या पुढच्या काळातसुध्दा साखर उद्योगासाठी त्यांचा पाठिंबा मिळाला तर साखर उद्योग टीकेल. तेव्हा या संदर्भात साखर उद्योगाला मदत करण्याच्या दृष्टीने मी राज्य शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, आरोग्याचा अनुशेष काही प्रमाणात असून , राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, जीवन दायी योजना सुरु करण्याचा तसेच कुंत्रा चावल्यास आणि व साप चावल्यास लस मोफत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

. सभापती महोदय, मॉडेल स्कूल, आय.आय.टी. आणि आय.आय.एम. सुरु करण्याचासुध्दा राज्य शासनाने निर्णय घेतला असून त्या प्रमाणे शासनाने ती कार्यान्वित करावी असे मला सांगावयाचे आहे. जो पर्यंत ही कॉलेजेस कार्यान्वित होत नाहीत तोपर्यंत विद्यार्थ्यांना चांगले एक्सलन्स मिळणार नाही.

सभापती महोदय, मौलाना अब्दुल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाची कर्जे माफ करण्यासंबंधी सन्माननीय सदस्या प्रा.फैजिया खान यांनी मागणी केली आहे त्यांच्या मागणीला मी पाठिंबा देतो.

सभापती महोदय, औरंगाबाद येथे हज हाऊस बांधण्यात येणार असून तेथै कॅन्सर हॉस्पिटलसुध्दा बांधण्यात येणार आहे त्याप्रमाणे नागपूर आणि पुणे येथेसुध्दा ते बांधण्यात येणार आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, राज्यात तीन अध्यासने स्थापन करण्यात येणार असून नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन, शिवाजी विद्यापीठात कर्मवीर भाऊराव पाटील अध्यासन आणि पुणे विभापीठात महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतराव चव्हाण अध्यासन स्थापन करण्यात येणार आहे त्याचे मी स्वागत करीत आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ...

सभापती महोदय, अखिल भारतीय मराठा शिक्षण प्रसारक परिषद , पुणे या संस्थेला 100 वर्षे पूर्ण् झाल्याबद्दल शासनाने 2 कोटी रुपयाचे अनुदान दिले त्यबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय,वैद्यकीय शिक्षण, पोषण आहार इत्यादीसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ केली त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पिवळया रेशन कार्डधारकांसाठी सर्व प्रकारच्या योजना राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याचप्रमाणे 20 लाख घरेलू कामगारांसाठी राष्ट्रीय स्वास्थ योजना राबविण्याचे ठरविले आहे त्याचप्रमाणे रोजगार हमी योजनेचे जनक कै.वि.स.पागे जन्मशताब्दी साठी निधी देण्याचे ठरविले असून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने हा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम राज्य शासनाने सुरु करण्याचे ठरविले आहे ते राज्य शासनाला निश्चितपणे भूषणावह आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुणे येथील स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा निर्णय शासनाने घ्ेतला असून तो अभिनंदनीय आहे.

सभापती महोदय, माजी उप मुख्यमंत्री कै. रामराव आदिक यांच्या स्मरणार्थ श्रीरामपूर येथे सभागृह बांधण्यात येणार असून त्यासाठी एक कोटी रुपयाची तरतूद राज्य शासनाने केलेली आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक बांधण्यासाठी 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.ही तरतूद कमी पडेल असे मला वाटते त्यामुळे या कामासाठी जेवढी तरतूद लागेल तेवढी तरतूद करण्याबाबत राज्य शासनाने हमी देणे महत्वाचे आहे. काही नेत्यांनी कारण नसतांना श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्यावर चिखलफेक केली आहे ती अयोग्य आहे. श्री.बाबासाहेब पुरदरे यांचे शिवाजी महाराजांवरील असलेले प्रेम अधिक जोपासण्याची गरज आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार ...

सभापती महोदय, सत श्रेष्ठ तुकाराम महाराज जन्म शताब्दी वर्षाकरिता 434 कोटी रुपयांची, गजानन महाराज समाधीसाठी 65 कोटी रुपयांची , संत तुकडोजी महाराजाच्या समाधीसाठी 30 कोटी रुपयांची तरतूद करण्याचे शासनाने ठरविले आहे ही बाब अभिनंदनास पात्र आहे.

नतंर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार...

सभापती महोदय, टॅक्सेशनच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, तंबाखू, सिगारेट, देशी व विदेशी दारु यावरील कर वाढविण्यात आला आहे. सामाजिक प्रक्रियेमध्ये लोकांनी तंबाखूचे, सिगारेटचे सेवन करु नये, दारुचे सेवन करु नये यासाठी त्यांच्या किंमतीमध्ये वाढ सुचविली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. हे करीत असतांना त्यांनी वाईन इंडस्ट्रीला त्यामधून वगळले आहे. नाशिकला वाईन डिस्ट्रीक्ट म्हटले जाते, त्या जिल्हयाचे वाईन हे कॅपिटल असल्यामुळे वाईनवर आपण कोणताही कर लावलेला नाही, त्याबद्दल धन्यवाद देतो. वाईन इंडस्ट्रीसाठी असलेल्या शेतकऱ्यांच्या द्राक्षाच्या बागांना न्याय देण्यासाठी आपण हा विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, स्टेथस्कोप, डायलेसिस युनिट या वैद्यकीय उपकरणांवरील कर 12.5 टक्क्यावरुन 4 टक्के इतका कमी केल्याबद्दल मी मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे आपल्या भगिनींना दिलासा देण्यासाठी गॅस शेगडीवरील कर कमी केला आहे. तसेच, अगरबत्ती, नकली दागिने यांच्यावरील कर कमी केला आहे. त्याबद्दल मी मंत्रिमहोदयांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आपल्या आर्थिक पहाणी अहवालामध्ये दारिद्रयाचे प्रमाण वाढत आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या 12.5 टक्क्यांनी वाढली आहे. यापुढील काळात जातीनिहाय समाज रचना जाऊन पुढे मागे फक्त श्रीमंत व गरीब असे दोनच वर्ग शिल्लक राहतील. त्यामुळे श्रीमंत व गरीब यामधील दरी कमी करण्यासाठी या कल्याणकारी राज्याने चांगली भूमिका घेऊन सर्वसामान्य माणसासाठी, आम जनतेसाठी काम करावे एवढीच विनंती करतो. त्यादृष्टीने माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, तंत्र शिक्षण विभागामध्ये 40 कोटींचा अनुशेष दाखविण्यात आला आहे. सभापती महोदय, संपूर्ण शिक्षण क्षेत्राचा अनुशेष आपण कॅलक्युलेट केला तर तो 4 हजार कोटी सुध्दा कमी पडेल अशी परिस्थिती आहे. आणि म्हणून याठिकाणी कायम विना अनुदानित यामधील "कायम" हा शब्द काढून आपण संस्थांना अनुदान दिले पाहिजे. सभापती महोदय, तंत्र शिक्षण विभागामध्ये आय.टी.आय., आय.टी.सी. मधील शिक्षकांना स्टेपवाईज अनुदान देऊन पगार देण्याचे मान्य केले होते. याबाबत मी सांगू इच्छितो की, आय.टी.सी. च्या सर्व शिक्षकांना 5 वर्षे सेवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाल्यानंतर 50 टक्के, त्यानंतर 75 टक्के आणि शेवटी 100 टक्के असे वेतन अनुदान द्यावे अशी विनंती करुन व माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

(यानंतर श्री. तालेवार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन (विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मैं वर्ष 2009-10 के बजट पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. सबसे पहले तो मैं वित्त मंत्री महोदय का अभिनंदन करती हूं, क्योंकि उन्होंने इस बजट के माध्यम से आम आदमी को राहत दी है. इस बात पर आम आदमी की जय हो. इसका मतलब यह है कि आम आदमी जो हमेशा महंगाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार का विरोध न करते हुए शोषण सहता जाता है, उस आम आदमी को केन्द्र बिन्दु बनाकर वित्त मंत्री जी ने यह बजट पेश किया है. इस बजट के माध्यम से वित्त मंत्री जी ने आम आदमी को अनेक योजनाओं के माध्यम से मदद की है ताकि आम आदमी अपने पांव पर खड़ा रह सके. इसी बात के लिए मैं वित्त मंत्री जी का अभिनंदन करती हूं. यहां इस सदन में सभी माननीय सदस्यों ने इस बजट पर अपने अपने विचार व्यक्त किए हैं और कुछ सुझाव दिए हैं. मैं उस विषय पर फिर से अपने विचार यहां उपस्थित न करते हुए दूसरे अन्य विषयों के संबंध में अपने विचार पेश करुंगी. महाराष्ट्र सरकार ने गरीब किसानों, गरीब आदिवासियों और अन्य गरीब तबकों को सहायता दी है, उनके कर्ज माफ किए हैं. उसी प्रकार से महिलाओं के लिए, महिला बचत गटों के लिए योजनाएं बनाई है. उसी प्रकार से सिंचाई, और सिंचाई का अनुशेष दूर करने के लिए योजनाएं बनाई है, बिजली उत्पादन बढ़ाने के लिए योजनाएं बनाई है, कृषि विकास के लिए कदम उठाए हैं, रास्तों, पुलों, मकानों के निर्माण के लिए योजनाए बनाई हैं, ग्रामीण विकास, नगर विकास, स्वास्थ्य सुविधाओं की वृध्दि के लिए योजनाएं बनाई है, पर्यटन क्षेत्र के विकास और तीर्थ क्षेत्रों के विकास के लिए जो कदम उठाए हैं तथा बजट में धनराशि का प्रावधान किया है, उसके लिए मैं वित्त मंत्री जी का और इस सरकार का अभिनंदन करती हूं.

सभापति महोदय, मैं इसके साथ ही साथ एक विषय की ओर सरकार का ध्यान खींचना चाहती हूं कि सभी वर्गो का और सभी क्षेत्रों का बराबर विकास होना चाहिए. एक दीर्घकालीन आर्थिक नीति के अन्तर्गत सभी क्षेत्रों का विकास होना जरुरी है. आज हमारे राज्य के सामने अर्बनाईजेशन की बहुत बड़ी समस्या है. ग्रामीण क्षेत्रों से लोग शहर में आकर बसते जा रहे हैं जिसके कारण शहरों में कई समस्याएं पैदा हो गई हैं, जैसे कि जल समस्या, मकान की समस्या, ट्रैफिक की समस्या, प्रदूषण की समस्या, ड्रेनेज की समस्या इत्यादि. चाहे वह मुंबई शहर हो, पुणे शहर हो, नागपुर शहर हो, ये सारी समस्या शहरों में पैदा हो रही है. विकास के दौरान कुछ

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन ....

शहरों का विकास होता है और कुछ शहर विकास में पिछड़ जाते हैं. इसी लिए मैं यह कहना चाहती हूं कि सभी क्षेत्रों का सर्वांगीण विकास होना चाहिए. अन्य क्षेत्रों की तुलना में कोंकण और खानदेश ये क्षेत्र कम विकसित हुए हैं.विशेष रुप से खानदेश कम विकसित हुआ है. इसलिए इन जैसों क्षेत्रों का विकास करने के लिए बड़े कारखाने स्थापित किए जाए और उन कारखानों को विशेष सुविधाएं दी जाए. जिस प्रकार से गुजरात में कारखाना खोलने के लिए वहां की सरकार विशेष सुविधा देती है, उसी प्रकार से महाराष्ट्र सरकार द्वारा भी सुविधाएं देनी चाहिए. जैसा कि आपको मालूम है कि पश्चिम बंगाल में स्थापित टाटा ने अपना नॅनो मोटर का प्रकल्प रद्द करके गुजरात में स्थापित किया. टाटा ने यह प्रकल्प महाराष्ट्र में स्थापित क्यों नहीं किया, उन कारणों पर ध्यान देने की जरुरत है. हमें यह विचार करने की आवश्यकता है कि उद्योगों के संबंध में किस प्रकार की नीति बनानी चाहिए ताकि महाराष्ट्र में बड़े कारखानों को आकर्षित कर सके. हमारे राज्य में सी और डी श्रेणी के जो पिछड़े क्षेत्र हैं, वहां उद्योगों के अनुकूल नीति अपनाई जानी चाहिए. ऐसे क्षेत्रों में कारखानों को विशेष सुविधा देकर उन क्षेत्रों का विकास करने के लिए कोई नीति अपनाई जानी चाहिए ताकि अर्बनाईजेशन से पैदा हुई समस्या हल हो सके. सम्माननीय सदस्य श्री गुजराथी और श्री रघुवंशी जी ने यहां खानदेश के लिए पॅकेज देने की बात कही है. मैं उसका समर्थन करती हूं. मैं खानदेश के विकास के लिए यह भी सुझाव देना चाहती हूं कि जिस प्रकार से विदर्भ, मराठवाड़ा के लिए वैधानिक विकास मंडल गठित किए गए हैं तथा शेष महाराष्ट्र के लिए वैधानिक विकास मंडल बनाए गए हैं उसी प्रकार से खानदेश के लिए अलग से वैधानिक विकास मंडल गठित किया जाना चाहिए. जब हम गरीबी रेखा से नीचे के लोगों के विकास की बात करते हैं तो मैं यह कह सकती हूं कि इन क्षेत्रों में रहने वाले लोग ज्यादा गरीब है. सरकार ने विदर्भ और मराठवाड़ा का विकास करने के लिए वैधानिक विकास मंडल का गठन किया है लेकिन विकास के संबंध में खानदेश निग्लेक्ट हुआ है. इसलिए खानदेश के विकास को ध्यान में रखते हुए खानदेश के लिए अलग से वैधानिक विकास मंडल गठित किया जाए और तब तक खानदेश के लिए विशेष खानदेश पॅकेज दिया जाए, जिसके द्वारा खानदेश का सर्वांगीण विकास हो सके.

अशोधित प्रति / शोधित प्रति नहीं

श्रीमती मधु जैन .....

सभापति महोदय, उसी प्रकार से जो प्रोजेक्ट पूर्ण नहीं हुए हैं ऐसे अधूरे प्रोजेक्ट पूर्ण किए जाए. विशेष रुप से सिंचाई के जो प्रोजेक्ट अधूरे रह गए हैं, उन प्रोजेक्ट को पूरा करने के लिए विशेष ध्यान देने की जरुरत है.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार की योजनाओं की जानकारी सामान्य लोगों तक नहीं पहुंचती है. इसलिए मेरा यह सुझाव है कि सरकार की योजनाओं की संपूर्ण जानकारी देने के लिए वेबसाईट बनाई जाए जिससे इस वेबसाईट के द्वारा सभी लोगों को जानकारी उपलब्ध हो सकेगी. सरकार ने कौनसी योजनाएं शुरु की है, उन योजनाओं के लिए कितनी धनराशि का प्रावधान किया है, उन योजनाओं के लाभार्थी कौन होंगे, किस जिले के लिए कितनी धनराशि का प्रावधान किया गया है, बजट में किस योजना के लिए कितनी धनराशि का प्रावधान किया गया है, कितनी धनराशि किस योजना पर खर्च की गई है, कितनी बाकी है, योजनाओं की वर्तमान स्थिति क्या है, ये सारी जानकारी वेबसाईट पर उपलब्ध कराई जानी चाहिए. वेबसाईट की सुविधा प्रदान करने से सरकार के कामकाज में पारदर्शकता आएगी और जनता का सरकार पर अंकुश भी रहेगा. यह वेबसाईट समाज के लिए और विकास के लिए उपयोगी होगी. इस कार्य के लिए एक कमेटी बनाई जाए जो एक अच्छी वेबसाईट बना सके. इस प्रकार की वेबसाईट के बन जाने के बाद अगर कोई व्यक्ति पर्यटन संबंधी योजना की जानकारी जानना चाहता है कि किस क्षेत्र के पर्यटन स्थल के लिए धनराशि का प्रावधान किया गया है तो निश्चित ही उसे ये सारी जानकारी वेबसाईट से मिल सकेगी.

सभापति महोदय, इस अवसर पर मैं यह भी बताना चाहती हूं कि मुझे ऐसा लगता है कि कुछ चीजों की वजह से घाटा बढ़ सकता है. क्योंकि 29 हजार करोड़ रुपये की वसूली का अंदाज था. प्लान 28 हजार 440 करोड़ रुपये का है. आगामी समय में इस अंदाज को ध्यान में रखा जाए. अगर आर्थिक मंदी का प्रभाव जारी रहेगा तो रेवेन्यू से अच्छी आमदनी नहीं हो सकेगी. उत्पादन शुल्क से कम आय हुई है. मोटर वाहन कर से कम आमदनी हुई है. केन्द्र सरकार से कम सहायता आई है. इसलिए मैं यह कहना चाहती हूं कि इस ओर ध्यान दिया जाए कि घाटा में वृध्दि न हो पाए. आज विश्व में मंदी छाई हुई है. इस विश्व मंदी के दौर में उद्योगों को ज्यादा से

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन .....

ज्यादा प्रोत्साहन दिया जाए. औद्योगिक घटकों के लिए वर्ष 2008-09 में 467 करोड़ रुपये दिए गए थे लेकिन वर्ष 2009-10 में केवल 400 करोड रुपये दिए गए हैं. इस तरह से कम धनराशि का प्रावधान किया गया है. प्रावधान कम नहीं किया जाना चाहिए. क्योंकि उद्योगों पर विश्व मंदी का असर पहले से ही पड़ा हुआ है. कुछ महामंडलों को आर्थिक सहायता दी गई है. लेकिन कुछ जगह उत्पादन कम हुआ है. 300 करोड़ रुपये की तरतूद की गई थी लेकिन 700 करोड़ रुपये खर्च हुए हैं. अन्न-धान्य उत्पादन पर 255 करोड़ रुपये की तरतूद की गई थी लेकिन 557 करोड़ रुपये खर्च हो गए हैं. इसलिए मुझे घाटा बढ़ने का डर लगता है. इस ओर विशेष ध्यान देकर घाटे को रोका जा सकता है. सार्वजनिक वितरण व्यवस्था के अन्तर्गत 49258 राशन दुकानों की जांच हुई है. जांच के दौरान 5950 राशन दुकानों में मिसएप्रोप्रिएशन ऑफ फंड और धोखाधड़ी के मामले प्रकाश में आए हैं. इनमें से 906 मामलों में कार्रवाई हुई है. शेष मामलों में कार्रवाई नहीं हुई है. इसलिए मैं यह जानना चाहती हूं कि क्या सरकार इतने गंभीर मामलों के बारे में कुछ करने वाली है ? बोगस राशन कार्ड के मामलों की जांच होनी चाहिए.

सभापति महोदय, अंत में इतना ही कहूंगी कि, रेन वाटर हॉर्वेस्टिंग पर ध्यान दिया जाना जरुरी है. सिंचाई के संबंध में ध्यान दिया जाना जरुरी है. जल की सतह नीचे जा रही है, उस ओर ध्यान देने की जरुरत है. इसमें कोई शक नहीं है कि राज्य सरकार का यह बजट अच्छा है. लेकिन सभी क्षेत्रों के विकास की ओर ध्यान देना जरुरी है. मैं फिर से यह कहना चाहूंगी कि खानदेश के लिए वैधानिक विकास मंडल गठित किया जाए और तब तक खानदेश के लिए विशेष पॅकेज दिया जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

.....

इसके बाद श्रीमती दराडे का भाषण

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीकार नोंद

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी सभागृहासमोर मांडलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये ज्यांच्या नावाने आदराने मान खाली झुकते अशा स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या सह्याद्रीचे वारे या पुस्तकातील काही ओळी या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने मला वाचून दाखवावयाच्या आहेत. त्याचा आपण गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. या पुस्तकामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "लोककल्याणकारी राज्य निर्माण करणे आणि समाजाच्या सर्व थरामधील सर्व प्रकारची विषमता नष्ट करणे हे जे आमचे अंतिम ध्येय आहे त्याच्याकडे जाण्याचा एक निश्चित असा मार्ग या अर्थरचनेमुळे तयार होतो आणि या मार्गावरील आमच्या वाटचालीमध्ये होत असलेली प्रगती हीच आमच्या योजनेच्या यशस्वीतेची खरी कसोटी आहे." याच पुस्तकामध्ये दुसऱ्या ठिकाणी स्व. चव्हाण साहेबांनी अर्थसंकल्प सादर करीत असताना आपण कसे जमिनीवर असले पाहिजे याबाबतीमध्ये स्वत:च्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, "आपणाला असेच नियोजन करावयाचे आहे की, जे व्यवहारात बसू शकेल आणि हाच प्रश्न फार महत्वाचा आहे. आम्हाला आकाशात भराऱ्या मारावयाच्या नाहीत. परंतु आम्हाला जमिनीवर चालावयाचे आहे आणि येथे टिकायचे आहे आणि त्याचबरोबर जमिनीवरुन टेकऑफ उड्डाण कसे करता येईल इकडे आमची सतत दृष्टी राहिली पाहिजे." अशा प्रकारची भावना या ठिकाणी स्व. चव्हाण साहेबांनी व्यक्त केलेली आहे. या भावना मी सभागृहामसेर यासाठी व्यक्त करीत आहे की, नियोजनाच्या संदर्भामध्ये ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याच्याशी सुसंगत राहून आपण हा अर्थसंकल्प या ठिकाणी मांडतो किंवा नाही याचे विश्लेषण झाले पाहिजे. दुसऱ्या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त करताना अजून एकदा स्व. चव्हाण साहेब असे म्हणाले आहेत की, "खेड्यामध्ये बिजली नेऊन पोहोचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे त्यातही शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही आणि या शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वत:चा दृष्टीकोन असा आहे." मी या ठिकाणी या ओळी मुद्दाम यासाठी उद्धृत केलेल्या आहेत की, एक विषय निघाल्याबरोबर काही सन्माननीय सदस्य हसले. सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

डॉ. वसंत पवार यांनी कायम विनाअनुदानितमधील 'कायम' हा शब्द काढून टाकण्याचा विषय या ठिकाणी उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. मला या सभागृहाला विनंती करावयाची आहे की, ज्या पध्दतीने आपण सिंचनावर भर देतो, ज्या पध्दतीने आपण आरोग्यावर भर देतो, ज्या पध्दतीने आपण रस्ते करण्याचा प्रयत्न करतो त्याच पध्दतीने या महाराष्ट्रामध्ये ही जी माणसांची बौद्धिक संपत्ती आहे तिचा वापर जर आपण करुन घेतला नाही तर भविष्यकाळ आपल्याला माफ करणार नाही. जग आर्थिक मंदीकडे जात असताना आपण त्याच्यापासून फार दूर राहू शकू असे मला वाटत नाही. केवळ सरकारी क्षेत्र समर्थ होऊन चालत नाही तर योजना खालच्या माणसांपर्यंत किती पोहोचलेल्या आहेत याचाही आपल्याला आढावा घेणे फार गरजेचे असते. कृषी क्षेत्राच्या अनुषंगाने मला या ठिकाणी केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदचंद्रजी पवार यांचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल. केंद्र सरकारने ज्या पध्दतीने अर्थक्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढवली आणि कृषी क्षेत्रामध्ये विकासाचा जो दर वाढला त्या राष्ट्रीय उत्पन्नाचा परिणाम महाराष्ट्रावर सुध्दा झाल्याशिवाय राहणार नाही. शेती मालाला भाव देण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने केला. दोन वर्षापूर्वीच आपल्याला गहू आयात करावा लागला होता. परंतु मागच्या वर्षीच्या कृषी धोरणामुळे आणि शेतकऱ्यांना दिलेल्या आधारभूत किंमतीमुळे आपल्या देशामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर धान्याचा साठा निर्माण झाला की, बाहेरच्या काही राष्ट्रांना आपण गहू देऊ शकलो आणि त्याचा फायदा महाराष्ट्रालाही दरडोई उत्पन्न वाढण्यामध्ये निश्चितपणे झालेला आहे. केंद्र सरकारचे खताबाबतचे धोरण आणि शेतीबाबतचे धोरण, सेंद्रीय शेतीबाबतचे धोरण, फळबागांबाबतचे धोरण या सर्व धोरणांचा फायदा महाराष्ट्र राज्यालाही झालेला आहे. निश्चितपणे या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये या योजना यशस्वीपणे राबविण्याचा प्रयत्न करुन त्याला पूरक अशा प्रकारची अर्थसंकल्पीय तरतूद आपल्या अर्थसंकल्पात सतत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणूनच मला याठिकाणी सांगावेसे वाटते की, स्व.यशवंतरावजी चव्हाण यांना अपेक्षित असलेले जे नियोजन आहे त्या पध्दतीने पाऊल टाकण्याचा निश्चितच आपण विचार करीत आहोत. आणि आपण यशस्वीपणे पुढे जात आहोत. उत्पादन वाढीसाठी जी गोष्ट कल्याणकारी असेल आणि लोकशाही विचारांच्या कल्पनेला ते बाधक नसेल तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

ते मान्य करण्यास काही हरकत नाही. या ठिकाणी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना माननीय वित्तमंत्र्यांनी विनंती केल्यानंतर, माननीय सभापतींनी विनंती केल्यानंतर या अर्थसंकल्पातील ज्या बाबी आहेत, ज्या खऱ्या अर्थाने कल्याणकारी योजना आहेत त्या सर्व कल्याणकारी योजनांचे स्वागत विरोधी पक्षाकडून होणे गरजेचे होते आणि ज्या त्रुटी आहेत त्यावर देखील त्यांनी चर्चा करायला हरकत नव्हती. आम्ही जरी सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य असलो तरी काही त्रुटींच्या बाबतीत या ठिकाणी स्पष्टपणे बोलण्यास मागेपुढे पाहात नाही. त्याचे कारण असे की, फक्त समर्थन करण्यासाठी नव्हे तर महाराष्ट्राचे प्रश्न सोडविण्यासाठी या सभागृहामध्ये आम्ही आलो आहोत. परंतु आज या लोकशाहीच्या या पायंड्याला विरोधी पक्षामुळे खीळ बसलेली आहे आणि त्याविषयी मला या ठिकाणी खंत करावीशी वाटते. योजनेसाठी लागणारा पैसा कोठून मिळणार हा प्रश्न नेहमी असतो. तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असताना आपण काही बाबतीत कर लावण्याचा तसेच काही बाबतीत कर कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. माननीय अर्थमंत्री पुन्हापुन्हा घड्याळाकडे बघत आहेत त्यामुळे मला फार बोलण्याची इच्छा नाही. मी माझ्या सर्व नोट्स बाजूला ठेवलेल्या आहेत. फक्त दोन तीन गोष्टी मला सांगावयाच्या आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

इतक्या विचलित झालेल्या वातावरणात मी फार बोलू शकेन असे मला वाटत नाही. मी न बोलण्याचा निर्णय घेतला होता तो योग्य होता असे मला वाटते. पण 2-3 गोष्टी सांगणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितल्याप्रमाणे मौलाना अब्दुल कलाम आझाद आर्थिक महामंडळाचे कर्ज माफ करावे अशी सूचना केली आहे त्याला माझा पाठिंबा आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यातील इतर महामंडळामार्फत भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांनी कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे महामंडळांमार्फत दिलेले कर्ज माफ करणे गरजेचे आहे. या विषयाकडे गांभीर्याने लक्ष घालावे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये श्री.शरद पवार हे मुख्यमंत्री असताना 1994 साली महिलांसाठी धोरण जाहीर केले होते. त्या धोरणाचा दर तीन वर्षांनी आढावा घ्यावयाचा असतो. परंतु त्याचा आढावा घेतला जात नाही. त्यासाठी शासनाने प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे राज्यातील युवकांसाठी धोरण जाहीर करावे. हा युवक उद्याचा महाराष्ट्र घडविणार आहे, आर्थिक मंदीच्या काळात जगाला सामोरे जाणार आहे. अशाप्रकारची मी मागणी करते. 2002 पर्यंतच्या मानव विकास निर्देशांकाची आपल्याकडे नोंद आहे. 2009 पर्यंतच्या मानव विकास निर्देशांकाचा अहवाल शासनाने मागवावा. त्यासाठी शासनाने विशेष तरतूद करावी अशी मी वारंवार मागणी केलेली आहे व त्याचा पुनरुच्चार करीत आहे.

सभापती महोदय, सभागृहात थोडया वेळापूर्वी सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुरुपसिंग नाईक हे उपस्थित होते. ऊस तोड कामगारांच्या पाल्यांना शाळा द्यावयाच्या नाहीत, अशाप्रकारचा जो जी.आर. आहे त्या विषयी मी अनेक वेळा बोलले आहे. सन्माननीय मंत्री महोदय श्री.सुरुपसिंग नाईक यांनी त्याबाबतच्या फाईलवर सही केली असून ही फाईल सध्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे प्रलंबित आहे असे कळते. त्याबाबत लवकरात लवकर शासनाने निर्णय घ्यावा अशी विनंती करते.

सभापती महोदय, मराठवाडयातील सिंचनाचा अनुशेष कमी झाला आहे असे कसे म्हणता येईल, कागदोपत्री अनुशेष कमी झाला असेल. शासनाने जे पाझर तलाव मंजूर केले ते सध्या नादुरुस्त आहेत, त्यात पाणी नाही. पाटबंधारे तलाव दिले त्यात गाळ आहे. त्यातील पाणी वाहून

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

जात आहे. म्हणून तलावांची उंची वाढविण्याचे काम करण्यात आले. परंतु शासनाने भूसंपादनाचा मोबदला अजून दिलेला नाही. सिंदफणा तलावात पाणी नाही, बाभळगाव तलावात पाणी नाही, मोहयामध्ये पाणी नाही. मराठवाडयातील सिंचनाच्या अनुशेषासंबंधी विरोधी पक्षाच्यावतीने मागणी केलेली आहे. ही चर्चा घेण्यात येईल त्यावेळी मी जरुर बोलेन. या अर्थसंकल्पावर बरेच बोलण्याची इच्छा होती. परंतु वेळेअभावी मला बोलता आले नाही. बोलावे असे वातावरण दिसत नसल्यामुळे मी या अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते.

तालिका सभापती (श्री.हेमंत टकले) : सन्माननीय वित्तमंत्री या चर्चेला उद्या उत्तर देणार आहेत.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ व कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. III OF 2009.

(A BILL FURTER TO AMEND THE YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY ACT,1989, THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT,1989, THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT,1994 AND THE KAVI KULAGURU KALIDAS SANSKRIT VISHVAVIDYALAYA (UNIVERSITY) ACT,1997.)

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 3 यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, 1989, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 आणि कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, 1997 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शिघ्रलेखासाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला एकच मुद्दा मांडावयाचा आहे. यामध्ये अशी एक तरतूद आहे की, ॲकेडेमिक कौन्सिल आणि एक्झीक्युटीव्ह कौन्सिल या दोन कौन्सिल एकत्र करुन सिलेक्शन कमिटीवर एक नाव द्यायचे आहे. तेव्हा या दोन्ही कौन्सिलची एकत्र मिटींग घेणे हे प्रॅक्टीकली डिफिकल्ट आहे. तेव्हा यातून आपण कसा काय मार्ग काढणार आहात याचा खुलासा करावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की आपण या पूर्वी युनिव्हर्सिटीच्या सर्च कमिटीमध्ये नॉमिनी घेत होतो त्यासंदर्भात काही निकष ठरविलेले नव्हते. आता आपण असे स्पष्ट निकष ठरवित आहोत. ॲकेडेमिक कौन्सिल आणि मॅनेजमेण्ट कौन्सिल या दोघांचे प्रतिनिधी सर्च कमिटीवर पाठविण्याच्या संदर्भातील प्रोसिजर डिटेलमध्ये दिलेली आहे. या दोन्ही कौन्सिलच्या मिटींग व्हाईस चॅन्सलरने बोलावून आणि त्यामध्ये चर्चा करुन आणि आवश्यकता असेल तर निवडणूक पध्दतीने ज्याला अधिक मते मिळतील असाच प्रतिनिधी सर्च कमिटीवर जाईल अशा प्रकारच्या सुस्पष्ट डायरेक्शन्स आपण देणार आहोत. तेव्हा हे विधेयक विचारात घेण्यात यावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री. हेमंत टकले) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 18 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 3 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2009 चे वि.प.वि. क्रमांक 3 संमत झाले आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील दोन अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. त्या उद्या घेण्यात येतील.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 10.6.2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 4 मिनिटांनी बुधवार, दिनांक 10.6.2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही